
मुसाफिर
हूं
यारों
नितांत
पेडणेकर

मुसाफ़िर हूं यारों

गेल्या ५० वर्षांतील माझे प्रवासाचे अनुभव

लेखक

नितांत पेडणेकर

<u>प्रवासवर्णन</u>

मुसाफ़िर हूं यारों

गेल्या ५० वर्षातील माझे प्रवासाचे अनुभव

प्रवासवर्णन- ई बूक आवृत्ती

लेखक

नितांत पेडणेकर

402 धवलगिरी को. ऑ. हौ. सोसायटी अशोकवन बोरिवली पूर्व मुम्बई 400066

ई-मेल nitant.pednekar@gmail.com

भ्रमणध्वनी क्र. 9870310961

व्हाटसप्प क्र. 9870310961

मुखपृष्ठ- अनित पेडणेकर

आवृत्ती:- जानेवारी 2022

या पुस्तकातील लेखनाचे सर्व हक्क अनुवादिकेकडे सुरक्षित असून पुस्तकाचे किंवा त्यातील अंशाचे पुनर्मुद्रण वा नाट्य, चित्रपट किंवा इतर रुपांतर करण्यासाठी अनुवादिकेची परवानगी घेणे आवश्यक आहे. तसे न केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

This declaration is as per the Copyright Act 1957 read with Sections 43 and 66 of the IT Act 2000. Copyright protection in India is available for any literary, dramatic, musical, sound recording and artistic work. The Copyright Act 1957 provides for registration of such works. Although an author's copyright in a work is recognised even without registration. Infringement of copyright entitles the owner to remedies of injunction, damages and accounts.

प्रकाशन : ई साहित्य प्रतिष्ठान

www.esahity.com

esahity@gmail.com

Whatsapp- 9987737237

प्रकाशन : २४ फ़ेब्रुवारी २०२२

©esahity Pratishthan®2022

- विनामूल्य वितरणासाठी उपलब्ध .
- आपले वाचून झाल्यावर आपण हे फ़ॉरवर्ड करू शकता .

हे ई पुस्तक वेबसाईटवर ठेवण्यापूर्वी किंवा वाचनाव्यतिरिक्त कोणताही वापर करण्यापूर्वी ई प्रतिष्ठानची लेखी परवानगी घेणे आवश्यक आहे.

या सर्व घटना खऱ्या आहेत. फक्त यातील व्यक्तींची नावे बदलण्यात आली आहेत. तरी कोणाच्या भावना दुखावल्या गेल्या तर, आधीच माफी मागतो. तुम्हाला हे मनोरंजक वाटेल अशी आशा करतो.

प्रिय

कै शिरीष पेडणेकर (वडील), कै अंजली पेडणेकर (आई), कै बनीमावशी, कै अलकाकाकी, कै अण्णाकाका, कै सुषमाताई (चुलत बहीण) कै. संदेश राव (लहानपणीचा मित्र), कै राजेंद्र पडते (लहानपणीचा मित्र), कै **अनंत माळी** (लहानपणीचा मित्र), कै **शेखर** (बी. एड. सहकारी), कै **प्रदीप महाजन**, कै सूर्यकांत चव्हाण (शिक्षक सहकारी) , कै अक्षय (पुतण्या) यांनी व ज्या कुटुंबीयांनी **अभयदादा** (भाऊ), **विनीत** (भाऊ), **आरती** (पत्नी), **अनित** (मुलगा), अनिताकाकी, **विजुदादा** (चुलतभाऊ), **आशिष** (चुलतभाऊ), **श्रद्धा** (चुलतबहीण), शमू (चुलत चुलत बहीण), सुनील (चुलत मेहुणा), **रमेशभाई** (चुलत चुलत भाऊ), सुहासभाई, सुरेशभाई (चुलत चुलत भाऊ), प्रकाशकाका, अरविंदकाका, इंदुमावशी, स्मितावहीनी, **साधना** (वहिनी), **अपूर्वा** (धाकटी वहिनी), मेघना (चुलतवहिनी), संतोष (चुलत मेहुणा) व ज्या लहानपणीच्या मित्रांनी **रमेश, बब्बी, दीपक, उज्जू**, सुबोध, अतुल, नितीन, **व्यंकटेश, धर्मीन**, बेबी, **आशिष गोलतकर**, प्रतिमा, वाय एम सी ए चे मित्र अनिश, सुहास, **हेमंत**, महाविद्यालयीन मित्र- जयेश, अनिल, पत्रकारीता महाविद्यालयातील मित्र **राजू**, छात्रभारतीचे मित्र संतोष, **दीपक, रमेश**, अंजु, मीनाक्षी, बी. एड. चे

मित्र- मिलिंद, **गणेश**, शाळेतील शिक्षक सहकारी **रवींद्र, हितेंद्र,** पितांबर, चितळे, **सुधीर, सोपान, विलास, उल्हास**, अमृत, **देवीदास**, झगडे, गोयाजी, थोरल्या भावाचे पाहुणे **प्रशांत**, मिलिंद व पत्नीचे नातेवाईक- दीप्ती (मेहुण्याची पत्नी), सासू, **रुपाली** (मावस मेहुणी), पाटील काका, आनंद शेडगे (सांडूबंधु), दत्ता (रुपालीचा चुलतभाऊ) आनंद झरेकर (मावस मेहुणा), माई (मावस मेहुणी), भारती (मावस मेहुणी), दिवाकर (सांडूबंधु), **सुखदेव** (सांडूबंधु), धाकट्या भावाचे पाहुणे- अपूर्वाची आई, हेमंत, संदेश, धाकट्या भावाचा मित्र अजय, अनीता (त्याची पत्नी), **म्हात्रेसर**, प्रीती (मानसी उद्योग सहकारी), संकेत पाटील (वायंगणीच्या मित्राचा मुलगा) या सगळयांनी व ज्यांचा उल्लेख अनवधानाने राहून गेला त्या सर्वांनी इतक्या वर्षांच्या वेगवेगळया प्रवासात माझी साथ दिल्याबद्दल हे पुस्तक मी तुम्हाला अर्पण करतो.

मनोगत

लहानपणापासुन मी एक अबोल मुलगा! कोणी पाहुणे घरी आले तर मी घरातुन पळून जायचो. लोकाना वाटायचे आम्हा 3 भावंडापैकी आईला फक्त दोनच मुले आहेत. पाहुण्यांच्या मते मी अस्तित्वातच नव्हतो. पण पुस्तकातला कीडा! एका चुलतभावाच्या घरी सत्यनारायण पूजेला गेलो असताना 'स्वामी' कादम्बरी अर्धी वाचुन काढली होती. यंत्रापासुन तंत्रापासुन कोणताही विषय निषिद्ध नव्हता. याला कारण माझे वडील. लहानपणापासुनच आम्हाला किशोर, टारझन, बिरबल या मासिकांची सवय त्यानी लावली. मी मराठी माध्यमाचा. तरी इंद्रजाल कॉमिक्स 'फ़ॅन्टम (चालता बोलता वेताळ), मॅन्ड्रेक' 'गोर्थ' ई० पहिलीपासुन इंग्रजीतली पुस्तके आणुन दिली. पहिली ते चौथी ते आम्हाला पुस्तक वाचून दाखवायचे. पाचवीत अर्थ सांगणे बंद केले. वाचल्याशिवाय गत्यंतर नव्हते. इंग्रजीची आवड लागली. हिंदीतील प्रेमचंदांच्या कथा वाचल्या. 'राग दरबारी'ने प्रभावित केले. सुट्टीत नाथमाधवांची 'वीर धवल', 'सोनेरी टोळी' इत्यादी० कादम्बया वाचल्या. नववीत 'म्रुत्युंजय' मुखोद्गत झाले. नंतर 'राधेय', 'पहिला कौंतेय', 'कर्ण खरा कोण होता'? दहावीत. चम्पक मात्र मोठेपणी वाचले. चांदोबा रद्दीच्या दुकानातुन चाराण्याला विकत घेउन वाचले. 18 पुराणे (माझ्या मावशीकडे होती.) रामायण, महाभारत, हनुमान चालीसा कथा (आमच्या शेजारच्यांच्या घरी) ई० लहानपणीच वाचले. ताम्हणकरांचा 'गोट्या', 'चिंगी' वाचुन झाली, भा रा भागवत यांची 'फास्टर फेणे'ची सर्व पुस्तके वाचुन झाली.

थोरला भाऊ मॅट्रीकच्या शेवटच्या तुकडीत असल्याने त्याला अभ्यासक्रमाला असलेले ‘छावा’, ‘रायगडाला जेव्हा जाग येते’ ‘एकच प्याला’ ‘बेबंदशाही’ वाचुन झाले होते. धाकटा भाऊ इंग्रजी माध्यमाला असल्याने त्याला इंग्रजी रीडर म्हणुन असलेली ‘ट्वेंटी थौजंड लीग्स अंडर द सी’, ‘टॉम सॉयर’, ‘हकीलबरी फीन्स’, जेम्स लेन, ‘ज्युल्स व्हर्न’ची सर्व पुस्तके वाचली. नववीत असताना जेम्स हार्डली चेसची ‘बोटल नेक मर्डर’ सकट सगळी पुस्तके वाचायचो. त्याचे कव्हर अश्लील चित्राचे असायचे. आईला राग यायचा. मग वडीलानी आईला समजावले होते की आत तसे काही नसते. ‘ॲस्टेरीक्स ॲण्ड ऑबेलीक्स’, ‘टिंनटीन’, ‘आर्चीज’च्या चित्रकथा वाचल्या. या महाग होत्या, त्या चारबंगलाच्या वाचनालयात वाचल्या. तेव्हा बाबुराव अर्नाळकरच्या ‘गरूड’ ‘काला पहाड’ ‘धनंजय’ ‘तिरंदाज’ वैगेरे, बाबा कदम यांच्या कादम्बऱ्या वाचायचो. व.पू. काळे माझ्या वडीलांचे मित्र असल्याने त्यांच्या सर्व कथा प्रकाशित झाल्या झाल्या वाचल्या. पु.ल. देशपांडेची सर्व पुस्तके वाचलीत. शोलेच्या संवादाचे पुस्तक, वीणा गव्हाणकर यांची ‘एक होता कार्वर’, संजय सोनवणी यांची ‘असुरवेद’ वाचली. रणजीत देसाई यांचे ‘शेकरा’ वाचले. डॉ. ना. य. डोळे यांचे ‘नवहिंदुत्वाची व्याघ्रमुद्रा’, निनाद दिवाळी अंक (2020), सकाळ शब्ददीप दिवाळी अंक (2020), चतुरंग (2020), अकल्पित दिवाळी अंक (2020), प्रपंच दिवाळी अंक (2020), नवल दिवाळी अंक (2020), ‘शालिवाहन शक’ गो ना दातार यांची कादंबरी, ययाती, ‘वस्त्रहरण’ मालवणी नाटक, विनीत बाजपाई यांचे ‘काशी’, ‘प्रलय’, अमिश त्रिपाठी यांचे ‘शिवा ट्रायलॉजी’ ‘रामचंद्रा

सिरीज’, ‘ईम्मोर्टल इंडिया’ ‘सुहेलदेव’, रॉबिन कुक यांची ‘मार्कर’ सकट सगळी पुस्तके, ‘इंडियन स्नेक्स- ए फील्ड गाइड’ बाय नीलिमकुमार खैरे, ‘वर्ल्ड वाइड फंड’ची पांडा बुलेटीनस, केविन मिस्सल यांचे ‘नरसिंहा’, ‘हिरण्यकश्यप’, प्रल्हाद’ ही तिन्ही पुस्तके, जॉर्ज आर आर मार्टिन यांची ‘ए सोंग ऑफ आइस अँड फायर’, ‘ए गेम ऑफ thrones’ ‘ए clash ऑफ किंग्स’, ‘ए डांस विथ dragons’, विश्वास मुदगल यांचे ‘द लास्ट अवतार- एज ऑफ कल्की’, पाउलो कोएल्हो यांचे ‘द विनर stands अलोन’, ऑक्सफोर्डचे ‘बर्ड्स ऑफ द इंडियन सबकॉन्टिनेन्ट’, कृष्णमेघ कुंटे यांची ‘एका रानवेड्याची शोधयात्रा’, मधुकर फुकणे यांचे ‘सातपुडयातील नरभक्षक’, जिम कॉर्बेट यांची सगळी पुस्तके, उषा नारायणन यांचे उज्ज्वला गोखले यांनी अनुवादीत केलेले ‘प्रदयउमन सन ऑफ कृष्णा’, राधिका टिपरे यांचे ‘कैलास मानस- एक पर्वतयात्रा’, अतुल धामंकर यांचे ‘पेंच- मोगली आणि जंगलबूकच अरण्य’, डॉ. हमीद दाभोलकर यांचे ‘विवेकाच्या वाटेवर’, डॉ. नरेंद्र दाभोलकर यांची अनेक पुस्तके, डॉ. दत्तप्रसाद दाभोलकर यांचे ‘अस्वस्थ दशकाची डायरी’, डॉ. नरेंद्र जाधव यांचे ‘आमचा बाप अन आम्ही’, निरंजन घाटे यांचे ‘स्पेस जॅक’ डॉ. जयंत नारळीकर यांची अनेक पुस्तके, श्रीकृष्ण सवदी यांचे ‘रारंग ढांग’ व ‘रारंग ढांग नंतर, ज्ञानेश महाराव यांचे ‘धरीले पंढरीचे चोर’, दिलीप प्रभावळकर यांची ‘बोक्या सातबंडे’ सकट सर्व पुस्तके, भालचंद्र नेमाडे यांची ‘कोसला’, साने गुरुजी यांचे ‘श्यामची आई’, शहीद भगतसिंग यांचे ‘मी नास्तिक का आहे?’, गोविंद पानसरे यांचे ‘शिवाजी कोण होता?’, ‘महाराष्ट्रातील किल्ले’, ‘बरमुडा ट्राएनगल ’, जे. आर.

आर टोकिनसचे ‘हॉबीट’ आणि ‘द फेलोशिप ऑफ रिंग’ आणि ‘द 2 टॉवर्स’, ‘द रिटर्न ऑफ दी किंग’- प्रथम, द्वितीय आणि तिसरा भाग ऑफ लॉर्ड ऑफ द रिंग सिरीज, मधु आडेलकर यांचे ‘क्रांतितीर्थ काला पानी- अंदमान’, डयान ब्राऊन, रॉबर्ट लुडलुम, अलिस्टर MacLean, सिडनी शेल्डन, शेरलॉक होम्स, जॉन ग्रिशम, मारिओ पुझो, शिवाजी सावंत, व्यंकटेश माडगूळकर, द मा मिरासदार, रणजीत देसाई, रॉबर्ट टी कियोसाकी यांची जवळ जवळ सर्व पुस्तके वाचली आहेत. रावणासंदर्भात काही पुस्तके, नावे आठवत नाहीत. ही आठवतायत त्या सर्व पुस्तकांची नावे! कितीतरी विसरून गेलोय!

मी स्वत: लिहिलेय भरपुर पण **प्रकाशित झालेला मजकुर,**

'कथा वॉर्डाची' या दै. तरुण भारतमधील सदरात '**आम्ही निवडलेले नगरसेवक अधिक्रुत, मग आमची झोपडी कशी अनधिक्रुत?**' (३ १ ९७), 11 12 2001 रोजी 11वीला मराठी या विषयाला संगणक हा विषय पर्याय म्हणून देण्याच्या वादात, मराठीच्या बाजूने 'महानगर' सायंदैनिकात राज्यसरकारविरोधी तक्रारपत्र- 'सरकारची साइट अजुनही अंडर कंस्ट्रक्शन' 'पडघम' या मासिकात सम्पादक म्हणुन कार्य केले (२००४). त्यात प्रसिध्ह झालेले माझे लेख- 'आला पावसाळा, चला पिकनिकला, दहावी बारावीनंतर काय?, शैक्षणिक स्थित्यंतर, मराठी माध्यमाची विद्यार्थी संख्या कमी न होण्यासाठी उपाय, मी बिबट्या बोलतोय.' यातील 'मी बिबट्या बोलतोय' हा लेख याच मासिकात लिहिणाऱ्या एका प्रसिध्ह पर्यावरणवाद्याने मोठ्या व्रुत्तपत्रात स्वत:च्या नावावर छापून आणला होता. 'शब्दसाहित्य' या दिवाळी अंकात (1999) तसेच 'पडघम' मासिकात माझी छायाचित्रे छापुन आली होती. 14 फेब्रुवारी 2012 रोजी डि. एन. ए. या व्रुत्तपत्रात 'रोड वाइड्नींग इर्क्स दहिसर रेसिडेंट्स' ही बातमी छापुन आणली. 7 मे 2012 रोजी 'मुम्बई मिरर' या व्रुत्तपत्रात 'दहिसर लोकल्स टेक ओन बी.एम.सी. टू सेव ट्रीज' ही बातमी छापून आणली. 12 4 14 रोजी लोकसत्ता या व्रुत्तपत्रात 'टर्निंग

पॉईंट' या सदरात 'आणि भीती पळाली' हा लेख प्रसिद्ध झाला. 4 10 18 रोजी डि. एन. ए. या व्रुत्तपत्रात 'बोरिवली लोकल्स डोंट वांट हॉकर स्पोट्स ऑन देअर फूटपाथ्स.' ही बातमी छापुन आणली. माझे 2 रे पत्र लोकसत्ता या दैनिकाच्या वाचक वार्ताहर मध्ये छापून आले, '**बोरिवली, दहिसरमध्ये पदपथांवर फेरीवाले नकोत.**' 2016-19 अशोकवन सामाजिक व सांस्कृतिक मंडळ व्यवस्थापन समितीसाठी जाहिराती जमा करण्यापासून वार्षिक अंक प्रसिद्ध करण्याची जबाबदारी पार पाडली. 14 1 2019 रोजी 'वाहनांनी व्यापले फूटपाथ' या शिर्षकांतर्गत महाराष्ट्र टाइम्स या वृत्तपत्रात तक्रारवजा पत्र छायाचित्रासह प्रसिद्ध झाले. 6 8 2019 रोजी अंधश्रद्धा निर्मूलन समिती महाराष्ट्राच्या मुंबई शाखेच्या वतीने, जरीमरी उद्यान ते दहिसर पूर्व रेल्वे स्थानकापर्यंत 'जवाब दो', 'निर्भय बनो' प्रभातफेरीत सहभाग घेतला होता, त्याचे छायाचित्र 28 8 2019 रोजी लोकसत्ता या वृत्तपत्रात कुटुंबकट्टा या पानावर 'सेल्फीस कारण की' या सदरात छापून आणले. लोकसत्ताच्या 'मैत्रीबंध' या सदरात '32 वर्षांनंतर भरतभेट' हा आमच्या शाळेच्या 1981 च्या बॅचचा 10वीच्या वर्गाचा 'एक्स्ट्रावगांजा' छापून आणला. (25 2 19)

अप्रकाशित लेखन

1991-92 बी.एड. चा अभ्यासक्रम पूर्ण करत असताना आम्ही गोळीबार, सांताक्रूझ तसेच खारदांडा येथे 'साक्षरता' या विषयावर पथनाटये केली होती, त्यातील नाट्यसंहितेत बदल करणे, नवीन गाणी तयार करणे ही कामे माझी होती. 1993 मध्ये नर्मदा बचाव आंदोलनात मेधाताई पाटकर यांना अटक झाल्यावर मोर्च्यात बोलल्या गेलेल्या गीतात नवीन नवीन 'गान पदे' निर्माण केली होती. 11 12 93 रोजी मुम्बईतील 'एन' वॉर्ड तर्फे विज्ञान प्रदर्शनानिमित्त आयोजित परिसंवादात सक्रीय भाग घेऊन स्वयंलिखित निबंध वाचन केले व चर्चेत, ज्या शाळेत मी शिक्षक म्हणुन शिकवत होतो त्या शाळेतर्फे सक्रीय भाग घेतला. (पाणी- हा विषय). याच शाळेसाठी 21 वर्षे विज्ञान प्रदर्शनासाठी विद्यार्थ्यांना निबंध, वक्तृत्वस्पर्धेसाठी भाषणे लिहुन दिली. एकदा 1 नाटकही लिहुन दिले, (पंचेद्रिये) या विषयावर व ते नाटक वॉर्डात 2रे आले. 'यशदा' या पुण्याच्या संस्थेकडून '8वी पुनर्रचित अभ्यासक्रम' या विषयावर घाटकोपर (प) येथे कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती, त्यात इतर शाळांच्या शिक्षकांबरोबर विद्यार्थ्यांच्या वर्तणूकीबाबत पथनाट्य बसवायचे होते. त्या दिवशी तिथल्या तिथे मी ते लिहिले व इतर शिक्षकांकडून बसवून घेतले. 'मानसी उद्योगा'ने आयोजित केलेल्या उद्योगविषयक सेमिनारमध्ये स्वलिखित भाषण, बालसंस्कार वर्गात अंधश्रद्धा निर्मुलनाविषयक

हिंदी भाषेतील मी लिहिलेले कथाकथन! आता जी काही प्रवासवर्णने आहेत ते माझे प्रवासविषयक आत्मचरीत्र आहे असे समजा. फक्त सहका-यांची नावे बदलली आहेत, कोणाच्या भावना दुखवू नयेत म्हणून! आज माझे वय 55 वर्षे आहे. जन्म 1966

कुटुंबियासोबतचा मला आठवणारा पहिला प्रवास- **बांदा,** *सावंतवाडी तालुका, सिंधुदुर्ग जिल्हा*: **(1974 मे महिना)**

लहानपणी एकदा प्रत्येक वर्षी मालवण- वायंगणीला जायचा शिरस्ता मोडून आम्ही मावशीच्या गावी बांद्याला गेलो होतो. तिथे संध्याकाळीसुद्धा विहिरीवर थंड पाण्याने आंघोळ करावी लागत होती. त्यांच्या आजोळी ‘कोनशी’ला एस.टी.ही जात नव्हती. वीज, नळाचे पाणी या सुविधा सोडूनच द्या. एका मोठ्या जंगलात ४-५ घरांची वस्ती. घराच्या बाजूला १ तळे होते. त्यात आम्ही पोरे डुंबत असायचो. जंगलातील झाडांवर आम्ही बस बस खेळायचो. तिथे जाताना १ दरीसारखा खड्डा ओलांडून जावे लागे. त्यावर पूल म्हणून झाडाचा बुंधा आडवा ठेवला होता. त्यावर हुंगले (मोठ्या लाल मुंग्या) होते. मी व माझ्यापेक्षा १ वर्षाने मोठ्या असलेल्या मावसभावाने त्या हुंगल्यांचे चावे सहन करत माझा धाकटा भाऊ, त्याचा धाकटा भाऊ व ३ मावसबहिणी याना पलीकडे सोडले होते.

गणेशपुरी: माझ्या आईच्या लहानपणीच्या मैत्रिणीचे यजमान धंदेवाईक छायाचित्रकार होते. त्यांनी त्या काळातील मोठमोठ्या नटनट्यांचे छायाचित्रण केले होते. त्यांच्यासोबत त्यांचे कुटुंब, माझी आई, मी व माझा धाकटा भाऊ गणेशपुरीला (1975) मध्ये स्वामी मुक्तानंद्स्वामींच्या आश्रमात गेलो होतो. आंबे हाताने सहज तोडता येतील इतके खाली लागले होते. पण तोडण्याची आम्हाला परवानगी नव्हती. नंतर आम्ही वज्रेश्वरीला गेलो होतो. तिथल्या नदीत माझी आई, मावशी पोहली होती. लहानपणी तिला विहिरीत, नदीत पोहोता, बेचकीने कैरी तोडता, माडावरचे नारळ काढता यायचे.

मढ बेट: महाशिवरात्रीला वर्सोव्यावरून होडी करून आई, शेजारच्या 'घरेलू कामगार' बाई व आम्ही भावंडे मढ बेटावरच्या शंकराच्या मंदीरात जायचो. (१९७६). १९७७ साली इमारतीतल्या मित्रांबरोबर पिकनिक काढली होती. घारापुरीची लेणी: माझे कुटुंब व माझ्या वडलांच्या मित्राचे कुटुंब घारापुरीच्या लेण्याना भेट देऊन आलो. (१९७७) नंतर एकदाच कधीतरी जाऊन आलेले आठवतंय. कोणाबरोबर ते आठवत नाही.

शालेय जीवनातील पहिला प्रवास – रामबाग, पवई

(1978-79) मी शाळेत 8वीत असताना आमच्या, शाळेचे स्काउट- गाईडचे शिबीर, रामबाग पवई येथे भरले होते. इथल्या तलावात माझी पाण्याची बाटली (तेव्हा मिनरल वॉटर आल्या नव्हत्या) पडली होती. खूप वर्षे वाट पाहिली, मला कोणीतरी ती आणून देईल! 😊 संध्याकाळी फिरताना आम्हाला एका कुत्र्याची कवटी सापडली होती. प्रयोगशाळेत ठेवण्यासाठी आम्ही ती घेऊन आलो होतो. त्या रात्री ती माझ्या पिशवीत ठेऊन तिची उशी बनवून मी झोपलो. रात्री मला ताप आला होता, असे माझे मित्र सांगतात. मी वातात बडबडत होतो म्हणे! आमच्या बाई रात्रभर माझे डोके मांडीवर घेऊन बसल्या होत्या. मला यातले काहीच आठवत नाही.

(1978 मे महिना)- आमच्या लहानपणी आम्ही बोटीने गावाला जायचो. माझा पहिला प्रवास मालवणपर्यंत बोटीने झाला होता. वर्ष आठवत नाही. पण मालवणला पहाटे उतरल्यावर कुत्रे भुंकत घरापर्यंत यायचे तेव्हढे आठवते. नंतर मालवणला बोटीचा अपघात झाल्यावर बोट फक्त देवगडला उतरवायला लागली. 8वीत असताना आई, धाकटा भाऊ, शालीमावशीचा मुलगा व बनीमावशीची मुलगी (यातील सख्खी मावशी एकही नाही, ह्या सर्व आईच्या गावाकडील मैत्रिणी) यांच्याबरोबर सकाळी 10 वाजता भाऊच्या धक्क्यावरून बोटीत चढलो. बोट 3 मजली! टॉप फ्लोअरला कॅप्टनची केबिन, वरचे अधिकारी, फर्स्ट क्लासचे तिकीट परवडू शकणारे लोक, ज्यांना या मजल्यावर स्वतंत्र केबिन्स होत्या. आम्ही मधल्या मजल्यावर, डेकवर आमच्या पथाऱ्या पसरून द्वितीय क्लास! आमच्या खालचा मजला तृतीय क्लास! हिप्पी व इतर! हे हिप्पी लोक केस अस्ताव्यस्त वाढवून, हातात गिटार, व्हायोलिन किंवा एखादे तत्सम तंतुवाद्य वाजवत बसलेले असायचे! ही लोक गोव्याला निघालेली असायची! ह्यांच्या खाली, खलाशांचे वास्तव्य! आई व धाकटा भाऊ यांना बोट खूप लागायची! त्यात बोट सतत हलत असल्याने ही लोक झोपलेली असताना, सतत केबिन पासून डेकच्या टोकाला व तिथून परत असे घरंगळत असायचे! मला कधीच झोप लागायची नाही! मग मी बोटीच्या मागच्या डेकवर समुद्रातील मासे पाहत! तोंडात गीत “सुहाना सफर और ए मौसम हंसी! हमे डर है, हम खो ना जाये कहीं!” गुणगुणणे! तर एकदा मला बोटीच्या बाजूला ‘गादी’ मासे पोहताना दिसले! मालवणला येणारे पर्यटक यांना ‘डॉल्फिन’ असे म्हणतात! मी सूरज व बेबी यांना हाक मारली ‘त्यांना’ बघायला! बघता बघता बोटीवरचे 1/3 प्रवासी तिथे जमा

झाले! बोट एका बाजूला कलंडायला लागली! शेवटी कॅप्टनने सर्वांना हाकलून लावले! मी थोड्यावेळाने परत तिथे! दुपारी समुद्राचे वेगवेगळे रंग दिसायचे, कधी हिरवा, कधी काळा! बोटीच्या जवळ कधी निळा रंग पाहिला नाही! लांबवर दिसायचा! उन्हात समुद्र चमकायचा! बंदर आले एखादे जवळ की किनाऱ्यावर वेगळेच दृश्य दिसायचे! तेव्हा कोकणही हिरवेगार होते! आतासारखे प्रकल्प सुरू झाले नव्हते! रात्रीसुद्धा मी झोपायचो नाही! डेकवरच! बोटीच्या प्रकाशात मासोळया चमकायच्या! चंदेरी मासे दिसायचे! रात्री 3 वाजता देवगड बंदर आले! एक पडाव आमच्या बोटीपर्यंत आला! देवगड बंदर एव्हढे खोल नव्हते की आमची बोट तिथे उभी राहू शकेल! बोटीपासून बंदरापर्यंत प्रवास पडावातून! मला पोहता येत नव्हते! आई चांगली पोहायची, पण एकावेळी ती आम्हाला चौघांना वाचवू शकत नव्हती, ते पण भर समुद्रात! आमचा पडाव समुद्रातून देवगडच्या धक्क्याला जाईपर्यंत एक लॉंच आमच्या दिशेने येताना दिसली! आमच्या पडावावर दिवे नव्हते! आम्ही आरडाओरडा केला, तेव्हा त्यांच्या लक्षात आले व त्यांनी लॉंच वळवली! मी मृत्युपासून पहिल्यांदा वाचलो! यानंतरच्या काळात असे अनेक प्रसंग आले! वाचालच तुम्ही! धक्क्यावर पोहोचल्यावर एक शेंगदाण्याचा लाडू व चहा! तेव्हा कटिंग सर्विस सुरू झाली नव्हती! 5 वाजता मालवणला जाणारी एसटी आली! मुंबई गोवा महामार्ग पुर्णपणे विकसित झाला नव्हता! मला तरी आठवते, मला मालवणच्या घरी जायला 11 वाजले होते! खरे खोटे त्या काळातील माहीतगार सांगतील! मी त्यांच्याशी वाद घालणार नाही, कारण 40 वर्षाच्या वर झाली आहेत या घटनेला! तेव्हढे काही आठवत नाही! नंतर या बोटीही बंद पडल्या व माझा बोटीवरील प्रवासही!

बोर्डी (1978-79)- 8वीत शाळेची एक पिकनिक बोर्डीला गेली होती. किनाऱ्यावर लांब गेलो असताना अचानक जोरात पाऊस पडू लागला. आमचे शिबीर कुठे आहे तेही कळेना. पळत सुटलो, तर तोंडावर जोरात पाऊस मारायला लागला. एकतर वाळूत पळतोय, पावसामुळे डोळे बंद झालेत, कुठे चाललोय काहीच अंदाज नाही, तोंडावर पावसाचे फटके सहन होत नाहीत. जाम बेकार अवस्था होती.

(३५ वर्षांपूर्वी) माझी पहिली इमारतीतल्या मित्रांबरोबरची पिकनिक आमच्या इमारतीतील मित्रांबरोबर गिल्बर्ट हिल अंधेरी पश्चिम येथे गेली होती. होय, तीच ही टेकडी, जिचा आमच्या ९वी च्या भूगोलाच्या पुस्तकात 'अग्निजन्य खडक' म्हणून फोटो होता. आज बिल्डर्सनी इमारतीच्या बांधकामासाठी तो पोखरला आहे. त्याच्याभोवतीची वस्ती 'डोंगरी' म्हणून ओळखला जातो. जिथे पाउल टाकावे तिथे कचऱ्याचे साम्राज्य होते तेव्हा! आमच्या शाळेत समाजसेवेच्या तासाला तो साफ करण्यासाठी घेऊन जायचे. वर एक गावदेवीचे देऊळ आहे. आता रहिवासी इमारतीही आल्या आहेत.

अलिबाग:- आमची शाळेची पिकनिक 9वीत असताना (1979-80) अलिबागला गेली होती. तेव्हा तेथील जंतर मंतर, ओबजरवेटरी पाहिल्याचे आठवते. तिथल्या भातात खाण्याचा सोडा मिसळला होता. रात्रभर माझे काही खरे नव्हते. तेव्हापासून मला कुठलाच ‘सोडा’ आवडत नाही. तेव्हा माझ्या मित्रांनी मला १ मोलाचा सल्ला दिला होता, की अशावेळी रोज गोष्टी सांगणाऱ्या आमच्या लाडक्या इतिहासाच्या बाई मदतीला येणार नाहीत, तर खडूस, शिस्तप्रिय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इंग्रजीच्या बाई मदतीला येतील व तसेच झाले! अलिबागजवळील कनकेश्वर देवळात जाताना ७०० पायऱ्या (५००० फुट) किंवा कार्ला गुंफा (एकवीरा देवी), लोणावळाच्या पायऱ्या चढताना आम्ही मुले वर चढून परत उतरलो तेव्हा आमच्या बाई फक्त अर्धा मार्गच चढलेल्या होत्या. त्याना दम लागलेला होता, त्यांचा चेहरा लालेलाल झालेला होता. जेव्हा मी एका शाळेत शिक्षक होतो तेव्हा हीच परिस्थिती उलट होती. आमच्या एकवीराच्या सहलीत मुले उत्साहात होती व आम्हाला दम लागला होता.

सासवणे (अलिबाग जवळ, रायगड जिल्हा) (1980) येथील एका वाडीत, (समुद्राला लागून) 2 चुलत आत्या, तिचे कुटुंबीय राहायला गेलो होतो. जाताना भाउच्या धक्क्यावरून रेवसला लोन्चने जायचे. तिथून सासवण्याची एस.टी. पकडायची. रात्री किनाऱ्यावर चटई टाकून झोपलो असता समुद्रातून टोर्चची उघडझाप होताना दिसली. आम्ही लपून बघू लागलो. किनाऱ्यावरूनसुद्धा असाच सिग्नल त्याना गेला. मग एका माणसाला धावताना बघितला. आमची जवळ जाऊन बघायची हिम्मत नाही झाली. सकाळी गेलो होतो सोन्याची बिस्किटे पडली आहेत का ते बघायला(!) पण आमचे नशीब थोर नव्हते. सासवण्याला शिल्पकार करमरकरांचा बंगला आहे. त्यात अजूनही खरीखुरी वाटणारी शिल्पे होती. (१९८१) एक बोट कोळयांच्या जाळयात प्रोपेलर अडकून किनांऱ्यावर आली होती. त्यातील खलाशाना पूर्वेकडच्या देशातले लोक हेलिकॉप्टरने घेऊन गेले म्हणतात. गावक-यांनी त्या बोटीवरचे सर्व सामान लुटले. आमच्याही वाट्याला काही दुधाचे खोके लागले होते. सकाळी ११ वाजता सर्व रिकामे झाल्यानंतर सावकाश कोस्ट गार्डची हेलिकॉप्टर्स आली.

आमच्या इमारतीतील थोरामोठ्यांच्या सहली कर्नाळा पक्षी अभयारण्य, अर्नाळयातील सुरूचे बन, (तेव्हा कानाला त्रास देणारे संगीत वाजवणारे, तरणतलाव, रेन डान्सची गैरसोय असलेले, दारू पुरवणारे, रोंबा सोंबा नाचाला प्रोत्साहित करणारे रिसोर्ट्स आले नव्हते.) केळवे समुद्रकिनारा (इमारतीतील एका कुटुंबाच्या नातेवाईकांचे घर) –[१९८४-२००४] इथे गेल्या होत्या.

1985 च्या सुमारास मी, माझा थोरला भाऊ व त्याचे ३ वाय.एम.सी.ए.चे मित्र नेपाळला गेलो. आमच्याकडे तेव्हा १ राउंड टिकिट होते. ज्याचा उपयोग भारतभर भ्रमणासाठी वापरू शकत होतो. एका स्थानकावर ब्रेक घेउन नंतर त्याच स्थानकावरून पुढे जाऊ शकत होतो. कुर्ल्यावरून भागलपुर जनता एक्सप्रेस पकडली. एक्सप्रेस कसली, ‘मेल’च होती ती. उत्तरेकडील स्थानिक लोक फलाटावरच बसून मुत्रविसर्जन करत होते. पाटण्यावरून नेपाळच्या सीमेवर (रसौल) जाण्यासाठी बस पकडली. नेपाळमध्ये टान्यातुन प्रवेश केला. काठमांडू शहरात एका होटेलमध्ये राहिलो. ५ दिवस नेपाळमध्ये होतो. आमचे मित्र ३ पत्तीत हुशार! रात्री कैसिनोमध्ये रुबाबात गेले व हरुन आले. पशुपतीनाथ मंदीरात गेलो. तिथल्या ८४ शिवलिंगांभोवती मनोभावे प्रदक्षिणा घातल्या. ८४ जन्मांच्या फेऱ्यातून मुक्तता करून घेतली. इथल्या माकडांनी दोनदा माझ्या हातातील प्रसाद पळवला. नेपाळ मधून हिमालय पाहिला. वाटेत एक कुंपण तुटले होते. तिथून आत शिरलो. तिथे सैन्याच्या व्युहरचनेचे मिनिएचर मोडेल होते. तिथून पुढे गेल्यावर नेपाळी सैनिकाने अडवले. त्याने विचारले “इथे कसे आलात?” आम्ही सांगितले की “ते कुम्पण तुटले होते तिथून आलो.” त्याने सांगितले की “हे प्रतिबंधित क्षेत्र आहे. इथे यायला परवानगी नाही.” त्याने थाम्बवल्यावर जर आम्ही थांबलो नसतो तर, त्याने गोळ्याच घातल्या असत्या. आमची आयुष्याची दोरी भरभक्कम होती. (दुसऱ्यांदा जीव वाचला) तिथे तेव्हा परदेशी गाड्या ट्याक्सी म्हणून वापरल्या जायच्या. आपल्याकडे मारुती प्रचलित झाली असावी. टैक्स लागत नाही म्हणून आम्ही खुप खरेदी केली होती. कपड्यांवर कर लागू नये म्हणून ते अंगावर घातले. डनलोपचे बूट विकत घेतलेले नाहीत हे दाखवण्यासाठी ते ५ दिवस पायात घातले. (त्यावेळी

डनलोप, नाइक, आदिदास या कंपन्यांचे बूट भारतात मिळत नव्हते. सर्वात महाग बूट ‘बाटा’चे होते.) मी ते वापरून असे फाडून दाखवले की कोणीही म्हटले नसते की हे ५ दिवसांपूर्वी विकत घेतले आहेत. (मुंबईत आल्यावर ते घालून मी फ़ुटबाल खेळत होतो.) ऐकिवात होते की इलेक्ट्रोनिक वस्तूंवर कर लागतो. सीमेवर आलो तेव्हा तिथल्या टांगेवाल्याने सांगितले की तो आम्हाला दुसऱ्या रस्त्याने नेइल. जेणेकरून आम्हाला जकात भरावी लागणार नाही. खरे म्हणजे त्यानी जकातवाल्याशी हातमिळवणी केली असावी. आम्हाला ३ वेळा कस्टमवाल्यानी गाठले. खरे होते की तोतया, ठाऊक नाही. शेवटी तिस-यांदा जो आला त्याच्या खांद्यावर भावाने हात ठेउन सांगितले की “भाईसाहब! हम भी बंबईसे आये है| आप जैसे बहोत मिलते है वहाँ!” पाटण्यालाही एक रेल्वे पोलिस चौकशीला आला. त्याला म्हणालो की सामानाची चावी सापडत नाही. तेवढ्यात गाडी चालु झाल्याने तो निघून गेला. जाताना एक सैनिक माझ्या बर्थवर येउन झोपला. म्हणत होता सरकारने त्याना कुठेही झोपायची परवानगी दिली आहे. शेवटी रायफलधारी रेल्वे पोलिसाने हाकलल्यावर गेला. तिथून दिल्लीला मुक्काम टाकला. पुढे अमृतसरला जाऊन यायचा विचार होता. बघतो तर नेपाळला ज्या किमतीला सामान घेतले होते त्याच दरात दिल्लीलाही मिळत होते. आमच्याकडचे पैसे संपले होते. मला आईने आणिबाणीच्या प्रसंगी उपयोगी पडतील म्हणून पैसे दिले होते तेही खर्च झाले होते. शेवटी नेपाळमध्ये घेतलेले सामान विकायची वेळ आली. तिथे सकाळी सकाळी हातावर पुऱ्या घेउन त्यावर छोले ठेउन लोक नाश्ता करायचे. तेही घ्यायला खिशात पैसे नव्हते. एका मित्राला स्वस्तातली स्वस्त पालेभाजी आणायला सांगितली. ब्रेडमध्ये ठेऊन स्यान्डवीच बनवून खायचा विचार होता. तो मुळा घेऊन आला. त्याचा पाला काढून टाकला व

उरलेला देठ घेऊन आला. आम्ही उपाशी! होटल सोडताना मला पर्साकिडे (कॉल ऑफ नेचर) झाले. चेकआउटला ५ मिनिटे उशीर झाला म्हणून पुढच्या अख्ख्या दिवसाचा चार्ज घेतला. तेव्हढ्यात दंगल पेटणार असे ऐकले. आमच्या हॉटेलचा मालक पंजाबी होता. धोका न पत्करता आम्ही स्थानक गाठून मुंबईला परत आलो. घरचे विचारत होते इतक्या लवकर कसे परतलात? काय सांगणार?

१९८५ च्या गणेशचतुर्थीला माझ्या थोरल्या भावाच्या यमाहा राजदूत ३५० सी.सी. बाईकवर मामा व माझे वडील (वय ५५ वर्षे) चालवत असलेल्या बजाज चेतक स्कूटरवर (हिचे इंजिन उजव्या बाजूला होते) मी (वय १८ वर्षे) बसलो होतो. पनवेलनंतर कुठेतरी मला ब्यागेतून काहीतरी खाली पडल्याचा भास झाला. मी लक्ष दिले नाही. नंतर लक्षात आले की माझा रेनकोट पडला होता. त्यानंतर जो पाउस चालू झाला, तो थांबलाच नाही. संपूर्ण दिवस घाटावरचा मुसळधार पाउस मी अंगावर घेत होतो. पण मला सर्दीही झाली नाही. मामाने शेवटी शेवटी त्याचा रैंकोट मला घालायला दिले तर त्याला सर्दी झाली. राजापूरला दुपारी ३ वाजता तोच तोच रस्ता नजरेसमोरून जात असल्याने मला झोप येत होती. मी स्कूटरवर बसलेलो असल्याने झोपूही शकत नव्हतो. गणेशचतुर्थीचा दिवस असल्याने कोकणातील सर्व दुकाने बंद झाली होती. सगळे कोकणस्थ गणेशचतुर्थीच्या दिवशी दुपारी ३ वाजल्यापासून घरात कोंडून घेतात. चंद्रदर्शन होऊ नये म्हणून! कोकणातल्या लोकांना विचारले तर ते नकार देतील. आम्ही गणपतीची पूजा करत असल्याने दुकाने बंद ठेवतो, म्हणून सांगतील. वडलाना चहाची हुक्की आली होती, पण आम्हाला चहाही मिळाला नव्हता. कणकवलीला उजवीकडे

आचऱ्याच्या दिशेला वळल्यावर चेतकचे मागचे चाक नट तुटल्यामुळे निखळले व पुढे धावत सुटले. आमचा तोल जाऊन आम्ही दोघेही (वडील व मी) खाली पडून रस्त्यावर घसपटत गेलो. नशीब! आड रस्ता असल्याने मागून येणारी कोणतीही गाडी नव्हती. वडलाना नेहमीच्या जागी (संपूर्ण आयुष्यभर याच गुडघ्यावर याच जागी त्यांना मार लागत आला होता.), डाव्या गुडघ्याला

मार लागला होता. माझा ओठ फाटला होता व डाव्या डोळयाच्या वर कपाळाला लागले होते. माझा थोरला भाऊ आम्हाला कणकवलीच्या इस्पितळात घेऊन गेला. डॉक्टरांनी मला विचारले, मला पेनिसिलीनची यालर्जी आहे का?, मी नाही म्हणालो. मला त्यांनी पेनिसिलीनचे इंजेक्शन दिले. ओठांवर टाके घालणार होते. मी नाही म्हणालो. थोरल्या भावाने एका दुकानात जाऊन वेल्डीन्गचे सामान मागितले. त्यांनी दार किलकिले करून ते दिले (चंद्रदर्शन टाळण्यासाठी!). ते घेऊन आम्ही अपघात स्थळावर गेलो. थोरल्या भावाच्या एका मित्राचे म्हणणे होते की "थोरल्या भावाचे १ स्वप्न आहे की, गाडी अशा जागी बंद पडावी की जिथे मागे ५० कि.मी. व पुढे ५० कि.मी. एकही ग्यारेज नसावे." आज ते स्वप्न पूर्ण झाले होते. एखाद्या अजगराच्या शरीरातील सर्व भाग पडलेले असावेत, तसे गाडीचे भाग रस्त्यावर अंधारात, पडलेले होते व थोरला भाऊ विजेरीच्या प्रकाशात ते जोडत होता. वडलांनी मामाला विचारले, "एक रात्र कणकवलीला मुक्काम करायचा का?" "ऊंऽ हूंऽऽ! गणेशचतुर्थीच्याच दिवशी घर गाठायचे." रात्री १२.१५ ला आम्ही वायंगणीला (आचऱ्याहून १५ कि.मी., मालवणवरून २५ कि.मी., मालवण तालुका, सिंधुदुर्ग जिल्हा) एका ओढ्याकडे आलो. थोरला भाऊ, मामाला म्हणाला "नितांत व तू इथे थांब. मी व भाऊ (माझे वडील) घरी जातो व बाइक ठेऊन परत स्कूटर घ्यायला येतो." तो म्हणाला "नको!" "का?" "वाईङ्गणीच्या सीमेवर इथे भुते असतात." "अरे पण! नितांत आहे ना सोबतीला!" "त्याला ती ओळखत नाहीत. मला लहानपणीपासून ओळखतात!" शेवटी सगळेच मामाच्या घरी पोहोचलो. दुस-यांदा (पहिल्यांदा काकानी आणली होती) दुचाकी पेडणेकरांच्या (दुकानदारांच्या) अंगणात

पोहोचली होती. कालावलीचा पूल अजून बनला नव्हता. अजूनही होड्यानीच प्रवास होत होता.

भिरा- (मुंबई- गोवा महामार्गावर कोलाडपासून २९ कि.मी. आत, पुण्यावरून मुळशी तलावाच्या खालच्या अंगाला, रायगड जिल्हा) : (1985) माझ्या थोरल्या भावाला, भिराला टाटा पोवर स्टेशनला नोकरी लागली होती. प्रथम त्याची व्यवस्था तिथल्या गेस्ट हाउसमध्ये झाली. नंतर त्याला स्वतंत्र बंगली मिळाली. अधिकारी वर्गासाठी वरच्या बाजूला कॉलोनी व कामगारांसाठी खालच्या अंगाला कॉलोनी व इतर आदिवासी वस्ती असे ते गाव होते. मुळशी तलावातील पाणी खाली आणून त्यावर धरण बांधून त्याच्यातून सुटणाऱ्या वेगाने वाहणाऱ्या पाण्यावर टर्बाईन फिरवून वीज तयार केली जायची. पाइप प्रथम १२ फुट रुंद, मग त्याचे २ भाग करून ६ फुटाचे, नंतर 3 फुटांचे! असे करत करत पाण्याचा वेग वाढवत जायचा. एकदा म्हणे तो पाईप फुटला होता, तेव्हा बाहेर पडणाऱ्या पाण्याचा म्हणे एवढा वेग होता की त्याने तिथली झाडे आडवी कापली होती. त्यातून बाहेर पडणाऱ्या पाण्याची कुंडलिका नदी बनून ती २९ कि.मी. वर मुंबई-गोवा हायवे ओलांडून रोह्याला जायचे, तिथून ते रेवदंडा खाडीला मिळायचे. माझी चप्पल त्यात पडली होती ती २९ कि.मी पार करूनच मला मिळाली. मी एकदा त्यात पोहायची हिम्मत केली होती, तेव्हा मी वाहत चाललो होतो व मला वाचवायला कोणी नव्हते. शेवटी प्रशांतने (माझ्या थोरल्या भावाचा मेव्हणा) मला सांगितले की प्रवाहाला विरोध करू नको तर त्याला समांतर पोहत किनारा गाठ! त्याच्या सल्ल्यामुळे आज मी जिवंत आहे. (तिसऱ्यांदा!) दुपारी ११ वाजता मुंबईतून एस.टी. सुटायची ती ५ वाजता भिराला पोहोचायची. रात्री ८ वाजेपर्यंत मेस

असायची. त्यानंतर जेवण नाही. दोनच मेस होत्या १ अधिका-यांची व १ कामगार वर्गाची. जेवण स्वस्तात चांगले होते. बटाटावडा वैगेरे पाहिजे असेल तर खाली एस.टी. स्थानका जवळ एक पांडोबाचे दुकान होते. ते संध्याकाळी ५ वाजता बंद व्हायचे. तिथेच न्हाव्याचे, चक्की, वाणी वैगेरे दुकाने होती. वर एकही दुकान नाही. १ तरणतलाव होता. अतिशय थंड पाणी! समोर मैदान! तिथे स्थानिक किंवा निम्नस्तरीय कामगारांची मुले क्रिकेट, फुटबॉल वैगेरे खेळायची. तिथून वर जायला उटीसारखे रस्ते! बाजूला बंगल्या! २ घरांमध्ये प्रचंड अंतर. एका घराला ५-६ खोल्या व राहणारी फक्त १-२ माणसे. खून झाला तरी २ऱ्या घरी ऐकायला जाणार नाही. रात्री चिडीचूप शांतता! रात्री भाऊ कामावर गेल्यावर टाइमपास काय? एकदा असाच जेवण झाल्यावर रस्त्यावर शतपावली घालत असताना दूर एका बंगल्यात पैंजणांचा आवाज ऐकू आला. माझ्या वडीलांनी सांगितले होते, जेव्हा कधी भीती वाटेल, त्या वेळी त्या भीतीचे मूळ कारण शोध. जवळ जाऊन बघतो, तर एक कीटक आपले पंख जेव्हा एकमेकांवर घासतो तेव्हा असा घुंगरांचा आवाज निर्माण होतो. कारण शोधले नसते, तर त्या निर्मनुष्य घरात, द मा मिरासदारांच्या कथेप्रमाणे, एक आत्महत्या केलेली नर्तकी जन्माला आली असती! एकदा चेरापुंजीपेक्षा जास्त पाउस इथे पडला होता. घनदाट जंगल! भावाने हरण सांभाळले होते. साप पाळले होते. ‘वायपर कीट’ सारखे विषारी साप! एका काचेच्या भांड्यात अजगर ठेवला होता. त्याला खायला बेडूक दिला असता तो अजगराला घाबरत होता व अजगर त्याला घाबरत होता. माझ्या वडलांचे मित्र घरात गेले असता साप पाहून, ते शेजारच्यांच्या घरात, गाडीत झोपले व वडलांना सांगायला लागले, “आम्ही सांगणार तुमच्या व्याह्याना की तुमच्या

मुलाला कसलेही व्यसन नाही, फक्त तो साप पाळतो." त्या घरांची वैशिष्ट्ये अशी की रात्री झोपेत तुमचा हात कधी कोणत्यातरी शीत रक्ताच्या प्राण्यावर (छपरांतून खाली पडणाऱ्या सापांवर पडेल याची काही खात्री नव्हती.) छतावर माकडे नाचायची. एकदा बाईकवरून जात असताना एक कोल्हा आमच्या बाजूला धावत होता, ज्याचा वेग ३० कि.मी./तास होता. पहिल्यांदा भावाबरोबर गेलो तर आई म्हणाली त्याला एकटे वाटू नये म्हणून त्याच्याबरोबर राहा. ५ दिवस राहिलो (१९८६). तिथे टाईमपास काही नाही. १ क्लब होता. त्यात बिल्लिअर्ड्सचे टेबल, ब्याडमिंटनचे मैदान, कॅरम, बुद्धीबळ वैगेरे खेळ होते. पण खेळायला कोणी नव्हते. सुट्टीच्या दिवसात कुटुंबे असायची पण एरवी भकास! टी.व्ही. होता पण त्यावर कोणीतरी दुसरेच काहीतरी बघत असायचे. खालच्या क्लबवर पडद्यावर 'शरारा', 'विजय' हे चित्रपट बघितल्याचे आठवतात. एका चित्रपटात हिरो धावत्या विमानात चढतो, दुसऱ्या चित्रपटात 'अमजद खान' धावते विमान थांबवून त्याची दोरी खांबाला बांधतो, असे काहीतरी बघितल्याचे आठवते. सकाळी मेसमध्ये ठराविक वेळेवर नाश्ता, दुपारी ठराविक वेळेत जेवण, संध्याकाळी चहा व रात्री ठराविक वेळेच्या आत जेवण. मग मी टाईमपास म्हणून पदपथाच्या (उटीसारख्या) बाजूला ठेवलेल्या बाकड्यांवर बसून सरडे, मुंग्या, कीटक वैगेरे बघत राहायचो. तेव्हापासून मला प्राण्यांचे निरीक्षण करायचा छंद लागला. नंतर बी.एस.सी.ला 'प्राणीशास्त्र' हा विषय घेतला. भाऊ कामावर गेलेला असायचा. मी एकटा! घरी ग्यास, स्टोव्ह, चूल वैगेरे काही नव्हते. इलेक्ट्रिक शेगडी होती. कारण वीज फुकट होती. भावाला जेवण बनवता येते. मला अजूनही येत नाही.

(1985-89) मिठीबाई महाविद्यालयाच्या एन.एस.एस. शिबिरात असताना डहाणूजवळील सावर्डा गावात आमचे एक मिठीबाई नगर आहे. तिथे विद्यार्थ्यांनी आपल्या परिश्रमांनी प्रा. रावल सरांच्या नेतृत्वाखाली बालवाडी बांधली आहे. तिथे ३ वर्षे समाजसेवा केली. सकाळी ६ची डहाणू लोकल पकडून जायचे. एकेका विद्यार्थ्याने ६ जणांची जागा अडवायची. डहाणू स्थानकाजवळ पूनम हॉटेलात ८ रुपयात अमर्यादित थाळी मिळायची. माझ्या मित्राने ३३ भाज्यांच्या वाट्यांचा ढीग रचला होता. आम्ही त्याला ‘व्ह्यू रिचर्डस’ असे नाव ठेवले होते. शेवटी हॉटेल मालकाने जेवण संपले असे सांगितल्यामुळे तो उठला. तेव्हा एका रिक्षात ६-७ जण बसून जायचो. तिथे गेल्यावर बालवाडी स्वच्छ करणे, संडास साफ करणे, रस्ता बांधणे, बंधारे टाकणे, सर्व्हे करणे, लहान मुलांना बालवाडीत घेऊन येणे, त्यासाठी त्यांच्या पालकाना समजावणे अशी कामे करायचो. १०-१२ वर्षाची मुले तिथे फुग्यांच्या कारखान्यात कामाला जायची. रोजचे १० रुपये मिळायचे. वडापावला ८ रुपये व २ रुपयाची दारू हा त्यांचा रोजचा दिनक्रम होता. आम्ही जुन्या कपड्यांचे वाटप करायचो. तेव्हा त्यांची जी झुंबड उठायची, त्याचे वाईट वाटायचे. संध्याकाळी डहाणूच्या किनाऱ्यावर फिरायला जायचो. तेव्हाही, पायावर तेलाचा तवंग चढायचा. रात्री पाड्यावर फिरायला जायचो. कॅम्पफायर, अंताक्षरी, आपापली कला सादर करणे. धमाल यायची. 1989 मध्ये माजी विद्यार्थी म्हणून ‘नेता’ बनून गेलो.

भिराला दुसऱ्या वेळेला माझ्या धाकट्या भावाबरोबर ‘प्रबोध’ नावाचा मित्र होता. हा सुद्धा माझ्या थोरल्या भावासारखा भागुबाई पोलीटेक्निकमध्ये इलेक्ट्रिकल इंजीनीरिंगचा डिप्लोमा शिकलेला असल्याने त्याला पोवर स्टेशन कसे काम करते ते समजावून सांगण्यात थोरल्या भावाला जास्त इंटरेस्ट होता.

(1986)

तसा मी नास्तिक, पण नवनवीन जागा पाहण्याच्या नादात १९८६ च्या सुमारास माझ्या २ मित्रांबरोबर शिर्डीला गेलो. माझ्या थोरल्या भावाचा मित्र तिथे मनोजकुमारच्या हॉटेलात व्यवस्थापक होता. त्याला भेटायला गेलो तर तो काही भेटायला आला नाही. मी समजुन गेलो व धर्मशाळेत मुक्काम टाकला. पहाटे ३ वाजता उठलो. १० रुपयात आंघोळ केली. अभिषेकासाठी रांगेत उभे राहिलो. अजून ३ मुले आमच्या ओळखीची झाली होती. आम्ही पाळीपाळीने रांगेत उभे राहत होतो. काही लोकाना व्ही.आय.पी. पास देऊन आत सोडले जात होते. काही लोक रांगेत घुसत होते. माझा मित्र देवाशिष (नाव बदलले आहे) वैतागला व बाहेर गेला. मग दर्शनाच्या रांगेत जाऊन उभा राहिला. आमचा क्र. ११ वाजता आला. सुशांतला व मला (नास्तिक) अभिषेकाचा योग होता. देवाशिषला (साईभक्त) योग नव्हता. शिरडीतील पिण्याचे पाणी तेव्हा गढूळ होते. (आता माहीत नाही.) तेव्हा जेवायला हॉटेलही चांगली नव्हती.

1987च्या सुमारास मी टी. वाय. बी. एस. सी. ला असताना मिठीबाई महाविद्यालयाची प्राणीशास्त्र विभागाची अभ्याससहल किहीमचा किनारा, अलिबाग येथे गेली होती. मी समुद्रकाठीच वाढल्याने [डी.एन.नगर वरून जुहू जवळ, गाव मालवण व वायंगणी (किनाऱ्याजवळ घर)], किनाऱ्यावरचे प्राणी (खेकडा, शंख, शिंपले, तारामासा, जेलीफिश इ०) माझ्या जास्त परिचयाचे. आमच्या ‘प्राणीशास्त्रा’च्या शिक्षकांना व सहाध्यायाना माहिती मीच पुरवली होती. खेकडा अंगठ्याच्या साहाय्याने पकडून फुशारक्याही मारल्या होत्या. आईचे ट्रेनिंग- दुसरे काय?

(1987) तिसऱ्या वेळेला भिराला जाताना माझा मित्र बब्बी बरोबर होता. हा ही इंस्ट्रूमेंटल इन्जिनीअरिन्ग डिप्लोमा केलेला विद्यार्थी असल्याने यालाही भावाने पोवर स्टेशन कसे काम करते ते व्यवस्थित समजावून सांगितले होते. भिराच्या वर डोंगरात हजार फुटांवर डोंगरवाडी म्हणून गाव होते. मुळशी तलावातून येणारे पाणी आधी तिथे यायचे. तिथे थोरल्या भावाचा मित्र राहायचा. त्याने आम्हाला वर जेवायचे आमंत्रण दिले होते. वर जायला ट्रामसारखे रूळ असलेली केबल कार होती पण खूप मंद! आम्ही पाइपलाइनच्या बाजूने या रुळांवर चढून जायचो. सकाळी लवकर चढायला सुरुवात केली की मजा यायची. तिथले दुध घेऊन उतरणारे आदिवासी मात्र फटाफट दुधाच्या कासंड्या घेऊन खाली उतरायचे व वर चढायचे सुद्धा! त्या दिवशी मी व बब्बी पक्षी, सरडे, माकडे, फुलपाखरे, खारी बघत टंगळमंगळ करत वर चढलो. वर गेल्यावर पत्ता लागला की थोरल्या भावाचा ज्या मित्राने आम्हालां जेवायचे आमंत्रण दिले होते तो खाली गेला होता. आता जेवण खालच्या मेसमध्येच मिळणार होते, जी २ वाजता बंद होणार होती. मग जे धावत उतरलो आम्ही, की आम्हाला भूकेपोटी पक्षी, सरडे, माकडे, फुलपाखरे, खारी यापैकी काहीही दिसले नाही. फक्त खालच्या मेसमधले जेवण दिसत होते. नारायण सुर्वे यांच्या कविता आठवल्या. 'भाकरीचा चंद्र शोधण्यातच झिंदगी बरबाद झाली.' 'भरल्या पोटी जर चंद्र पाहिला असता तर आम्हीही कुणाची याद केली असती!' खरोखर या कवी कल्पना, सौन्दर्याग्रहण वैगेरे कधी? जेव्हा पोट भरलेले असते तेव्हा. भुकेल्या पोटी आधी पोट भरण्याची भ्रांत, मग सगळे काही! आधी पोटोबा, मग विठोबा! मुंबईला जाताना भावाने त्याच्या यामाहा राजदूतवर [ही गाडी भारतातल्या

पहिल्या १० यामाहा राजदूत ३५० सी.सी. पैकी १ होती. जी घेतल्या घेतल्या भावाने तिचे सगळे भाग काढून रस्त्यावर ठेवले व परत जोडले होते. (त्या काळात एकाही गॅरेज मेक्यांनीक्ने या बाइकला हात लावला नव्हता, म्हणजे थोरला भाऊ ती परत जोडू शकला नसता तर ते रिस्कच होते, पण धोक्याला घाबरेल तर तो माझा थोरला भाऊ कसला?) होता इलेक्ट्रिक इंजिनीअर, पण मेक्यानिकलची आवड होती. गाड्या दुरुस्त करणे हा त्याचा छंद होता. हिमालयन ऱ्यालीमध्ये (बाईक रेस) भाग घेतला होता. शेवटच्या टप्प्यात पुढच्याने वाटेत खिळे टाकून ठेवल्याने दिलेली वेळ पूर्ण न केल्याने हरला होता], आम्हाला दोघाना घेऊन गेला होता. अंतर २५० किमी! चौकावर बब्बी उतरायचा व चालत पुढे जायचा. ट्रिपल सीट होतो ना! बब्बीच्या बुटाना प्ल्यास्टीकचा (पीवीसी) तळवा असल्याने तो वितळून गरम सायलेन्सरला चिकटला व शेवटी फेकून द्यावा लागला.

मग कुटुंबासोबत भिराला आलो. चुलतबहिणीबरोबर हा डोंगर चढलो. उतरताना मात्र केबल कारने रुळांवरून उतरलो. भीती वाटायची, कारण एका वेळेला ती ४५ अंशाचा कोन करून उतरायची. खाली १ सिमेंटचा अडथळा होता. एकदा मात्र ऐकले की ती, तो कोंक्रिटचा ठोकळा फोडून पोवर स्टेशनची भिंत तोडून गेली होती. (१९८७)

भिराला एकदा थोरल्या भावाचे वाय.एम.सी.ए.चे मित्र आले होते. त्यापैकी १ पोहायला येत नसताना तरणतलावात खोल पाण्यात उतरला व गटांगळ्या खाऊ लागला. त्याला बाहेर काढायला भाऊ पाण्यात उतरला, तर त्याने ह्यालाच मिठी मारली. शेवटी कशीबशी त्याच्याकडून सुटका करून घेऊन, ह्याने त्याला ढकलत पाण्यावर नेले. तिथे इतरांनी त्याला खेचून घेतले.

त्याच्या पोटातील पाणी काढून त्याला शुद्धीवर आणल्यावर दुसरा त्याला म्हणतो. “ऐसे नाही कुदनेका| ऐसी छलांग लगानी होती है|” असे म्हणून त्याने जी उडी मारली ती उथळ पाण्यात. त्याचे डोके पाण्यातील फरशीवर आपटले व रक्त वाहू लागले. (१९८७)

एकदा इमारतीतील मित्रांबरोबर भिराला आलो. मित्रांनीच जेवण बनवले होते. (१९८७)

एकदा चुलतभाऊ व धाकटा भाऊ माझ्याबरोबर भिराला ! ते एका खोलीत झोपलेले होते, व मी एकटा दुसऱ्या खोलीत. थोरला भाऊ कामावर रात्रपाळीला! रात्री ३ वाजता प्रातर्विधीला जायचे होते. मला अंधारात जाऊन यायची सवय! अचानक छतावर कोणीतरी चालण्याचा व दूर कसलेतरी आवाज! 'कोण असेल? चोर असेल? मी एकटा पकडू शकेन? भावांना उठवले तर ते मला भित्रा भागुबाई म्हणतील? नको रे बाबा!' असे नाही नाही ते विचार डोक्यात! पाच साडेपाच पर्यन्त मी जागाच होतो. शेवटी आठवले, 'अरे! आपल्याला बाथरूमची लाइट लावता येते ना!' धीर करून उठलो, लाइट लावून आधी बाथरूम मध्ये गेलो. नंतर टॉर्च हातात घेऊन बाहेर गेलो, तर छतावर माकडे नाचत होती, व दूर कुठेतरी सुरुंगाचे आवाज ऐकू येत होते. 'हात्तिच्च्या! हे कारण होते का? उगाच एवढा वेळ जागा राहिलो!' भाऊ झोपलेलेच होते. गुपचूप घरात जाऊन झोपलो. (1988)

दोन वर्षांनंतर, थोरल्या भावाचे लग्न झाले व तो मुंबईत स्थिरावला. तरीही आम्ही त्याच्या, बंगला भागीदार, 'आचार्यां'कडे जाऊन भिराला रहायचो. (1989-90)

सासवणे, अलिबाग (2 10 1988- 24 6 1990) प्रशांतच्या गाडीतून (12 जण) कोणी सीटखाली बसलय, कोणी कुठे! असा ६-७ तासांचा प्रवास. तेव्हा रविवारी सकाळी ११ वाजता दूरदर्शनवर महाभारत मालिका लागायची. संपूर्ण मुंबई ओस पडायची. बाजार बंद झालेले असायचे. आम्हीही सासवण्यात एका घरात जाऊन टी.व्ही. बघायचो. मी दादरच्या महात्मा गांधी तरण तलावावर पोहायला शिकलो होतो. अंधेरीच्या स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समध्ये सराव करत होतो. तिथे माझ्या थोरल्या भावाचा धाकटा मेहुणा पोहायला शिकायला यायचा. तर त्याच्याबरोबर सासवण्याला भाड्याच्या सायकली घेऊन भटकंती करायचो. वाटेत आम्हाला १ तलाव दिसला. त्या तलावाच्या मधोमध १ खांब होता. ठरवले की तिथपर्यंत जायचे. मला फ्री स्टाईल एवढी जमत नाही. मी फ्रॉग स्टाईलने पोहतो. तो काठावरच पोहत राहिला. मी आतमध्ये तर गेलो. पण दम लागला. आता बुडालो तर कोणीही वाचवायला नव्हते. शेवटी कसाबसा त्या खाम्बापर्यंत पोहोचलो. त्याला पकडून दम घेतला व परत आलो. रात्री काहीजण झोपले असताना धाकट्या मेहुण्याने त्यांच्या खाटान्खाली फटाके फोडले.

नाशिक – 1988 च्या सुमारास मी महाविद्यालयातून बी.एस.सी. पूर्णकरून नोकरीच्या शोधात असताना अंधश्रद्धा निर्मुलन समितीच्या शिबिरातून (वसई) छात्रभारती विद्यार्थी संघटनेत शिरलो होतो. त्यांच्या नाशिकच्या राज्यव्यापी शिबिरासाठी गेलो होतो. येताना पूर्ण वेळ (नाशिक ते मुंबई) उभ्याने आलो. शिर्डीहून येणारी काही तरुण मुले एस.टी.त होती, ती १ गाणे साईबाबांचे गायची, मग १ गाणे आम्ही संघटनेचे गायचो, मग १ ते, मग १ आम्ही.

भिमाशंकर (1988-89)- भीमाशंकरला जाण्यासाठी व्ही.टी. वरून सुटणारी शेवटची कर्जत लोकल पकडून कर्जतला उतरलो. रात्री एस.टी.स्टैंडवर झोपलो असता एक माणूस उठवायला आला. म्हणाला, “इथे झोपलात तर कोणीतरी बैग चोरून नेइल. त्यापेक्षा माझ्या घराच्या अंगणात झोपा.” दुसऱ्या दिवशी त्याच्याकडचे १५ रुपयाचे कांदेपोहे खावे लागले. प्रातर्विधी मोकळ्यावर करण्यासाठी टमरेल भरून पाणी दिले. आंघोळ नाही. नंतर दुसऱ्या वेळीसुद्धा हाच अनुभव! सकाळी ६ वाजता खांडसला जाणारी एस.टी. पकडली. आमच्या कॉलनीतील १ मित्र अतुल (नाव बदलले आहे) व महाविद्यालयातील २ मित्र, जयेश व सुनिल (नावे बदलली आहेत.) तसेच बब्बी माझ्या बरोबर होते. अतुल व जयेश मिठीबाई महाविद्यालयात गिर्यारोहण पथकात होते. मी, सुनिल व बब्बीची पहिली डोंगरचढाई! अतुल व जयेशने अनुभवी गिर्यारोहकांच्या थाटात सांगितले की जिथून पाण्याचा खाली येण्याचा मार्ग आहे तिथून जाउया! नंतर असे लक्षात आले की जसजसे आपण वर जाऊ, तसतसा मार्ग अजून कठीण होत जातो. सुनिल [गुजराथच्या गावाकडचा अनुभवी(?)] तर धावतच वर चढत होता. शेवटी अकरा-साडेअकराच्या सुमारास वर जायला काहीच रस्ता नव्हता, म्हणून खाली उतरलो. अतुल व जयेश, आम्हाला पाणी प्यायला देत नव्हते. बब्बी वैतागला होता. शेवटी सर्व पाणी पिऊन झाले होते. आता प्रचंड तहान लागली होती. खाली उतरताना एक पठार लागले. त्यावर एका स्थानिकाची झोपडी होती. त्या भल्या गृहस्थाने आम्हाला पाणी प्यायला दिले. तो आम्हाला परत वर घेऊन जायला तयार झाला. जाताना तो आम्हाला शिडीच्या मार्गे घेऊन गेला.

मला विचारले की "तुम्ही यापूर्वी कधी येऊन गेला आहेत का?" मी नाही म्हणालो. त्यांनी सांगितले की मी चांगला चढतो. मी म्हणालो की "मी लहानपणी आमच्या गावाच्या डोंगरावर वैगेरे चढलो आहे." माझी स्तुती केल्यावर जयेश व अतुलची तोंडे बघण्यासारखी झाली होती. सुनिल गळपाटला होता. बब्बी परत जायचे म्हणत होता. रस्ताच तसा खतरनाक होता. शिडी डुगडूगत होती. एका खडकाच्या बाजूला एक हात घालून २रा हात पलीकडच्या बाजूला, एक पाय इथे तर २रा पाय, २ऱ्या बाजूला- मध्ये खोल दरी. उंची 34०० फुट. हाड पण नाही मिळायचे! कसेबसे आम्ही वर पोहोचलो. आमचा मार्गदर्शक दक्षिणा घेऊन परत खाली गेला. वर घाटकोपर येथील एका कामगार नेत्याने आयोजित केलेला अखंड हरी नाम सप्ताह चालू होता. सप्ताहाला आलेल्या लोकाना आम्हाला यावेळी वर आल्याचे आश्चर्य वाटले. ते म्हणाले की अजून १५ मिनिटे उशीर झाला असता तर आम्हाला नक्की वाघ भेटला असता. रात्री त्यांच्याकडेच जेवलो. इतके प्रचंड थकलो होतो की त्यांच्या मांडवातच झोपून जाणार होतो. तेव्हढ्यात जयेश म्हणाला की त्याने त्याच्या आजीला सांगितलेय की रात्री घरी येतोय म्हणून. आम्हाला या लोकांनी एका टेम्पोतून खाली सोडले. तिथून एका ट्रकमधून मुंबईला रवाना झालो. एकमेकांच्या तंगड्या एकमेकांच्या गळयात घालून आम्ही झोपलो होतो. कारण ट्रकमधून मानवी वाहतूक करण्यास मनाई होती. सकाळी घरी पोहोचल्यावर दाढी वैगेरे न करता महाविद्यालयात गेलो. कारण सकाळी झोपायचे नाही असा माझा नेम होता. अवतार बघण्यासारखा होता. बब्बी जो झोपला तो तिसऱ्या दिवशी उठला.

बडोदा: (1988-89) मी अंधेरीत राहायला होतो तेव्हाची गोष्ट! मुंबईत चर्चगेटला एका पोश कचेरीत विक्रम साराभाई इंस्टीट्यूट ह्या बडोद्याच्या कंपनीचा एमआरआय (मार्केटिंग रिसर्च इनवेस्टिगेटर) या पदाकरीता मुलाखत होती. मुलाखतीचा पहिला टप्पा (ग्रुप चर्चा- विषय- मुंबईत काम करायला आवडेल की मुंबईबाहेर काम करायला आवडेल?) [माध्यम- इंग्रजी]– आम्ही दस्तुरखुद्द मराठी माध्यमात शिकलेले, इंग्रजी माध्यमिकांच्या दृष्टीने 'व्हरणाकुलर! शीSS! सो लो क्लास!' इंग्रजी फ्लूएन्ट बोलता येत नाही. (अजूनही भरपूर वेळ बोलता येणार नाही. पण कोंवेंट इंग्लिश पेक्षा शुद्ध बोलीन. पण कंपन्यांना कान्वेंट इंग्लिश लागते, भले त्यांना सर्वे अकोल्यात घ्यायचा असला तरी.) इतर लोक टाय बाय घालून आलेले! मी जाळीदार कॉलरवाले पांढरट टी शर्ट घालून! मी 'मुंबईबाहेर काम करायला आवडेल' या गटात सामील झालो. माझ्या मोडक्या तोडक्या इंग्रजीत मी गट चर्चेला सुरुवात केली. 2 गुण माझे! अंतही मीच केला (निष्कर्ष)! परत 2 गुण माझे! मला वैयक्तिक प्रश्न विचारण्यात आला, "मुंबईच्या बाहेर कुठे जायला आवडेल?" "काझीरंगा जंगलात! आसाम!" "का?" "बिकॉज आय ॲम ए वाइल्ड नेचर्ड पर्सन!" मुलाखतकारांचे स्मितहास्य! या गटचर्चेत मी पहिला किंवा दूसरा आलो असेन. मला बडोद्याच्या मुलाखतीची वेळ, स्थान, दिवस कळवण्यात आला. (कॉल लेटर). असे आम्ही मुंबईतून 7 जण निवडले गेलो. इतर सर्व आठवत नाही, पण सुहास मोरे (गोरेगावचा- मोतीलाल नगर) व श्रीश भालेराव (दादरचा)! श्रीषने एक प्रश्न विचारला होता तो अजूनही आठवतो- "सध्या काय करतो?" "छात्रभारती वैगेरे!" "पोटापाण्यासाठी काय करतो?" "उदरनिर्वाहासाठी?" "हां!" "शिकवण्या घेतो!" "ठीक!" वडलांनी

विचारले, “बडोद्याचे आरक्षित रेल्वे तिकीट काढलेस?” “नाही.” “एवढा भारतभर फिरतोस. एव्हढी साधी गोष्ट सांगावी लागते.” लगेच रेल्वे स्टेशनवर जाऊन रेल्वे तिकीट काढले. मोबाइल अजून आले नव्हते. मी, श्रीश व सुहास चांगले मित्र बनून गेलो होतो, एकत्रच दादरला श्रीशच्या घरी जाऊन तिथून दादरच्या स्टेशनवर जाऊन बडोद्याला जाणारी रेल्वेगाडी पकडली. इतर 4 पण याच गाडीत होते. बडोद्याला उतरून एक लॉज बूक केले. जेवायला वेगळे रेस्टोरंट वैगेरे नव्हते. शेवटी रेल्वे स्थानकावरील कयांटीन मध्ये जाऊन जेवलो. सकाळी मुलाखतीच्या आधी बडोद्याची, संग्रहालय, सयाजीराव गायकवाड महाराजांचा राजवाडे वैगेरे प्रेक्षणीय स्थळे पाहिली. मुलाखतीच्या वेळी लक्षात आले की, मी कॉल letterच आणलेले नाही. ते मला मुलाखतीसाठी घ्यायलाच तयार नव्हते. जेव्हा माझ्या सहकाऱ्यांनी सांगितले की याचे कॉल लेट्टर आम्ही पाहिले, तेव्हा त्यांनी मला मुलाखतीची परवानगी दिली. तिथे मी दुसरी चूक केली. उत्तरे देताना संपूर्ण सत्य सांगायचे नसते. त्यांनी मला विचारले, “तुमचे वडील काय करतात?” मी उत्तर दिले, “महानगरपालिकेतून निवृत्त होऊन वकीली करतात.” “अजून कोण आहे घरात?” “आई, थोरला भाऊ, धाकटा भाऊ!” “थोरला भाऊ टाटा कंपनीत इंजिनीअर आहे.” मी रीजेक्ट! कारण मी जर ह्यांची नोकरी सोडली तरी मला काही फरक पडणार नव्हता. माझे वडील व थोरला भाऊ कमावते होते. मी सांगायला पाहिजे होते की, “माझे वडील निवृत्त आहेत व थोरला विवाहीत भाऊ चारकोपला वेगळा राहतो. तो आम्हाला आर्थिक मदत करत नाही. माझे कुटुंब माझ्या नोकरीवर अवलंबून आहे.” इतर सर्व पास झाले. 7 जणांपैकी मी एकटा रीजेक्ट झालो. अतिशय उदास मनस्थितीत मी मुंबईला परतलो. मै जिंदगी का साथ निभाता चला गया! हर फिक्र को धुअेमे उडाता चला गया!

चिन्चोटीची (वसई स्थानकावरून) सहल छात्रभारतीबरोबर- मी तेव्हा छात्रभारती विद्यार्थी संघटनेत (समतावादी विचारांची विज्ञानयुगातील संघटना) नुकताच शिरलो होतो. संघटनेत माझा चुलतभाऊ सोडून मी कोणाला ओळखत नव्हतो. त्याने मला गोरेगाव स्टेशनला (पश्चिम) बोलावले पण स्वतःच आला नव्हता. गोरेगावला विद्यार्थ्यांचा १ गट दिसला. मी आधीच वसईचे तिकीट काढले होते. त्या गटाबरोबर मी वसईला पोहोचलो. चिंचोटीपर्यंत पोहोचताना लक्षात आले की हा तर अभाविपचा गट. हे आमच्या विरुध्द विचारांचे विद्यार्थी. छात्रभारतीचा पत्ताच नव्हता. नेहमीप्रमाणे ते उशीरा उठणारे (जेव्हा पोहोचायची वेळ दिलेली असते तेव्हा ते घरातून निघणार) होते. शेवटी मी एकटा चिंचोटीला गेलो. एकट्यानेच सहल एन्जोय केली व परतलो. तेव्हापासून माझे मित्र म्हणायला लागले की, 'नितांत' एकटा तर एकटा जाईल पण सहलीवरून परत फिरणार नाही. (१९८८-८९)

1988 सालानंतर आम्ही (मी व माझा चुलतभाऊ) संस्थांच्या सहली आयोजित करायला लागलो. एस.आय.एस. या संगणक प्रशिक्षण संस्थेची वर्षासहल माळशेज घाटात नेली होती. धबधबा दिसला की सगळे म्हणायचे "धब धबाऽऽ". तेव्हा, आतासारखा दारू पिऊन धांगडधिंगा सुरु झाला नव्हता. एम.टी.डी.सी. रिसोर्ट मध्ये उत्कृष्ट जेवण, धुक्यामध्ये फिरणे! पुढचे पाउल रस्त्यावर आहे की दरीत पडतंय याची खात्री नाही. एकमेकांचा हात धरूनच पुढे सरकायचे. एखादा हरवला तर सापडणार नाही. मोबाईल आले नव्हते. धबधब्यात आंघोळ केल्यावर बसमध्ये कपडे बदलायचे. आधी मुली, मग मुले. तोपर्यंत बाहेर उभे राहून कुडकुडणे सुरु. हातगाडीवर भाजलेली

मक्याची कणसे खाणे, कांदाभजी हादडणे, गरमागरम चहाचे घुटके घेणे. मज्जा! (1989) पुढची सहल माळशेज घाट, ओझरचे गणपतीचे देऊळ (अष्टविनायकापैकी १), लेण्याद्रीच्या गणपतीसाठी पायऱ्या चढणे. जुन्नरला मुक्काम (हॉटेलमध्ये. सहल ठरवल्यानंतर मी व चुलतभाऊ जाऊन जुन्नरला पुढच्या आठवड्यातले बुकिंग करून यायचो. हॉटेल्सचे बिछाने तपासावे लागायचे, काही हॉटेल्सच्या बिछान्यात ढेकुण असायचे). सकाळी शिवनेरी किल्ला, बाजारपेठेतून प्रवास (शिवाजी महाराजांच्या काळात घोड्यावरूनच खरेदी कसे करत असतील याचा अंदाज घेत), घोडेगाव, भीमाशंकर, दर्शन घेत पुणे ओलांडून डोणजेला (सिंहगडाच्या पायथ्याचे गाव) कोंढाणा हॉटेलात मुक्काम. सकाळी खडकवासलाचे कॅडेट्स परेड करत सिंहगडावर जायचे. सिंहगड बघून भोरघाटाकडे प्रयाण! पुणे- सातारा रस्ता व भोरघाटाच्या सुरुवातीला बनेश्वर नावाचे देऊळ आहे. तिथे कासव दिसतात. तिथून समर्थांची शिवथरघळ! तो प्रचंड धबधब्याचा आवाज बाहेरच ऐकायला यायला लागतो. त्या काळात रस्ते नसताना समर्थ रामदास तिथे कसे आले असतील व त्यांनी कसा दासबोध ग्रंथ लिहिला असेल याचे आश्चर्य वाटते. नंतर महाड- मुंबईच्या रस्त्याने मुंबईला परत!

मी, थोरला भाऊ, धाकटा भाऊ, आमचे वाय.एम.सी.ए.चे मित्र सासवण्याला गेले असता, रेवसजवळ १ क्रिकेटची टूर्नामेंट चालू होती. आम्ही त्यात भाग घेतला. जिंकलो म्हणून पुढच्या रविवारी मोटर लॉनचने परत गेलो. उशिरा पोहोचल्याने समोरच्या टीमला ‘बाय’ मिळाला. आम्ही खरेखुरे गाववाले बनून परत आलो. (१९८९)

भिरा – ‘भटकी जमात मित्र मंडळ’ (प्रशांत, धाकटा मेहुणा, त्यांचे २५ चुलत, मावस भाऊ, त्यांचे खेतवाडी गिरगावचे मित्र) बरोबर अनेकदा गेलो. दादाच्या धाकट्या मेव्हण्याने शिकण्यासाठी कार चालू केली व समोरच्या भिंतीवर आपटली. (१९८९)

सातारा – 1989 च्या सुमारास छात्रभारतीच्या राज्यव्यापी अधिवेशनास साताऱ्याला गेलो. डिसेम्बरचा महीना आणि आमचे काही मित्र बर्फाच्या फैक्टरीतुन खाली पड़णाऱ्या थंड पाण्यात आंघोळ करायला गेले. इतर सातारकर नेहमीप्रमाणे तोंडावर पागोट्याचा शेला नाहीतर रुमाल घेउन उभे. आम्ही नुसत्या टॉवेलवर उघडया अंगाने आंघोळ करायला उभे! ते आम्हाला विचारतायत "तुम्हा मुंबईकराना थंडी वाजत नाही." आम्ही म्हणालो "आम्हाला सवय आहे." खरेतर आम्हाला प्रदुषणाची सवय असल्याने ही थंडी आमच्यासाठी काहीच नव्हती. अधिवेशन संपल्यावर शहरात दिंडी काढली होती. अजिंक्यतारा बघायचा राहून गेला.

मी व माझा चुलतभाऊ काढत असलेल्या (निसर्गयात्री) दुसऱ्या सहलीत संख्या कमी पडली म्हणून चुलत वहिनी, तिच्या प्रयोगशाळा सहाय्यिका मैत्रिणी, चुलत बहीण, तिच्या मैत्रिणी, धाकट्या भावाचा मेहुणा, त्याचे मित्र, आमचे मित्र असा मोठा परीवार. धाकट्या भावाचा मेहुणा व मित्र ही अजब रसायने! सूर्यवंशी! सूर्य उगवल्याशिवाय उठायचे नाहीत. आम्ही इथे लवकर उठून बसलोय व ह्यांना फोन केल्यावर "कुठे जातोय आपण?" मग त्यांच्या घरी जाऊन, त्यांना उठवून त्यांची आंघोळ, प्रातर्विधी उरकायची वाट पाहायची! त्यांची अंथरूण पांघरूण उचलण्यापासून सुरुवात असायची! यावेळेला आम्हाला डोणजे गावात कोंडाणा हॉटेल मिळाले नाही. मग दुसऱ्या एका हॉटेलमध्ये राहयलो होतो. खोल्या भरपूर होत्या, खान पान ही चांगले होते, पण कोंडाण्यावरून दिसणारे शेत, झुळझुळ वाहणारा झरा, पक्षी वैगेरे काही नव्हते. (1989)

माझ्या इमारतीतील मित्रांबरोबर राजमाचीला ट्रेकला गेलो. रात्रीची धावती ट्रेन पकडली. आमचा १ मित्र चढू शकला नाही. माझा धाकटा भाऊ चालू ट्रेनमधून उतरला. त्याला दाखवले की कसे चढायचे ते. पण तरीही तो चढू शकला नाही. शेवटी हा परत गाडीत चढून आला. रात्री राजमाचीहून येताना आम्ही एवढे थकलो होतो की फलाटावर झोपून ट्रेनची वाट पहात होतो. ट्रेन आल्यावर फलाटावरून उठून डब्यात जाऊन झोपल्याचे आठवते. (1989)

लहानपणीच्या मित्रांबरोबर सिंहगडला निघालो. यावेळी १ मित्र पुण्याहून येणार होता. त्याने तिथल्या अभियांत्रिकी महाविद्यालयात प्रवेश घेतला होता. त्याला ट्रेक्सची सवय होती. हा ट्रेक यानेच आयोजित केला होता. नाव- प्रबोध! यावेळी आमचा १ मित्र आनंद छ. शिवाजी टर्मिनसला (तेव्हाचे व्ही.टी.) धावत्या ट्रेनमध्ये चढला पण त्याला डब्यात कोणीही न दिसल्याने तो दादरला उतरुन घरी गेला. इतर दोघेजण लेडीज डब्याच्या दरवाज्यावर लटकत होते. आतल्या स्त्रियांना विनवणी करत होते, पण त्या काही दरवाजा उघडायला तयार नव्हत्या. शेवटी दादरला उतरून त्यांनी डबा बदलला. जेव्हा आम्ही शिवाजीनगरला उतरलो तेव्हा 'आनंद' न दिसल्याने, माझा धाकटा भाऊ थंडीत कुडकुडत दरवाज्याला लटकून पुण्यापर्यंत जाऊन परत आला. तेव्हा मोबाईल नव्हते. मग प्रबोध व आम्ही सिंहगडाकडे प्रस्थान केले. डोणजे गावावरून प्रबोध व आमचे मार्ग वेगळे झाले. कारण प्रबोध एकटाच डांबरी रस्त्यावरून सिंहगडाकडे गेला. पण माझ्या धाकट्या भावाचे म्हणणे सिंहगड सरळ दिसतोय ना! मग तसेच जायचे. बाकीचे त्याच्या मागे. मला प्रबोधचा रस्ता पटत होता. पण 'मित्र की भाऊ?' या वादात 'भावा'चा विजय झाला. म्हटले, 'शेवटच्या प्रसंगात भावाबरोबर राहावे'. शेवटी सर्व डोंगरांवर असते ती सर्व परिस्थिती ओलांडून आम्ही वर गेलो, म्हणजे पहिल्यांदा खाजखुजलीची झाडे, त्यात उकाड्यामुळे शर्ट काढल्याने उघड्या अंगाची खाजवून लाही लाही झालेली. प्रचंड ऊन! नंतर सुकलेले गवत, त्याला पकडल्यावर ते हातात यायचे. त्यानंतर ढिसाळ माती! त्यात नखे खुपसून वर चढावे लागायचे. नंतर काळा कातळ! शेवटी १ फुट अंतर राहिले. पहिल्यांदा माझा मित्र बंब्बी वर! मी त्याला विचारले, "आला सिंहगड?". तो म्हणाला

“वर येऊन बघ!”. आम्ही एका डोंगराच्या शिखरावर उभे होतो. सिंहगड दृष्टीक्षेपातही नव्हता. सगळे निराश झाले होते. तहान तर प्रचंड लागली होती. बाकीचे म्हणायला लागले “परत खाली उतरुया.” मी म्हणालो, “जर खाली उतरून त्या जंगलात रस्ता चुकलो तर उपाशी पोटी, तहानलेले, वेड्यासारखे भटकत राहू. कदाचित जिवंत त्या अरण्याच्या बाहेर पण पडू शकणार नाही. पण आता आपण डोंगरावर आहोत. सिंहगडही डोंगरावर आहे. ‘शोधले तर सापडते’. मी चाललोय. तुम्हाला यायचे तर या.” शेवटी सगळे माझ्या मागे आले. वाटेत आम्हाला गुरांची पायवाट, त्यावर शेण पडलेले दिसले. म्हणजे जवळपास वस्ती होती. एक गुराखी व त्याच्या गायी दिसल्या. आनंदातिरेकाने वेडच लागायचे बाकी होते. त्याला विनंती केल्यावर त्याने एक पाण्याचे डबके दाखवले. त्यात शेवाळ दिसत होते. पण त्यावेळी ते आमच्यासाठी अमृत होते. ते शेवाळ बाजूला करून ते पाणी घटाघटा प्यालो. मिनरल वोटरची आम्हाला सवय नव्हती पण घरी कमीतकमी उकळलेले पाणी तरी पीत होतो. पण खरे सांगतो, ते पाणी पिऊन अजूनही आम्ही जिवंत आहोत. त्यानंतर आम्ही त्या गुराख्याच्या घरी गेलो. वाटेत प्रबोधही भेटला. त्या गुराख्याच्या घरी त्याने आम्हाला झुणका भाकर दिली. झुणका एवढा तिखट होता की एकेका घासाबरोबर तांब्याभर पाणी आम्ही पीत होतो. तिथून बाहेर पडल्यावर सिंहगडाला दुरूनच नमस्कार करून सिंहगड न पाहताच आम्ही निघालो. (1989-2004). त्यानंतर सिंहगड अनेकदा केला.

(१९८९-९०) मी ज्या शाळेत शिकवत होतो, त्या शाळेचे‘ गाईड’चे शिबीर रामबागेत (पवई) भरले गेले होते. आमची शाळा निम्न- मध्यमवर्गीय स्तरातल्या विद्यार्थ्यांची! रात्रीच्या जेवणानंतर मुलांना उलट्या होऊ लागल्या. आम्हाला भीती वाटली, की याना फूड पोईझनिंग झाले का? म्हणून आम्ही ते जेवण जेवलो. तर जेवण चांगले होते. मुलांना इतके चांगले जेवण जेवायची सवयच नव्हती. मध्यंतरी पौष्टिक दुधाच्या बाबतीत असेच घडले होते. आठवत? कारण मुंबईतली बहुतेक मुलांना लहानपणी, दूधच घ्यायची सवय नसते.

आमच्या इमारतीची १ दिवसीय सहल भाड्याची बस ठरवून सासवण्याला गेली होती. थोरल्या भावाने व आमच्या इमारतीतील बुगडे या गृहस्थानी जेवण बनवले होते (१९९०). त्यानंतर आमचे सासवण्याला जाणे थांबले.

फलटण (बारामती व साताऱ्याच्या मध्ये):- १७ मे १९९० रोजी पुण्याला एस.टी.त बसून व तिथून फलटणला एस.टी.त उभ्याने पोहोचलो. रात्री मित्राकडे राहिलो. दुसऱ्या दिवशी त्याच्या थोरल्या भावाचे लग्न होते. रात्री मेहंदी काढायचा कार्यक्रम होता, ज्यात पुरुषसुद्धा भाग घेतात. मीसुद्धा काढून घेतली. दुसऱ्या दिवशी लग्न झाल्यावर अहेराची घोषणा माईकवर करत होते. नंतर जळगावला सहकाऱ्याच्या धाकट्या भावाच्या लग्नात हाच प्रकार पाहिला. मुंबई-मुंबई 'या 'गणेश शिंदे' व 'सयाजी गायकवाड' यांनी अभिनीत चित्रपटात, 'रिकामे पाकीट' हा असाच प्रसंग आठवला. मित्राच्या थोरल्या भावाचे लग्न झाल्यावर साताऱ्याला एस.टी.ने बसून गेलो. कोल्हापूरपर्यंत एस.टी.त उभ्याने! मावसबहिणीला भेटून आलो. तिथून एस.टी.त बसून कणकवली, ६ सीटरने आचरा, ६ सीटरने वायंगणी (आचरेकरांचे दुकान)! तिथून ५ कि.मी. उन्हात चालत माझ्या आजोळी. कसे जायचे हे माझ्या सर्वात धाकट्या मामेभावालाच विचारले. (त्याच्याच घरी जायचे होते. त्याला ओळखलेच नाही. त्याचेच लग्न सुद्धा होते.) २० मे १९९० रोजी दोन्ही भावंडांचे विवाह एकाच मांडवात होते. मांडव घराच्या अंगणात घातला होता. थोरल्या मामेभावाचे सासरे कॉंग्रेसमध्ये होते तर धाकट्या मामेभावाचे सासरे भाजपाचे! दोन्ही पक्ष संपूर्ण तयारीत आले होते. (कॉंग्रेसवाले सफेद कपड्यात, तर भाजपावाले भगव्या कपड्यात). नशीब काही गैरप्रकार घडला नाही.

भिरा (1990)- मी बी.एड. साठी प्रयत्न करत होतो. चेंबूरच्या पिल्लई कॉलेजमध्ये अर्ज केला होता. निकाल बघायला चाललो होतो. प्रशांत रोह्याजवळच्या चणेरे गावात त्याची जमीन बघायला जिप्सी घेऊन चालला होता. त्याचा १ मित्रही बरोबर होता. मला म्हणाला "मी वाटेत सोडतो." माझा निकाल बघून येईपर्यंत थांबला. माझे प्रवेशयादीत नाव नव्हते. त्याने विचारले, "मग येतोस भिराला?" मी हो म्हणालो. आईला पी.सी.ओ. वरून फोन करून सांगितले (मोबाईल अजूनही आले नव्हते). आईने फक्त एकच प्रश्न विचारला, आता पत्नी विचारते. "कपडे?" (बाकी त्यांना माहीत होते व आहे, नितांत, 'थांब; म्हटले तर ऐकायचा नाही. तो त्याला करायचे तेच करणार.') ३ दिवसांच्या प्रवासाकरता नेसत्या कपड्यानिशी निघालो. चणेरला गेलो. अंतवस्त्र विकत घेतले. तिथे प्रशांतचा १ शाखाप्रमुख मित्र होता. त्याला घेऊन निघालो. ३ दिवस भिराला होतो. बाहेर धो धो पाउस पडत होता. जेवायलाही जाऊ शकत नव्हतो. घरात उकडलेली अंडी होती. मी तोपर्यंत अंडी खात नव्हतो. खाल्ले की मळमळायचे. त्या दिवशी ६ उकडलेली अंडी खाल्ली. ही माझी भिराची शेवटची ट्रीप. अजूनही जायची इच्छा आहे. बघुया कधी वेळ मिळतो?

डी. एन नगरच्या लहानपणीच्या मित्रांबरोबर राजगडला निघालो. मागच्या वेळेला ट्रेनमध्ये चढू न शकणारा मित्र यावेळी आला होता. नाव- संदेश (बदलले आहे). संदेश एवढा घाबरला होता की सपाटीवरही रांगत पुढे जात होता. एकदा तर आम्ही ६ जणांनी शिडी केली, म्हणजे एकाने झाडाला पकडून आडवे पडायचे, त्याचा पाय दुसऱ्याने पकडून झोपायचे, त्याचे पाय तिसऱ्याने पकडून झोपायचे. हा बहाद्दर या सर्वांच्या खांद्यावर चढून वर गेला, त्यात शेवटच्याचा तोल जाऊन तो खाली घरंगळायला लागला. नशीब बाजूच्याने त्याचा हात पकडून त्याला थोपवला. नाहीतर काय खरे नव्हते. एखादा गेला तर काय वाटत नाही पण त्याच्या घरच्यांना ही बातमी कशी सांगायची हे टेंशन! आमच्या मनात होते संदेशला तसेच सोडून द्यावे पण माझा धाकटा भाऊ त्याला सोडायला तयार नव्हता. तो म्हणत होता तुम्ही पाहिजे तर पुढे जा. पण तो काही संदेशला घेतल्याशिवाय वर (डोंगरावर- गैरसमज नसावा!) जाणार नाही. मी धाकट्या भावाला सोडणार नव्हतो व इतर मला टाकून पुढे जाणार नव्हते. शेवटी राजगडला जाऊन आलो. (१९९०)

मी, माझा चुलतभाऊ (निसर्गयात्री) सहली ठरवायच्या आधी एकदा आपण जिथे जिथे जाणार आहोत, तिथे चक्कर मारून यायचो. असेच एकदा डोणजे गावी (सिंहगडाचा पायथा) आलो असता, कोण्डाणा हॉटेलचा शोध लागला. पहिल्या मजल्यावर मध्ये एक हॉल (ज्यात 15- 20 लोक सलग झोपू शकतील, बाजूला 2 स्वतंत्र खोल्या! पुढच्या वेळी छात्रभारतीचे 2 मित्र व एक पत्रकारीतेतील पदविकेचा अभ्यासक्रम पूर्ण करतानाचा सहाध्यायी! (नंतर आमचा हा गटचं बनला.) तर आम्ही 5 जण इथे राहिलो होतो. वर सिंहगडावर गेलो नाही. (1990)

एका नुकत्याच चालू झालेल्या सायंदैनिकात ‘बिल कलेक्टर’ची नोकरी करत होतो. मला सिल्वासाला जायचे होते व हे सायंदैनिक मला लवकर सोडायला तयार नव्हते. प्रेस कार्ड व मासिक पगार मिळाला होता. पोटात दुखत असल्याचा बहाणा करून निघालो. ३१ डिसेंबर १९९० रोजी माझा थोरला भाऊ, वहिनी, प्रशांत व त्यांचे इतर वाय एम सी ए तील मित्र, सिल्वासाला (दीव, दमण केंद्रशासित प्रदेश) गेलो होतो. एका हॉटेलच्या खोल्या, बांबूच्या कॉटेजच्या होत्या. त्या एका खोलीत आम्ही २२ जण होतो. ३ अंश तापमान! थंडी मी म्हणत होती. अंगावर ४ कपडे असले तरी जमिनीवर पाय ठेववत नव्हता. बिछान्यावर बसून कुडकुडत होतो. रात्री १२च्या सुमारास, धाकटा भाऊ व एक मित्र बाईकवरून जंगलातून आले. थंडीने कापत होते. शेवटी, जेवल्यानंतर शेकोटीच्या बाजूला भांगडा नाच केला तेव्हा कुठे शरीरात उब आली. रात्री ३ वाजता प्रशांतला हुक्की आली. त्याने विचारले “नितांत, चलतोस मुंबईला?” मी हो म्हणालो. तो, मी व त्याचा १ मित्र त्याच्या जिप्सीने मुंबईला निघालो. अहमदाबाद- मुंबई या सपाट रस्त्यावर (घाट नसलेल्या) प्रचंड धुके पसरलेले होते. याच्या गाडीला सोडिअम व्हेपरचे दिवे बसवले असल्याने आम्ही सुरक्षित आलो. धुके निवळल्यानंतर बघितले तर अनेक गाड्याना अपघात झाले होते.

माथेरान: पहिल्यांदा इमारतीतील मित्रांबरोबर माथेरानला गेलो. नेरळवरून मिनी ट्रेन पकडली होती. मध्येच खाली उतरायचो, चालत पुढे जायचो व परत ट्रेन पकडायचो. (1990-91)

1990 साली परत नोकरीच्या शोधात समाजवादी कार्यकर्त्या सौ. ‘क्ष’ यांच्या कालीना संकुलातील संस्थेत गेलो. त्याना त्यांच्या संस्थेत कायमस्वरूपी काम करणारे कार्यकर्ते पाहिजे होते. पण मला पुढे बी. एड. ला प्रवेश घ्यायचा होता, म्हणून त्यांनी मला नोकरी नाकारली. माझ्या मित्राला नोकरी दिली. पण त्यानी मला, माझ्या मित्राला व २ मैत्रिणीना त्यांच्या एका प्रकल्पात बरोबर नेले. त्यावेळी रायगड जिल्हा सम्पूर्ण साक्षर म्हणून घोषित करण्यात आला होता. तो खरोखर साक्षर झाला आहे की नाही हे तपासण्याच कार्य त्यांच्या संस्थेला दिले होते.

प्रथम आम्ही पेणला गेलो. तिथे सरकारी पक्षाच्या कार्यालयात आम्हाला प्रथम बसवण्यात आले.

रात्री ‘रोहया’ला गावात प्रौढ़ साक्षर वर्गात जाऊन परीक्षा घेतली. तिथले कार्यकर्ते दिवसभर नोकरी करून रात्री शिकवायचे. प्रौढ़ही दिवसभर थकून रात्री शिकायला यायचे. आमची रात्री कोलाडच्या गेस्टहाउसमध्ये व्यवस्था करण्यात आली होती. भलीमोठी पाल पाहिल्याचे आठवते.

दुसऱ्या दिवशी निघणार तर एका कार्यकर्त्याने मला बाजुला बोलावले. त्याना भीती वाटत होती की आम्ही सरकारी अधिकारी आहोत व आम्ही आता उलटसुलट रिपोर्ट करणार! म्हणून आमची ‘खातिरदारी’ करण्यासाठी त्याने मला अपेयपानाबद्दल विचारले.

मी म्हणालो “मी पीत नाही.”

मग त्यानी माझ्या मित्राबद्दल विचारले.

“तोही नाही!”

“सिगारेट?”

“नाही!”

“तंबाखु?”

“नाही!”

तेव्हा गुटखा, मावा वैगेरे पदार्थ आले नव्हते.

“गेला बाजार पान तरी?”

“नाही!”

त्याना आश्चर्य वाटले. ‘सरकारी अधिकारी(!), पोट सुटलेले आणि बीअरही पीत नाही.

पण खरोखरच आम्ही घेत नव्हतो. शेवटी त्यानी आम्हाला विवेकानंदाची व सरस्वतीची मूर्ती दिली (पेणच्या मुर्त्या प्रसिद्ध आहेत.)

मढ बेट – १९९१ साली छात्रभारतीच्या कार्यकर्त्यांन्सोबत मंडल आयोगाच्या समर्थनार्थ सायकलस्वारान्साठी जेवणाची व्यवस्था करण्यासाठी मढ बेटांवर गेलो होतो. तिथे आमच्यातला भाषण करणारा वक्ता नेमक्या वेळी आला नाही. शेवटी 'मंडल आयोग' काय आहे हे त्या महादेव कोळी जमातीच्या लोकाना समजाऊन द्यायची वेळ माझ्यावर आली. तिथे एक लग्न होते. तिथे जेवून जायचा आम्हाला आग्रह करण्यात आला. खुप तिखट जेवण होते ते! रात्री १२ वाजल्यानंतर घरी आल्यावर आईने विचारले, "कुठे गेला होतास?" तिला विद्यार्थी संघटनेच्या कार्याला गेलेले आवडत नसे. त्यात मी न सांगता गेलो होतो. त्यावेळी मोबाइल नसायचे. घरी दुरध्वनीही नव्हता. असला तरी मढ बेटावर पब्लिक टेलीफोन असण्याची शक्यता कमी होती. मी म्हणालो की "मी भाषण करायला गेलो होतो." आई खुश!

माथेरान – छात्रभारती विद्यार्थी संघटना, अंधेरी विभागाची वर्षासहल माथेरानला काढली होती. छत्री घेऊन यायला परवानगी नव्हती. आणली तरी उघडू दिली नव्हती. रात्री शेवटची गाडी पकडून नेरळला उतरायचे. रात्रीच डोंगर चढायला सुरुवात करायची. डोंगरावर चढताना चहा बनवला. 3 विटांची चूल. दुधाच्याच टेट्रापॅकचे कप तयार केले. पहाटे माथेरानला पहिला प्रवेश आमचा! पहिल्यांदा एम.टी.डी.सी. च्या महाग रेस्टोरंट मध्ये नाश्ता करायचा अनुभव घेतला. नंतर धुक्यात दुकानांच्या पाय-यांवर झोपलो. दिवसभर ओल्या कपड्यात, अन्तवस्त्रांसकट राहायचे म्हणजे काय अनुभव असतो ते वर्णनापलीकडे आहे. रात्रभर चालून आलो होतो, दिवसभर माथेरानचे सर्व पोइन्ट बघितले. संध्याकाळी परत चालत रेल्वे मार्गाने, धावत, शोर्टकट मारत, घसरत उतरून घरी परत. (1991-92)

(1991) छात्रभारतीच्या आनंद, सुशयंत, रंगा व आनंदची एक मैत्रीण चित्रा, या मित्रांबरोबर पालघरच्या दिशेला काळूमामाना (भूमीसेना नेत्याला) भेटायला गेलो होतो. एका आदिवासीच्या घरी मुक्काम टाकला. बरोबर एक तरुणी असल्याने एकच खोली असलेली झोपडी असल्याने रात्रभर लाइट चालू होती. मला असे प्रकाशात झोपण्याची सवय नसल्याने त्रास झाला. सकाळी त्यांनी विचारले की आंघोळीला गरम पाणी हवे का? म्या मूढाने ‘हो’ म्हटल्यामुळे इतरांना राग आला. सकाळी काळुमामांची सहकारीण ज्योती भेटली जी नाशिकचे राष्ट्र सेवा दल सोडून या भूमी आंदोलनात आली होती. कारण तिच्या दृष्टीने वस्तीवरील पाण्यासाठी भाण्डणारी संघटना तिला पाहिजे होती.

छात्रभारतीबरोबर सातपाटीला, वसईला शिबिरे आयोजित केली होती व सहभागही घेतला होता. (1991-92)

1991 साली दिवाळीच्या सुट्टीत बी. एड. च्या मित्रांसोबत वाड्याला मित्राच्या गावाला गेलो. तिथल्या धरणात मनसोक्त पोहलो. 1992 च्या मे महिन्यात बी. एड. ची परीक्षा झाल्यावर, आम्ही मित्र मैत्रिणी सूर्या धरणावर (पालघर तालुका, ठाणे जिल्हा) गेलो.

माथेरान : माझ्या माजी विद्यार्थ्यांच्या समूहाबरोबर जाताना दिवसभर ओल्या कपड्यात, अन्तवस्त्रांसकट राहायचे म्हणजे काय अनुभव असतो ते वर्णनापलीकडे आहे. रात्रभर चालून आलो होतो, दिवसभर माथेरानचे सर्व पोइन्ट बघितले. संध्याकाळी परत चालत रेल्वे मार्गाने, धावत, शोर्टकट मारत, घसरत उतरून घरी परत. यावेळी एक हरणटोळ दिसला. हुशारी दाखवायला पकडायला गेलो. नशीब, त्याने मारलेला डंख चुकवला. नाहीतर मला कोण वाचवणार होते? तिथे कोणी डॉक्टरही नव्हते. (१९९२-९३)

मंडल आयोगाच्या समर्थनार्थ छात्रभारती विद्यार्थी संघटना, ठाणे विभाग यांनी सातपाटी ते मढ बेटांपर्यंत सर्व कोळी वस्तींत सायकल यात्रा आयोजित केली होती. यांच्या जेवण्याची व राहण्याची जबाबदारी आम्हा प. उपनगरवासीयांवर होती. (मागे उल्लेखल्याप्रमाणे मढ बेटावर भाषण केल्याचा संदर्भ याच दरम्यानचा!) त्यासाठी मढ ते गोराई, भाडोत्री वाहनातून फिरताना गाडीचा दरवाजा उघडला व मी अर्धा बाहेर लटकत होतो. नशिबाने माझ्या सहकाऱ्याने मला आत खेचले होते. मी या सायकल यात्रेत मालवणी (मालाड पश्चिम, मुंबई) ते मढ बेटांपर्यंत भाग घेतला. मालवणीला मुक्काम असताना रात्रभर अंताक्षरी खेळत जागलो होतो व पहाटे प्रभातफेरीलाही गेलो होतो. आरे कोलोनीत पिकनिक गेली होती. कुठेतरी तार ओलांडून आम्ही बंदी असलेल्या ठिकाणी शिरलो. एक रखवालदार आला व त्याने एका कार्यकर्त्याचा हात पकडला. मी त्याला समजावले, “आधी त्याचा हात सोड!” तेव्हा माझी इतर कार्यकर्त्यांशी एवढी ओळख नव्हती पण माझा हा धाडसी स्वभाव इतरांना आवडला व मी त्यांचा झालो. (१९९२).

(1992 मे महिना) सीबीडी बेलापुर, वाशी, नवी मुंबई – हरकिसनदास इंस्टीट्यूट ऑफ जरनालीझम संलग्न एन एम कॉलेज विलेपार्ले (प) च्या पहिल्या बॅचचे आम्ही विद्यार्थी! 2 वर्षानी ही पत्रकारीतेतील पदविका आम्ही उत्तीर्ण झालो होतो. पण तोपर्यंत मला शिक्षक व्हायचे वेध लागले होते. बी.एड. ची परीक्षा चालू होती. पण राहवत नाही ना! पनवेलच्या एकमत दैनिकाच्या 'पत्रकार' या पदासाठी अर्ज केला होता. मुलाखत नेमकी बी.एड. च्या परीक्षेच्या मध्ये होती. म्हणजे एक दिवस बी.एड चा पेपर, दुसऱ्या दिवशी अभ्यास करायला सुट्टी! तिसऱ्या दिवशी पेपर!

या मधल्या दिवशी सीबीडी बेलापुर येथे सकाळी 9 वाजता मुलाखत.

मी काही पत्रकार बनणार नव्हतो, पण राहवत नाही ना! बी.एड. चा अभ्यास टाळून सकाळी सकाळी (आजचे वृत्तपत्र यायच्या आधी- संदर्भ नंतर लागेल.) अंधेरी (प) वरुन रेल्वेने सीबीडीला पोहोचलो. कचेरी बंद! समोरच्या भिंतीवर जाऊन बसलो. थोड्या वेळाने, माझ्या बाजूला एक तरुण येऊन बसला. चौकशी केली, तर तो सुद्धा मुलाखत द्यायला आला होता. ठाणे वैभव नावाच्या दैनिकात काम करत होता. आता त्याचे मला नावही आठवत नाही. गप्पा सुरू झाल्या. 10 वाजता कळले की मुलाखत दुपारी 3 वाजता आहे. मी घरी जायला निघालो. माझा उद्या बी.एड. चा पेपर होता. पण त्याला मुलाखत द्यायची होती.

तो म्हणाला, "माझी बहीण इथे बेलापूरमध्ये राहते. तिच्याकडे दुपारी जेवूया! व परत मुलाखतीला येऊया." मी अळंटळम करीत शेवटी तयार झालो. भरपूर चालत त्यांच्या घरी पोहोचलो.

चारकोपला कसे असते, तसे सिडकोने बांधलेले बंगलावजा घर होते. बहीण वैगेरे काही नाही, तो पूर्वी ज्या गावात राहत होता, (सातारा, नगर आता आठवत नाही.) तिथली शेजारची मुलगी होती. तिला ताप आला होता. बिछान्यावर होती. मी, त्याला इशारा केला, ‘आपण बाहेर जाऊन हॉटेलात जेवूया!’ पण तो पण पाय काढेना! व ते पण त्याला सोडेनात!

आधी चहा! मग घर दाखवणे! पत्नीने नवऱ्याला भाजी कशी कापायची, फोडणी कशी द्यायची, याबद्दल मार्गदर्शन केले व नवऱ्याने संपूर्ण साङ्ग्रसंगीत जेवण बनवले व आग्रह करकरून वाढले.

मी कोण होतो त्यांचा? त्यांच्या माहेरच्या शेजाऱ्याचा, आत्ता अर्ध्या तासापूर्वी बनलेला मित्र! पण दारी आलेल्या पाहुण्याला उपाशी नाही पाठवले त्यांनी! मी पूर्वी म्हणायचो, माणुसकी या पृथ्वीवर शिल्लक नाही म्हणून, पण नाही ती शिल्लक होती. तिथून आम्ही परत 3 वाजता मुलाखतीला गेलो. नापास झालो असतो तरी मला काही फरक पडत नव्हता म्हणून मी बिनधास्त होतो. 4-5 मुलाखतकारांचे पॅनल समोर बसले होते. पहिला प्रश्न! “आजक्या पेपरमधील ठळक बातमी काय?” “मी इतक्या सकाळी सकाळी मुलाखत द्यायला इथे आलो की आजचा पेपर वाचायला वेळच मिळाला नाही.” ते हताश! पुढचा प्रश्न काय विचारायचा? पण मीच हसून म्हटले, “मघाशी मुलाखतीच्या आधी बाहेर बसलो असताना बाहेरचे पेपर वाचलेत.” ते खुश! मग बातम्यानवर प्रश्न विचारले, मी उत्तरे दिली. मग नेहमीचे प्रश्न! “न्यूजचा फूल फॉर्म काय?” “नॉर्थ ईस्ट वेस्ट साऊथ” “कुठल्या बातम्या छापायला जास्त महत्व द्याल?” “पनवेलचा पेपर असल्याने प्रथम पनवेलच्या बातम्या!

वाचकांची पहिली नजर स्थानिक बातम्यांवर जाते, त्यानंतर तो/ती ज्या गावातून आले आहेत त्या गावातील बातमी, नंतर तालुका, जिल्हा, राज्य, राष्ट्र, मग आंतर्राष्ट्रीय!" पत्रकारीता माझ्या नसानसातून झळकत होती. "तुमचा राजकीयदृष्ट्या कुठल्या पक्षाला पाठिंबा आहे?" "कुठल्याच नाही." "म्हणजे नॉन पोलिटिकल?" "नाही! अँटी पोलिटिकल! माझा सर्व पक्षांना विरोध आहे." "का?" "धार्मिक दृष्ट्या विचार करायचा झाला तर, भाजपा व शिवसेना बहुस्ङ्ख्यांकाच्या बाजूने आहेत व कॉंग्रेस, जनता दल (समाजवादी) व communist (साम्यवादी) अल्पसंख्यांकाच्या बाजूने आहेत. असे एका धर्माच्या, जातींच्या, पंथानच्या बाजूने उभे राहणे मला मान्य नाही. आर्थिक दृष्ट्या विचार करायचा झाला तर communist (साम्यवाद्यांची) मते मला पटतात पण ते हुकुमशाही मानतात जे माझ्या तत्वांच्या विरोधात आहे." "मग त्यातल्या त्यात तुम्ही कोणाची बाजू घ्याल?" "सध्या कोंग्रेसचे नरसिंहराव यांची आर्थिक उदारतेची धोरणे मला मान्य आहेत. दुधात आरेला, टेलीफोन मध्ये एमटीएनएल, बीएसएनएलला, टी.व्ही. संचात नॅशनलला, टी.व्ही. चॅनल मध्ये दूरदर्शनला, रेडिओत आकाशवाणीला, विमानसेवेत इंडियन एयरलाइन्स व एयर इंडियाला, वीज पुरवठ्यात बीईएसटीला, पत्र बटवडयात भारतीय पोस्ट ऑफिसला, या सरकारी कंपन्यांना स्पर्धा हवी तरच ह्या कंपन्या व्यवस्थित सेवा देतील." "पण त्यामुळे बहुराष्ट्रीय कंपन्या बाजारात उतरतील व लघु उद्योगांची गळचेपी होईल, त्याचे काय?" "मी कुठे म्हणालो, नरसिंहरावांची सर्व धोरणे मला मान्य आहेत म्हणून!" ते हसले. त्यांनी मला अजून एक आमदार, खासदार निधीसंदर्भात प्रश्न विचारला. मी उत्तर दिले,

“मला माहीत नाही.” माझा प्रामाणिकपणा त्यांना आवडला. मी पास झालो होतो. मला नोकरी मिळाली होती. तसे पत्र माझ्या घरी आले पण कमी पगार, पनवेलमध्ये राहायला घर नाही, व त्या काळात पत्रकारावर व वृत्तपत्र दैनिकांच्या कार्यालयांवर (आज दिनांक, महानगर इत्यादी) होणारे हल्ले यामुळे आईने या नोकरीवर जाऊ दिले नाही.

पुणे:

1. आई व माझी मावसबहीण, यांच्यासोबत नाम संप्रदाय मंडळाबरोबर अष्टविनायक गणपती, देहू, आळंदी, पुण्यास महादजी शिंदे यांची छत्री, सारसबागेचा गणपती दर्शन केले.- १९९२
2. १९९३ साली मित्राबरोबर सकाळ वृत्तपत्राच्या परीक्षेला बसलो होतो.- नापास.

मित्राचे लग्न फलटणला असल्याने गेलो होतो (16 5 1993). यावेळी आमची, इमारतीतील लहानपणीची मित्रमंडळी सोबत होती. आमची राहण्याची व्यवस्था समोरच्या लॉजमध्ये केली होती. 17 5 1993 ला दुपारी लग्न लागल्यानंतर गावातल्या देवळापर्यंत वरात काढली होती. भर उन्हात नाचत होतो आम्ही. हा मात्र आरामात

घोड्यावर बसून छत्रचामराखाली सावलीत चालला होता. खर म्हणजे त्यालाही उतरून नाचायचे होते. पण त्याच्या नातेवाइकानी त्याला परवानगी दिली नसती.

धाकटा भाऊ, मित्र व त्याचे २ मित्र नेरळ स्टेशनवरून टॅक्सी पकडून माथेरानला गेलो. ते २ मित्र एखादी तरी मुलगी माथेरानला पटवून तिच्याशी लग्न करायचे याच उद्देशाने आले होते. शेवटी अविवाहित परतले. एकमेकांशी ते अक्षरक्ष: ५ पैशावरून भांडत होते. आम्ही सोल्जर सिस्टीम किंवा तू तेरा मै मेरा पद्धत वापरत नव्हतो तर जो काही खर्च होईल तो आपापसात विभागून घ्यायचा ही पद्धत वापरत होतो. त्यामुळे माझ्या धाकट्या भावाने १ पापड जास्त खाल्ल्यावर त्यांनीसुद्धा १-१ पापड जास्त खाल्ला. शेवटी वैतागून माझा धाकटा भाऊ त्यांना सोडून वेगळा खाली उतरला. त्यांच्यासोबत मी व माझा मित्र! (१९९३-९४)

1993- मार्च महिना- माझ्या थोरल्या भावाच्या भिराच्या मित्राचे लग्न मंगलोरला होते. आम्ही घाटगे पाटील ट्रान्सपोर्टच्या बसने गिरगाववरून निघालो. मंगलोरला लग्न आटपल्यानंतर कासारगौडला (केरळ) येथे त्याच्या भावाकडे जायची योजना ठरवली. जाताना बसने गेलो. तिथे खाजगी बसेसच एस.टी. सारख्या चालवल्या जात होत्या. वाहकसुद्धा गणवेशाशिवाय! कासारगौडला उतरल्यावर, ‘त्याना जेवण बनवण्याचा त्रास का द्यायचा? म्हणून आम्ही एका चीनी रेस्टॉरंटमध्ये जेवायला गेलो. हिरवळीवर एक गोलाकार चौथरा, त्यावर गोलाकार टेबल, त्यावर एकखांबी गोलाकार छप्पर असा जामानिमा होता. आमच्यापैकी एका गर्भश्रीमंत व्यावसायिक मित्राने कोणालाही न विचारता अनेक चिनी पदार्थ मागवले. बरे! केरळातल्या डिशेस आपल्या मुंबईसारख्या कंजूष नाहीत. प्रत्येक डिश आपल्या दुप्पट-तिप्पट. पोट तुडुंब भरले होते. नंतर त्या नातेवाइकान्कडे गेलो. त्यांनीही जेवण बनवले होते. त्यांनी खाल्ल्याशिवाय पाठवले नाही. ताटभर भात, सांबार भरपूर वैगेरे. जेवल्यानंतर मद्रासी केळी खायला घातली. जेवून झाल्यावर प्रथम संडास कुठे आहे ते विचारले. इतरांनी जी ओकायला सुरुवात केली ती कासारगौड स्थानक येईपर्यंत थांबलेच नाहीत. ट्रेनमध्ये चढलो व झोपून दिले. तेव्हा कोकण रेल्वेमार्ग सुरु झाला नव्हता. गाडी केरळ, तामिळनाडू, आंध्रप्रदेश दाखवत सोलापूरमार्गे यायची. दुसऱ्या दिवशी ट्रेनमध्येच दाढी करून आंघोळ न करता सकाळी कुर्ल्याला उतरून, सकाळ अधिवेशनाला घाटकोपर पश्चिमेच्या शाळेत शिकवायला गेलो.

मागच्या वेळेला मला कळले होते की भीमाशंकरला जायला २रा रस्ता पण आहे ज्याला ५ तास लागतात पण तो शिडीच्या रस्त्याप्रमाणे कठीण नाही. या वेळेला (१९९४) माझ्याबरोबर माझे बी. एड. महाविद्यालयातील२ मित्र शेखर व गणपती (नाव बदलले आहे), पत्रकारितेच्या पदविका महाविद्यालयातील १ मित्र राजू व गणपतीचा १ मित्र होता. कर्जतला 15 रुपयेवाल्या पोह्याचा अनुभव घेऊन खांडसच्या पायथ्याशी पोहोचल्यावर डोंगराची उंची पाहिल्यावर गणपती व त्याचा मित्र आल्या पावली परत फिरले. शेखर ५ लीटरची पाण्याचा बाटला घेऊन वर चढायचा. त्याचे सामान आम्ही घेऊन जायचे. अट अशी की येताना पण त्याचे सामानही आम्हीच उचलायचे. तो रिकामा बाटला घेऊन येणार. आम्ही ठरवले होते की ५ तासाच्या लांबच्या रस्त्याने जायचे, पण रस्ता चुकून शेवटी शिडीवाल्या रस्त्यानेच गेलो. राजू प्रचंड घाबरला होता. त्याचे म्हणणे असे की ‘एवढी वर्षे जपलेला हा देह असा फुकाफुकी का घालवायचा’? तो परत जातो म्हणाला. म्हटले, “जा”. पण तो एकटा कसा जाणार? शेवटी आला बिचारा. त्याला आधार देत त्या दरीतून पार केला. एका बाजूने मी त्याला पकडले. एका बाजूने शेखरने त्याला ढकलले. मला मात्र त्या दरीवर उभे राहताना भीती वाटत नव्हती, पण गच्चीवरून खाली पाहताना (चौथ्या मजल्यावरून) मला भीती वाटते. का कोणास ठाऊक? वर पोहोचलो तर एक मुलगा एकटाच खाली उतरत होता. मानले पाहिजे. चढणे एकवेळ ठीक आहे, पण उतरणे जास्त कठीण असते. ते पण एकट्याने!

गोवा:- 2 जून १९९४ रोजी कदंबा बसने म्हापशाला (गोवा) मधुचंद्रासाठी निघालो. आमच्या पेडणेकरांची प्रथा अशी होती की लग्न झाल्यानंतर पेडण्याला आमचे कुलदैवत भगवती देवीला ओटी भरावयास जायचे व नंतर गोव्यालाच मधुचंद्र करायचा. प्रथेप्रमाणे प्रथम भगवती देवीचे दर्शन घेतले. त्यावेळी २१ वर्षांपूर्वी पेडणे आतासारखे विकसित झाले नव्हते. एकच खानावळ होती. आमचे तिथे घर नाही. त्या खानावळीत जेवायला गेलो. भात, वरण किंवा कालवण, मासे इत्यादी जेवण. ताटभर भात वाढला होता. मी सगळा भात खाल्ला. पत्नीने अर्धा. मला मालकाने अनुनासिक स्वरात विचारले, "शित व्हंया?" मला आधी कळले नाही, कारण मराठीत 'शित' म्हणजे ताटाभोवती जे सांडत ते! नंतर कळले कोकणीत भाताला 'शित' म्हणतात. एवढे ताटभर खाल्ल्यावर अजून? नंतर म्हापशाला गेलो. तिथे 'शिरसाट' लॉजमध्ये खोली घेतली. स्वस्त व मस्त! पत्नीसाठी एकच अडचणीची गोष्ट म्हणजे, बाथरूम बाहेर, सार्वजनिक! तिथे तेव्हा २० रुपये ताशी भाड्यावर कायनेटिक होंडा मिळायची. पण माझ्याकडे परवाना नव्हता. रिक्षाने समुद्रकिनाऱ्यावर गेलो. संध्याकाळी ७ नंतर परत यायला रिक्षा नसायची. सुदेवाने एक मिळाली. परत कानाला खडा! संध्याकाळी गोव्याच्या कोणत्याही समुद्रकिनाऱ्यावर जायचे नाही. परत यायला रिक्शा मिळणार नाहीत, (त्या काळी). तिसऱ्या दिवशी तिला ताप भरला. नशिबाने एक डॉक्टर जवळपास होते. त्या रात्री कुठेच बाहेर पडलो नाही. चौथ्या दिवशी वादळ व मुसळधार पाउस! टेलिफोनच्या तारा तुटल्या होत्या. विजेचे खांब तुटले होते. झाडे रस्त्यावर आडवी पडली होती. गोव्याचा इतर भारताशी संपर्क तुटला होता. आम्ही तसेच बाहेर पडलो. 'पुढारी' प्रेसचा टेम्पो सावंतवाडीला

निघाला होता. त्याना विनंती केल्यावर त्यांनी सावंतवाडीला सोडले. तिथून एस.टी. पकडून मालवण! मालवणला आमचे घर आहे. माझी १ मावशीही तिथे आहे. वायंगणी आमचे मूळ गाव! आईचे माहेरही तिथलेच! माझ्या पत्नीने यापूर्वी कधीच कोठले गाव पाहिले नव्हते. मुंबईतच जन्माला आली, वाढली, लग्नापूर्वी ५ वर्षे पुण्याला तिच्या मावशीकडे होती. पण त्याना गाव नाही. (आहे! ओटव, पण तिथे त्यांचे घर नाही.) तिचा समज असा होता की मराठी चित्रपटात दाखवतात ते गाव असते. बैलगाडी असते, पाटील असतात, तमाशा असतो वैगेरे!

वायंगणीला मामाच्या घरी गेल्यावर मामीने फ्रीजमधील थंड पाणी दिले. पत्नी म्हणते, "हे काय गाव आहे? इतके आधुनिक?". नंतर पुढच्या वर्षी (1995) तिच्या मावशीच्या गावी पोयऱ्याला गेल्यावर, तिची खरोखरचा गाव बघायची इच्छा पूर्ण झाली. आचरा तिठा ते देवगड हा रस्ता एवढा खतरनाक की व्ही आकाराच्या या दरीसारख्या रस्त्यावर एस.टी.ची मागील चाके मागच्या उतारावर तर पुढची चाके पुढच्या चढावर.

इथे आंघोळीची व्यवस्था मात्र नारळाच्या झावळयांच्या आड होती, ती पत्नीला आवडली नाही. पण नदीकिनारा, शिंपले वेचणे, संध्याकाळी शेतात जाणे, आंबे, फणस, करवंदे काढणे, सड्यावर (डोंगरावर) चढणे ह्या प्रकारात ती रमून गेली. ह्या वेळेला आम्ही आमच्या मित्राच्या लग्नासाठी तराळयाला गेलो होतो. भरलेल्या एस.टी.त चढू शकलो नाही, म्हणून ट्रकमधून उभ्याने प्रवास केला होता.

आचरा ते कणकवली, कणकवली ते तराळा व पुढे त्याच्या गावाला आतमध्ये. तिथे जाताना एका शेतात आम्हाला गिधाडांचा थवा दिसला होता.

(१९९५) यापूर्वी एकदा संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात असा थवा मी व माझ्या मित्राने पाहिला होता. (1994) मालवणवरून मुंबईची तिकीट मिळेना. म्हणून पुण्याला गेलो. (1994) तिथे पत्नीची मावशी राहायची. त्यांच्याकडे रिक्षाने गेलो असता रिक्षाने लांबचा वळसा घालून पुणेरी हिसका दाखवला. तिथून मुंबई!

माथेरान- माझ्या मित्रांबरोबर व माझ्या चुलतबहिणीच्या मित्र मैत्रिणींसह रेहेकुरी अभयारण्याकडे निघालो. मी वाचले होते की ते कर्जत जवळ आहे. नंतर कळले की ते सोलापूरमधील कर्जत जवळ आहे. शेवटी माथेरानला जाऊन मुक्काम केला. मला भूगोलात 40 पैकी 40 गुण मिळायचे यावर यांचा अजूनही विश्वास नाही. मेलेला विंचू पाहिला. (१९९४-९५)

1994 साली मी व माझा मित्र- शेखर, दोघेच, पावसाळ्यात इर्शालगडावर निघालो. हा ईशालगड रायगड जिल्ह्यातील. याचे वैशिष्ट्य असे की याच्या टोकावर ६ फुट व्यासाचे नेढे होते. पावसाळा असल्याने रस्ता निसरडा होता. एका छत्रीखाली दोघेजण जेवायचो. तरी कपडे ओले, जेवणाच्या डब्यात पाणी. ज्या खबदाडीत आधारासाठी बोटे खुपसायचो, त्यात एखादा खेकडा असायचा. समुद्रकिनाऱ्यापासून एवढ्या वर खेकडे कसे आले, ते कळले नाही. बहुतेक भारताचा द्वीपकल्प आशिया खंडावर जेव्हा आपटला, तेव्हा जे डोंगर तयार झाले, त्यांच्याबरोबर आले असतील. धुक्यात वर गेल्यावर नेढे कुठे दिसेना. नंतर लक्षात आले की, आम्ही नेढयाच्याही वर पोहोचलो होतो. आता खाली उतरून जायचे होते. धुक्यात मघाशी जिथून आलो तिथून उतरलो तर कडेलोटाची शिक्षा. शेवटी डोंगरावरच कुठेतरी उताराचा शोध घेण्याचे ठरवले. चालता चालता मी घसरून दरीत पडलो. तो दरीच्या कडेवरील एका झाडावर पडलो. समोर शेखर चालतोय! त्याला पत्ताच नाही, माझे काय झाले ते? शेवटी स्वत:च काहीतरी प्रयत्न करून वर आलो. त्या धुक्याची आठवण कायमची माझ्या मनात मृत्यूशी जोडली गेलीय. मृत्यू हा असा धुक्याच्या रंगासारखा राखाडी असणार! गडद राखाडी! मनाला नैराश्य आणणारा रंग! आधीच पाऊस! त्यात मळभ दाटून आलेले! आम्ही तर एकमेकांशीही गप्पा मारत नव्हतो. गपचूप चाललो होतो! आमचे दोघांचे काही बरेवाईट झाले असते, तर जगाला पत्ताच लागला नसता की आमचे काय झाले? शेवटी एक आदिवासी त्या धुक्यात दारूची भट्टी लावून बसलेला दिसला. त्याने त्याच्या गावाकडून खाली जाण्याचा रस्ता दाखवला. खाली उतरताना एक माणूस सोबतीला मिळाला. त्याचे काम सरकारसाठी

कुष्ठरोगी शोधण्याचे व नंतर त्याना जागृत करून उपचारांसाठी सरकारी डॉक्टरांकडे नेण्याचे होते. म्हणजे त्याचा संबंध रोज कुष्ठरोग्यांशी येत असणार! कुष्ठरोग, कधी कधी 20 वर्षे शरीरात छुप्या अवस्थेत राहतो म्हणे! त्यानंतर 20 वर्षे, 2014 सालापर्यंत मी माझ्या शरीरावर ज्यात स्पर्शाची जाणीव होत नाही असा चट्टा निर्माण झाला आहे का ते शोधत होतो! अजून तरी नाही सापडला!.................क्रमश:

खंडाळा – 1994-95 च्या दरम्यान सकाळी- सकाळी मी व माझा मित्र खंडाळ्याला ट्रेनने पोहोचलो. ५ कि.मी. लोणावळ्यापर्यंत रेल्वे मार्गावरून चालत, तिथून भुशी धरण व परत, असे एका दिवसात २२ कि.मी. चाललो.

लग्न झाल्यावर पहिल्या ३१ डिसेंबरसाठी (१९९४) कणकेश्वर देवळाच्या (अलिबाग) आम्हा मित्र मैत्रिणींच्या जेवणाच्या नोंदणीसाठी मी व माझ्या पत्नीने कणकेश्वरला जायचे ठरवले (२५ डिसेंबर १९९४). भाउच्या धक्क्यावरून लौंच पकडून रेवसला उतरलो. एस.टी. पकडून कणकेश्वरच्या पायथ्याशी गेलो. भर दुपारी ७०० पायऱ्या चढून देवळात गेलो. तिथल्या पूजाऱ्याना सांगितले की आम्ही मित्रमंडळी (१३-१४ लोकांसाठी) ३१ डिसेंबर १९९४ च्या रात्री जेवायला येत आहोत. त्यानंतर परत ७०० पायऱ्या उतरून आम्ही खाली पोहोचलो तर शेवटची लौंच निघून गेली होती. अलिबागला जाणारी शेवटची एस.टी.ही निघून गेली होती. आता पत्नीला घेऊन रेवसच्या धक्क्यावर कसे राहायचे? अचानक आठवले की इथे जवळच्या गावात नांदगावात, माझ्या थोरल्या भावाच्या सास-यांनी इथल्या एका व्यक्तीला के.एम. इस्पितळात नोकरी मिळवून दिली होती, त्यांचे बंधू राहतात. मी पत्नीला घेऊन त्या गावात गेलो. गावक-यांनी घर दाखवले. त्याना जाऊन भेटलो. ते मला ओळखत होते. त्यांनी आमची राहण्याची व जेवणाची व्यवस्था केली. प्रथम गावातल्या प्रतिष्ठीत व्यक्तीच्या घरातून ट्रंककॉल नोंदवला. त्यावेळी मोबाईल आले नव्हते. बी.एस.एन.एल. च्या टेलिफोनवर ट्रंककॉल नोंदवावा लागायचा. त्यानंतर लागला की, फोनवर एस.टी.डी. वापरता यायचा. १-२ तासानंतर कॉल लागल्याचे त्या प्रतिष्ठीत व्यक्तीने कळवले. मग आम्ही त्यांच्या घरी जाऊन माझ्या थोरल्या भावाला फोन करून सांगितले, की "आम्ही सुरक्षित आहोत, उद्या सकाळी पहिल्या लौन्चने येऊ". त्यानंतर आम्ही ज्यांच्याकडे राहिलो, त्यांनी आम्हाला कोंबडीची व्यवस्था केली. झोपायला एक स्वतंत्र खोली दिली. आम्हाला एवढे सगळे नको होते, फक्त साधे जेवण व झोपायला पुरेशी जागा मिळाली

असती तरी चालले असते. सकाळी गरम गरम भाकरी चहाबरोबर, नाश्त्याला दिली. यापूर्वी माझा समज होता की माणुसकी या पृथ्वीवर शिल्लक नाही, पण अजूनही गावात ती शिल्लक होती. त्यांनी या सर्वांचे पैसेही घेतले नाहीत. पहाटे पत्नीस तिथल्या स्त्रियांनी विचारले की, “तुमच्या नवऱ्यास पत्नीने पंजाबी ड्रेस घातलेला कसा चालतो? साडी घालणे कम्पल्सरी नाही का?” ती उत्तरली, “नाही, लोकल ट्रेनमध्ये ड्रेस सुटसुटीत पडतो.” आम्ही सकाळची पहिली लौंच पकडून गेलो. पत्नी तिथूनच तिच्या कचेरीत गेली व मी घरी आलो.

३१ डिसेंबर १९९४ ला मी, पत्नी, धाकटा भाऊ, चुलत भाऊ, त्याची पत्नी, २ मित्र, त्यांच्या बायका, चुलत बहीण, तिच्या २ मैत्रिणी, अजून एक चुलत चुलत बहीण, एक बी. एड. महाविद्यालयातील मित्र असा भलामोठा गट कणकेश्वरच्या दिशेने निघाला. काहीजण कामावरून सरळ आले होते, म्हणून शेवटची लौंच पकडून आम्ही कणकेश्वरच्या पायथ्याशी पोहोचलो तेव्हा रात्र झाली होती. आता ७०० पायऱ्या चढायच्या होत्या. एका मित्राने त्याच्या पत्नीस व चुलतबहिणीच्या मैत्रीणींना सांगितले होते की, “आपण बीचवर चाललोय”, ७०० पायऱ्या चढायच्या आहेत, याची कल्पना दिली नव्हती. अन्यथा त्या आल्या नसत्या. त्या उंच टाचांचे स्यांडल घालून आल्या होत्या. आम्ही अंधारात ७०० पायऱ्या चढत असताना (५००० फुट) अजून एक गट वर जाताना आम्हाला दिसला. आता हा गट वर पोहोचल्यावर आम्हाला जेवायला मिळणार नाही, म्हणून आम्ही वेगाने चालायला सुरुवात केली. त्या गटाला ओलांडून आम्ही वर पोहोचलो व पुजाऱ्याना झोपेतून उठवले व आमच्या नोंदणीची आठवण करून दिली. ते म्हणाले की, “एवढ्या

उशीरा (रात्रीचे 10) कसले येताय, म्हणून जेवण काही बनवले नव्हते.” शेवटी त्यांनी एवढ्या सर्वांसाठी गरम गरम भात, वरण, त्यावर तूप, बटाट्याची सुंदर भाजी, पोळया, चटणी- कोशिंबीर, पापड, लोणचे असा फक्कड बेत बनवला. चालून- चालून प्रचंड भूक लागली होती. माझा धाकटा भाऊ जो ३६५ दिवस मासे खातो, तो पण ३१ डिसेंबरच्या रात्रीसुद्धा, शाकाहारी जेवण जेवून खुश झाला. रात्री तिथेच राहून, सकाळी कणकेश्वराचे दर्शन घेतले. सकाळी एका मित्राची बायको त्याला म्हणाली, “मी उंचावरून (२-३ फ़ुट) उडी मारते, तू मला पकड.” तो “हो” म्हणाला. तिने उडी मारल्यावर त्याने चक्क तिला सोडून दिले. ती धपदिशी आपटली. असे आमचे मित्र! आजूबाजूचा परिसर बघून निघालो.

१९९५ साली माझी पत्नी, माझे मित्र, त्यांच्या सहचारिणी, इतर अविवाहीत मित्र- मैत्रिणी मढ बेटावर कोजागिरी पुनवेनिम्मित्त एक बंगला ठरवून रात्रभर संगीत मैफल साजरी केली होती.

चुलतभावाच्या बजाज डिस्कवरी ४ एस. च्याम्पिअन या बाईकने गेलो. प्रथम माळशेज घाटातून भिजत! जुन्नरला चुलतभावाच्या मामेसास-यांकडे मुक्काम टाकला. पाठ्पिशवीत पाणी शिरल्याने ओल्या कपड्यातच झोपलो. वाडा जुन्या काळातला. वाड्याच्या भिंती म्हणजे ‘बंडे!’ ५ फुट रुंदीचे. २ भिंतींचे!! अजूनही भिंतीमध्ये जुन्या काळातले तोफगोळे सापडतील. तिथून घोडेगाव करत भीमाशंकर! वाटेत बाईक पंक्चर झाली. रिक्षा पकडून टायर बदलून आणावा लागला. इतरांच्या मोपेड, ल्युना सहज वर जात होत्या. आमची बाईक आम्हाला धक्का मारून वर न्यावी लागली. तिथून तळेगाव! मुंबई-गोवा हायवेने मुंबईला. पनवेलला पोहोचेपर्यंत रात्र झाली होती. अक्षरक्ष: झोपेत बाईक चालवून भावाने मुंबईत गाडी आणली. (१९९५)

ज्या शाळेत मी शिकवत होतो त्या शाळेतील सहकारी शिक्षकांबरोबर माथेरानला गेलो होतो. 8 कि.मी. चढ डांबरी रस्त्याने चालत गेलो. वर १ हॉटेल बुक केले. काहीजण कड्याच्या टोकावरील झाडाच्या फांदीच्या टोकावर बसून आले. आम्हाला भीती एव्हढीच की ते खाली पडल्यावर त्यांच्या घरी कसे कळवायचे? रात्री मुक्काम केला. दुसऱ्या दिवशी परत आलो. माथेरान पाठ झालय आता. (१९९५-९६)

पन्हाळा (कोल्हापूर): १९९५ साली मे महिन्यात माझ्या एका मित्राचे लग्न झाले. त्याच्या मधुचंद्रासाठी दुसऱ्या मित्राने पन्हाळयाला एका महाग हॉटेलातील एक सूट ठरवला. पण ज्याचे लग्न झाले होते त्याने आधीच दुसरीकडे व्यवस्था केली होती. आता पन्हाळयाची नोंदणी फुकट जाऊ नये म्हणून त्याने मला विचारले. मी व माझी पत्नी आमचा दुसरा मधुचंद्र साजरा करण्यासाठी पन्हाळयाला गेलो. वर चढत असताना अनेक स्वस्त हॉटेल्स होती. पण आमचे बुकिंग झाले असल्याने आम्ही त्या हॉटेलपर्यंत गेलो. तिथे गेल्यावर कळले की नोंदणी झालीच नव्हती. शेवटी पदरचे पैसे खर्च करून तिथे १ दिवस काढला. पन्हाळा फिरल्यावर सरळ मालवणला आमच्या गावी गेलो.

आरे कॉलनी सहल (1995-99) मला माझ्या अमेरिकास्थित धाकट्या भावाने एक डिजिटल कॅमेरा भेट दिला होता. त्याचे वेगवेगळे मोड्स ट्राय करण्यासाठी मी व माझे 2 मित्र आरे कोलोनीत गेलो होतो. तिथे झूम, फॉरेस्ट मोड, निघत मोड असे वापरुन बघितले. यांच्यापैकी एका पत्रकार मित्राने मला मंगल गाणी दंगल गाणीचा पास दिला होता. हा कार्यक्रम उघड्या मैदानावर होता. या कार्यक्रमाला त्या काळातले महाराष्ट्राचे मुख्यमंत्री येणार होते. मी हा कॅमेरा घेऊन गेलो होतो. सुरक्षा रक्षकानी क्यामेराचा फ्लॅश मारायला सांगितला. यापूर्वीचे सगळे रोल वाले कॅमेरे फ्लॅश शिवाय काम करत नव्हते. हा कॅमेरा मात्र फ्लॅश ऑफ मोड वर काम करायचा. शेवटी फ्लॅश ॲक्टिव करून मला फोटो काढावा लागला, तेव्हा त्यांनी मला आत जाऊ दिले. मला प्रेस मुळे या मुख्यमंत्र्यांच्या बरोबर मागे खुर्ची मिळाली होती. अतिरेक्यांचे दुर्देव, मी त्यांच्या संघटनेत नव्हतो.

1995 मी ज्या शाळेत शिकवत होतो त्या शाळेची सहल राणीच्या बागेत गेली होती.

१९९६ च्या सुमारास डिसेंबर महिन्यात मी, माझी पत्नी, ८ महिन्याचा मुलगा, माझी 1 मावसमेहुणी व सासू माझ्या दुसऱ्या मावसमेहुणीच्या घरी (सिडको कॉलोनी- नाशिक) राहायला गेलो होतो. काळ्या रामाचे देऊळ, गोदावरी काठ, वणी इत्यादी पाहून आलो. मुलाला दम्याचा त्रास होता पण डिसेंबरच्या नाशिकच्या थंडीतही त्याला कसला त्रास जाणवला नाही.

१९९७ मध्ये मावसमेहुण्याबरोबर नाशिकला त्याच घरी जाऊन आलो. शनिवारी गेलो व रविवारी आलो. येताना गर्दीत बसमध्ये चढत असताना बसचा पत्रा लागून हाताला कापले गेले. त्वचा कापून मांस दिसत होते, पण त्या धक्काबुक्कीत कधी लागले ते कळलेही नाही. आजही हातावर ती खूण आहे.

1997 साली आमच्या पेडणेकर कुटुंबियांच्या प्रथेप्रमाणे [लग्न झाल्यावर पेडण्याला (उत्तर गोवा) भगवतीच्या दर्शनाला जाऊन येणे] धाकटा भाऊ, वहिनी, तिच्या २ मैत्रिणी, त्यापैकी एकीची थोरली बहिण, तिचा नवरा, मुलगा, माझा चुलतभाऊ व मी असा मोठा परिवार गाडी करून निघालो. प्रथम देवरुख, नंतर पेडणे, मग उत्तर गोवा, मायेम लेक. 'मायेम लेक'च्या बाजुच्या हॉटेलात पापलेटचे ३ तुकडे त्या काळात ८०० रुपयाला होते. येताना वेंगुर्ला, शिराळयाजवळील वेतोबाचे देऊळ, रेडीचा २ हातांचा गणपती, धामापुरचा तलाव, मालवण- तारकर्ली, देवबाग, मालवणचा बाजार, तेथील पारिजात त्र्यावेल्सच्या दुकानातील आईस्क्रीम, राणे कोल्ड्रिंक्सचे दुकान, विजया बेकरी, झांट्ये काजूचा कारखाना, जेवणानंतर सोलकढीचा अख्खा ग्लास, सिंधुदुर्ग किल्ला (तेव्हा स्नोर्केलिंग, स्कूबा डायव्हिंग व पाण्यातले खेळ चालू झाले नव्हते. रॉक गार्डनही उघडले नव्हते). कचेरीच्या खडकावरचा (राजकोट) सूर्यास्त बघायला मजा यायची. मेढे, फोकांडया पिंपळाचा पार, अरुण भोजनालय, देसाई हायस्कूल, टोपीवाला हायस्कूल, कन्या हायस्कूल, बोर्डिंग ग्राउंड (आता तिथे रणजी क्रिकेटचे सामने भरतात. पूर्वी सायकल, दुचाकी शिकायला या मैदानाचा उपयोग व्हायचा), चिवल्याची येळ (बीच), कोळंबची खाडी, आडारीचा पूल, कालावलीचा पूल, तोंडवळीच्या फाट्यावरील फाटका वड, व्याघ्रेश्वरीचे देऊळ, नाथाची भजी, वायंगणी, आमची सतीची देवी (वीरगळ), दत्त मंदीर, वायंगणीची येळ, आचऱ्याचे रामेश्वराचे देऊळ, बाजार, आचरा तिठा, कणकवलीकरून गणपती पुळे, मालगुंडला जाऊन परत येत असताना सगळयाना जुलाब सुरु झाले. प्रत्येक जण मिनरल वाटरची बाटली घेऊन रानात धावू लागला.

१९९७ मध्ये पत्नी, मावस मेहुणी व परिवाराबरोबर पुणे फिरावयास गेलो असता कात्रज सर्पोद्यानात गेलो. घडीयाल, सुसर पाहिली.

माझे लग्न झाल्यावर, (1996 नंतर) मी, पत्नी व मुलगा वज्रेश्वरीला गेलो होतो. तिथे एका लॉजवर उतरल्यावर कळले की त्या खोल्या एका तासासाठी भाड्याने दिल्या जातात. माझी पत्नी एवढी रागावली होती की विचारू नका. (१९९८)

(१९९८) नुकतीच कायनेटीक होंडा स्कूटर घेऊन चालवायलाही शिकलो होतो. एकदा सकाळी पनवेलच्या शिक्षकांकडे ती चालवत घेऊन गेलो. त्यांच्या घरचा पाहुणचार घेऊन गाडेश्वर धरण पाहावयास गेलो. तेथून

सुधीरच्या मित्राकडे आतमध्ये एका गावात गेलो. तिथून 1 ट्री हिल, माथेरानला जायला एक वाट (चढ) होती. आम्ही रात्रभर तिथे राहिलो व पहाटे मी चारकोपला जायला निघालो. तिथून पनवेलपर्यंत येणाऱ्या अंधाऱ्या रस्त्यावर स्कूटरची चावी वाटेत कुठेतरी पडली. आता अंधारात ती दिसणार नाही व गाडी बंद करता येणार नाही. कायनेटिक होंडा असल्याने तिची पेट्रोलची तोटी पण मागच्या सीटखाली! चावीशीवाय उघडता येणार नाही. चारकोपला जाईपर्यंतचे पेट्रोल शिल्लक होते. तशीच न थांबता घरांपर्यंत गाडी पळवली.

१९९९ साली मी व माझ्या मित्राने युथ होस्टेलचे सदस्यत्व घेतले व २५ मे ते ७ जून असा 14 दिवसांचा हिमाचल प्रदेशातील सार पास ट्रेकसाठी नोंदणी केली. थंडीसाठी काही गरम कपडे (तरी तिथे कमी पडले- शेवटी मित्राने आपले वापरावयास दिले), क्यानव्हासचे शूज (बर्फात घसरू नये म्हणून), गोगल (बर्फावरून परावर्तीत होणाऱ्या उन्हाचा त्रास होऊ नये म्हणून) मुंबईतच घेतले. मित्राने डोंगरावर चहा बनवण्यासाठी भांडीही घेतली. ती काही वर नेता आली नाहीत (१५ किलोच्या वजनाची अट).

दिल्लीला जाणारी ट्रेन पकडली. आयत्या वेळेला मित्राने टांग दिली. नंतर विमानाने येतो म्हणाला. एकट्यानेच दिल्ली गाठली. रात्री स्वागत करायला चुलत बहिण आली होती, जी दिल्लीतच एका इस्पितळात अपंगाना कृत्रिम हात-पाय पुरवायचे काम करायची. (जयपूर फुट नव्हे, प्रत्यक्षात काम करू शकणारे अवयव.) तेव्हा ती वसंत कॉलनीत पेइंग गेस्ट म्हणून राहायची. रात्री दिल्लीत महिलांनी फिरणे सुरक्षित नसल्याने, ती तिच्या एका पुरुष सहकाऱ्याबरोबर आली होती. त्यानंतर ती निघून गेली. मी चालत चालत स्टेशनसमोरच्या हॉटेलकडे जाऊ लागलो. एक माणूस मला, ‘हॉटेल पाहिजे का’ म्हणून विचारत होता. मी त्याच्याकडे दुर्लक्ष करून समोरच्या हॉटेलकडे गेलो. या पठ्ठ्याने स्वागतिकेला सांगितले की त्याने मला इथे आणले. स्वागतिकेने मला विचारले की “त्याने, मला इथे आणले का?” म्हणून. मी “नाही” म्हणालो. स्वागतिकेने मला त्यांच्या २ऱ्या हॉटेलचा पत्ता दिला व एक सायकल रिक्षा करून दिली. हे हॉटेल दिल्ली शहरात आतमध्ये होते. त्याना सांगितले की माझा मित्र दुसऱ्या दिवशी येईल व २ दिवसांची नोंदणी केली. सकाळी लाल किल्ला बघावयास निघालो. बसला प्रचंड गर्दी! वाहक गणवेशाशिवाय! तिकीट काढले नाही, तरी कळणार नाही, एवढी गर्दी. एकही स्त्री बसमध्ये शिरायची हिम्मत करत नाही. लाल किल्यावर मे महिन्याच्या भर उन्हात फिरत होतो. खिशात ‘मराठीत(?)’ मला, उष्माघाताचा आघात झाल्यावर काय करावयाचे याची चिठ्ठी होती. खरोखरच त्या कोरड्या हवेत, उन्हात फिरताना चक्कर येऊ लागली. दुपारी जेवल्यावर बहिणीला भेटायला तिच्या इस्पितळात गेलो. तिने मला एका रुग्णाला भेटवले, जी नुकतीच हिमालयातून आली होती. तिच्या पाठीचा कणा मोडला होता. ती मुंबईची

होती. तिला विचारले, “मुंबईला कुठे?” तर ती उत्तरली “अंधेरी!”, “अंधेरीला कुठे?” “अंधेरी(प)!” “पश्चिमेला कुठे?” “चारबंगला!”. नशीब, मला वाटले की अशीच सांगत राहिली तर दा.नौ. नगर(२)ला समुद्रदर्शन सोसायटीत, ९ क्रमांकाच्या इमारतीत माझी ‘शेजारीण’ निघतेय की काय? पण एकूण, माझी बहिण मला सावध करण्याचा प्रयत्न करत होती, की मी हिमालयाचा ट्रेक करू नये. त्यानंतर तिने मला ती जिथे पेईंग गेस्ट म्हणून राहत होते, त्या पंजाबी काकीच्या घरी नेले. नंतर मी स्थानिक विमानतळावर (जे मूळ शहरापासून दूर आहे.) मित्राचे स्वागत करावयास गेलो. तिथून हॉटेलला गेलो. रात्री पराठा व ‘सरसोंका साग’ भाजी खाल्ली. मित्र म्हणाला “इथली लस्सी छान असते म्हणून”. आपल्यापेक्षा पेला मोठा असतो, पण ‘पेपर’ मिसळलेला तिथेही होता. नंतर चंदिगढलाही अशीच ‘पेपर’मिश्रित लस्सी होती. शुध्द लस्सी आता पंजाबलाही मिळत नाही. दुसऱ्या दिवशी सायकलरिक्षात बसून बसस्थानकावर पोहोचलो. दिल्लीहून चंदिगढसाठी बस पकडली. सामान वर टपावर होते. टपावरही माणसे बसली होती. माझी ब्याग उघडून त्यातून छोटे सामान काढण्यात आले. चंदिगढवरून कुलूला पोहोचलो. कुलूहून कसौली! रस्ता इतका अरुंद की एकावेळी एकच गाडी जाऊ शकते. मध्येच दरडी कोसळल्याने रस्ता बंद व्हायचा! त्या रस्त्यावरून ते गाडी चालवायचे ते एकदम कडेकडेने. एका बाजूला उंच पहाड, तर २ऱ्या बाजूला खोल दरी! खाली पडलो तर हाडही मिळायचे नाही. कसौटीला आमचा बेस कॅम्प (शिबीर) होते. (२९-५-१९९९) समुद्रसपाटीपासूनची उंची ५००० फुट! आम्हाला मुंबईकराना एक तंबू मिळाला होता. १५ लोक होतो आम्ही. त्यात मालाडचे ५ जण होते. ‘लार्सन आणि टूब्रो’चे ५ जण होते. ही मंडळी प्रत्येक शनिवारी- रविवारी ट्रेकवर जायची. वर्षातून एक मोठी सुट्टी घेऊन हिमालयात!

बद्री केदारनाथला जाऊन आली होती. उताराला तिथली लोक ‘ढलानही ढलान है|’ असे म्हणतात हे ज्ञान घेऊन आले होते. लोकसत्ताचे तेव्हाचे पुरवणी संपादक व त्यांचे कुटुंब आमच्या बरोबर होते. एक मुसलमान मुलगा एकटाच भारतभर फिरत होता. कन्याकुमारी बघून आला होता व हा ट्रेक संपल्यावर काश्मीर, लडाखला जाणार होता. ४-५ गुजराथच्या तरुण-तरुणींचा गट होता. एक तरुण युथ होस्टेलमध्ये सिनिअर होता व त्यांचाच उंचावर सिगारेट न पिण्याचा नियम तोडत होता. आमचा ऑक्सिजन कमी करत होता. वर हवा विरळ असते, ऑक्सिजन कमी असतो व हे सिगारेट पिणारे तो अजून कमी करतात. दुसऱ्या दिवशी सकाळी डोंगरमाथ्यावर समायोजन करता यावे म्हणून व्यायाम होते. ८ वाजता मैदानावर जमा व्हायचे होते. प्रथम बेड टी मिळायचा. मला दात घासल्याशिवाय चहा प्यावयाला जमायचा नाही. जसजसे उंचावर गेलो तशी सवय झाली. मी पहाटे ५ वाजता उठून आंघोळ करायला व कपडे धुवायला सार्वजनिक नळावर जायचो. थंड पाण्याखाली आंघोळ करायचो. २ दिवस नाटके केली. जसजसे वर गेलो पाणी एवढे थंड होत गेले की नंतर आंघोळ करणे शक्य झाले नाही. दुसऱ्या ब्याचच्या एकाने असा प्रयत्न केला तर त्याला प्रचंड ताप भरला. रोज १ ब्याच वर जायची. आमच्या मागच्या ब्याचमध्ये १ अपंग मुलगा कुबडी घेऊन आला होता. त्यानेसुद्धा हा १३ दिवसांचा ट्रेक पूर्ण केला. सकाळी स्वागत सूप मिळायचे, नंतर नाश्ता, परत पाहिजे त्याला चहा, कॉफी, संध्याकाळी परत चहा. त्यांचे म्हणणे की जेवढे जास्त पेय (द्रव पदार्थ) शरीरात जातील तेवढे थंड हवामानात चांगले! सकाळी डोंगरावर घेऊन गेले. तो माझ्यासाठी हाताचा मळ होता. नंतर रिवर क्रोसिंग! तिथे मात्र माझ्या वजनामुळे मी लटकत असलेली दोरी खाली आली होती. माझी पाठ जवळजवळ नदीला टेकली

होती. (संपूर्ण ट्रेक पूर्ण केल्यावर माझी कंबर फक्त २ इंचांनी कमी झाली.) नंतर प्रस्तरारोहण! पाठीला दोरी बांधून खडकाला ९० अंशाचा कोन करून उलटे चालत उतरणे! सह्याद्री पालथा घातलेला मी, मला मात्र हे तंत्र व्यवस्थित जमले नाही. त्या दिवशी संध्याकाळी आम्हाला ४ वाजता बोलावण्यात आले. बरोबर ४ वाजता फक्त मुंबईकर व पुणेकर हजर होते. बाकीचे 'भारतीय वेळेनुसार' आले. आमच्या शिबिरप्रमुखाने (एव्हरेष्टच्या पायथ्याशी असलेल्या गिर्यारोहण प्रशिक्षण केंद्राच्या नियमानुसार, प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षणाचा भाग म्हणून युथ होस्टेलच्या वेगवेगळया उंचीवरील शिबिरात २१ दिवस शिबिरप्रमुख म्हणून काम करावे लागते. जसजसे वर जावे, तसतसे त्याना एकट्याला तिथल्या स्थानिकांच्या मदतीने राहावे लागते. त्यांच्यासाठी विरंगुळा म्हणजे आमच्यासारखे रोज येणारे शिबिरार्थी!) आम्हाला अस्वलापासून कसे वाचावे, वैगेरे माहिती पुरवली. अस्वल मागे लागले तर झाडावर चढायचे. तेही चढते. फांदीच्या टोकावर जायचे. तेही येते. मग फांदीवरुन उडी मारायची. त्याला उडी मारता येत नाही. मागे लागले तर उताराकडे पाळायचे. परत वर कसे जायचे, ते मात्र सांगितले नाही. आमच्यातलाच पूर्वीचा अनुभवी नेता निवडला. नेता पुढे राहील व उपनेता सर्वांच्या मागे! सुरुवातीला मार्गावर खुणा केलेल्या होत्या. नंतर बर्फात स्वत:चा मार्ग स्वत: शोधायचा होता. हरवलात तर संपलात! शिबिरप्रमुखाने बाकीच्यांकडून गुटख्याची पाकिटे काढून घेतली. सांगितले की, आम्ही ज्या प्रदेशात चाललो होतो तिथे सर्वसामान्याना प्रवेश नाही. फक्त युथ होस्टेलवाल्याना प्रवेश होता, कारण त्यांनी सरकारला आश्वासन दिले होते की त्यांच्याकडून एकही प्ल्यास्टीकचा तुकडा त्या प्रदेशात टाकला जाणार नाही.

त्यांनी आम्हालाही हा नियम पाळावयास सांगितला. मी वर चढताना, एका गायीला प्ल्यास्टीकच्या वेस्टनातील कचरा खाताना पाहिले. आता तिच्या पोटात ते प्ल्यास्टीक न पचता अडकून राहणार, ज्यायोगे ती दुसरे काहीच पचवू शकणार नाही व लवकरच मरणार. एकीकडे आमच्या धर्माने सांगितले, गायीना मारू नका म्हणून व आमच्याच धर्माचे लोक गायींना प्ल्यास्टीकच्या पिशवीत बांधलेला कचरा खाण्यासाठी प्रवृत्त करतात. तिथल्या गायी आपल्याकडच्या गायींपेक्षा व कावळे आपल्या कावळ्यापेक्षा शरीराने मोठे असतात. शिबिरप्रमुखाने सांगितले की जेव्हा एका बाजूला कडा व दुसऱ्या बाजूला दरी आली व तिथले स्थानिक मेंढपाळ वैगेरे समोरून येत असतील तर तुम्ही कड्याच्या बाजूला रहा व त्याना दरीच्या बाजूने येऊ द्या. त्याना व त्यांच्या मेंढयाना सांभाळून चालायची सवय असते. तिथे स्थानिक तुम्हाला 'म्यागी' नुडल्स विकतील, ते घेऊ नका, जेणेकरून तुम्हाला जास्त त्रास होईल. पण रोज पहिल्याच दिवशी प्याक केलेली बटाट्याची भाजी व पुऱ्या (१३ दिवस) खाऊन वैतागलेल्या माझ्या मित्राने नुडल्स न खाण्याचा सल्ला जुमानला नाही. आमच्या पाठ्पिशव्या ठेऊन देऊन, त्यांनी त्यांची आधीच्या शिबिरार्थीने वापरलेली पाठ्पिशवी दिली, जिचा १ बंद सर्वोच्च शिखरावर असताना तुटला. एका बंदावर एका खांद्यावर १५ किलो वजनाची पाठ्पिशवी घेऊन मी १७ कि.मी. गुडघ्या एवढ्या बर्फातून चाललो होतो. आधीच माउंटन सिकनेसचा त्रास, त्यात हा प्रकार, मनातल्या मनात जाम शिव्या घातल्या होत्या युथ होस्टेलवाल्याना! फक्त १५ किलोचे सामान घ्यायला परवानगी होती. म्हणून बाकीचे समान एका खोलीत ठेवून दिले होते, त्यात मित्राची चहाची भांडीही होती. तिसऱ्या दिवशी सकाळी आम्ही चढायला सुरुवात केली. सुरुवातीचा पल्ला सोपा होता, नंतरचा कठीण! रोज ९-१० वाजता

चढायला सुरुवात व्हायची! दुपारी २-३ वाजेपर्यंत पोहोचायचो. रोज १००० फुट चढून जायचे. तिथे तळ ठोकायचा. तिथल्या हवेची सवय करून घ्यायची व मग २ऱ्या दिवशी वर जायचे. वर गेल्यावर प्रथम तुम्हाला स्वागत पेय म्हणून फळांचा रस किंवा टोमाटो सूप वैगेरे मिळायचे. मग जेवण! नंतर चहा, कॉफी इत्यादी! रात्री झोपायला ब्लान्केट, अजून उंचावर स्लीपिंग ब्याग्स! उशी म्हणून तुमची पाठ्पिशवी! जसजशी वर थंडी वाढत गेली तसतसे आम्ही बूट घालूनच झोपायला लागलो. नदी एवढी थंड असायची की बोटे पाण्यात घालताच येईनात.

मुंबईच्या सर्व सवयी बदलल्या होत्या. सकाळी दात न घासता बेड टी, दाढी नाही, आंघोळ नाही, आंघोळीनंतर कपडे बदलणे नाही. घामच यायचा नाही. वातावरण सतत बदलते! कधी पाउस, कधी ऊन तर कधी थंडी! सतत म्हणजे अक्षरक्ष: 15- 15 मिनिटात! आता गरम, तर लगेच थंड, तर लगेच पाऊस, तर लगेच बर्फ असे! बेस कॅम्पला प्ल्यास्टीकची (मेणकापडाची) इरली (कोकणात असतात तशी) घेतली होती. डोक्यावर ठेवायची, हात मोकळे! कधीकधी मात्र वाऱ्याने उडायची. खाली येईपर्यंत फाटली. जेवणापूर्वी हात धुता यायचे नाहित. जेवणानंतरही नाही. कागद वापरायचे! बेस कॅम्पला रंगीबेरंगी लोकरीचे हातमोजे, पायमोजे घेतले होते. अजून आहेत, मुंबईला वापरता येत नाहीत.

माझा मित्र दुसऱ्या एका मुलाबरोबर पक्षी बघत रमतगमत चालायचा. दुसऱ्या मुलाकडे पक्ष्यांची माहिती असलेले पुस्तक होते. जेव्हा आम्ही शिबिरात सर्वात शेवटी पोहोचायचो तेव्हा आम्हाला कनातीकडची, एकदम कडेची जागा मिळायची. तिथून थंड वारे आतमध्ये शिरायचे. म्हणून मी मित्राला घाई

करायचो. तो म्हणायचा तुला पाहिजे तर पुढे जा. कसे जाणार? लहानपणापासून नियम असा की कुठल्याही परिस्थितीत, मित्राला सोडून जायचे नाही, एकट्याने खायचे नाही, जे काय असेल ते शेअर करायचे, मारामारी करताना समोर जास्त लोक असतील व आपण नक्कीच मार खाणार, तरीही मित्राला संकटात सोडून जायचे नाही. अजूनही हा नियम मोडलेला नाही. (आजचे वय ५५ वर्षे!).

चौथ्या दिवशी सकाळी शिबिरप्रमुखाने घोषणा केली की “आताच रेडिओवर सांगितले की कारगिलचे युध्द सुरु झालेय. मुलान्साठी ‘पाकिस्तान’ या दिशेला आहे व मुलींसाठी ‘चीन’ त्या दिशेला आहे. तिथे जाऊन सकाळचे बम्बार्डींग(?) करायचे होते. मित्राने मला विचारले की, “पाण्याचे काय?” त्याला म्हणालो, “ही झाडाची पाने आहेत ना!” जाम वैतागला होता. जेव्हा आम्ही खाली पोहोचलो तेव्हा कॅम्प फायरच्या वेळेला त्याने ही तक्रार मांडली होती की प्रत्येक तळावर शौचालये बांधा म्हणून! त्याला लहानपणापासून कधी उघड्यावर जायची सवय नव्हती! मी मात्र लहानपणी गावाला मामाच्या घरी राहताना, समोरच्या सड्यावर जायचो!

वर मोबाईलची रेंज मिळत नव्हती. खाली असताना पत्नीस एस.टी.डी. बूथवरून फोन केला तो शेवटचा!

जेव्हा मी त्या ५ जणांपैकी एकाबरोबर दुपारच्या वेळेला प्रातर्विधीसाठी बसलो होतो, तेव्हा त्याने विचारले की, माझ्या परधर्मीय मित्राशी माझी एवढी घनिष्ट मैत्री कशी? आम्ही एकमेकाना सोडून कुठेच जायचो नाही. मी म्हणालो, “लहानपणी जेव्हा ओळख झाली, तेव्हा माहित नव्हते की हा परधर्मीय आहे! त्याच्याशी मैत्री करू नको, असे मनात विष पेरणारेही

आमच्या घरात किंवा इमारतीत कोणी नव्हते. ईदला खीर, शीर कुर्मा, बिर्याणी खायला आम्ही त्यांच्याकडे जायचो. त्यालाही माझ्या आईने दिवाळीत



बनवलेले बेसनचे लाडू आवडायचे. होळीला, रन्गपन्चमीला, दहीहंडीत तो आमच्याबरोबर असायचा. त्याची बहीण मला राखी बांधायची! आजही भारत पाकिस्तानबरोबर क्रिकेटमध्ये जिंकला तर त्याला माझ्यापेक्षा जास्त आनंद होतो. त्याला गुंफा, किल्ल्यांबद्दल माहिती जाणून घ्यायला आवडते."

ग्रहण गांव!

नागफणी! बरकथ्याच! आम्ही ८००० फुट उंचीवर मिनीथ्याचला पोहोचलो तेव्हा बर्फ भुरूभुरू अंगावर पडायला लागले. यापूर्वी हा अनुभव मी कधी घेतला नव्हता. आम्ही अत्यानंदाने नाचत होतो. काहीजणानी कानात कापूस घातला होता. काहीजणानी कानाभोवती मफलर गुंडाळला होता.

शिबिरप्रमुखाने सांगितले की “कान मोकळे ठेवा. याच्यापुढे अजून वर जाल तशी अजून थंडी वाढेल. तेव्हा या थंडीची सवय करून घ्या. नाहीतर नंतर त्रास होईल.”

शिबिराच्या बाजूला काही स्थानिक, नुडल्स, माचिस, बिस्किटाचे पुडे इत्यादी गोष्टी विकायचे. सकाळी आमचा मुक्काम हलला की त्यानंतर ते आपले सामान गाठोड्यात बांधून निघायचे, ते आमच्या आधी वर पोहोचून आपले दुकान उघडून बसलेले असायचे.

१२००० फुटांवर नगारुला जेव्हा पोहोचलो तेव्हा तापमान वजा १० अंशापर्यंत घसरले होते. नगारुवरून हिमालय! दुपारी ४ वाजता मी तंबूत झोपून होतो व मला बूट पायातून काढावयाचे होते, पण त्या थंडीत उठवत नव्हते. माझ्या मित्राने सांगितले की “नितांत,तू उठ सकता है| उठ, लेस छोड़|” त्याच्या शब्दानी धीर आला. उठलो. लेस सोडली. बूट काढले. पहाटे लवकर उठावयाचे असल्याने, रात्री कॅम्पफायर झाला नाही. संध्याकाळी नगारु देवाला (त्यांचा स्थानिक देव – १ खडक!) नमस्कार करून झोपावयास गेलो.



रात्री अचानक जाग आली. शिबिरप्रमुखाने सगळ्यांना उठवले होते. १८० कि.मी./तास या वेगाने वारा वाहत होता. तंबू उडून जाण्याच्या बेतात होता. जर तो उडून गेला असता तर आमची बर्फाखाली थडगी बांधली गेली असती. आम्ही सगळ्यानी तंबूचा खांब पकडून ठेवला होता. त्या ५ जणांनी गणपतीची आरती म्हणायला सुरुवात केली. नगारु देवाची प्रार्थना करायला सुरुवात केली. माझ्यासारखा नास्तिक माणूससुद्धा मोठमोठ्याने आरती म्हणत

होता. माझ्या मुसलमान मित्राने कुराणातील आयते म्हणायला सुरुवात केली. बाहेर शिबिरप्रमुख त्या वादळात फिरून सगळयाना धीर देत होता. शेवटी वादळ संपले. तंबूत बर्फ शिरले होते.

मुंबईत पोहोचल्यावर अमेरिकानिवासी धाकट्या भावाला सांगितले, तर तो म्हणाला, “अमेरिकेत नेहमीच -१० अंश तापमान असते. त्यात काय विशेष?” आम्ही म्हणालो “पण, अमेरिकेत तुमच्या अंतवस्त्रात बर्फ घुसलेय व तुम्ही त्यातच झोपताय असे तर होत नाही ना?” पहाटे ३ वाजता उठून प्रातर्विधीसाठी बाहेर गेलो. तेव्हा शिबिरप्रमुखाने सांगितले की “जर तो बर्फ तुमच्या पार्श्वभागाला लागला तर फ्रश्ट्बाइट होईल व तो भाग कापून काढावा लागेल. वरवर प्रातर्विधी उरकले व नगारुदेवाला नमस्कार करून निघालो.

१७ कि.मी. चालताना बर्फात गुडघ्यापर्यंत पाय रुतत होता. आमच्या हातात खाली बेस कॅम्पवर घेतलेल्या काठ्या होत्या. एकदा मी खाली घसरून पडलो. मला घ्यायला कोणीही येऊ शकले नाही. जो कोणी मदत करायला येईल, तोच घसरून खाली जाईल. शेवटी स्वताचा जीव महत्वाचा! मीच प्रयत्न करून वर आलो. माझा मित्र फ्ल्याटफुटेड असल्याने त्याने कॅनव्हास शूज घातले नव्हते, तर स्पोर्ट्स शूज घातले होते ज्याचा तळ प्ल्यास्टिकचा होता. त्यामुळे तो अनेकदा घसरत होता. त्यामुळे त्याला शेवटच्या कॅम्पफायरमध्ये फिशपोंड मिळाला की “सौ बार चढे और दोसौ बार फिसले!”. १७ कि.मी.चा प्रवास एका दिवसात, ढोपरभर बर्फातून, ब्यागेचा १ ‘बंद’ तुटलेल्या अवस्थेत, १५ कि.ग्रा. चे वजन एकाच खांद्यावर, १२००० फुट उंचीवर, विरळ ऑक्सिजन घेऊन, ढगाळ हवामानात चालत होतो मी!

शिबिरात पोहोचलो तेव्हा मानसिकदृष्ट्या खचलो होतो. मित्रावर चिडलो होतो. या मानसिक स्थितीची कल्पना तळावर देण्यात आली होती. पण वादळाची कल्पना दिली गेली नव्हती. कशी देणार? यापूर्वीच्या इतिहासात १८० कि.मी./तास या वेगाने कधी तिथे वादळ आलेच नव्हते. आम्हाला जो बर्फ मिळाला, तेव्हढा बर्फ ना आदल्या दिवशी येवून गेलेल्या ब्याचला मिळाला, ना दुसऱ्या दिवशीच्या ब्याचला. ते बिचारे बर्फ न बघताच परत गेले. उतरताना १ मोठा उतार होता. त्यावरून खाली घसरत जायचे होते. काहीजणानी मेणकापडाचा उपयोग घसरण्यासाठी केला. प्रचंड वेगाने ते खाली घसरत गेले. जरा अंदाज चुकला तर कपाळमोक्ष! मी थांबत थांबत घसरत गेलो.

माझी १३ दिवस घातलेली जीन्सची प्यांट मागून फाटली. १३ दिवस आंघोळ केली नव्हती.

खाली उतरल्यावर मनीकरणला गेलो. तिथे गरम पाण्याचे झरे आहेत. त्यात कापडी पुरचुंडीत तांदूळ ठेवून, ते आतमध्ये घालून बाहेर काढले, तर त्याचा भात बनलेला असतो. त्या कुंडाच्या बाजूच्या टाईल्सवर पाउल ठेवले तर पायाला चटका लागत होता. गेल्या १३ दिवसांची आंघोळ, मनीकरणमधील नळावर उरकून घरी परतलो.

काही लोक मनालीला वैगेरे जाऊन आले. मला कधी एकदा सुखरूप माझ्या माणसात पोहोचतो असे झाले होते. मी वर असताना माझ्या मित्राला सांगूनही ठेवले होते की, “जर माझे काही बरेवाईट झाले आणि तू जिवंत घरी पोहोचलास तर माझ्या पत्नीस व मुलाला सांग, मी शेवटच्या क्षणी त्यांची

आठवण काढत होतो." नशिबाने अशी काही वेळ त्याच्यावर आली नाही. अजून एकदा जीवंत राहिलो.

२००० साली माझा मुलगा ४ वर्षाचा असताना मी, पत्नी व माझा मुलगा आंबोलीला (सावंतवाडी, सिंधुदुर्ग जिल्हा) राह्यलो होतो. मुलाबरोबर भविष्यात काय होईल या विषयावर मी गप्पा मारल्या होत्या.

महाबळेश्वर- २००१ च्या मे महिन्यात अंधेरी पूर्वेच्या स्वामी ट्रॅव्हल्सकडे महाबळेश्वरची आधी नोंदणी करून सुद्धा की ‘माझ्या पत्नीस व मुलास गाडी लागते’, तरी त्यांनी आम्हाला चाकावरचे आसन दिले व आमच्यानंतर नोंदणी करणाऱ्याना पुढची आसने दिली. तसेच महाबळेश्वरच्या बाहेरील हॉटेलमध्ये

आमची राहण्याची व्यवस्था केली. सावित्री नदी! पारसी पॉइंट! भर मे महिन्यात थंडी लागते हे कोणाला माहीत? हिमालयासारखा ‘क्षणात पाउस, क्षणात थंडी, क्षणात ऊन पाहिले’. गारांचा पाउस पहिल्यांदा पाहिला. थंडीची कल्पना नसल्याने स्वेटर नेला नव्हता. आता इथे विकत घेतला असता, तर घरचा फुकट गेला असता. थंडीपासून वाचण्याकरीता शेवटी २ बनियान्स (गंजी- इनर वेअर) विकत घेतले. माझा मुलगा 5 वर्षाचा असतांनाही त्याने आमचे छायाचित्र काढले होते.



दुसऱ्या वेळी महाबळेश्वरला जाताना प्रशांत, दादाचे वाय एम सी ए चे मित्र असे सगळे एका जिप्सीतून गेलो होतो. रात्री १२ वाजता प्रशांतला गाडी चालवताना कसला तरी आवाज येतोय म्हणून गाडी थांबवली. चाकाचे नट तुटत चालले होते. गाडीत ‘पाने’ नव्हते. मग वाटेतल्या गाड्याना थांबवून आम्ही ‘पाने’ मागू लागलो. वेळीच लक्षात आले नसते तरss त्या रात्रीपासून ‘रोज रात्री १२ वाजताss येणाऱ्या जाणाऱ्या गाड्याना थांबवून, आम्ही 12 जण- “पाना हैss?” अशी विचारणा केली असती.’ महाबळेश्वरला थोरला भाऊ व त्याच्या मित्रांबरोबर टाटा कंपनीच्या गेस्टहाउसमध्ये पान्चगणीत, तेव्हा पहिल्यांदा टेबलटॉप पाहिला. (2002)

फणसाड अभयारण्य व कुडा लेणी सहल- (2002)- लोकसत्ता वृत्तपत्रात जाहिरात वाचली व मार्ग्स (संस्थेचे नाव बदलले आहे. का ते शेवटी कळेल.) या संस्थेला फोन केला. मी एकटा प्रवास करू शकतो, पण एक सोबती असलेला बरा, म्हणून जंगलाची व लेण्यांची आवड असलेल्या माझ्या मुसलमान मित्राला फोन केला. तोही तयार झाला. या संस्थेने प्रथम कोलाडचे रमेश घोणे यांचे काष्ठ शिल्प संग्रहालय दाखवले. नंतर बिर्ला मंदीर! फणसाड अभयारण्य! एक वन कर्मचारी आम्हाला मार्गदर्शन करत होता. त्याला विचारले, “झाडे एवढी विरळ कशी?” त्याने जे उत्तर दिले ते मी इथे छापू शकत नाही. वैयक्तिकरीत्या भेटल्यावर सांगेन. त्यानंतर रात्री नांदगावचे गणपतीचे देऊळ! रात्री मुरुड काशीदच्या एका शाळेत मुक्काम टाकला. सकाळी मुरुड जंजिरा, कुडा लेणी! स्पष्टीकरणासाठी एक तज्ञही आले होते. माझ्या मित्रानेही काही प्रश्न

विचारले. रात्री ठाण्यात उतरताना आयोजकापैकी एकाने मला बाजूला घेऊन सांगितले, “पुढच्या वेळी नक्की या! त्याला आणू नका!” मी परत कधी त्यांच्याबरोबर गेलो नाही ही गोष्ट तुमच्यासारख्या सुज्ञांना सांगायला नको!

(2002 दिवाळी) आमचे अख्खे पेडणेकर कुटुंबिय (भाऊचाईचो गोतावळो) [धाकटे काका, काकी, आत्या, थोरला चुलतभाऊ, वहिनी, त्यांच्या 2 मुली, थोरली चुलतबहीण, भावोजी, त्यांचा 1 मुलगा, थोरला भाऊ, वहिनी, त्यांची 2 मुले, मी व माझी पत्नी, आमचा एक मुलगा, धाकटा भाऊ, वहिनी, त्यांची 2 मुले, धाकटा चुलतभाऊ, वहिनी, 1 मुलगा, धाकटी चुलतबहीण] असा भला मोठा परीवार होता. 4 गाड्या करून मालवणला आमच्या घरी गेलो. तिथे माझ्या व पत्नीच्या हस्ते सत्यनारायणाची पूजा केली. लग्नानंतर मी पूजा

घातली नव्हती. 8 वर्षांनंतर पहिली पूजा केली. पत्नी खूप खुश झाली.

त्यानंतर महाबळेश्वरला, एका मित्राबरोबर टाटा इंडिका कारने (माझ्या) गेलो. स्ट्रॉबेरीचे पदार्थ विकत घेतले. ही ट्रीप सॉलिड होती. महाबळेश्वरला जायचे ठरवले नव्हते. मुंबई गोवा महामार्गावरून कुठेतरी जायचे म्हणून निघालो होतो. पोलादपुरवरून, “अरे! हा रस्ता कुठे जातो? महाबळेश्वरला! चलो!” (2003)

2003 च्या मे महिन्यात ठरवले की उभा महाराष्ट्र आडवा करायचा (पालथा घालायचा.) बरोबर कोणी नव्हते. एकटाच वाट फुटेल तिथे निघालो. बोरिवलीहून एस.टी. पकडली ती कल्याणची निघाली. कल्याणला उतरल्यावर आठवले की इथे हाजीमलंगचा डोंगर आहे. चढायला सुरुवात केली. भरपूर पायऱ्या चढल्यावर शेवट काही येत नव्हता. कंटाळा आला, तहानही खूप लागली होती. पोटात कावळे ओरडत होते. शेवटी खाली उतरलो व घरी गेलो. महाराष्ट्र आडवा घालायचा राहून गेला.

नंतर एकदा फक्त जेवायला मी, माझा चुलतभाऊ व मित्र मामाच्या गावात आलो. जेवण रुचकर होते. (2004)

2004-05 मी ज्या शाळेत शिकवत होतो त्या शाळेची शैक्षणिक सहल संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात कान्हेरी गुंफात गेली होती. त्यावेळी आमच्या बरोबर आलेल्या एका आयोजक गटाने विद्यार्थ्यांचे प्रस्तरारोहण व रिवर

क्रॉसिंग आयोजित केले होते. त्यांनी सांगितले की आवाज करू नका, शांत रहा! पक्षी दिसतील, त्यांचे आवाज ऐकू येतील! आमची सर्व मुले पांढऱ्या सदऱ्याच्या गणवेशात! पिकनिकला येऊन शांतपणे चालणे शक्य आहे का? ते पण दुपारी 11 च्या सुमारास! कुठले पक्षी नि कसले काय? इतर शिक्षक वैतागले होते.

२००५ मध्ये पावसाळ्यात आम्ही चौघे (मित्रमंडळी) कुठेतरी ट्रेकवर जायचे म्हणून बाहेर पडलो. कुठे जायचे निश्चित नाही. कर्जत स्टेशनवरच रात्रभर गप्पा मारत राहिलो. पहाटे १-२ तास तिथल्या बाकड्यांवर झोपलो असू. सकाळची ट्रेन पकडून मळवली स्टेशनला उतरलो. कार्ला गुंफा, एकवीरा देवीचे दर्शन घेऊन आलो. मित्राची पाठ दुखत असल्याने लोहगड वैगेरे न करता परत आलो.

२००५ च्या ऑगस्ट महिन्यात मी, थोरला, धाकटा व चुलत भाऊ कारने वाइंगणी गावाला काही वैयक्तिक कामासाठी निघालो. आळीपाळीने गाडी चालवत होतो. पुणे- बंगलोर रस्त्यावरून कोल्हापूर मार्गे निघालो होतो. रात्र झाली होती. कोल्हापूरच्या १ कि.मी. आधी थोरल्या भावाने चुलत भावाला सांगितले की, “आता, १ कि.मी. नंतर कोल्हापुरचे वळण (फाटा) येईल. तेव्हा गाडी उजवीकडे वळव!” व तो झोपून गेला. मी व धाकटा भाऊ आधीच झोपलेलो होतो. थोड्या वेळाने मी उठलो तर मला कन्नड भाषेत बोर्ड दिसायला लागले. मी चुलत भावाला व इतराना जागे केले. तेव्हा, आमच्या लक्षात आले की, चुलत भाऊ झोपेत आहे व आम्ही २० कि.मी. पुढे कर्नाटक सीमेवर आहोत. गाडी वळवून परत कोल्हापूरला आलो. यावेळी सर्व जागे होतो. रात्री १ वाजता कोल्हापूरच्या हॉटेलमध्ये मुक्काम टाकला व दुसऱ्या दिवशी वायंगणीला गेलो.

मी, माझी पत्नी व माझा 5वीतील मुलगा! आम्ही सिंहगडावर आलो असता एक मार्गदर्शक खूपच मागे लागला. शेवटी भाडे ठरवून त्याला बरोबर घेतला. तो माझ्याबरोबर चाललाय! मुलगा माझ्यासोबत! पत्नी मागे, त्याचे बोलणे ऐकू येणार नाही, एवढ्या अंतरावर ती! तो नेहमीप्रमाणे बडबडतोय! “इथून तानाजी व मावळे घोरपडीच्या साहाय्याने दोरी लावून गडावर चढले!” जसे काही 300 वर्षांपूर्वी हा तिथे हजर होता. ‘कुठून चढले ते बघायला’? मी आपला त्याच्याकडे दुर्लक्ष करून चालतोय, कारण इतिहास मला



त्याच्यापेक्षा जास्त नक्कीच माहिती होता. शेवटी माझ्या मुलाने विचारले, “बाबा, हे काय बडबडतायत?” मी फक्त हसलो व ठरलेले भाडे देऊन त्याला वाटेला लावले. (2006)

2006 मध्ये मित्राबरोबर मेहुण्यांच्या घरी पुण्याला गणेशोत्सवाला गेलो होतो. रस्त्यावर मोकळयावर गणपती असतात. मुंबईसारखे बंदिस्त नाही. रात्रीची रोषणाई बघण्यासारखी असते. पण गर्दीत आमच्या नातेवाईकान्पैकी मुलीना धक्काबुक्कीही झाली.

12. 10 2006 ला मित्राबरोबर पुण्याला पेशवेपार्क पाहावयास गेलो.

२००६ मध्ये हरिहरेश्वर, नांदगावचा सोन्याचा गणपती वैगेरे करून कुटुंबाबरोबर (चुलत भावंडे, त्यांच्या बायका, मुले व काका- काकी इ०) येत असताना एका हॉटेलमध्ये जेवायला गेल्यावर माझा थोरला भाऊ, तिथल्या कोळणीकडे जाऊन मासे घेऊन आला. त्याने तिला विचारले "तुमचे मासे कोंबडीपेक्षा महाग का असतात?" तिने उत्तर दिले की, "मासे घ्यायला तुम्हाला आम्हाला शोधत यावे लागते. कोंबडी तुम्हाला कुठेही मिळते." ते विशिष्ट मासे, (पापलेट, बांगडा की सुरमई ते आता आठवत नाही.) हॉटेलवाल्याला आणून दिल्यावर त्याने इतर ग्राहकाना न देता खास आमच्यासाठी ते करून दिले. असे आमचे माशांचे वेड! एखादा विशिष्ट मासा त्या हॉटेलला मिळत नसेल, तर माझा थोरला भाऊ तो बाजारातून त्या हॉटेलवाल्याला आणून देणार व आमच्यासाठी करावयास लावणार! मालवणला, माझ्या पत्नीच्या पहिल्या मुक्कामात (१९९४) सकाळी काकीने कोळंबच्या खाडीवर विकत घेतलेली कोळंबी फडफडवतच, तिला झोपेतून उठवले होते. "ही बघ ताजी कोलमी (झिंगे), आताच घेऊन आले!"

(2006) एकदा भाऊबीजेच्या दिवशी पातोंडा गावाला, (चाळीसगाव) सहकाऱ्याच्या गावी त्याच्या घराच्या वास्तुशांतीसाठी गेलो होतो. त्यांची लिंबाची झाडे आहेत. एक दिवसभर मी एकटाच होतो. कोणीही खानदेशी सहकारी तिथे यायला तयार नाही. दुसऱ्या दिवशी (पूजेच्या) एक सहकारी आला व त्याच्या गावाला गोंडगावाला घेऊन गेला. रात्री खांदेशाची तोबा थंडी पडलीय व मी लाकडी फळयांच्या दरवाजाच्या बाजूला झोपलोय. पण लक्षात आले की, मी खांदेशातील थंडी पण सहन करू शकतो. या गावात डुकरे भरपूर! (ती काय करतात ते प्रत्यक्ष भेटल्यावर सांगीन. छापण्यासारखे नाही.) तिथून त्या सहकाऱ्याच्या सासरी पारोळयास पण गेलो. इथे एसी चालत नाही, (कोरडी हवा असल्याने) फक्त कूलर चालतो. नाक्यावर चार तरुणानी एकत्र येऊन हॉटेल उघडलय! नाहीतर आमच्या प्रांतातील लोक! सहकाराच्या नावाने बोंबा!

(2006 मे महिना) एकदा दुसऱ्या सहकाऱ्याच्या भावाच्या लग्नाला जाण्यासाठी कल्याणवरून कार घेऊन निघालो. धुळ्यापर्यंत 10 तास लागतात पण जाणवत नाही, रस्ता भला मोठा रुंद! प्रथम तिसऱ्या सहकाऱ्याच्या गावी दोन्डाईचाला गेलो. या सर्व शिक्षकांचा असा समज होता की मी अत्यंत श्रीमंतीत वाढलोय! मला सड्यावर जाऊन प्रातर्विधी उरकायची सवय नाही, म्हणून त्याने

माझी व्यवस्था त्याच्या मित्राकडे केली. याचा बंगला होता. आदरातिथ्य खूप चांगले केले, पण यांच्याकडे असा समज आहे की ‘पाहुणा आल्यावर त्याला मटन खायला घालायचेच! बरे! पाहुणेही असे असतात की मटन खायला घातले नाही की नाराज होतात. मी असा महाभाग होतो की कोंबडी तिखट लागते म्हणून बारावीपर्यंत मी कधी चिकन खाल्ले नव्हते. मटन तर सोडून द्या! बरे ! आमचे तिखट म्हणजे खोबरे घालून केलेले तिखट! जाळगावच्या (माझ्या चुलतभावाचे म्हणणे आहे की जीभेखाली जाळ काढतो ते जळगाव) मटणापुढे ते काहीच नाही! त्यावर ते तरी ओततात! तेलाचा तवंग नुसता! एव्हढे तेल आमच्या जेवणात असले तर आमची भूक मरते. ही लोक तरीवर तरी मागून खातात. व्हायचा तोच परिणाम झाला. मला जुलाब सुरू झाले. ह्या लोकांना नाश्त्याची मात्र सवय नाही. मला सकाळी 4 चपात्या, दुपारी 4

चपात्या व रात्री 4 चपात्या लागायच्या! (भाकऱ्या एव्हढ्या जात नाहीत) जिथे राहिलो होतो तिथे नाश्त्याची व्यवस्था नव्हती! म्हणून माझ्या सहकाऱ्याकडे

गेलो. त्याला वाटले मी ऑलरेडी नाश्ता करून आलोय. दोन्ही घरचा पाहुणा उपाशी! बरे! गावातही एखादे रेस्टोरंट नाही. पण आता माझ्या सहकाऱ्याकडेच राहिलो. तिसऱ्या दिवशी आम्ही जीपने तोरणमाळ थंड हवेच्या ठिकाणी गेलो. सहकाऱ्याचे काही स्थानिक मित्र मोहाची दारू चढवून होते. त्यांना वरच्या होटेल्वाल्यांनी प्रवेश नाकारला. परत त्या वळणावळणाच्या रस्त्याने परत! चालक ही मंडळी! जीव मुठीत धरून खाली उतरलो! परत चायनिज जेवण मिळते अशा हॉटेलमध्ये गेलो. चौथ्या दिवशी ज्याचे लग्न होते त्या गावी, जैतपीरला एसटीने गेलो. जेवण मंडपात सतरंजीवर! आहेर तिथल्यातिथे उघडून भोंग्यावर घोषित केला जातो! मुंबई मुंबई चित्रपटात (सयाजी शिंदे अभिनीत) असाच प्रसंग होता. त्यात एक घोषणा अशी होती. अमुक अमुक रिकामी पाकीट! सगळ्या पाहुण्यांसमोर पाणउतारा! फलटणच्या मित्राच्या भावाच्या लग्नातही अशीच घोषणा ऐकली होती. आमचे मित्र पूर्ण रात्रभर वरातीत नाचत होते. डफ वाजवणाऱ्याला “वाजव!” असे सांगत! मी मात्र वर माडीवर जाऊन झोपलो. जाताना चौथ्या सहकाऱ्याच्या गावावरून (धुळयातून) एसटी पकडून मुंबईला आलो. त्याला मात्र इतर लोक वर्षभर चिडवत होते की तो मला घरी घेऊन गेला नाही. पण माझ्याकडेच वेळ नव्हता!

लोहगड:- मी व माझे २ मित्र (त्यातील एक हिमालय १९९६ मध्ये केल्यावर पहिल्यांदा चढत होता व दुसरा रोज संगणक दुरुस्तीसाठी चालत होता) लोहगडावर चढलो. पहिल्याच्या पायात गोळे आल्यामुळे आम्ही माझ्या शाळेतल्या (जिथे मी शिकवत होतो.) शिपायाच्या घरी थांबलो. वर गेलोच नाही. येताना एका व्यक्तीने नर्सरीत वाढवलेले पेपरमिंटचे रोप दाखवले. (27 10 2006)

अनुराधा व चन्द्रशेखर भडसावळे यांचे सगुणा रिसोर्ट (निसर्ग निकेतन, मालेगाव, नेरळ), घाटघर, कर्जत (3 वेळा- एकदा मित्राबरोबर, एकदा २ सहका-यांबरोबर, एकदा मी ज्या शाळेत शिक्षक होतो त्या शाळेच्या सहलीबरोबर) :- २० १ २००७ पहिल्यांदा मित्राबरोबर गेलो असता तलावातल्या घरात राहायला यायचे अशी इच्छा व्यक्त केली, अजूनही जमलेले नाही. त्यांच्या शेतात त्यांनी कीटक पकडण्यास्साठी जी कल्पना केलेली आहे ती आवडली.

२००७ साली सासूस आणावयास येरवडा, पुण्यास देवांशीषबरोबर गेलो. येतानाचे ट्रेनचे रिझर्वेशन केले होते. ट्रेनमध्ये बघतो तर आमच्या जागेवर दुसरे कोणीतरी बसले होते. मग आमची तिकिटे बघितली तर ती चुकून दुसऱ्या दिवशीची नोंदली होती. गपचूप उतरून एशियाडने आलो.

२ मे २००७ पोयरा [पत्नीच्या मावशीचे घर] (ता. मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग), 3 मे २००७ ला मालवण (आमचे घर) , [जिल्हा सिंधुदुर्ग], ५ मे २००७ला राजकोट खडक, कचेरीजवळ, रॉक गार्डन , मालवण. 6 मे 2007ला तारकर्लीहून येताना मावसमेहुणीच्या पोटात दुखायला लागले. तिला मालवणच्या सरकारी इस्पितळात भरती केले. तिथून पोयऱ्याला जाऊन तिच्या नातेवाईकाना घेऊन येणे, सोडणे- हा सर्व मालवण ते मालवण प्रवासच ५०० कि.मी. पेक्षा जास्त झाला असेल. ९ मे तोंडवळीचे (ता. मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग) व्याघ्रेश्वर देऊळ, पांडवांची गुहा, मधल्या तोंडवळीतील (मावसमेहुणीच्या आत्येचे घर)! इथे मुक्काम केला. १० मे २००७ खालच्या तोंडवळीतील समुद्रकिनारा पाहिला. ११ मे २००७ ला पोयरा, कुणकेश्वरला (जिल्हा सिंधुदुर्ग) व जामसंडीला (मावसमेहुणीचे सासर) [जिल्हा सिंधुदुर्ग], मावस मेहुणीच्या काकांकडे सासूला, पत्नीच्या मावशीला, मावसमेहुणीला, भाच्यांना, पत्नीस व मुलास घेउन गेलो. जामसंडी (सध्या पत्नीच्या मावशीचे

दीर राहत होते), देवगड बंदरावर (जिल्हा सिंधुदुर्ग), सासू, मावसमेहुणी, भाचे, पत्नी व मुलास घेउन गेलो. १२ मे २००७ रोजी मावस मेहुणीच्या काका काकीन्बरोबर सिंधुदुर्ग किल्ला दर्शन! [मावस मेहुणीच्या

काका काकीने (वय ५०-६०) सिंधुदुर्ग जिल्ह्यात, पोयऱ्याला राहून, अजून सिंधुदुर्ग किल्ला पाहिला नव्हता. तो त्याना दाखवला], परत त्याना सोडायला पोयरा. तिथून मालवण. १३ मे २००७ मध्ये मालवण गावावरून गोव्यातील पेडण्याला काकी, सासू, मावसमेहुणी, भाचे, पत्नी व मुलास घेउन भगवतीच्या (आमची कुलदेवता) देऊळ दर्शनास गेलो. येताना गाडीत काकी, पत्नी, मेहुणी व आमची छोटी मुले असा परिवार असतानाही कस्टमवाल्यांनी गाडीची दारुच्या बाटल्यांसाठी चेकिंग केली. येताना सावंतवाडीच्या (जिल्हा सिंधुदुर्ग) बागेत मुले खेळत होती. त्यानंतर वेंगुर्ल्याचा उभा दांडा! (जिल्हा सिंधुदुर्ग) [सहकाऱ्याचे घर], शिरोडयाचा वेतोबा, रेड्डीचा (जिल्हा सिंधुदुर्ग) २ हाताचा गणपती, धामापुरचा तलाव (जिल्हा सिंधुदुर्ग), १४ मे २००७ ला मालवणला सकाळी खंड्या पक्षी, सरडा पाहिला. १४ ५ २००७ संध्याकाळी मालवणच्या धक्क्यावरून सिंधुदुर्ग किल्ला दर्शन! पोयरा (पत्नीच्या मावशीचे घर), १५ मे ला वायंगणीचा (माझे आजोळ) समुद्रकिनारा, मामाच्या घरी गेलो होतो. 16 मे ला भाचीचा वाढदिवस पोयरा, मालवण १७ मे ला काकीचा वाढदिवस इथेच (सिंधुदुर्ग जिल्ह्यात) साजरे केले.

मुंबईत आल्या आल्या २००७ च्या मे महिन्यात २१ ते २५ तारखेपर्यंत ब्रह्मकुमारीन्सोबत माउंट अबूला (राजस्थान) जायची योजना ठरवली. माझी व माझ्या मुलाची तिकीट आधीच काढली होती. पत्नीची आयत्यावेळी काढली. ब्रह्मकुमारीन्पैकी मुंबईतील एका केंद्राची प्रमुख, माझी माजी विद्यार्थिनी! आता आयुष्यभर कुमारिका! त्यांनी त्या परिसरातील सर्व शिक्षकांचे शिबीर माउंट अबूला आयोजित केले होते. आमच्या शाळेतून आमची मुख्याध्यापिका, एक सहशिक्षक, त्यांची पत्नी व ३ मुली, एक लिपिका, तिचा मुलगा व तिची बहिण असा परिवार होता. इतर शाळेतील शिक्षक- शिक्षिका, रेल्वे प्रवास व मुक्कामाची व्यवस्था स्वस्त होईल म्हणून राजस्थान फिरण्यासाठी आले होते. रेल्वे प्रवासात ब्रम्हकुमार आमच्याकडून जेवण घेत नव्हते. त्यांनी स्वत:चे डबे आणले होते. घरीसुद्धा ते म्हणे स्वत:चे जेवण स्वत: बनवतात. कारण प्रत्यक्षात भेटाल तेव्हा सांगेन! सफेद वस्त्रे घालतात. त्यावर एक बिल्ला लावलेला असतो. राजस्थानला पोहोचल्यावर आम्हाला न्यायला एक बस होती. त्यांचे २ शांती आश्रम आहेत. एक खाली व दुसरा डोंगरावर. आमची व्यवस्था खालच्या आश्रमात केली होती. ५ वेगवेगळी संकुले होती. प्रत्येक संकुलाला उर्जा पुरवण्यासाठी पंचतत्वांचा उपयोग केला होता. एका संकुलाला लाकूड जाळून उर्जा, दुसरीला जलतत्व वापरून, तिसऱ्याला वायू तत्व वापरून इत्यादी! खोल्या ५ स्टारला तोंडात मारतील अशा! मोबाईल चार्गीन्साठी प्लग तळमजल्यावर संयुक्तिक! मैदानात संपूर्ण दिवस जेवण बनवण्याची व्यवस्था वृध्द स्त्रियांकडून (कारण प्रत्यक्षात भेटाल तेव्हा सांगेन!) केली जाते. सकाळी चहा, कॉफी, सोया दुध दिवसभर! नाश्ता, जेवण, संध्याकाळी चहा, कॉफी वैगेरे दिवसभर बनवणे चालू! कितीही खा, कधीही खा! सकाळी प्रथम प्रार्थना, नंतर ध्यान, डोळे

उघडे ठेवून! ध्यानाच्या नावाखाली झोपा काढायच्या नाहीत. नंतर प्रवचन (प्रवचनात काय सांगतात ते प्रत्यक्षात भेटाल तेव्हा सांगेन!) वर डोंगरावर शांती आश्रम म्हणजे दुसरा स्वर्ग! तिथे एका पिंजऱ्यात मोर व लांडोर वेगळ्या पिंजऱ्यात ठेवले होते. (कारण प्रत्यक्षात भेटाल तेव्हा सांगेन!) ३ दिवसांचा प्रशिक्षण कार्यक्रम होता. चौथ्या दिवशी वेगवेगळ्या प्रेक्षणीय स्थळांना भेट! पाचव्या दिवशी बाजारहाट! प्रत्यक्षात इतर शाळेतील शिक्षक-शिक्षिका रात्री झोपायला या खोल्यांत पण दिवसभर जयपूर- जोधपुर वैगेरे भेट देऊन आले. मी व माझा सहकारी, लिपिका व तिची बहीण एका दिवसात कंटाळलो व आम्ही दिवसभर आमच्या मुलांना घेऊन आजूबाजूला उंडारत राहिलो. माझी पत्नी व आमच्या मुख्याध्यापिकेने मात्र तिन्ही दिवस त्यांचा कार्यक्रम व्यवस्थित पाळला. चौथ्या दिवशी आम्हाला गीरच्या जंगलातील (गुजराथ) सोनेरी कळसाचे जैनमंदीर (इथे नारळ आधीच फोडून दाखवावा लागतो, जेणेकरून त्यात बॉम्ब लपवता येणार नाही) व डोंगरावरील अम्बाडीचे देऊळ दाखवले. केबल कारने वर जायचे! पाचव्या दिवशी बाजारहाट करू देण्याचे वचन न पाळल्यामुळे माझी पत्नी वैतागली व पुढच्या वेळेला हैदराबादला आली नाही. मीही गेलो नाही!

पावसाळा संपायला आला असता २१ जूलै २००७ रोजी मी व माझे ३ मित्र, दुपारी पालीला निघालो. रात्री कर्नाळा हॉटेलमध्ये मुक्काम टाकला. सकाळी पालीच्या बल्लाळेश्वराचे दर्शन घेऊन उन्हेरे येथील विठोबा-रखमाईचे देऊळ व गरम पाण्याच्या कुंडाकडे गेलो. त्यात पाय बुडवून बसलो. इतरांनी ५ मिनिटात पाय बाहेर काढले. मी १५ मिनिटे पाय आत ठेवून होतो. (मधुमेह!). त्यानंतर आम्ही पालीजवळच्या धबधब्याजवळ गेलो. आमच्या एका मित्राने बाळसे धरले असल्याने त्याला वर घेऊन जाईपर्यंत खूप त्रास झाला.

२० ८ २००७ रोजी मित्राबरोबर टाटा इंडिका गाडीने वाड्याला (पालघर/ ठाणे जिल्हा) एका हॉटेलमध्ये झोपलो. दुसऱ्या दिवशी सकाळी जव्हारचा राजवाडा (ठाणे जिल्हा) व दाभोसा धबधबा पाहिला.

१५ ९ २००७ मध्ये गणपतीच्च्या सुट्टीत वायंगणी!

पुढची ट्रीप सहशिक्षकांबरोबर आंजर्ल्याला, ऑक्टोबर-नोव्हेंबर महिन्यात (गरबा काळात) ठरवली. अजूनही गाडी चालवता येत नव्हती. साधा टोल नाक्याचा स्पीडब्रेकर ओलांडता येईना! शेवटी धुळयाच्या एका मित्राने ओलांडून दिला. (ज्याच्याकडे स्वताकडे परवाना नव्हता.) तिथुन पनवेलला मित्राकडे मुक्काम टाकला. रात्री गरबा पाहिला. आमचा धुळयाचा मित्र कल्याणला घरी निघून गेला (काही कामानिमित्त). शेवटी आम्ही तिघेजण, पनवेलकराच्या २ मुली असा लवाजमा आंजर्ल्याला निघालो. मंडणगडापर्यंत पोहोचेपर्यंत रात्र झाली. रात्रीचे १० वाजले होते. तिथे एक शार्प यु टर्न (वळण) होता. मला त्याची कल्पना नव्हती. मित्र रोजचा जाणारा-येणारा (एस.टी.ने) असूनसुद्धा त्याने कल्पना दिली नाही. रस्त्यावर अंधार. चौथ्या गिअरमध्ये चढणारी गाडी, अचानक वेग कमी झाल्यावर, क्लच दाबून गिअर कमी न केल्याने थांबली. परत उलटी माघारी जाऊ लागली. ह्यांडब्रेक दाबून थांबवली. सोडल्यावर आक्सेलेरेटर देऊन पहिल्या गिअरमध्ये गाडी पुढे घेणे मला जमेना. इतर दोघानाही गाडी चालवता येत नव्हती. आजूबाजूलाही कोणी गाडीवाला नव्हता. गाडी मागे जाऊ लागली. या लोकांनी उतरून मागे दगड लावले. शेवटी कशीबशी गाडी पुढे घेऊन रात्री आंजर्ल्याला मित्राच्या घरी मुक्काम टाकला.

कड्यावरच्या गणपतीचे दर्शन घ्यायला गाडी न घेताच गेलो. परत जाताना हरिहरेश्वरला निघालो.

मुंबईला जाताना वाटेतच गाडी बंद पडली. चालूच होईना. शेवटी माझे २ सहकारी हायवेवर मेकानिक शोधायला गेले. मी व पनवेलकराच्या २ मुली गाडीत! मेक्यानिक येऊन धक्का स्टार्ट पद्धतीने गाडी चालू करून मुंबई-गोवा

हायवेपर्यंत गाडी चालवत गेला. तेव्हा त्याने माझ्या गाडी चालवण्यातला दोष सांगितला. तो म्हणाला, “उतारावर क्लच दाबूनच ठेवायचा नसतो. एकदा चालू केल्यावर व फक्त गिअर बदलताना क्लच दाबायचा. नंतर सोडून द्यायचा. अन्यथा ब्रेक लागणार नाही.” २००७-०८

2007 मध्ये मी व माझे २ मित्र बहिरी ढाकच्या (ठाणे जिल्हा) दिशेने निघालो. दुपारपर्यंत अर्धाच पल्ला पार पडला. संध्याकाळी लक्षात आले की, बहिरी ढाक गाठायला २ दिवस लागतील. रात्री झोपायची सोय नाही व जेवणाचीही! १९९९ ला हिमालयात आलेला मित्र आता थकला होता. त्याच्या पायात गोळे यायला लागले होते. दुसऱ्या मित्राला संगणक दुरुस्तीच्या निमित्ताने चालायची सवय होती, पण नाईलाजास्तव परत फिरावे लागले. येताना ट्रेनमध्ये प्रचंड थकलो होतो. उभ्याने प्रवास करत होतो. एक जागा रिकामी झाली. संगणकवाला व दुसरा एक तरुण त्या जागेसाठी एकाच वेळी धावले. माझा मित्र देवाशिष तिथे आधी बसला. त्याबरोबर चिडून त्या तरुणाने आशिषला ढकलले. तेव्हा मी त्याला पकडले ते पण एव्हढे थकलेलो असताना! (वय ४१ वर्षे) व देवाशिषनेही त्याच्यावर हात उगारला. आम्ही तिघेजण असल्याने तो गप्प बसला. देवाशिष विक्रोळीला उतरला. आम्ही दोघांनी दादरपर्यंत प्रवास केला. तेव्हा आम्हाला भीती वाटत होती की, आता दोघेच आहोत म्हणून तो तरुण त्याच्या मित्राना बोलावून आमची धुलाई करतो की काय? पण तसे घडले नाही. तोही दादरला उतरून गेला. आम्ही या वयातही एकी बाळगून होतो.

२९ १२ २००७ मी ज्या शाळेत शिकवत होतो त्या शाळेच्या सहलीबरोबर

पालीला, महडला वैगेरे गेलो. तसेच कार्ला गुंफा पाहायला! येताना राजमाची पोइन्ट! खण्डाळयाचा घाट! राजमाची पॉइंटवरून दिसणारे दृश्य! एकदा कागद बनवायचा कारखाना पाहीला. प्रचंड घाणेरडा वास येतो तिथे! सहन होत नाही! वीर कोतवाल यांचा पुतळा पाहिला. पेण जवळ कुठे तरी!

मी ज्या शाळेत शिकवत होतो त्या शाळेची सहल सगुणा फार्म्सला काढली होती. शाळेतल्या विद्यार्थ्यांना त्यांची सैनिकी प्रशिक्षणात असते तशी वर चढायची जाळी आवडली होती. सगुणा फार्म्स, चन्द्रशेखर भडसावळे यांच्या मालकीचे आहे. चांगला उपक्रम आहे. सकाळी शेती कशी करतात ते दाखवतात. कीटकांना पकडण्यासाठी दिव्यांची व्यवस्था केली आहे. सैनिकी शाळेतील जाळ्यांवर चढण्याचे खेळ आहेत. जेवणही रुचकर असते. (2008)

२००८-०९ च्या दरम्यान आम्ही पुण्याच्या हर्बलाइफ़च्या कचेरीत (सिटी मॉल, गणेशखिंडीजवळ पुणे युनिव्हर्सिटीच्या मार्गावर) व्यवसाय सादरीकरणासाठी प्रत्येक बुधवारी गाडीचे भाडे विभागून जायचो. आदल्या दिवशीच्या किंवा त्या दिवसाच्या वृत्तपत्रात आमची जाहिरात आलेली असायची. सादरीकरणाआधी गणेशखिंडीत पत्रके वाटायचो व लोकाना सादरीकरणासाठी आमंत्रित करायचो. सादरीकरणासाठी सूट- बूट घालून असायचो. एकदा तसेच आमच्या चरबी तपासणीच्या यंत्रासह जवळच्या एका सामाजिक संस्थेच्या कार्यालयात ‘आरोग्य तपासणी शिबिरा’साठी जाऊन आलो. तिथल्या लोकाना तर आम्ही डॉक्टरच वाटत होतो.

कोथरूडला एका वितरकाच्या घरी गेलो होतो. पुणेकरांची घरे आमच्या मुंबईकरांपेक्षा प्रशस्त असतात. एकदा दगडूशेठ हलवाईच्या गणपती दर्शनासाठी गेलो. एकदा एका आडगावात डाऊनलाईनच्या वितरकाच्या गावी गेलो. हा बांधकामात क्षेत्रात असल्याने तो हऱ्बालाईफच्या उत्पादनांना ‘मटेरियल’ म्हणायचा! शेतात बसून कंदीलाच्या उजेडात आम्ही डेमो दिला होता. ज्या शेतातून मी माझी टाटा इंडिका कार घातली होती, तिथून परत बाहेर कशी काढली, ते माझे मला माहीत! एकदा माझ्या मुलासह (वय 13-14) रात्री ‘गोलमाल २’ चित्रपट पाहिला. पुण्याला जाऊन! काय हौस असते पहा!

4 5 2008 साली माझी चुलतवहिनी व मी दादर वरुन शेअर टैक्सी करून पुण्याला आमच्या सत्कार समारंभासाठी जावयास निघालो. वाटेत आमच्या ड्रायव्हरने मागच्याला पुढे जाऊं दिले नाही, म्हणून त्यानी आम्हाला पुढच्या टोल प्लाझाला गाठले व आमच्या ड्रायव्हरकडून त्याचा चालक परवाना मागितला. नंतर पोलिसांकडे जायचे सांगत होता. नंतर त्याच्या लक्षात आले की त्याच्या स्वत:कडेच परवाना नव्हता. मग त्याने आम्हाला व त्या ड्रायव्हरला क्षमा मागायला लावून परवाना परत केला. यात आमचा वेळ कारणाशिवाय गेला.

19 5 2008 मध्ये गाडी नुकतीच शिकलो होतो. पत्नीस, मावस मेहुणीस घेऊन माझी टाटा इंडिका घेऊन पुण्याला, येरवड्याला तिच्या मावसभावाकडे गेलो. त्यांच्या इमारती शेजारी लावताना गाडी घासली होती. पत्नीला, मावस मेहुणीला मुंबईत परत यायचे होते पण मला इतक्या लवकर परत यायचे नव्हते. त्यांना ट्रेनने पाठवून दिले. त्याच दिवशी माझा मित्र, त्याची पत्नी व त्यांचा मित्र मुंबईहून ट्रेनने पुण्यास आले. आम्ही संपूर्ण पुणे जिल्हा फिरायचा ठरवला होता. प्रथम पेशवे पार्क पाहिले. नंतर त्यांना घेऊन सिंहगडावर गेलो. मला तो गड कारने चढण्याची हिम्मत नव्हती. खालच्या सार्वजनिक कारवाल्याना विचारले, “आमची गाडी चालवत वर चलणार का?”, त्यांनी २०० रुपये दर सांगितला. माझ्या मित्राला तो जास्त वाटला, म्हणून त्याने मलाच चालवायला सांगितले. ज्याला विचारले, त्याला २री गाडी चालवायला मिळाली होती. त्याला माहित होते, मला व्यवस्थित चालवता येत नाही म्हणून. त्याने मुद्दामून चढावर माझ्यासमोर गाडी थांबवली. मी ब्रेक मारून गाडी थांबवली, पण परत तो सोडून गाडी पुढे घेणे जमेना. मागून येणारे होर्न मारायला लागले. पुढचा आम्हाला त्या परिस्थितीत टाकून निघून गेला होता. शेवटी मागच्या गाडीवाल्याला विनंती केली. त्यांच्यातला एक आमची गाडी चालवायला तयार झाला. मी ह्यांडब्रेक लावून गाडी थांबवली होती. त्याने आम्हाला वर सोडले. सिंहगडला तानाजीची समाधी पाहिली. सिंहगडावर नाश्ता, जेवण पुरवणाऱ्या एकीला सांगितले होते, नाश्ता करायला येईन, पण येताना तिथे थांबलोच नाही. शाप लागला! अशा अरुंद

रस्त्यांवर इतर गाड्यांना रस्ता देण्यासाठी आपली गाडी रस्त्याच्या कडेला उतरावायची नसते. आम्हाला इतरांविषयी अपार कळवळा ना! सिंहगड बघून खाली येताना डांबरी रस्त्याच्या कडेला घासून चाक पंक्चर झाले. मध्येच थांबवता येत नाही म्हणून तशीच गाडी खालपर्यंत आणली. चाकाचे पूर्ण नुकसान झाले होते. एका स्थानिक माणसाने चाक कसे काढायचे याचे मार्गदर्शन केले. मी व माझ्या मित्राने चाक बदलले. आता आमच्याकडे अतिरिक्त स्टेफनीही शिल्लक नव्हती. तिथून आम्ही वरसगाव धरणाकडे गेलो. गाडी गुपचूप खाली ठेवली व चालत वर गेलो. असेच पानशेत धरण! तिथून तोरण्याला जायचे ठरले. २ रस्ते पुणे जिल्ह्याच्या नकाशात दिसत होते. १ रस्ता धानेप घाटातून जात होता. २ऱ्या साठी परत पुणे- सातारा मार्गावर जाऊन परत वेल्ह्याला यावे लागले असते. आम्ही धानप घाटाची निवड केली. पहिल्यांदा वाटेत १ ओढा आला. आता हा कसा पार करायचा? गाडीचे म्यानुअल वाचले. त्यात लिहिले होते, गाडी पहिल्या गिअरवर चालवायची. नंतर तो घाट लागला. स्थानिकांनी गाडी बघून आश्चर्य व्यक्त केले. गेल्या ३०० वर्षात पहिल्यांदा तिथे गाडी बघितली होती. मी एकटाच चालवणारा, तोही नवशिका! इतराना गाडी येत नाही. सायंकाळची वेळ, स्टेफनी नाही! गाडी बंद पडली तर आजूबाजूला वस्ती नाही. गाडीत एक स्त्री! आमची गाणीबिणी सगळी बंद झाली होती. कोणी काही बोलतही नव्हते. वेल्ह्याजवळ आलो तर रात्र झाली होती. आता या रात्रीचा काय तोरणा पाहणार? रात्री झोपणार कुठे?

शेवटी सातारा-पुणे रस्त्यावर गाडी आणली. पुण्याच्या दिशेने निघालो. खेड-शिवापुरजवळ एका हॉटेलमध्ये गाडी लावली. ते बारवाले हॉटेल होते. रात्री उशीरापर्यंत चालायचे व सकाळी उशीरा चालू व्हायचे. गरम पाणीही उशीरा मिळणार. आम्ही चहा प्यायला सकाळी दुसऱ्या हॉटेलमध्ये जाऊन आलो. आंघोळ करून नाश्ता न करता बाहेर पडलो. वाटेत पंक्चरवाला दिसला. त्याच्याकडून वापरलेले चाक स्टेफनीसाठी घेतले. ५०० रुपयाला व तोपर्यंत आम्ही नाष्टा करून घेतला. नंतर कळले की त्याने खराब चाक व पंक्चरवाली ट्यूब घशात घातली होती. थोरला भाऊ नंतर म्हणाला, “म्हणून संपूर्ण चाक बदलेपर्यंत आपण तिथे उभे राहायचे असते. काही नाही, ५०० रुपयात तुला अनुभव मिळाला, जो तू आयुष्यात विसरणार नाहीस.” तिथून आम्ही पुणे-नाशिक मार्गाने ओझरकडे गेलो. ओझरहून लेण्याद्री! – जुन्नरला मुक्काम! सर्व हॉटेल्स भरलेली. एका हॉटेलमध्ये एक खोली रिकामी होती. मी दर विचारून खाली आलो, मित्राला विचारले. दर ऐकून तो आढेवेढे घ्यायला लागला. परत वर जाईपर्यंत तीही खोली बुक झाली होती. शेवटी मालकाने त्याची स्वत:ची खोली वापरावयास दिली. अर्थातच चढा दर लावून. तिथून सकाळी शिवनेरी किल्ला बघून गणेशखिंडीतून बाहेर पडलो. हाही अवघड रस्ता! चांगली मिसळ देणारेही एकही हॉटेल नाही. माळशेज घाट पार करून मुंबईत आलो. नवशिका असतानाही ६ घाट व ९०० कि.मी. चा रस्ता पार केला होता, तेही ४ दिवसात!

१ ६ २००८ रोजी पत्नी, सासू, मुलगा व भाचीला घेऊन जीवदानी विरार (पालघर जिल्हा) येथे जाऊन आलो. केबल कारने सासुला वर डोंगरावर घेऊन जाता आले.

लोणावळा – २००८ मध्ये हर्बालाइफ़ची उत्पादने लोणावळयाच्या एका खानावळ मालकाच्या पत्नीस विकण्यासाठी दुपारच्या वेळी अडीच नंतर मी व माझा सहकारी बाहेर पडलो. वाशीलाच रात्र झाली होती. लोणावळयाला पोहोचायला रात्रीचे ३ वाजले होते. (मुंबई-पुणे जुना रस्ता) मी रस्त्याच्या बाजूला गाडी (टाटा इंडिका) घेऊन उभा होतो. सहकारी 'एका हॉटेलात राहाण्याची सोय होऊ शकते का?' हे विचारायावयास रस्त्यापलीकडे गेला. तेव्हढ्यात एका पाण्याच्या टयांकरने (आरजे 32 जी 2138) माझ्या गाडीस पाठीमागून उडवले. माझी गाडी उडून पुढे जाऊन उभी राहिली. टयांकरवाला पळून चालला होता. माझा सहकारी, शिक्षक असल्याने, त्याच्या खिशात सतत शिटी असायची. त्याने ती वाजवली. टयांकरवाल्यास वाटले की पोलिसांनी शिटी वाजवली. तो थांबला. तो थांबल्यावर स्थानिकांनी त्याला मारत मारत आमच्यापासून दूर नेले व त्याच्या खिशातून ९००० रुपये काढून घेतले. त्याच्या खिशातून पैसे काढले, हे आम्हाला माहीतच नाही. मग त्यांनी त्या टयांकरवाल्याला आमच्या ताब्यात दिले व आम्हास सांगितले की, त्याला पोलिसांच्या ताब्यात द्या. आम्ही त्याला घेऊन पोलिस स्टेशनला गेलो. तिथे पोलिस झोपलेले होते. त्यांना उठवले. त्यांनी दोन्ही बाजू ऐकून घेतल्या. आता त्या टयांकरवाल्याकडे पैसे नव्हते. आता मालदार पार्टी आम्हीच होतो. त्यांनी आम्हाला सांगितले की, "तुम्ही गाडी रस्त्याच्या मध्ये उभी केली नाही, कशावरून? आम्हाला गाडी दाखवा." मग त्यांनी आमची गाडी पाहिली. माझ्याविरुद्ध तक्रार लिहिली की मी गाडी मध्येच उभी केली होती म्हणून. माझ्याकडून गाडीचे नोंदणी पत्र मागून ते ठेवून घेतले. माझ्याकडे विम्याची छायाप्रत होती ती ठेवून घेतली व मूळ प्रत मिळेपर्यंत नोंदणीपत्र

देणार नाही म्हणून सांगितले. आम्हालाही सोडावयास तयार नव्हते. मग आम्ही विनंती केल्यावर विनापावतीचे १५०० रुपये घेऊन आम्हाला सोडले. मी सांगत होतो की, माझी पत्नी कुठे काम करते, तरी ते ऐकावयास तयार नव्हते. परत गाडीकडे आलो, तर हॉटेलवाला ‘अपघाती गाडीचे मालक’ म्हणून आम्हाला जागा द्यावयास तयार होईना. शेवटी शेतात जाऊन व्हाळाच्या बाजूला प्रातर्विधी उरकला. आंघोळीसाठी दुसऱ्या एका हॉटेलात एक तास जागा मिळाली. तिथे दाढी वैगेरे करून आंघोळ करून सूट बूट चढवून सेंट मारून ज्या कामासाठी आलो होतो, तिथे गेलो. सादरीकरण करून उत्पादने विकली. नंतर एका ग्यारेज्मध्ये गाडीची डिकी चेपली होती, ती तात्पुरती दुरुस्त केली. मुंबईला जाऊन पत्नीस हा किस्सा सांगितला. पत्नीने फोन करून लोणावळयाच्या त्या वेळेच्या पोलिसांकडून (2008) नोंदणी पत्र व १५०० रुपये, दोन्ही मिळवले.

2 9 2008 रोजी पुणे- बंगलोर रस्त्यावर कराड शहरात संगम होटेलमध्ये जेवलो. ३-४ ९ २००८ गणपतीच्या सुट्टीत वायंगणी! 3 ध्रुवांवर तिघे आपण!

मोबाईलवर बोलताना! तोंडवली! 5 9 18 रोजी येताना धामणी, संगमेश्वर तालुका, रत्नागिरी जिल्ह्यात गाडीत डिझेल भरले.

दिल्ली:-

2008 मध्ये हर्बलाइफ़च्या भारतीय इव्हेंटसाठी दिल्लीला ट्रेंनने गेलो. अशोका आंतरराष्ट्रिय होटेलमध्ये आमचा इव्हेंट होता. करोल बागेत राहिलो. आदल्या दिवशी तिथेही फास्टट्र्याक इंटरन्याशनल (आमची मोनिटरिंग कंपनी)चा इवेन्ट झाला. तिथे पत्रक वाटताना एका व्यक्तीचा संपर्क झाला. त्या व्यक्तीने घरी बोलावले. त्यांची सोन्याचे नाणे वाटायची स्कीम होती. मी आणि दिल्लीकरांच्या जाळ्यात सापडणार? वाट बघा! येताना विमानाने आलो. माझा पहिला विमान प्रवास!

15 11 8 रोजी दादर ते भुबनेश्वर कोणार्क एक्स्प्रेस या ट्रेनने चुलतबहीण, काका, काकी, चुलतभाऊ, मी, पत्नी व मुलगा निघालो. ओरिसास ३ राज्ये पार करून ट्रेनने गेलो. एकदा ट्रेन सरळ जाते, मग परत मागे येते व परत पुढे जाते. म्हणजे इंग्रजी ‘एन’ च्या रुपात. मधल्या मागे येण्याच्या टप्प्यात वरच्या खिशातला मोबाईल संडासात पडला. गाडी खूप हळू होती. पण उतरून शोध घेतला तर तो सापडण्याची शक्यता नव्हती, कारण ट्रेन संपूर्ण पुढे जाईपर्यंत मला त्याचा शोध घेता आला नसता. समजा मला ट्रेन परत पकडता आली नसती तर माझ्या कुटुंबियाना मी उतरून गेलोय हेही कळले नसते व त्याना मला फोनही करता आला नसता. 17 11 18 ला भुबनेश्वरला पोहोचलो. प्रवासाचा कंटाळा आला. आम्ही सर्व कुटुंबीय, काका-काकी, चुलतभाऊ, वहिनी, पुतण्या, पत्नी व माझा मुलगा, चुलतबहीणीच्या साखरपुड्यास चाललो होतो. दुसरा चुलतभाऊ व माझा थोरला भाऊ, त्यांचे कुटुंबीय विमानाने नंतर आले. आधी भुवनेश्वरला (देवळांचे शहर) आर्य पॅलेस हॉटेलात (प्लॉट क्र. 126/बी, जन पथ, अशोक नगर, भुवनेश्वर, ओरीसा 751009) मुक्काम टाकला. 17 11 2008 रोजी चुलतबहिणीच्या साखरपुड्यानिमित्त अशोकनगर, भुबनेश्वर 751009, ओरिसा येथे पट्टा व टोपी विकत घेतली. तिथून दुसऱ्या (18 11 2008) दिवशी शांती पूजा करायला, चुलतबहीणीच्या सासुरवाडीस (रासुलगढ, भुबनेश्वर 10) एका देवळात गेलो. तिथल्या देवळाना या पृथ्वीवरील सर्व रंग असतात. बैल, सिंह, हंस, मोर अशा सर्व पशु पक्ष्यांनी दरवाजा, भिंत

सजवलेले असतात. देवळासमोरील नंदी हुबेहूब त्याच्या वृषणासह असतो. प्रत्येक देवळाच्या प्रवेशद्वारावर सिंह वेगळयाच आकारात असतो. त्या सिंहाला मिशा असतात. (माणसासारख्या, मान्जरासारख्या नव्हे! मोठमोठे बटबटीत डोळे) सकाळी सुरु झालेली पूजा रात्री संपली. रात्री आरतीच्या वेळी भटजी व स्थानिक (कहानी चित्रपटात विद्या बालन ज्या मिरवणुकीत सामिल झालेली असते, त्या मिरवणुकीतील बंगाली स्त्रिया कशा किंचाळतात, ओठांवर बोट ठेवून ओरडतात तशा) मोठमोठ्याने ओरडतात, किंचाळतात. देवीच्या गळयात नरमुंडकांची, कंबरेत नरहातांची माळ, हातात तलवार असते. वरच्या अंगाला देवीला कपडे नसतात. 19 11 2008 रोजी येथील उत्कलिका ह्यांडलूमच्या हांडीक्राफ्टच्या दूकानात, ‘ए यूनिट ऑफ ओरीसा स्टेट को-ओपेरटीव म. शॉप नंबर 1, ईस्टर्न टावर मार्केट इमारत, अशोक नगर, भुबनेश्वर 751009’ कपडे विकत घेतले. आम्ही उदयगिरीच्या गुंफा पाहून आलो. दगडी हत्तींच्या पायाकडे दगडी केळी! पायथ्याशी चणे विक्रेते तूम्हाला चण्याच्या पुड्या विकतात, वर

उपयोगी ठरतील म्हणून! वर काही माकडे आहेत. ही माकडे तुमची विजार पकडून खेचतात. त्याना हे चणे द्यावे लागतात. नाहीतर ही माकडे विजार सोडत नाहीत. ब्राम्ही, खरोष्टी किंवा कोणत्यातरी पुरातन लिपीत लिहिलेला मजकूर कोणार्कला शिल्पान्वर होता, सुर्यमंदिराचे दर्शन घेतले. सुर्यमंदिराच्या परिसरातच नवग्रह मंदिरही होते. तिसऱ्या दिवशी सकाळी भुवनेश्वरला 'हरे

रामा हरे कृष्णाच्या' (इस्कॉनच्या) देवळात साखरपुडा झाला. चौथ्या दिवशी जाताना सास-यांनी आम्हाला एका हॉटेलमध्ये जेवावयास नेले. एक खानावळीसारखे हॉटेल होते. तिथे आडव्या लाकडी टेबलांवर पंगतीसारखे, उडीसी जेवण केळयांच्या पानावर जेवलो. रात्री जगन्नाथ पुरीला गेलो. कळसावर चढून दिवा लावला जातो. गाभाऱ्याच्या दरवाजावर पुजारी छडी घेऊन उभे असतात. दक्षिणा दिली नाही, तर अंगावर छडी मारतात. पंढरपुरचे बडवे कधी पाहिले नाहीत, पण हा प्रकार पाहिला. पाचव्या रात्री पूर्वेचा समुद्रकिनारा पाहिला. येताना 20 11 2008ला विमानाने आलो. पत्नीचा पहिला विमानप्रवास! मुलाने (8वीतील) या आधी बंगलोर विमानाने केले होते.

२००९ मध्ये परत दिल्लीला जाऊन फास्टट्र्याक इंटरन्याशनलचा इवेन्ट केला. परत करोलबागमध्येच राहिलो.यावेळी त्या स्कीम्वाल्याला बोलावले. पण तो आला नाही. यावेळीही ट्रेनने गेलो व विमानाने आलो.

सगुणा फार्मस:- आदल्या रात्री पनवेलला सहकाऱ्याच्या घरी मुक्काम टाकला. फक्त अजून 1 सहकारी बरोबर! कल्याणकरांनी ‘येतो’ म्हणून सांगून फसवले. दुसऱ्या दिवशी सकाळी (29 5 2009) कारने जाताना एक उभी बाईक पाडून गेलो होतो, अरुंद रस्ते! तेव्हा त्यांच्याकडून तांदूळ विकत घेतले होते ते पत्नीस आवडले नाहीत.

19 5 2009 ला माझ्या मुलासाठी मालवणच्या डॉ. के.एन. देसाई (एमबीबीएस) यांच्या सल्ल्यानुसार सुबोध मेडिकल स्टोअर्स, केमिष्ट & ड्रग्गिष्ट, डॉ. बल्लव रोड, मालवण, जी. सिंधुदुर्ग यांच्या दुकानातून औषधे घेतली. तेव्हा आम्ही धुरीवाडा मालवण येथील आमच्या घरात राहत होतो. 21 5 2009 रोजी थोरल्या भावाच्या घराच्या वास्तुशांतीला वायंगणीला गेलो. रात्री पाउस व त्याबरोबर जंगलातील सर्व किडे, वाळू घरात शिरली. ड्रायव्हरच्या कानात एक किडा शिरला. आचऱ्याच्या इस्पितळात जाऊन तो काढावा लागला.

कुर्ल्याच्या एका विद्यालयात मी व माझा सहकारी, इतर शिक्षकाना (एल, एम्, एन वार्ड) ८वीच्या नविन ज्ञान रचनावादावर आधारीत प्रशिक्षण कसे द्यावयाचे याचे प्रशिक्षण घेत होतो, तेव्हा आमची अभ्याससहल महाराष्ट्र राज्य निसर्ग उद्यान, धारावी येथे गेली होती. (29 5 09)

१० ६ २००९ रोजी आमच्या शिक्षक प्रशिक्षणातील अभ्यास सहल नेहरू सायन्स सेंटरला वरळी, मुंबई येथे गेली होती. तीत माझा मुलगाही आला होता.

28 8 2009 मध्ये गणेशोत्सवाच्या सुट्टीत मी व माझे शाळेतील सहकारी शिक्षक दुपारी उशीरा कोकणात जायला निघालो. पहिल्या रात्री (मुंबई- गोवा महामार्गावर) माणगावच्या पुढे 28 8 2009 रोजी ओंकार होटेलात मुक्काम टाकला. पहाटे ४ वाजता उठून गाडी सोडली, ती सुसाट वायंगणी. ९च्या दरम्यान थोरल्या भावाच्या घरी! नाश्त्याची सोय नव्हती, भाऊ, वहिनी कुठेतरी बाहेर जाण्याच्या तयारीत होती. पण आंघोळीला पाणी मिळाले. समुद्रकिनारा दाखवला, सुरुची बने, काजूची झाडे, नारळाची झाडे, आमची विहीर, दत्त मंदीर वैगेरे दाखवले. गणपती दर्शनासाठी मूळ घरी नेले. सतीचे

देऊळ (१५० वर्षांपुर्वी पेडण्याजवळून आणलेल्या मूर्ती- विरगळ) दाखवल्या. तिथून आमची ठाणेश्वर प्राथमिक शाळा दाखवली. फोटोसेशन झाल्यावर मामीच्या घरी गणपती बघायला गेलो. तिथे मामी जेवायचा आग्रह करत होती पण आम्हाला त्याच दिवशी आंजर्ले गाठायचे होते. त्यानंतर धुळे जिल्ह्यातील मित्र, ज्याने माझी गाडी टोलनाक्यावरून ओलांडून दिली होती, (माझ्यापेक्षा गाडी चालवण्यात हुशार) त्याच्याकडे गाडी (टाटा सुमो) चालवायला दिली. धुळयाच्या रस्त्यावर चालवण्याचा अनुभव असलेला माणूस, त्याला काय कोकणातल्या रस्त्यावर चालवणे जमेना. माझ्या गावात एका वेळी फक्त एकच गाडी जाऊ शकते. समोरून एस.टी. आली तर गाडी रिव्हर्समध्ये मागे घ्यावी लागते. त्याने गाडी भर रस्त्यावर (आचरा- मालवण) मधेच आणून उभी केली, ह्याण्ड ब्रेंक असा लावून ठेवला की सुटता सुटेना! (या टाटा सुमोचा ह्याण्डब्रेक मुळातच घट्ट

होता) व त्याने गाडी माझ्या ताब्यात दिली. तिथून मालवणला गेलो. आमचे घर बाहेरून दाखवले. मावशीकडे गेलो. त्यानंतर मालवणच्या तेव्हा नुकतेच सुरू झालेल्या मेढ्यातील होटेलमध्ये जेवायला गेलो. नाही आवडले! त्याना मासे खायचे होते. गणपतीच्या दिवसात व कोकणात मासे? तेही चांगले? तिथून गोवा- मुंबई महामार्गावरून गणपती-पुळयाला (रत्नागिरी जिल्हा) निघालो. सरळ जात असता लक्षात आले की आपण भलत्याच रस्त्याला लागलो आहोत. आम्ही विजयदूर्गाच्या दिशेने २० की.मी. आत शिरलो होतो. परत फिरलो, मुळ रस्त्याला लागलो व गणपतीपुळयाला मुक्काम टाकला. सकाळी गणपतीचे दर्शन घेतले. आमच्या दुसऱ्या धुळयाच्या सहकाऱ्याने सांगितले की पुढच्या दिवाळीच्या सुट्टीत तो इथे सहकुटुंब येईल. नाही आला! कोकणातल्या माणसाची हिम्मत झाली असती, गणपतीला दिलेले वचन पूर्ण न करण्याची? आम्ही तिथून हायवेला न लागता दाभोळ जेट्टी, गुहागर, दापोली जेट्टी, हर्णे बंदर असे करत गेलो. (कधी गाडी रस्त्यावर तर कधी

लॉचवर!) हर्णे बंदरावर रस्त्यावर मासे सुकत घातले होते. माझा आन्जर्ल्याचा मित्र घाबरत होता की एखाद्या माणसाला धक्का लागला तर! म्हणून मी पहिल्या गिअरवर गाडी चालवत होतो. शेवटी त्याच्या घरी आंजर्ल्याला मुक्काम टाकला. सकाळी कड्यावरच्या गणपतीचे दर्शन घेऊन निघालो.

तिथून खेड तालुक्यात (रत्नागिरी जिल्हा) सहकाऱ्याच्या आजोळी पोयनारला गेलो. त्यांचे वैशिष्ट्य असे की एकाच घरात भावाभावाचे २ गणपती शेजारी शेजारी बसवले जातात. घराच्या पडवीत मधमाशाचे पोळे होते. घराकडे जायला लाकडी साकव (छोटा तरंगता पूल) होता. तिथून दापोली तालुक्यात, पालगड येथे जाऊन साने गुरुजींचे घर व घरातील साने गुरुजींच्या संबधित फोटो, वस्तू इत्यादींचे स्मारक पाहिले. खानदेशातील 2रा सहकारी खूप आनंदित झाला. म्हणाला, “त्याच्या मुलांना तो सांगेल की, साने गुरुजींच्या घरी जाऊन आलो म्हणून.” हे ८ दिवस मी सतत गाडी चालवत होतो.

३ ऑक्टोबर २००९ ला मी, माझे ३ मित्र, चुलतभाऊ अशी फक्त पुरुषमंडळी कोयना ट्रीपला निघालो. सुरुवातीला चुलतभावाच्या चिपळूणमधील मित्राच्या घरी मुक्काम टाकला. त्यानंतर त्यांनाही बरोबर घेऊन कोयनेला गेलो. कोळकेवाडी येथील कोयना धरणाचे काम बघितल्यावर समर्थांची रामघळ पाहिली. तेव्हा एका मित्राच्या पायाला जळू चिकटली होती. तेव्हा पहिल्यांदा जळू, काय प्रकार असतो ते पाहिले.

३१ डिसेंबर २००९ला मी व माझा मित्र जळगावला (खानदेश) जायला निघालो. रात्री ९ वाजल्यानंतर नाशिकच्या पुढे एका वडगाव बुद्रुक नामक गावात पोहोचलो. तिथल्या हॉटेलात जेवून तिथेच मुक्काम टाकला. शिरस्त्याप्रमाणे रात्री गाव फिरून बघितले. ११.४५ ला झोपलो होतो. नववर्षाचे स्वागत करण्यासाठी जागा पण राहिलो नाही. होत कोण, आम्हाला एकमेकांशिवाय? ते गाव आम्हाला परके होते. 1 1 10 औरंगाबाद जळगाव हायवेवर सोएगाव फाट्यावर फरदापूर गावात (तालुका सोएगाव जिल्हा औरंगाबाद) ‘पावन लहरी’ पेट्रोलपंपावर डिझेल भरले. त्याच दिवशी जळगाव गाठले. तिथल्या हॉटेलात मुक्काम टाकला. सकाळी नाश्त्याला इथे पोहयावर पण तरी ओततात. जाम तिखट! चुलतभावाने आमची नोंदणी ‘मालवणचे (आंबा बागायतदार) शेतकरी म्हणून करून आम्हाला तिसऱ्या दिवशी म्हणजे २ जानेवारी २०१०ला जैन इरिगेशन कंपनी दाखवण्याची व्यवस्था केली. संध्याकाळी त्यांचे शेत पाहिले. खास करून तिथली आंब्याची कलमे, त्यांची ठराविक उंची व एकमेकांपासून विशिष्ट अंतर ठेवण्याची पद्धत, त्याला गेरू लावून त्यांचे तापमान कमी करणे, कडूलिंबाचा वापर कीटकनाशक म्हणून करणे, मोरावळा तयार करून विक्रीची नवी पद्धत, तिथले पोपट वैगेरे गोष्टी आवडल्या. रात्री धाब्यावर जाऊन कोंबडी मागवली. आचाऱ्याला सांगितले मिरच्या टाकू नको. तरी त्याने एव्हढे तिखट बनवले की ज्याचे नाव ते! उगीच नाही माझा चुलतभाऊ याला जाळगाव म्हणत! जीभेखाली जाळ काढतो ते जाळगाव!

चौथ्या दिवशी ३ जानेवारीला आम्ही अजंठा पाहायला गेलो. चौथ्या गुंफेचे छत, चौथ्या गुहेतील बुद्धाची मूर्ती, सहाव्या गुहेतील भित्तीचित्र, सहाव्या

गुहेतील बुद्धाची मूर्ती व त्याचे शिष्यगण एवढ्याच गुहा पाहून आम्ही बाहेर पडलो. येताना रेहेकुरी अभयारण्यालाही भेट दिली, तेव्हा तिथल्या वनाधिका-यांनी सांगितले की पाण्याचा दुष्काळ असल्याने राहता येणार नाही व प्राणीही दिसणार नाहीत. इथेही प्रचंड वाईट असा रस्ता पाहिला. पुण्यामार्गे मुंबईला परत.

1 3 2010 च्या होळीच्या दिवशी देवाशिषला मुंबईत थांबायचे नव्हते. म्हणून आदल्या दिवशी मुंबई- पुण्याच्या जुन्या रस्त्याने लोणावळयाला आलो. हॉटेलचे दर चढे असल्याने वळवण धरणासमोरील एका हॉटेलात मुक्काम केला. खूप जुनाट हॉटेल होते ते! सकाळी फाटकातून रेल्वेमार्ग ओलांडून पाय-यांवरून चढून भाजे गुंफा बघितल्या. बौद्ध स्तुपांचे शिखर! या स्तूपात एखादा केस किंवा तत्सम अवयव ठेवून त्याभोवती स्तूप बांधलेला असतो. पायथ्याशी एका टेम्पोत घोडा बघितला. समोर लोहगड दिसत होता. जाताना काही स्थानिक मुलांनी वाटेत काट्यांची झाडे टाकून रस्ता अडवला होता आणि होळीची वर्गणी मागितली. येताना परत तीच मुले वर्गणी मागत होती. जाताना वर्गणी दिली होती. येताना मात्र बिनदिक्कतपणे त्या काट्यांना तुडवून गाडी न थांबवता निघालो.

2010 च्या पावसाळ्यात 28 8 2010 रोजी मुंबई विद्यापीठाच्या कालिना कॅम्पसमधील बही:शाल शिक्षण विभागातर्फे आयोजित केलेल्या कर्नाळा पक्षी अभयारण्यातील (रायगड जिल्हा) अभ्याससहलीस मी व माझा मित्र जाऊन आलो. वनस्पतीशास्त्रातील प्राध्यापकान्च्या गटाबरोबर माझा मित्र व प्राणीशास्त्राच्या प्राध्यापकान्च्या गटाबरोबर मी (आमच्या आवडीनुसार) चाललो होतो. गोगलगाय आणि तीही झाडावर (?), कोळी (विडो स्पायडर), वोटर स्ट्रायडर्स, एक प्रकारचे मोस किंवा बुरशीची एक जात, पळस, लाकडी पुलाला लागलेली अळंबी, थुंकणाऱ्या किड्याची बाळे आपल्या गुद्द्वारामधून फेस काढून त्यात राहतात व स्वत:चे संरक्षण करतात. प्रौढ उंच उडी मारून धोक्यापासून पळ काढतात. एक कोळी, एक मातकट रंगाचा टोळ, ज्याचे मातीच्या रंगाशी अनुकूलन झाले होते, ‘टिकटिक’ करत उड्या मारणारा किडा! नेच्याचा १ प्रकार! याट्लास पतंग! त्यानंतर तारा येथील युसुफ मेहेर अली सेंटरलाजाऊन तिथले कार्य समजून घेऊन जेवण घेतले व नंतर तिथली नर्सरी बघितली.

२०१० ला आषाढ एकादशीच्या आधी एका सहकाऱ्याने पार्टीत त्याच्या गावाला सोलापूरला यायचे आमंत्रण दिले. त्याच्याबरोबर तसेच कपडे वैगेरे न घेता कार नोंदवून निघालो. जर कोणी सहकारी सोलापूरला न येता घरी गेला तर जाणाऱ्यांचा, त्याने सर्व खर्च करावा, अशी अट लादली गेली. सकाळ अधिवेशनातील सर्व पुरुष सहकारी गपचूप आले. काही दुपारच्यांनाही बोलावून घेतले गेले. वास्तविक त्यांच्याबद्दल सोलापूरकर काही बोलला नव्हता. पण त्याने सगळ्यांचा खाण्यापिण्याचा व प्रवासाचा खर्च उचलला! प्रत्येकाच्या घरी दुसऱ्याने फोन करून तो ३-४ दिवस घरी येणार नाही असे कळवण्यात आले. माझ्या पत्नीस मात्र मीच फोन केला. तिचा नेहमीचा एकच प्रश्न "कपडे?" माझे नेहमीचे ठरलेले उत्तर, "वाटेत घेईन". शेवटी सोलापूरला सकाळी पोहोचून तिथे अंतवस्त्रे विकत घेतली गेली. त्याचे घर पाहिले, शेत पाहिले. तिथे तो शेतावर आम्हाला सोडून निघून गेला, तेव्हा कंटाळून तुळजापूर गाठले. ३-४ मजल्याच्या त्या रांगेत उभे राहून दर्शन घेतले.

आल्यावर सकाळी त्यांच्या गावात विहिरीवर गेलो. गावातल्या एकूण ६ विहिरींपैकी ३ विहिरी बुजवून त्या जमिनी फ्याक्टरीमालकांना विकल्या होत्या. आधीच दुष्काळ, त्यात हे सोलापूरकर (जवळच्या गावातील शेतकरी) असे वागतात. त्याच्या विहिरीत पोहून आंघोळ केली व मुंबईला परतलो. संपूर्ण खर्च त्याने उचलला.

11 9 2010च्या गणेशोत्सवाच्या सुट्टीत मालवणला ब्यारीस्टर नाथ पै सेवांगण येथे पहिल्या दिवशी मुक्काम केला. वायंगणीला गेलो असता (१२ ९ २०१०). समुद्र गरुडाच्या मादीने बनवलेले घरटे (सुरुच्या झाडावर), सकाळच्या वेळी सुरुच्या झाडांवर टोकाला बसलेला मोर! थोरल्या भावाचे वायंगणीतील घर एरवी बंद असते. तिथला फ्रीझही बंद होता. या वेळा जेव्हा तो उघडला, तेव्हा त्यात एक बेडूक होता. दुस-यांदां जेव्हा तो फ्रीज उघडला तेव्हा त्याने रंग बदलला होता. (15 9 2010)

दुसऱ्या एका मित्राबरोबर पालीला (रायगड जिल्हा) गेलो होतो. तेथील धर्मशाळेत मुक्काम टाकला. सवयीप्रमाणे रात्री पाली गाव बघायला बाहेर पडलो. अष्टविनायकांपैकी एक असूनही गावात कोंबडीही मिळत होती व मद्यही! सकाळी दर्शन घेतल्यावर सरसगडाजवळच, उन्हेरे येथील गरम पाण्याच्या कुंडात पाय शेकवले. विठोबा- रखमाईचे दर्शन घेऊन चन्दरगाव येथील, नवीन पनवेलच्या सौ. माधुरी सुरेश सावंत संचालित एक ईमू पालन केंद्र पाहायला गेलो. तिथे कोंबड्या, तुर्की कोंबड्या, बदके, शेळ्या व ससेही पाळले जात होते. (२०१०-११)

आमच्या शाळेची (जिथे मी शिकवत होतो) ८वीच्या विद्यार्थ्यांची १ पर्यावरणीय सहल महाराष्ट्र राज्य निसर्ग उद्यान, धारावी येथे काढली होती. सकाळी ९ वाजता तेथील तज्ञांनी उद्यानासंदर्भात माहिती द्यायला सुरुवात केली. १२ वाजेपर्यंत माहिती देऊन झाली. मुख्याध्यापिकानी पालकाना संध्याकाळी शाळेत बोलावले होते. आता तोपर्यंत टाईमपास काय करायचा? मुलांना कसे गुंतवून ठेवायचे. मुलांना डबा खाऊन फक्त १ तास वेळ घालवता आला. पुढे काय? पण आमचे नशीब म्हणून एका संस्थेने सर्पांची माहिती देण्यासाठी महाविद्यालयीन विद्यार्थ्यांचा १ गट आणला होता. त्यांनी सापांची माहिती तर दिलीच पण आमच्या विद्यार्थ्याना बिनविषारी सापाना हाताळायलाही दिले. मग काय मुले खुश व त्यांचे सापाविषयी अज्ञान, अंधश्रद्धा, भीती दूर झाल्याने तसेच ५ वाजेपर्यंत वेळ गेल्यामुळे आम्हीही खुश! (२०१०)

2010 च्या डिसेंबर महिन्यात चुलतभाऊ, चुलत मेहुणा व पुतण्याबरोबर गाडीने अलिबागला गेलो. एसी रूम नोंदली. रात्री भारनियमन! लाईटच गेल्यावर एसीचा काय उपयोग? पैसे मात्र एसीचे भरले. सकाळी कुलाब्याच्या किल्ल्यावर जाऊन आलो. (कान्होजी आन्ग्रेंची आठवण काढली).

३१ डिसेंबर २०१० रोजी पन्हाळयाला माझ्या चुलतभावाबरोबर त्याचा मुलगा व माझा मुलगा असे कारने आलो. रात्री उशिरा आल्याने जे मिळेल ते हॉटेल घेतले. 1 1 11 रोजी सकाळी गरम पाणीच नाही. एकतर पन्हाळयाची ३१ डिसेंबरची थंडी! शेवटी भांडून गरम पाणी आंघोळीसाठी मिळाले. सकाळी पन्हाळा फिरल्यावर महाबळेश्वरकडे गेलो. तिथे चुलतबहीण, तिच्या सासरकडची मंडळी आली होती. संध्याकाळी प्रचंड थंडी वाजत होती. रात्री बाजारात फिरत असता धाकट्या भावाचे मेहुणे भेटले. पूर्वी थंडीत महाबळेश्वर रिकामे असायचे. आता सिझनच राहिला नाही. प्रचंड गर्दी १ जानेवारीला! (२०११). त्याच दिवशी प्रतापगडाला भेट देऊन आलो.

वाडी हुसैनी फार्म हाउस, भिवंडीला (ठाणे जिल्हा) सहल गेली होती तेव्हाची गोष्ट! त्यांच्या तलावातून पाणसाप बाहेर आला व त्याने माशाला पकडले, तेव्हाच मला त्याचा फोटो काढता आला. संध्याकाळी आमच्या एका विद्यार्थिनींपैकी एक ६ वीतील मुलगी झोपाळ्यावरून पडली व तिच्या डोक्याला खोक पडली. जवळपास डॉक्टरही नाही. पण त्यांनी एका बाईकची व्यवस्था केली. मागे आमचे १ शिक्षक तिला मध्ये घेऊन बसले व तिला बँडेज बांधून आले. निघणार, तेवढ्यात आम्ही भाड्याने आणलेल्या बसचा पाटा तुटला होता. दिवसभर गाडी एका जागेवर उभी होती, तेव्हा त्यांनी बघितले नव्हते. निघताना लक्षात आले. दुरुस्त करण्यासाठी दुसरा दिवस उजाडणार होता. त्यांच्याकडे दुसरी गाडीही नव्हती. शेवटी आम्ही दुसऱ्या प्रवासी कंपनीला फोन करून घाटकोपर वरून त्यांची बस मागवली. ती येईपर्यंत मुलांना भूक लागली. पण वाडी हुसैनीवाल्यांनी या सर्व विद्यार्थ्यांसाठी परत पोहे बनवले. त्यांनी अडून दाखवले असते तर आमची काही खैर नव्हती. रात्री १ वाजता आम्ही शाळेत पोहोचलो. पण पालकांनी आम्हाला चांगली साथ दिली. प्रदूषित तलाव- एक प्रकारची जलीय वनस्पती फोफावलीय. (29 1 2011)

१६ ४ २०११ रोजी पत्नी, मुलगा, मावस मेहुण्या व भाच्यांसोबत कात्रज घाटात (पुणे जिल्हा) प्राणीसंग्रहालय पाहायला!

२२ ४ ११ रोजी गगनबावडा (कोल्हापूर) पार केला.

२०११ च्या एप्रिल-मे महिन्यात मी, पत्नी, मुलगा (10वीची परीक्षा देऊन), मेहुण्याची पत्नी व तिचा मुलगा (शाळकरी विद्यार्थी) असे टाटा इंडिकाने वायंगणी गावी गेलो. कोल्हापूर मार्गे गगनबावडयाहून न जाता मुंबई-गोवा महामार्गाने जाण्याचा मूर्खपणा केला. पनवेल ते वडखळ नाका, प्रचंड ट्राफिक. १० कि.मी.चा रस्ता पार करायला २ तास लागले. कसालला (मालवण तालुका, सिंधुदुर्ग जिल्हा) पोहोचायला रात्र झाली होती. दोनदा गाडी पंक्चर झाली. एकदा संगमेश्वरच्या पुढे व एकदा कणकवलीच्या पुढे. माझा मुलगा आता चाक बदलण्यात तज्ञ झालाय. रात्रीच्या अंधारात ११ वाजता मुंबई-गोवा हायवेवर कणकवलीच्या पुढे, पत्नी, मेहुण्याची पत्नी विजेरी प्रकाशित करून उभे आहेत व मी आणि माझा मुलगा चाक बदलतोय! सुंदर दृश्य! मालवण (4 ते 6 मे 2011). मधल्या काळात वायंगणी! (17-18 5 11) मालवण, मालवणवरून पेडण्याला जाऊन आलो. भगवतीचे देऊळ दर्शन. (18 5 2011). येताना सावंतवाडीची लाकडी खेळणी विकत घेउन, तिथल्या बागेत खेळलो. येताना वेंगुर्ल्याला उभा दांडा येथे

सहकाऱ्याच्या ‘कृष्णकुंज’ नावाच्या घरी गेलो. १९ ५ ११ वायंगणी – मालवण. २० ५ ११ला पोयरा! पोयऱ्याच्या नदीत पोहलो. (२१ ५ २०११) गणपतीपुळयाला गेलो. तिथून मुंबई.

२०११ च्या मे महिन्यात १० तारखेला लेण्याद्रीच्या (पुणे जिल्हा) विरुध्द बाजूने (रस्त्याच्या विरुद्ध बाजूला) नगरच्या दिशेने चाललो होतो. ११ तारखेला मी, मित्र व माझा मुलगा (वय 15 वर्षे- 9वीत) टाटा इंडिकातून अहमदनगरला गेलो. चांद बिबीका मकबरा पाहिला. समोर पवनचक्क्या दिसत होत्या. समोरच्या हेलीप्याडवर एक हेलीकोप्टर दिसत होते. अहमदनगर येथील भुईकोट किल्ला, जिथे १२ राष्ट्रीय नेत्याना तुरुंगात ठेवले होते.

माझा मुलगा हा इतिहास वाचत असताना!

येताना पुण्यावरून आलो. रस्ता एवढा रद्दड की विचारू नका. पण टोल मात्र घ्यायचे. त्याना विचारले “कसला टोल घेता?” तर म्हणे, “ज्या पुलावर टोलनाका उभा आहे, त्या पुलाचा.” इतर रस्त्याशी त्यांचा काही संबंध नव्हता.

२०११ ला मित्रांबरोबर पावसाळ्यात लोणावळ्याला जाऊन राहिलो व पावसात नाचलो.

पावसाळ्यात कांदिवली पूर्वेच्या ठाकूर संकुलातील ‘मराठी सांस्कृतिक मंडळा’बरोबर वज्रेश्वरी व ‘कल्याणी रिसोर्ट’ येथे वर्षासहलीला गेलो. (17 7 2011)

१ ते ७-९-२०११ च्या गणेशोत्सवाच्या सुट्टीत चुलतबहीणीच्या नवऱ्याबरोबर (ओरीसावासी- नुकतेच लग्न झाले होते) वाइंगणीला गावाला गेलो असताना थोरल्या भावाच्या घरी गुडघ्याभर पाण्यातून गेलो असता तो परत यायलाच तयार नव्हता. म्हणाला, “मी नाही, या पाण्याने भरलेल्या शेतातून चालणार!” आमच्या विहिरीत एक कोंबडा आत जाऊन बसला, त्याला बाहेर पडताच येईना!

४-११-२०११ ला चुलतभाऊ व २ मित्रांबरोबर गणपतीपुळयाच्या आधी एका प्लॉटची प्री लौंच ऑफर बघायला गेलो होतो. युटोपिया गटवाल्यांनी आमची रत्नागिरीला रहायची व्यवस्था केली. जेवण खाण त्यांच्यातर्फे! प्लॉट बघितल्यावर स्वखर्चाने गणपती पुळयाला जाऊन आलो. ५-११-२०११

२१ ११ २०११ ला उरण, मी ज्या शाळेत शिकवत होतो, तिथल्या २ सहका-यांबरोबर जाऊन आलो.

9-12-11 ला मी ज्या शाळेत शिकवत होतो त्या शाळेच्या नेचर क्लबचा नेचरट्रेल, वर्ल्ड वाईड फौन्डेशन, भारत, या संस्थेबरोबर प्रियदर्शिनी गार्डन, चेंबूर येथे आयोजित केला होता. तिथे एक छायाचित्र प्रदर्शनही लावले होते. त्यात मी सहभाग घेतला होता.

१६ १२ ११ साली पुण्यात पाहुण्यांकडे राहावयास, मित्राबरोबर गेलो. तिथून दुसऱ्या मित्राला भेटावयास! (अमेरिका रिटर्न- परत आता तिथेच सेट्टल झालाय!) मगरपटटा सिटी, पुणे.

मी ज्या शाळेत शिकवत होतो, त्या शाळेच्या रौप्य महोत्सवी वर्षानिमित्त आम्ही शिक्षक व शाळेचे माजी विद्यार्थी, खडवली (ठाणे जिल्हा) येथे मातोश्री वृद्धाश्रमास भेट देऊन तिथे मनोरंजनात्मक कार्यक्रम सादर केले. २५-१२-२०११

४-१-२०१२ ला मी ज्या शाळेत शिकवत होतो त्या शाळेची अभ्यास सहल श्रुष्टी फार्म्स, वाशिंद (ठाणे जिल्हा) येथे गेली होती.

कोल्हापूर :- १५ मे २०१२ ला पुण्याला टाटा सुमो घेऊन जाऊन मावस मेहुणी, सासू व भाच्यांना घेऊन प्रति बालाजी देऊळ, कराडजवळील (प्रसाद म्हणून मिळालेल्या लाडवानेच पोट भरते. तरीही तिथले प्रसादाचे जेवण घेऊन) बघून टाटा सुमो घेऊन चांदोली अभयारण्यात गेलो. सासू विचारत होती, “आता कुठल्या देवळात जायचे?” खूप उत्साहात होती. तिला म्हटले, “आता जंगलात जायचे आहे आपल्याला!” तेव्हा तिला आश्चर्याचा धक्का बसला! मनातल्या मनात म्हणाली, “असे कोणी जंगलात फिरायला जाते का” वेळ संध्याकाळची! राहण्याची व्यवस्था होईल की नाही माहीत नाही, म्हणून फोन करून फोरेस्ट गेस्ट हाउस नोंदले. हे गेस्ट हाउस प्रवेशद्वाराजवळच आहे. तिथे एकावर एक (लहान मुलांचे किंवा सैनिकांचे दुहेरी किंवा तिहेरी बंकर्स कसे असतात तसे) अशा पलंगाच्या ४ जोडया होत्या. माचीस, मेणबत्त्या, साबण, कासवछाप अगरबत्ती वैगेरे आणायला परत गावात जावे लागले. रात्री जेवायला जंगलातील खाजगी गेस्ट हाउसला गेले, तेव्हा पत्ता लागला, की इथे आतमध्ये व्यवस्था चांगली आहे. त्यांच्याकडे जनरेटरही आहे. त्यांचा फोन नंबर घेतला, परत आलो तर आतमध्ये राहण्यासाठी! पण पत्नीने शपथ घेतली आहे, चुकूनही इथे परत कधीच न परतण्याची! रात्री आमची लाईट गेली, तेव्हा रात्रभर प्रचंड उकडत होते, डास चावत होते. शेवटी हॉलच्या मध्यभागी मी जमिनीवर झोपलो. पहाटे आम्हाला ६ वाजता जंगल दाखवणार म्हणून त्यांनी वचन दिले होते. रात्रभरच्या जागरणामुळे आम्ही ४ वाजताच उठून बसलो. सकाळी मी व पत्नी त्याना शोधायला गेलो, तर जंगल मार्गदर्शक ढाराढूर झोपलेले! त्याना उठवले. पहाटे जंगलात गेलो, तर मुलाला ताप आलेला! (वय – 16 वर्षे- संगणक पदविकेचे 1 वर्ष पूर्ण) त्याला गाडीतच झोपवला. त्यांनी जंगलातून वाट दाखवली. सकाळी सकाळी जंगलातून

चालायला शांत वाटत होते, पण ज्या कारणासाठी आलो होतो त्याचे काय? आदल्या रात्री एक तरुणांचा गट, जीप घेऊन जंगलात शिरला होता. त्यांनी फटाके फोडून सर्व पक्षी पळवून लावले होते. आमच्याकडे असलेल्या नियमावलीत मात्र रात्री जंगलात प्रवेश करायला परवानगी नव्हती. इथे सर्वसामान्य पर्यटकांसाठी नियम वेगळे होते व पैसेवाल्या धनदांडग्यासाठी नियम वेगळे होते. माझी पत्नी वैतागून म्हणाली, की "यापेक्षा मुंबईत, माझ्या घरासमोरच्या झाडावर जास्त पक्षी आहेत." चांदोलीचे प्रवेशद्वार! चांदोली अभयारण्य, लांडोर, गाडीतून चांदोली तलाव, चांदोली धरण! जंगलातील पशुगणनेचे स्थळ! तिथून ज्योतिबाचे दुरून दर्शन घेत विशालगड मार्गे कोल्हापूर गाठले. एका हॉटेलात (खानावळीसारख्या खोल्यांत) मुक्काम टाकला. सामान वर घेऊन जाईपर्यंत गाडीला टोचन लावायला त्राफ्फिच्ची गाडी आली. त्यांना म्हटले फक्त सामान वर ठेवायला गाडी उभी केली होती. नंतर हलवणारच होतो. ऐकायला तयारच नव्हते. फोन करून पत्नीस खाली बोलावले. मग त्यांनी गाडी सोडली. तिथे लांबवर पार्किंग स्पेस आहे. तिथे जाऊन गाडी पार्क केली. तिथल्या दुसऱ्या खानावळीत जेवलो. शिरस्त्याप्रमाणे रात्री १० नंतर कोल्हापूर फिरून पाहिले. सकाळी दर्शन घेऊन पुणे गाठले. 17 मे २०१२ ला पुण्यात येरवड्याला माझे साडू बंधू, माझी टाटा सुमो रस्त्याच्या डाव्या बाजूने गाडी चालवत असता, समोरून, येरवडा पोलिस स्टेशनमध्ये काम करणाऱ्या महिला कॉन्स्टेबलच्या, दारू प्यालेल्या भावाने आमच्या गाडीला धडक दिली. माझ्या गाडीचे नुकसान करून तो (ती व्यक्ती) त्याची गाडी सोडून पळून गेला. माझ्या साडू बंधूनी आमच्या गाडीच्या भोवती खडूने रेघ ओढून पोलिसाना बोलावून घेतले, व त्यांच्या सांगण्यानुसार येरवडा पोलिस चौकीत तक्रार केली. आधी तक्रार नोंदवायलाच तयार नव्हते. मग

पत्नीने ती तक्रार नोंदवावयास लावली व त्यांच्याकडून नुकसान भरपाई भरून घेतली. (पण ती पण पुरेशी नव्हती. नुकसान जास्तच झाले होते.) दुसऱ्या दिवशी गाडी स्थानिक ग्यारेजमध्ये दुरुस्त केली. तिसऱ्या दिवशी पुणा- मुंबई एक्ष्प्रेस्स हायवेने निघालो असता परत ब्रेक फेल झाला व गिअरवर गाडी नियंत्रित करत पुणे एक्सप्रेस महामार्गावरून गाडी न थांबवता म्याकडोनाल्डच्या सेवा केंद्रावरून ड्राइव इन पद्धतीने नाश्ता घेऊन मुंबईला पोहोचलो व परत गाडी ग्यारेजला नेली. कारणाशिवाय दहा हजाराचा फटका! 'खाया पिया कुछ नही, ग्लास तोडा बारा आना'|

9-11 6 2012 ला मी, माझा चुलतभाऊ व त्याचे शेजारी नांदगावला, (कणकवली तालुका, सिंधुदुर्ग जिल्हा) कणकवलीच्या आधीचे स्टेशन (कोकण रेल्वे), भावाच्या गाडीने त्याच्या काही खाजगी कामासाठी गेलो होतो. तिथून त्याच्या शेजारच्यांच्या मेहुण्याच्या घरी कणकवलीला राह्यलो. व्यवहार झाल्यावर वायंगणीला जाऊन परत त्याना कणकवलीला सोडून राधानगरी – कोल्हापूर मार्गे मुंबईला परत आलो. येताना गगनबावडा घाट-कोल्हापूर- पुणे हायवे पार केला.

१३ ते १६-१०-२०१२ रोजी एका खाजगी कामासाठी मी, चुलतभाऊ, काका व आमचा एक मित्र (14 10 12) नांदगावला, मालवणला (आडारीच्या पुलावर रात्री कितीतरी वर्षांनी, सेवांगणात), विजयदुर्गासमोर असलेला प्ल्यास्टिकचा रेसोर्ट बघण्यासाठी (कोन्क्रीटच्या चौथऱ्यावर बांधलेले जे कधीही हलवता येते) गेलो. (मालवणच्या किनाऱ्यावर रांपण

(15 10 12)

26, 27, 28-11-2012 ला एस.टी. पकडून मी व माझा मित्र साताऱ्याला गेलो. दुपारी जेवायला ताम्बडा व पांढरा रस्सा. झणझणीत! मजा आली. संध्याकाळी हायवे पलिकडील दक्षिण भारतीय मंदीरात गेलो. परत रात्री जेवल्यानंतर शहर फिरायला बाहेर पडलो. मला व माझ्या या मित्राला रात्रीच्या वेळी शहरे फिरायला आवडतात. दिवसभराचा बाजार शांत झालेला असतो. गर्दी कमी झालेली असते. शहर काही वेगळच दिसते तेव्हा! २७-११-१२ ला सकाळी उठून रिक्शा पकडून अजिंक्यतारा किल्ल्यावर गेलो. मजा नाही आली. कास बघायचे राहून गेले. एका हॉटेलच्या छताला लागलेले मधाचे पोळे, हायवेच्या पलिकडे असलेले दाक्षिणात्य देऊळ, नटराज मंदीर, अय्यप्पा मंदिरातून प्रवेश केला, त्या देवळाचा एक दरवाजा- आंध्रप्रदेश प्रवेशद्वार. भोसल्यांचा राजवाडा व जलमंदीर दुरून पाहिले.

रायगडला (1991) धाकटा भाऊ, थोरल्या भावाचे दोन्ही मेव्हणे, त्यांचे चुलत-मावस बंधू व गिरगावातील मित्र (भटकी जमात मित्र मंडळ) गेले होते, तेव्हाची कथा. (तेव्हा केबल कार सुरु झाली नव्हती.) थोरल्या भावाच्या धाकट्या मेहुण्याची पाठ्पिशवी खाली पडली. ५ मिनिटानी तिचा आवाज आला. यावरून उंचीची कल्पना येईल. तो पडला असता तर काय शिल्लक राहिले असते? एका आडमार्गाने वर चालले असता एक मित्र म्हणायला लागला की 'हेलिकोप्टर आणल्याशिवाय तो वर चढ़णार नाही. तेव्हा यानी एका म्हाताऱ्या ताकवाल्याला रस्ता विचारायला खाली बोलावले. आता एवढा खाली आला तर त्याच्याकडून 'ताक पिऊया', म्हणून त्याला ताक विचारले. त्याने मडके समोर ठेवले. मडक्याच्या तोंडावरील कापडी आवरण काढले नी, जी खोकायला सुरुवात केली ती ताकाच्या मडक्यातच. आता एवढा खाली आला की तर त्याना नाही कसे म्हणायचे. म्हणून त्यांच्याकडून ताक विकत घेतले. शेवटी त्यानी वर चढायचा १ शोर्टकट दाखवला. वरच्या लोकानी सांगितले की गेल्या ३०० वर्षात या मार्गावरून येणारे तुम्हीच पहिले! शेवटच्या एसटीने पायथ्याला सोडल्यावर ह्यांनी गावाच्या दिशेने चालायला सुरुवात केली. गावाच्या वाटसरुला विचारले, "गाव किती अंतरावर?" "हे काय, हाकेच्या अंतरावर!" कितीही हाका मारल्या तरीही गाव काही येईना! कितीतरी कोस चालल्यावर एकदाचे गाव आले. महाड! थोरल्या भावाचा धाकटा मेहुणा 4 मित्रांसोबत शिखरावर गेला व रात्री तिथेच मुक्काम केला. मला नंतर म्हणाला, "अनेकांच्या गटात राहण्यापेक्षा 4 जवळच्या मित्रांबरोबर राहण्यात जास्त मजा आहे बघ! अंतरीच्या गप्पा मारता येतात."

मी मात्र देवाशीशबरोबर केबल कारने रायगडला वर जाऊन आलो. म्यूजियम पाहिले. रेकॉर्डिंग ऐकले. घोड्यावरून खरेदी करण्याची बाजारपेठ पाहून मी देवाशीशला म्हणालो, “माझ्या मुलाला आणायला पाहिजे होते, हे सर्व प्रत्यक्ष पाहायला त्याला आवडले असते.” नंतर परत म्हणालो, “कदाचित नाही! त्याला इतिहासाची आवड नाही आहे. मी जेव्हा त्याला कान्हेरी गुहेची माहिती देत होतो, तेव्हा तो चिडून बाहेर पळाला होता. माझ्यासारख्या, शाळेत इतिहासाचे पुस्तक शिकवताना इतिहासाच्या गोष्टी रंगवून सांगणाऱ्या अरगडे बाई त्यांला मिळाल्या पाहिजे होत्या. मग त्याला इतिहासाची आवड लागली असती. पण इंग्रजी माध्यमाला अशा कोण शिक्षिका मिळणार? या दाक्षिणात्य, उत्तर प्रदेशीय शिक्षकांना कुठून माहीत असणार शिवाजी महाराजांच्या कथा? आणि इंग्रजीत त्या कशा रंगवणार? मातृभाषेचा हा फायदा विदेशी भाषांना कसा कळणार? 11वीत कला शाखेत आईने जाऊ दिले नाही व म्हणून मी ‘इतिहास’ हा विषय पुढे घेऊ शकलो नाही. भूगोलात तर मला 40 पैकी 40 गुण मिळायचे! माझे नागरीकशास्त्र कच्चे होते. अजूनही कदाचित मला लोकसभा, विधानसभा, राज्यपरिषद, विधानपरिषद, नगरपालिका, ग्रामपंचायत, प्रमुख कोण, किती सदस्य, किती वर्षांनंतर सदस्य बदलतात, आमदार, खासदार वैगेरे कोणाला म्हणतात? इत्यादी प्रश्नांची उत्तरे देता येणार नाही.” (2012 नंतर केबल कार सुरू झाल्यावर)

माणगावला (रायगड जिल्हा) प्लॉट बघण्यासाठी मी व माझे सहकारी टाटा सुमोने गेलो. (२०१२)

2012 मध्ये कल्याणजवळील एका चिनी नावाच्या रिसोर्टला, (सुज्ञांनी गूगलचा वापर करून स्वत: माग काढावा व तिथे लॉकर मध्ये काही ठेऊ नये.) जिथे रस्त्याच्या बाजूला रेस्टोरंट कम बार असून, आतमध्ये लाटा उत्पन्न करणारा तरण तलाव आहे, तिथे आमचे कपडे लॉकरमध्ये ठेवले असता, त्यातून सहकाऱ्याच्या पाकिटातील हजार रुपये व दुसऱ्याचे घड्याळ काढून घेण्यात आले होते. चावी आमच्याकडे होती, तरीही?

२९ डिसेंबर २०१२ रोजी टाटा इंडिका चालवत मी व माझे दा. नौ. नगरचे लहानपणीचे मित्र महाडला आमच्या दुसऱ्या मित्राच्या घरी राहायला गेलो. तिथून पहाटे ४ वाजता निघून वायंगणी गाठले. (30-12-12) संध्याकाळी मालवण. एका मित्राला सोडून इतर मित्राना मुंबईला जाणाऱ्या बसमध्ये बसवून दिले. त्या एका मित्राबरोबर देवबागच्या (ता. मालवण, जिल्हा सिंधुदुर्ग) किनाऱ्यावर गेलो. आमच्यासोबत माझा चुलत भाऊ आला होता. त्याने राहिलेल्या मित्राच्या आई, पत्नी व मुलास भाड्याच्या गाडीने मुंबईहून बोलावून घेतले. ३१ डिसेंबर तेथील हॉटेलमध्ये साजरा केला. अजून एक चुलत चुलत भाऊ पण सोबत होता. तो घरीच थांबला होता. सकाळी, १ जानेवारी २०१३ रोजी आम्ही स्नोर्केलिंग केले. त्यांना परत वायंगणीला थोरल्या भावाच्या घरी घेऊन गेलो. आमचे मूळ घर, सतीचे देऊळ (विरगळ) व ठाणेश्वर प्राथमिक शाळा दाखवली. त्यानंतर त्याना मुंबईस पाठवून दिले. नंतर माझे कुटुंब (पत्नी, मुलगा, चुलत, आत्ये भावंड, त्यांच्या बायका, मुले व काका-काकी) मालवणला आले. ५ जानेवारी २०१३ रोजी काकांचा सहस्त्रचंद्रदर्शन सोहळा साजरा केला. त्यानंतर मी, माझा मुलगा व पुतण्या कारने मुंबईला परत गेलो. इतर ट्रेनने गेले.

फलटण – माझे वजन व चरबी तपासायचे यंत्र घेऊन एस. टी. ने त्याच्या घरी गेलो. हर्बालाइफ़्चा व्यवसाय केला. (2 2 2013)

१५-३-२०१३ रोजी पत्नी तिच्या कचेरीतील सहका-यांबरोबर उरणला गेली होती आणि मी डेक्कन क्वीनने पुण्याला.

मी ‘मानसी उद्योगा’बरोबर पाली रिसोर्ट, उत्तनला (वसई तालुका, पालघर जिल्हा) गेलो असता माझा मोबाईल हरवला. रेंज नसल्याने इतरांच्या फोनवरूनही फोन करता आला नाही. (4 8 2013) इथली घसरगुंडीही चांगली नव्हती त्या दिवशी, त्याच्या बाहेर आलेल्या व गंजलेल्या पत्र्यामुळे हाताला जखमा होऊ शकत होत्या.

8 8 2013ला मी, पत्नी व मुलगा पत्नीच्या सहका-यांबरोबर शेगावला अमरावती एक्स्प्रेस ट्रेनने गेलो. एरवी पत्नी ‘एसी कोचवर खर्च का करता?’ म्हणून विचारते, पण तेव्हा मात्र प्रवासाअंती असे म्हणाली की सर्वसामान्य डब्यात केसांची वाट लागते. कोणीही डब्यात आपल्या बर्थच्या मध्ये पथारी टाकून झोपलेले असते. टी.सी. सुरुवातीला कोणी मिळते का हे बघून निघून गेलेला असतो. नंतर तो लक्षही देत नाही. पण एसी डब्यात आगंतुक शिरत नाहीत.’ तिचे सहकारी नेहमी शेगावला जाणारे असल्याने त्यांनी गजानन महाराजांच्या देवळाजवळ असलेल्या निवासस्थानात नोंदणी करून ठेवली होती. त्यामुळे राहण्याचा त्रास झाला नाही. सकाळी गाव उठायच्या आत प्रभातफेरीला गेलो असता गाव, इतर, देशावरच्या गावान्सारखेच वाटले. डुक्कर वैगेरे! सकाळी वशिला असल्याने रांगेत जास्त काळ उभे राहावे लागले नाही. गाभाऱ्याजवळ प्रवेश मिळाला. महाप्रसादासाठी मात्र रांग लावावी लागली. कंटाळा आला. दुपारी टयाक्सी करून एक खूप उंच अशी हनुमानाची मूर्ती पाहायला गेलो. तिथे हर्बलाइफ़चा एक वितरक आपली गाडी घेऊन आला होता. तिथून लोणार तलाव पाहून आलो. खूप थकलो होतो. रस्ताही खूप खराब होता. 10 8 13 रोजी मुम्बई मेलने निघालो व 11 8 13 रोजी मुम्बईत परत आलो.

31 8 2013 रोजी मित्राबरोबर आंजर्ले गावी जायचे ठरले. सकाळी विक्रोळीवरुन त्याच्याबरोबर बाहेर पडलो व ठाणे एस.टी. स्थानक गाठले. तिथे कळले, दापोलीला जायची गाडी फक्त रात्री 10 वाजता मिळते! तिकिटे तर काढली पण दिवसभर टाइमपास काय करायचा? ठाण्याच्या 2 मॉलमध्ये दुनियादारी हा चित्रपट बघितला व विंडो शोप्पिंग केली. महागडी कॉफी प्यालो. रात्री एस.टी. पकडली. तुफान गर्दी होती. ती फक्त हायवे पर्यंत! हायवेवर गाडी रिकामी! परत दापोलीला शिरताना गर्दी वाढली. दापोलीला उतरुन दुसरी एस.टी. नंतर 6 सीटर रिक्शा! मग लॉंच! बाणगाव जेट्टी! शेवटी सकाळी आंजर्ले गावात पोहोचलो. 1 9 2013 रोजी मित्राबरोबर आंजर्ले येथे 'विनोद सुर्वे' यांच्या 'क्रुष्णाई होम स्टे'मध्ये मुक्काम टाकला. दिवसभर कड्यावरचा गणपती, पुल, आन्जर्ल्याची खाडी, आन्जर्ल्याच्या पलीकडे, बाणकोट जेट्टी खुप फिरलो.

गाव एंजोय केला! 2 9 2013 रोजी एस.टी. रिक्शा बोट करत हरिहरेश्वरला गेलो. मित्राच्या नातेवाइकांची 'शांती' केली. संध्याकाळी परत मुम्बई! रात्री ठाण्याला एका होटेलमध्ये काचपेटीत मोठ्या डोळ्यांचा 1 मासा होता.

२० ९ १३ ला पुण्यास येरवडा येथे विडी कामगार वसाहतीत साडू बंधूंच्या घरी राहावयास गेलो. इनसर्च आउटडोर ट्रेनिंगला हजर राहण्यास गेलो.

ओक्टोबर २०१३ ला चुलतभावाच्या वर्गमैत्रिणीच्या नान्द्राव, काशीद, मुरुडच्या एका रिसोर्टला गेलो होतो. रात्री जेवण, आमच्यासाठी एक स्वतंत्र खोली! सकाळी चुलतभावाच्या वर्गमैत्रिणीला थंड पिच अफ्रेश पाजले. खुश झाली! त्यांची बाग़ फिरून पाहिली. त्यांना निरोप देऊन दुपारी भावाच्या, पत्रकार मित्राच्या अलिबागच्या कचेरीत गेलो. तिथे त्या पत्रकार मित्राने एका टूथपेस्ट कंपनीत घडलेली गोष्ट सांगितली. [कंपनीत चर्चा चालली होती, की आपल्या टूथपेस्टचा खप कमी का झाला? एका जॅकने (पहिल्या महायुद्धात Britain मध्ये एक बैठक झाली. त्यात ही चर्चा सुरू होती की आपली विमाने जी युद्धात नष्ट होतात, तिथे त्यांना काय केल्याने संरक्षण मिळेल? सगळ्यांनी सांगितले परत येणाऱ्या विमानांचा अभ्यास करून ज्यावर सर्वात जास्त बोंबफेक झालीय तेव्हढ्या भागांवर संरक्षक पत्रा लावावा. सगळ्यांनी सहमती दाखवायला हात वर केले. एकटा जॅक सोडून! इंग्लंडमध्ये बहुमतालाच धरून न ठेवता एका व्यक्तीच्या मताला ही किंमत असते. त्याला विचारण्यात आले, "तुझे काय मत आहे? तुला आमचे मत का मान्य नाही?" तो म्हणाला की "त्या भागावर एव्हढा मारा होऊनसुद्धा ही विमाने परत आली. जी विमाने परत आली नाहीत, त्यांचे काय? याचा अर्थ उरलेल्या भागावर डबल पत्रा लावावा लागेल." सर्वांना हे मान्य झाले. तेव्हापासून असे वेगळे मत मांडणाऱ्या व्यक्तीला जॅक म्हणतात.) त्याना आपले वेगळे मत सांगितले, प्रथम त्याने प्रत्येकासमोर टूथपेस्ट ठेवायला सान्गितली. तो म्हणाला, जे प्रोडक्ट तुम्हाला विकायचे आहे, ते प्रथम नजरेसमोर पाहिजे! मग त्याने सांगितले, "टूथपेस्ट मधील पेस्ट बाहर पडण्याचे नोज़ल मोठे करा. जेणेकरून

दाबल्यावर जास्त पेस्ट बाहर पडेल व ती लवकर संपेल. लवकर संपली तर लवकर खरेदी केली जाईल.”]

६ डिसेंबर २०१३ला, ३ मित्रांसोबत अलिबागला गेलो. चुलतभावाची मारुती व्यान एका मित्राने (एकतर त्याला व्यवस्थित दिसत नाही, त्यात रात्र झालेली, त्यात रस्ता खडबडीत) अलिबागच्या रस्त्याने एवढी वेगात नेली की विचारू नका! रात्री हॉटेलमध्ये मुक्काम टाकला. येताना ७ डिसेम्बर २०१३ रोजी आधी अलिबागच्या किनाऱ्याला फिरुन नंतर ताऱ्याला युसुफ मेहेर अली सेंटर पाहिले.

७-१२-१३ घोडबंदर गेस्टहाउसला, ठाणे जिल्हा – रात्री हेल्थ, वेल्थ, हैप्पीनेस, लोखंडवाला संकुल, कांदिवली पूर्व केंद्राबरोबर संगीत मैफल साजरी केली.

१५-१२-२०१३ ला ‘मानसी उद्योग’बरोबर मामाच्या गावी, मनोर फाटा, बोईसर (पू) येथे जाऊन आलो. माझा मुलगा व पुतण्याही (थोरल्या भावाचा मुलगा) बरोबर होते.

मी, पत्नी, मुलगा व पुतण्या वसई रेल्वे स्थानकावरून रिक्षा पकडून ‘द ग्रेट एस्केप’ रिसोर्टला गेलो असता माझा कॅमेरा चोरीस गेला. चूक माझी होती. मी बेंच वर ठेऊन कपडे बदलत होतो. लक्ष दिले नाही. (२०१३)

12 1 2014 रोजी थोरल्या भावाची बोट, जी गावाला घेऊन जायची होती, ती अर्नाळयाला विरार (प) पालघर जिल्हा नांगरून पडली होती ती पाहावयास व तिची निगा राखावयास गेलो. त्यात पाणी शिरले होते व दिवसभर ते उपसत होतो.

१५ ३ २०१४ ला थोरल्या भावाबरोबर वायंगणीला गेलो.

१०-१३ ५ २०१४ ला मित्राच्या कुटुंबाला मालवण फिरून दाखवले. त्याआधी ते सिंधुदुर्ग किल्ला पाहून आले होते व स्नोर्केल्लिंगही केले होते. प्रथम धक्क्याजवळील हॉटेलमध्ये उतरलो. (11 5 14) दुपारी त्याना रॉक गार्डन, राजकोटचे खडक दाखवले. त्यानंतर वायंगणीच्या घरी घेऊन गेलो. येताना ब्रम्हगिरींची समाधी किंवा गुहाही, ओझर दाखवण्याचा प्रयत्न केला पण ही मंडळी थकलेली असल्याने सर्व बसमधून खाली उतरली नाहीत. त्या रात्री त्याना जयंत साळगावकरांचे गणपतीचे सुवर्ण मंदीर दाखवले. 12 5 2014 रोजी सकाळी आम्ही डॉल्फिन दर्शन, वोटर स्पोर्ट्ससाठी देवबाग-तारकर्लीला बोटीने गेलो. 2 6 14 ला पुणे सातारा मार्गाने आलो.

११-१५ ऑगस्ट २०१४ला माझा धाकटा भाऊ (अमेरिकानिवासी), वहिनी, पुतणे, त्याची सासू, त्याचे मेहुणे, त्यांच्या अर्धांगिनी व त्यांची मुले, माझी पत्नी, भावाची मुले, थोरला भाऊ, पुतण्या, मी व माझा मुलगा अशी भली मोठी टोळी १७ सीटरने वायंगणीत गेलो. थोरली वहिनी आजारी असल्याने सकाळपासून उठून बसलेलो आम्ही तिची वाट बघत दुपारपर्यंत घरी बसून होतो. शेवटी ती आलीच नाही. माझा मुलगा महाविद्यालयात जाऊन पण आला. शेवटी वहिनी व पुतणीशिवायच निघालो. अर्धा दिवस फुकट गेला होता. रात्री धाकट्या भावाच्या सासरच्या नातेवाइकान्कडे कोल्हापूरला झोपलो. सकाळी उठून वायंगणीला गेलो. आम्हाला एक दिवस अजून राहायचे होते, पण बसवाला अडून बसला. त्याला नंतर दुसरे गि-हाईक होते. आम्ही त्या दिवसाचा एक्स्ट्रा चार्ज भरायला तयार होतो, पण तो काही ऐकला नाही. तिथे आम्ही फुटबॉल सामना खेळलो. आम्ही ५० वर्षीय मोठे व ते १७-१८ वर्षाचे युवक, फुटबॉल च्याम्पिअनs क्लब स्पर्धेत खेळणारे! तरी आम्ही त्याना टफ दिली. १५-८-१४ परतीचा प्रवास गगन्बावड्यावरून केला.

१८-८-१४ धाकटा भाऊ, त्याचे कुटुंबीय, थोरल्या भावाचे कुटुंबीय, धाकट्या वहिनीचा आत्येभाऊ व त्याचे कुटुंबीय, धाकट्या भावाची सासू, धाकट्या वहिनीची भाची व दस्तुरखुद्द मी केरळला विमानाने जाऊन आलो. कोचीला उतरून

१७ सीटर बस केली. पुतणीने या टूर्स व ट्र्यावेल्स ची नोंदणी मुंबईतूनच केली होती. आमच्या मार्गदर्शकाने आधी एका मल्याळी हॉटेलमध्ये नाश्त्यासाठी थांबवले. मसाला डोसा, उत्तप्पा, इडली, वडा सांबार हे पदार्थ तयार नव्हते. दुसरे काहीतरी मागवले. तेव्हढ्यात काही मघाशी नसलेले पदार्थ दुस-यांच्या ताटात दिसायला लागले. वेटरला विचारल्यावर म्हणाला. मघाशी नव्हते, आता आहेत. तरीही काही पदार्थ तयार नव्हते. थोड्या वेळानंतर तेही दुसऱ्याच्या ताटात दिसायला लागले. वेटरला विचारल्यावर म्हणाला. मघाशी नव्हते, आता आहेत. असे करून १५-१५ मिनिटानी दुसऱ्यांच्या ताटात दिसणारे पदार्थ जे आम्ही सुरुवातीस मागवले होते ते पदार्थ २ तासांनी आले. जाताना वाटेत एक मोठा ‘चीयाप्पम’ धबधबा पाहिला. दुपारी ३ वाजता मुन्नारला आलो. बाहेर पाउस पडत होता. आम्ही भिजत भिजत एका टपरीवर कॉफी प्यायला

गेलो. ज्या हॉटेलमध्ये मुक्काम होता, तिथे प्रचंड थंडी! मी उन्हाळा समजून केरळला प्रवेश केला होता. म्हटले, हॉटेलला गेल्यावर खाली उतरेन, वाण्याच्या दुकानातून सामान घेऊन येईन, हे हॉटेल (ब्रेक्नेल फोरेस्ट) भर डोंगरात, चहाच्या मळयांमध्ये, धुक्यात लपलेलं व प्रचंड थंडी! घरात घालायची स्लीपरही आणलेली नव्हती व खाली जाऊन काही (माचीस,

मेणबत्ती, कासवछाप मच्छर अगरबत्ती इत्यादी) घेण्यासाठी साधी पानटपरीही मैलोगणती लांब होती. रात्री हॉटेलमध्येच, केरळी स्वादिष्ट जेवण मेसमध्ये जेवलो. सकाळच्या नाश्त्याला वेगवेगळ्या ऑर्डर घेऊन वेटर वैतागला. शेवटी त्याने एक पद्धत सुरु केली. तो विचारायचा ”टी?” व हात वर करायला सांगायचा. मग विचारायचा “कॉफी?” मग परत हात वर करायला सांगायचा. मग “स्यांडविच?” अशा पद्धतीने ऑर्डर घ्यायचा. चहाचे मळे! जाताना ‘लाईफ ऑफ पाय’ मध्ये जे घर सुरुवातीला दाखवण्यात आले, ते पाहिले. दुपारी

‘एराविकुलम’ एडक्यांच्या अभयारण्यात गेलो. तिथे परदेशी लोकांसाठी वेगळा दर होता. दुबईला कायमस्वरूपी स्थायिक झालेले केरळी नागरिकही आपण भारतीय असल्याचे सांगून कमी दरात तिकिटे घ्यायची. माझ्या धाकट्या भावाची दोन्ही मुले अमेरिकेत जन्माला आली आहेत. त्याच्या मेहुण्याची मुलगीही लहानपणापासून अमेरिकेत वाढली आहे, त्यांच्या आत्येबहीणीचा मुलगाही अमेरिकन इंग्रजीतच बोलतो. त्यांना म्हटले, की इथे खाद्यपदार्थ विकत घेताना, अमेरिकन हेलातील इंग्रजी फाडू नका. ते तुम्हाला जास्त दरात (महाग) खाद्यपदार्थ विकतील. या जंगलात डोंगरातील बकरा- शेळी (एडका) संरक्षित आहे. वर खूप धुके होते. उतरताना! दुपारी पुतणीला मल्याळी मसाज करून घ्यायचा होता. सगळेच तयार झाले. जंगलात जाण्यापूर्वीच मुन्नारला आम्ही नोंदणी

करून गेलो होतो. फक्त माझा अपवाद! जंगलात जाऊन आल्यावर सगळे मसाज करायला गेले. प्रत्येकाचे सर्व कपडे काढले, फक्त लंगोटासारखी चिंधी बांधली. सगळे वैतागले! मुलांना तर मसाजच्या नावाखाली बडवून काढले. धाकट्या भावाची सासू विचार करायला लागली की, इथे कुठे गुप्त क्यामेरा तर लावलेला नाही ना? फक्त मी मसाज करणार नसल्याने, तेथील एका पुरोहित भोजनालयात, हॉटेल धन्यश्री, धन्यश्री जंक्शन, चिलिंग प्लांट रस्ता, मुन्नार, येथे उत्तर भारतीय जेवण जेवून आलो. पुतण्या (धाकट्या भावाचा थोरला

मुलगा) म्हणाला, 'आता यापुढे कोणताही कार्यक्रम ठरला की तो माझे अनुकरण करणार.' या सर्वात फक्त मीच शहाणा निघालो. अचीरापल्लीचा धबधबा (भारतातला नायगारा) पाहायला गेलो. काही तरुण मुले मोबाइलमधील व्हिडिओ चालू ठेवून धबधब्याच्या निमित्ताने आमच्याकडील तरुण मुलींचे चलचित्रण करण्याचा प्रयत्न करत होती. इथे माकडे तुमच्या हातातील खाद्यपदार्थ हिसकायला बघतात. संध्याकाळी बाजारात गेलो. वेगवेगळ्या प्रकारचे मसाले, चहा (लेमन, जिंजर, चोकलेट इत्यादी), कॉफी, इलायची, जायफळ इत्यादी विकत घेतली. (चहा, कॉफी वेगळ्या चवीचे, खूप दिवस मीच एकटा संपवत होतो. पत्नी व मुलगा त्यांना हात लावायला तयार नव्हती. चव कशी बदलायची?) रात्री १०

वाजताच झोप आली. चुलतभावाचा फोन आला, तर त्याच्याशी बोलायचेही त्राण नव्हते. शेवटी सकाळी वहिनीने त्याला घडलेला किस्सा सांगितला. तो हसून लोटपोट झाला. हॉटेल सोडून अल्लापुझ्झाच्या दिशेन निघालो. जाताना

एका दुकानावर थांबून केरळी पदार्थ घेतले. अल्लापुझाला रात्री पोहोचलो. हे हॉटेल एका बेटावर होते. प्रथम एका होडीत पाय ठेवून मग तिथे पोहोचलो. आमची मंडळी घाबरली होती. खाडीच्या बाजूला असल्याने डास, कीटक होते. (21 8 2014) रोजी सकाळी एक शिकारा थोरल्या भावाने वल्हवत चालवला. त्यात धाकटा भाऊ व पुतणे बसले. पुतण्याने गळ टाकून मासेमारी केली.

एक गरुडाचे पिल्लू आले होते. कोळ्यांनी खाडीतून पकडलेल्या कासवान्पैकी लहान आकाराचे कासव परत खाडीत सोडले.

इतर मोठी कासवे विकली जातात व खाल्ली जातात. तिथल्या एका देवालयाचे दर्शन घेतले. ह्या देवळात पूजा-यांनी प्रसाद देताना आम्हाला स्पर्श होणार नाही, याची काळजी घेतली. कदाचित आम्ही खालच्या जातीचेही असू शकतो. कशाला धोका पत्करा? नंतर एका हाउसबोटीवर गेलो. नाचलो! थोरल्या भावाने बोटीच्या किचनमध्ये जेवण बनवले. तिथे जेवल्यानंतर दुसऱ्या बोटीतून आईस्क्रीम विकायला येतात. धनुष्यबाणाच्या साहाय्याने मासेमारी करताना पाहिली. रात्री ‘कोंडाई लीप’ हॉटेलमध्येच जेवलो. दुसऱ्या दिवशी सकाळी कोचीला प्रयाण! जाताना एका नर्सरीत रोपे घेतली व नंतर त्यांना विमानातून घेऊन जायला छोट्या ब्यागा विकत घेतल्या.

जाताना परत पहिल्या दिवशीच्या हॉटेलमध्ये, (2 तासानंतर नाश्ता येणाऱ्या) मार्गदर्शक जेवायला थांबवत होता.

त्याला मनाई केली. मग त्याने अस्सल केरळी रेस्टोरटमध्ये थांबवले. इतर मंडळी चायनीज-अमेरिकन मागवत असता माझ्या थोरल्या भावाने व वहिनीने केळयाच्या पानावर मत्स्याहारी (गोड्या पाण्यातल्या) व मी शाकाहारी जेवण मागवले. सांबर ग्लासभर! इतर असूयेने आमच्याकडे पाहत होते. कोचीला जाताना 'ग्रीनलंड केरळा सारीज'च्या दुकानात (मुख्य रस्ता, मुन्नार , केरळा 685612) जाऊन केरळी साड्या विकत घेतल्या. एवढ्या महागातल्या साड्या या महिला कधी घालणार होत्या कोणास ठाऊक? ह्यांच्याच मुन्नार इन मसाले शॉपिंग मॉल मध्ये जाऊन मसाल्याचे पदार्थ घेतले होते. कोचीला आशियातील सर्वात मोठ्या मॉलमध्ये गेलो असता पार्किंग लॉटमध्ये आग लागली होती. आम्ही (मी व थोरली वहिनी) सावकाश, आमची डिश वैगेरे संपवून बाहेर पडलो. रात्री विमानतळावर गेलो असता पुतणीने पायाला स्पा मसाज करून घेण्याची इच्छा पूर्ण करून घेतली. येताना एअर इंडियाच्या विमानाने उतरताना त्रास दिला व आंतरराष्ट्रीय विमानतळावर खूप लांब उतरवले.

28 ऑगस्ट २०१४ रोजी काही आकस्मिक कारणासाठी मी, माझी पत्नी, धाकटा भाऊ, चुलत वहिनी व पत्नी विमानाने गोव्याला गेलो. त्या दिवशी गणेश चतुर्थी होती. वास्कोला उतरल्या वर आम्ही सार्वजनिक वाहन भाड्याने घेऊन मालवणला निघालो. पत्नीस विमान लागले होते, त्यात वाहन चालक अतिशय वेगाने, उलटसुलट वळणे घेत गाडी चालवत होता. उलटी थांबवण्यासाठी गोळया व पाण्याची बाटली पाहिजे होती. तर सर्व गोवा बंद. औषधाची दुकानेही बंद पण दारूची दुकाने मात्र चालू. शेवटी एका इस्पितळातील औषधाचे दुकान चालू होते. त्यांचे कॅन्टीनही चालू होते. मालवणला चहाही मिळेना. शेवटी एका ख्रिश्चन कुटुंबाने आमची चहाची व रात्रीच्या जेवणाची व्यवस्था केली. चंद्रदर्शनाच्या भीतीने संपूर्ण कोकणस्थ व गोवेकर, गणेशचतुर्थीच्या दिवशी दुपारी ३ वाजल्यापासून घरात कोंडून घेतात. मालवणी माणसाला विचारले तर तो मात्र नकार देईल. त्यांचे म्हणणे “आमच्या घरी गणपती असतो म्हणून आम्ही घराबाहेर पडत नाही.”

6-10-2014 ला ट्रेनने रत्नागिरीला उतरून पालीला मित्राबरोबर त्याच्या फार्महाऊसवर जाऊन आलो. त्याच्या झाडावरुन चिकू काढले. लांजा बाजारलाही जाऊन आलो. येताना सुट्टीचा शेवटचा दिवस असल्याने (४ दिवसांची सुट्टी) कुठल्याही बसमध्ये जागा मिळत नव्हती. शेवटी रत्नागिरीवरून जैन मंदीराजवळून राम नाक्यावरून अंबाभवानी टूर्स व त्रावेल्सच्या स्लीपरकोचने (माझा स्लीपर कोच बसचा पहिलं प्रवास!) मुंबईला परत आलो. गच्चीवरून चिकू काढताना! या वयात सुद्धा झाडावर चढून चिकू काढताना!

२४ ते २८ ऑक्टोबर २०१४ मध्ये थोरल्या भावाबरोबर व पुतणीबरोबर वायंगणीला जाऊन आलो. यावेळी वायंगणीवरून मालवणला जाताना एका बाईकवाल्याचा अपघात पाहिला. इथे कोणीच हेल्मेट घालत नाहीत. पुतणीबरोबर खूप गप्पा मारल्या. तिला गावाला राह्यला आवडते. मी कायमस्वरूपी इथे स्थायिक होऊ शकत नाही. मला मुंबईला असताना हिरवे कोकण, समुद्राची गाज, इथली शांतता खुणावते. आणि इथे आल्यावर मुंबईचे इंटरनेट, टी.व्ही., संगणक, मित्र खुणावतात. इथून पुण्याला इन सर्च आउटडोअर्सच्या व्होलुन्टीअर ट्रेनिंग प्रोग्राम (स्वयंसेवक प्रशिक्षण कार्यक्रमास) जाऊन मुंबईस गेलो. घरातील एका मांजराची सोफ्यावरची ठरलेली जागा होती. इथे दुसरे कोणी झोपलेले तिला आवडत नसे. गेले ६ महिने एका जागी झोपलेला बेडूक पाहिला.

1-3 नोव्हेंबर २०१४ ला काकी व २ चुलतभावांबरोबर काही खाजगी कारणास्तव मालवणला गेलो होतो. वायंगणीचा निर्मनुष्य किनारा! तेव्हा वायंगणीला दत्ताच्या देवळाचे दर्शन घेतले.

सतयेचे देऊळ किंवा वीरगळ!



आचरा बंदर आचऱ्याचे रामेश्वर दर्शन,

आचऱ्याची खाडी, तिवरांचे जंगल, आचऱ्याचा दीपस्तंभ, थोरल्या भावाची बोट दुरून, आंगणेवाडीचे भराडीचे देऊळ,

सातेरी देवतेचे देऊळ, कालावलीचा पूल, मालवणचा बाजार, 3 11 14 संध्याकाळी तारकर्लीचे वोटर स्पोर्ट्स दुरून पाहून आलो.

२०१४ साली 'मुंबई नेचर फोटोग्राफर्स मीटअप' नावाचा गट तयार केला. ७० लोक जमल्यावर त्याना घरी बोलावणे परवडणार नव्हते. म्हणून त्याना आरे कॉलोनीमध्ये, गोरेगाव पूर्व येथे बोलावले. फक्त १च व्यक्ती वाशीवरून आली व 2रा माझा छात्रभारतीचा मित्र! बस्स! दुसरा फोटोशूट कान्हेरीच्या गुंफांमध्ये (बोरीवली पूर्व) आयोजित केला. (९-११-१४) ५ लोक आणि एकाची लहान मुलगी आली पण त्यामध्ये पहिल्याचा समावेश नव्हता. त्यांच्यापैकी एकाने मोबाइलचा रिमोट कंट्रोलसारखा वापर करून कॅमेरा जमिनीवर ठेऊन आमचा सेल्फी काढला. चैत्यग्रुहातील स्तूप पाहिला. त्यानंतर वसईच्या किल्ल्यावर ७-१२-२०१४ ला गेलो. यावेळी १० जण होते. पण यातील ९ जण नवे होते.

एक माझा लहानपणीचा मित्र होता. आफ्रिकन बोआ झाड पाहिले. पोर्तुगीजांनी आणले. कोणीही याचा मृत्यू पाहिला नाही. माणसापेक्षा जास्त आयुष्य असते असे म्हणतात. १३-१२-१४ परत संजय गांधी राष्ट्रीय उद्यान-(बोरीवली पूर्व) यावेळी एकूण ४ सदस्य होते.– आधीचा एकही नाही. सोवेनियर विकणाऱ्या दुकानातून 1 पांढरा टी शर्ट विकत घेतला.

30 11 14 ला मुम्बई एक्स्प्रेस या ट्रेनने सकाळी 8 वाजता पुण्याला गेलो. ‘सुपरमाइण्ड’ प्रशिक्षण.

22 12 2014 रोजी पुण्याच्या ‘फास्टट्रॅक आंतरराष्ट्रीय’च्या इवेंटमध्ये माझा सत्कार करण्यात आला.

३०-१२ ते ३१-१२-२०१४ रोजी मित्रांबरोबर वायन्गनीला निघालो. दुपारी उशीरा गाडी टाटा सुमो दुरुस्त झाली. एक मित्र ग्यारेजकडेच आला होता. त्याला घेऊन ऐरोलीचा पूल गाठला. तिथे दुसरा जॉईन झाला. तिथून महाड गाठले. रात्रीचे १० वाजले होते. तिथे तिसरा त्याच्या चालकासह आला. चालकाला विशाखापट्टणमपर्यंत ट्रक चालवायचा अनुभव होता. वर्षअखेर असल्याने जागोजागी चेकिंग चालू होते. खेडला चेकिंग झाले. थोरला भाऊ सतत मोबाइलवरुन संपर्कात होता. त्याचे म्हणणे होते, “रात्रीच्या वेळी गाडी चालवल्यावर अपघात होण्याची शक्यता वाढते,” असे त्याचे म्हणणे होते. मी त्याला म्हणालो, “विशाखापट्टणमपर्यन्त ट्रक चालवणारा व्यावसायिक चालक गाडी चालवतोय.” यावर त्याचे उत्तर, “हेच लोक जास्त अपघात करतात.” तरी आम्ही गाडी दामटली. ‘गलती तो हर किसीसे होती है|’ पण रात्री ४ला घरी सुखरूप पोहोचलो. (नशिबाने असे म्हणणार होतो, पण माझा नशीबावर विश्वास नाही.) ३१-१२-२०१४ ला सकाळी मालवणला जाऊन गावठी कोंबडा (ब्रोईलर कोंबड्याला इंजेक्शन देतात असे महाडचा मित्र म्हणाला) घेऊन आलो. आमचे केअर टेकर श्री. रमेश यांच्या पत्नीकडे बनवावयास दिला. 31 12 14 गावठी कोंबडा पार्टी केली. रात्री किनाऱ्यावर फिरावयास गेलो. अख्ख्या किनाऱ्यावर फक्त आम्हीच! सकाळी मुंबईच्या दिशेने प्रयाण! १ जानेवारी २०१५ ला महाडमार्गे परत मुंबई!

2014- 15 पुण्याला प्रत्येक रविवारी इनसर्च आउटडोर प्रशिक्षणासाठी गेलो. (सकाळी 5- 5.30) ची शिवनेरी पकडून. ४-१-२०१५ ला रात्री 12.30 वाजता हिरकणी बस पकडुन 4 वाजता चांदणी चौकला उतरलो. परत रिक्शा पकडून स्वारगेटला प्रातर्विधी करायला गेलो. रिक्शावाला म्हणतो, ‘दिल्ली दिलवालोंकी! बम्बई पैसेवालोंकी!!’, परत चांदणी चौक. तिथे संस्थेची लोक, इतर सहाध्यायी, स्वत:च्या गाड्या घेउन आले. इनसर्च आउट्डोअर्सबरोबर पाषाण लेक, पुण्याला जाऊन आलो. काही पाणपक्षी बघितले. एका सहाध्यायीने परत ब्रेमन चौकला सोडले. तिथुन परत स्वारगेट! दुपारी 2.30 वाजताची शिवनेरी पकडुन मुम्बई! 10 1 2015 रोजी मालवणवरुन पुण्याला इनसर्च आऊट्डोअर्सच्या प्रशिक्षणासाठी गेलो. तिथुन मुम्बई व परत जगदम्बा टुर्स आणि त्र्यॅव्हेल्स्ची बस पकडुन 13 1 2015 ला मालवण गाठले. 8 2 15 रोजी 5.30 वाजताची शिवनेरी पकडुन बोरिवली नॅन्सी कोलॉनीतुन स्वारगेटला गेलो. इनसर्च आउटडोअरचे व्याख्यान ऐकल्यावर दुपारी 3 वाजताची हिरकणी पकडुन बोरिवलीला परत! 8 3 15 ला पुण्यावरुन डेक्कन एक्स्प्रेस पकडुन मुम्बईला परत. 15 3 15 ला नॅन्सी कॉलॉनी, बोरिवली पुर्वेवरुन शिवनेरी पकडुन 5.30 वाजता इनसर्च आऊट्डोअरच्या प्रशिक्षणासाठी स्वारगेट पुण्याला गेलो. 2 वाजता त्याच मार्गे परत. 22 3 15 ला सकाळी 5.30 वाजता शिवनेरी पकडुन वरीलप्रमाणे! 5 4 15 रोजी शिवनेरीने सकाळी 10 वाजता निघुन डेक्कन जिमखान्याला उतरलो. प्रकल्प सादर करुन नीता राजेंद्र ट्रॅव्हेल्सच्या बसने बोरिवली गाठली. 14 4 15ला सकाळी 10.30 वाजता शिवनेरीने नॅन्सी कॉलॉनी, बोरिवली पुर्वेतुन निघुन पुण्याला स्वारगेटला गेलो.

१ २०१५ ला मावसभाऊ व मावशीला घेऊन वायंगणीला गावी टाटा इंडिका घेऊन गेलो. मुक्काम मामाचे शेजारी, त्चिंदरकरांच्या घरी व थोरल्या भावाच्या घरी! गाडीची चावी आतच (गाडीतच) राहिली व दरवाजा बंद! थोरल्या भावाने गाडीची छोटी काच फोडून ती चावी बाहेर काढली. २ऱ्या मावशीला घेऊन परत येताना, कोल्हापूरला गाडी पंक्चर झाली. स्टेफनी काढण्यासाठी डिकीतील आमचे सर्व सामान, 2ऱ्या मावशीचे नारळ, गावठी तांदूळ सर्व काढावे लागले. कोणत्याही हॉटेलमध्ये थांबलो तर गाडी दिसेल असे बसावे लागायचे. काच उघढी ना! 16 तासांचा प्रवास! मावसभावाला विक्रोळीला सोडले. घरी आल्यानंतर मावशीचा आग्रह होता की तिचे नारळ घेऊन मी 4 मजले चढून (लिफ्ट नाही) वर घरी जावे. [आधीच 16 तास गाडी चालवून मी थकलो होतो.] माझ्या चुलतभावाने तिला सांगितले की तो नारळ त्याच्या मारुती वॅन मध्ये ठेवेल. मावशी खुश! नारळ सुरक्षित राहतील म्हणून! तिला हे माहीत नव्हते की चुलतभावाच्या गाडीचा दरवाजा सहज बाहेरून उघडत होता, पण दुसऱ्या दिवसापर्यंत नारळ सुरक्षित राहिले.

२६-१-२०१५ ला मित्राबरोबर एशियाडने पुण्याला गेलो. स्वारगेटला उतरून सहकार नगरपर्यंत रिक्षा केली. आम्हाला पंडीत भीमसेन जोशी आर्ट ग्यालरीला जायचे होते. रिक्षा सोडून चालत निघालो. पुणेकराना विचारल्यावर, त्यांनी सवयीप्रमाणे उलटसुलट फिरवले. शेवटी जिथे सुरुवात केली होती तिथे पोहोचल्यावर एका बागेत ही ग्यालरी सापडली. तिथे इनसर्च आउट्डोअर्सचे ‘वाइल्ड क्लिक्स’ नावाचे छायाचित्रांचे प्रदर्शन लागले होते. बाहेर हत्तींच्या पुतळ्याशेजारी आमचे फोटोसेशन (एकमेकांचे दगडी हत्तीशेजारी फोटो काढणे) झाल्यावर जेवणाच्या शोधात (जिथे शाकाहारी व मांसाहारी

ेल) चालत चालत स्वारगेट गाठले व शेवटी स्वारगेटसमोरील एका इराणी प्रकारचे पण इराणी नव्हे अशा रेस्तोरंट मध्ये जेवलो. स्वारगेटला पोहोचलो तर एकही बस रिकामी बोरिवलीसाठी नव्हती. सर्व आरक्षित! शेवटी भ न (उभ्याने) पुणे स्टेशन गाठले. पुणे स्टेशनच्य परिस्थिती! बाहेर जाऊन टयाक्सीची चौकशी केली तर आज त्यांचे भाव गगनाला भिडलेले! शेवटी एसी (शिवनेरी)च्या रांगेत मोजून साडेतीन तास उभे राहिल्यावर (एक मिनिटही कमी नाही) आम्हाला ७ वाजता शिवनेरी मिळाली. (तेवढ्यात चालत मुंबई गाठली असती) आमची बस टोल प्लाझाला पोहोचल्यावर भरपूर दिवसाची इच्छा पूर्ण करण्यासाठी फ्रेंच टोस्ट (अंड्याच्या बलकात बुडवलेला पाव)

खायला गेलो. १५ मिनिटे उशीर झाला. बसचालक शिव्या घालत होता. (ओरडत होता.) रात्री १२ साडेबाराच्या सुमारास बोरिवलीला न्यांसी एस.टी. स्थानकावर पोहोचलो. कुत्र्यांच्या भीतीने घरी चालत जायची हिमत नव्हती. रिक्षाही मिळत नव्हती. शेवटी चुलतभावाला स्कूटी घेऊन बोलावले. तोही म्हणाला, “काय एवढी हौस होती?”

भिगवण- मयुरेश्वर अभयारण्य- ३१-१-२०१५ ला माझी कार घेऊन चालवत पुण्याला निघालो. जाताना एक्स्प्रेस्स हायवे लागला व लक्षात आले की गाडीतील पेट्रोल रिझर्वला लागले आहे. पहिला टोलप्लाझाला मी उजव्या लेनला असल्याने पेट्रोल पंपावर जाऊ शकलो नाही. आता लोणावळयाला उतरून पेट्रोल भरून परत येताना परत टोल भरावा लागतो का ते माहित नाही. हे १ टेन्शन व त्यात दुसऱ्या टोल नाक्यावर खिशातली पावती दाखवण्यासाठी काढण्याच्या भरात समोर उभ्या असलेल्या गाडीवर आपटलो. त्या गाडीला मागच्या बाजूला टायर असल्याने तिला काही झाले नाही. तरी ते चौघे मला मारायला आले. मी गाडीतून बाहेर पडलोच नाही. मग त्यांनी माझ्याकडे माझा नंबर मागितला. मी त्याना माझे व्हिजिटिंग कार्ड (प्रत्यक्षात ते माझे कार्ड नव्हतेच! ते दुसऱ्याचे होते. त्यांनी त्याच्यावरील पदव्या बघितल्या व अजून बडबडले. एवढा सुशिक्षित माणूस आणि असा वागतो?) दिले. मला शिव्या घालत ते निघून गेले. मग त्यापुढे मी पेट्रोल भरून थोडेसे खाऊन, चहा पिऊन पुण्याला साडू बंधूंकडे गेलो. साडू बंधूंनी गाडी पार्क करताना दरवाजाची काच एवढया जोराने बंद केली की ती बिघडली. आता रात्रभर काच उघडीच! पहाटे ४ साडेचारला १- २- २०१५ ला सिद्धी गार्डनसमोर, साडू बंधु मला सोडून, ते परत गाडी घेऊन घरी गेले. 'इनसर्च आउट्डोअर' या संस्थेने ३५ सीटरची व्यवस्था केली होती. वाटेत प्रथम नाश्ता करून 'अग्निपंख' या गटाबरोबर बोटीने भिगवण धरणाकडे (उज्जनी जलाशय- पुणे सोलापूर रस्ता) गेलो. अग्नीपंखवाले पक्ष्यांसाठी हवेत अन्न भिरकावयाचे. ते खायला पाणपक्षी जमायचे. हे सर्व बघून झाल्यावर, परत किनाऱ्याला येऊन जेवल्यावर आमचा ओरिएन्टेशन प्रोग्राम झाला. तिथून परत येताना मध्येच उतरून आम्हाला एका पाणथळ जागेकडे (मार्शी ल्यांड) कवडीपाटला नेले. तिथे अजून पक्षी पाहिले.

नंतर मयुरेश्वर अभयारण्यात गेलो. चिंकारा पाहिले. नंतर एका जागी उतरून त्यांनी दगडाखाली विन्चवांचा शोध घेतला, सापडले नाहीत. गेको सापडला. पकडून आम्हाला दाखवला व सोडून दिला. पक्षी, चिंकारा बघण्यासाठी मनोरा आहे. तिथून लांबवर एक ससाणा रूस्टिंग (संध्याकाळची वेळ) करताना दिसला. चहा पिऊन पुण्याला परत आलो. रात्री वाटेतच हडपसरला बस पकडून पुणे रेल्वे स्थानकावरून येरवड्याला साडू बंधूंच्या घरी गेलो. दुसऱ्या दिवशी सकाळी फक्त एका फूड प्लाझाला थांबलो. गाडीची काच उघडीच! ब्याग पाठीवर घेऊनच खायला बाहेर पडलो. मग परत गाडीत बसून मुंबईपर्यंत चालवत आणून तिसऱ्या दिवशी गाडीची काच दुरुस्त करून घेतली. (२-२-२०१५)

९ फेब्रुवारी ते १३ फेब्रुवारी २०१५– मी व माझा मित्र आमच्या लहानपणीच्या गोव्याच्या मित्राला भेटायला ट्रेनने गेलो. त्याने करमाळी स्टेशनवर त्याची कार आणली होती. त्याने आपल्या घरी पणजीला, गोवा 403001 येथे राहायला नेले. सकाळी बोंडला फोरेस्टचे बुकिंग करून, दक्षिण गोव्यात घेऊन गेला. आम्हाला चर्चेस व देवळे बघण्यात रस नव्हता. फेरी बोटीवर गाडी चढवून, पलीकडे जाऊन आम्ही एका हॉटेलात जेवलो.

संध्याकाळी मांडवी नदीतील त्याच्या क्रुझवर, (प्याराडाईझ क्रुझ, इथे त्याचा 'पॅटसोन कॅटेररस आणि कंसलटन्ट्स' नावाचा एक छोटासा फास्ट खाद्यपदार्थान्चा स्टोल होता) तो आम्हाला घेऊन गेला. तिथे पोर्तुगीज, कोळी व पाश्चिमात्य अशी ३ लोकनृत्ये पाहिली. प्रत्येक लोकनृत्यानंतर

उपस्थिताना मंचावर बोलावून नाचण्याची संधी दिली गेली. आधी मुले, त्यानंतर जोडपी आणि नंतर पुरुषांना मंचावर नाचण्याचा आनंद दिला गेला. दुसऱ्या दिवशी सकाळी बोंडला फोरेस्टला प्रयाण केले. त्यादिवशी दुपारी त्यांचे प्राणीसंग्रहालय बघितले. डुक्कर, कासव, झू बाहेरील सरडा! संध्याकाळी तेथील धारबांदोड्याचा शिमगोत्सव पाहीला. वेगवेगळ्या गावाचे चित्ररथ, त्याच्यासमोर नाचणारे स्थानिक कलाकार, वेगवेगळ्या वेशभूषा घालून फिरणारी स्थानिक मंडळी असा तो स्पर्धात्मक सण असतो. दुसऱ्या दिवशी सकाळी मी व माझा मुंबईचा मित्र तेथील एका स्थानिक माणसाबरोबर (फोरेस्ट गार्ड) जंगलात फिरावयास गेलो. त्याने विचारले की, "कमी अंतराच्या रस्त्याने जाउया की जास्त अंतराच्या रस्त्याने?" माझा मित्र म्हणाला की "अर्थातच! कमी अंतराच्या रस्त्याने". बर्ड वॉचिंग साईटवर गेलो. वाटेत वेगवेगळ्या पक्ष्यांची किलबिल ऐकावयास येत होती. मार्गदर्शक सांगत होता की, तो छोटा पक्षी आहे. त्याला नाव वैगेरे काही माहीत नव्हते. (सर्व पक्ष्यांना तो एकाच नाव सांगत होता.) त्याला फक्त जंगलात जाणारी व

येणारी पायवाट माहिती होती. वाटेत ‘विडो’ कोळयाची जाळी दिसली. येताना एक राखाडी धनेश पक्षी दिसला. आल्यानंतर सांगतो की “आपण जर लांबच्या वाटेने गेलो असतो तर आपल्याला गवे दिसले असते.” आम्ही म्हणालो की, “आधी सांगितले असते तर आम्ही लांबच्या वाटेने गेलो असतो.” माझा गोव्याचा मित्र म्हणाला की तो व त्याची पत्नी चहा प्यायला जवळपास गेली असता त्यांना गवा दिसला. त्या दिवशी संध्याकाळी परत पणजीला गेलो. दुसऱ्या दिवशी पहाटे मी जोग्गीन्गला जाऊन आलो. तेव्हा झोपलेले पणजी पाहिले. सकाळी फक्त चहावाले उठलेले असतात. तिथे नाश्त्याला पावाचे वेगवेगळे प्रकार असतात. चपाती, भाकरी कोणी खात नाही. क्रुझच्या स्टोलवर ‘स्यांडविचेस’ पोहोचवून आम्ही गोव्याच्या दुसऱ्या टोकाला तांबडीसुर्लाला एक महादेवाचे देऊळ पाहावयास गेलो. याचे वैशिष्ट्य असे की हे अग्निजन्य खडकाचे बनवलेले आहे.. संध्याकाळी समुद्रकिनाऱ्यावर गेलो. भरपूर वनवे व नो एन्ट्र्या आहेत. कुठेही फलक नाहीत. बाहेरच्याला काहीही कळणार नाही व आयता वाहतूक पोलिसांच्या तावडीत सापडणार. रात्री हॉटेलात जेवल्यावर आईस्क्रीम खायला गेलो. इथे ओला कचरा व सुका कचरा वेगवेगळा ठेवावाच लागतो, नाहीतर दंड आहे. दिल्लीकराना वाटते, की इथल्या स्थानिक स्त्रिया पाश्चात्य संस्कृतीच्या अधीन आहेत, (आपल्याला सहज उपलब्ध आहेत.) म्हणून ते क्लबमध्ये त्यांची छेड काढावयास जातात व स्थानिकांशी रोज भांडणे करतात. इथले पेट्रोलपंपवाले, स्थानिकांना वेगळा दर लावतात व बाहेरच्या राज्यांना वेगळा! जर तुम्ही महाराष्ट्रात नोंदवलेली गाडी घेऊन पेट्रोल भरावयास गेलात तर ‘कोकणी’त, तुम्ही स्थानिक आहात असे सांगावयास लागते. आम्ही ट्रेनने मुंबईस परत आलो.

गोल्डन प्यागोडा, गोराई- १९-२-२०१५ ला एस्सेलवर्ल्डसाठी जाणाऱ्या गोराई खाडीवरून सुटणाऱ्या बोटीने गोल्डन प्यागोडाला माझे कुटुंब व मावस मेहुणीचे कुटुंब जाऊन आलो. दर्शकांमध्ये बौद्ध धर्मीय (भारतीय व पौर्वात्य देशातील) यांचा भरणा जास्त होता. इतराना एस्सेलवर्ल्ड (माझी सुद्धा माझ्या कुटुंबियांच्या आग्रहाने, एकदा प्रेस मधील एका मित्राने पास दिल्याने, ज्यात मी, मी ज्या शाळेतील सहकारी आणि छात्रभारतीतील एक मित्र, जाऊन आलो होतो, पण मला त्या उंच व वेगात फिरणाया राईडसची भीती वाटते, ऑक्टोपसवाल्या राइड मध्ये चक्कर येते पण तो सहकारी आणी माझा मुलगा बिनधास्त राईडसवर बसतात.) व वोटर किंगडममध्येच (एकदा कुटुंबियांबरोबर इथेपण जाऊन आलोय.) जास्त इंटरेस्ट होता. आतमध्ये भलेमोठे विपश्यना केंद्र आहे.

३ ४ २०१५ ला सकाळी पुण्याच्या इनसर्च आउट्डोअरच्या कार्यकर्ता प्रशिक्षण कार्यक्रम २०१४ अंतर्गत प्रकल्प सादर करण्यासाठी गोराई खाडीजवळील खारफुटी जंगल पाहावयास गेलो होतो. मनातून मडस्कीपर्स शोधायचे होते पण जेव्हा पाहिजे तेव्हा सापडतील तर ते प्रथम उभयचर कसले? नंतर थोरल्या भावाच्या सासऱ्यांच्या श्राद्धकर्मासाठी भाईंदर खाडीवर गेलो तेव्हा हे मडस्कीपर्स सापडले पण तेव्हा गरज नव्हती व योग्य वेळही

नव्हती!

१७ एप्रिल ते २८ एप्रिल २०१५- खाजगी कामासाठी, मी व चुलतभाऊ मालवणला गेलो. चिवल्याची येळ! घरात बेडूक (एप्रिल महिन्यात जागा होता?) 20 5 15 मी एकटाच त्याची होंडा याकटीव्हा घेऊन संध्याकाळी तोंडवळीला गेलो. रस्त्याची कामे चालू होती. मावसमेहुणीच्या आत्येकडे, मावसमेहुणीकडे गेलो. मावसमेहुणीच्या आत्येभावाने तिथे रिसोर्ट बांधले आहे ते बघितले. परत मालवणला जायला निघालो, तर रस्त्याचे डांबरीकरणाचे काम चालू होते. रात्र व्हायला आलेली. चुलतभावाने सांगितले होते की अंधार पडायच्या आत परत ये. डांबरीकरणाचे काम लवकर होण्याची चिन्हे दिसेनात. माझ्याबरोबर इतरही दुचाकी, तिचाकी, चारचाक्या गाड्या उभ्या होत्या. एक चारचाकी गाडी निघून गेली. १-२ दुचाक्याही निघाल्या. कामगार ‘वडारी’ भाषेत आम्हाला पुढे जाऊ नका म्हणून सांगत होते. मला त्या स्त्रिया काय सांगताहेत ते कळेना. मी डेअरिंग करून गाडी घातली. चाकात डांबरी खडे अडकून गाडी बंद पडली. पुढेही सरकेना, मागेही जाईना. डांबरात अडकली. कामगारांचे काम संपवण्याची घाई असल्याने, तेही मदतीला येईनात. शेवटी स्थानिक मदतीला आले व गाडी उचलून बाजूला घेतली. तेवढ्यात ‘मावसमेहुणीचा आत्येभाऊ’ही आला. विजेरीच्या प्रकाशात गाडीच्या चाकात अडकलेले मोठे खडे काढले, तेव्हा गाडी हलली. पण चालू होईना. शेवटी धक्का मारत परत त्याच्या घराकडे (मधल्या तोंडवळीत) आणली. शेवटी रात्री त्याच्याकडेच मुक्काम टाकला. रात्री कोंबडा खाला. सकाळी भाच्यांना घेऊन डांबरीकरण सुरु व्हायच्या आत मालवण गाठले. वाटेत ‘फाटक्या वडा’जवळ मोर पाहिला. लहानपणी या झाडाकडे जायला वायंगणीहून अख्खा डोंगर चढून पायी जावे लागायचे. आता रस्ता बाजूने

जातो. मेहुणी व सासू रिक्षाने मालवणला आले. तिथून टाटा इंडिका घेऊन पेडण्याला भगवती देवीकडे गेलो. येताना आरोन्द्यास, आरवलीच्या वेतोबाचे दर्शन घेऊन शिरोडामार्गे वेंगुर्ल्याच्या उभ्या दांड्यावर सासूच्या शेजा-यांच्या घरात जाऊन सागरी मार्गाने मालवणला आलो. त्या एवढुश्या रस्त्याला महामार्ग नाव दिलेय. येताना भविष्यातला चीपीचा विमानतळ पाहिला. रात्री मेहुणी, सासू व भाचे मालवणला राहिले. दुसऱ्या दिवशी सकाळी त्याना तोंडवळी फाट्याजवळ सोडले. तिथून ते भगवंतगडहून येणारी एस.टी. पकडणार होते. डांबरीकरणामुळे रिक्षा बंद होत्या. मी त्याना सोडून आचऱ्याला जाऊन पेट्रोल भरले, चाकातली हवा तपासली, नाश्ता केला व परत आलो. बघतो तर काय? अजून एस.टी. आली नव्हती. माझी गाडी घेऊन तोंडवळीला जायची तयारी नव्हती. (परवाचा डांबरीकरणाचा अनुभव!) परत अडकून पडलो तर काय घ्या? शेवटी एस.टी. आली. ते बसले. मी मालवणला गेलो. 28 4 15 तोंडवळी अना हडकरचे resort! नंतर माझा दुसरा चुलतभाऊ मालवणला आला. 1-2 5 15ला वाइंगणीला मुक्काम! ३ मे २०१५ ला त्यांच्याबरोबर (२ भावांबरोबर) परत पेडण्याला गेलो. शिरोड्याला मावसआजीच्या नातवाच्या लग्नास हजर राहिलो. येताना वेतोबाला जाऊन कर्लीच्या पुलावरून परत आलो. तिथून मालवणचा धक्का गाठला. रोज रात्री जेवल्यावर कुल्फी खाल्ली. 21 5 15ला मालवणच्या दारासमोर बेडूक पाहिला. सिंधुदुर्ग किल्ला- हा किल्ला फक्त एकाच शत्रूपासून असंरक्षित आहे, तो म्हणजे प्लास्टिक! तिथून करली नदीच्या पुलावर गेलो.

कोहोज किल्ला ट्रेक:- (२४/४/२०१५) इतराना जर या ट्रेकला घेऊन जायचे असेल तर आधी आपण हा ट्रेक करायला हवा म्हणून सर्चिंग आउट्डोअरच्या ३ सदस्यांनी म्हणजे मी, बब्बी व वेन्काने कोहोज किल्ल्याला जायचे ठरवले. बब्बी अंधेरीला राहायला. वेंका मुलुंडला. वेन्काला म्हटले की तू कल्याणला जा व तिथून एस.टी. पकडून कोहोजच्या पायथ्याशी उतार. (वाड्याच्या पुढचा थांबा). मी व बब्बी पालघरवरून येतो. पण बब्बी ऐकायला तयार नव्हता. त्याने त्याला दादरवरून येऊन आम्हाला भेटायला सांगितले. चुकामुक झाली तर? शेवटी आम्हाला पालघरला पोहोचायला १० वाजले. मार्गदर्शनपर वृत्तपत्रीय लेखांत असे म्हटले होते की पालघर स्टेशनवरून तिथपर्यंत जाण्यासाठी एस.टी. मिळते म्हणून! पूर्वेला उतरल्यावर कळले की सर्वकाही पश्चिमेला आहे. तिथे एस.टी. स्थानक कोणी दाखवेना! शेवटी रिक्शावाल्याना विचारले तर ते म्हणाले ६ सीटर मनोर फाट्यापर्यंत जाते, तिथून २री वाहने मिळतात. इतराना म्हणालो, मनोर फाट्यावरून काही मिळाले नाही तर ‘मामाचा गाव’ रिसोर्टला जाऊन येऊ. चांगले जेवण तरी मिळेल. पण मनोर फाट्यावरून त्या गावाला जायला एस.टी. मिळाली. तिथे पोहोचेपर्यंत ११ वाजून गेले होते. पलीकडे १ बंद शाळेसारखी इमारत होती. तिथे चौकशी केल्यावर कळले की तेथील व्यक्ती जेवण पुरवते पण त्या दिवशी सुट्टी होती. त्या इमारती शेजारूनच रस्ता वर जात होता. तिथून पुढे गेल्यावर २ फाटे फुटत होते. काही व्यक्ती डावीकडच्या बाजूला जात होत्या. आम्ही प्रथम डावीकडे जाऊ लागलो, तेवढ्यात उजवीकडून एका व्यक्तीने हात दाखवला. जवळ गेल्यावर त्याने सांगितले, तुम्ही चुकीच्या रस्त्याने जात होता. तो कधीचा हाक मारत होता पण आम्हाला ऐकायला येत नव्हते. शेवटी त्याने आम्हाला एका तलावाजवळ

आणून सोडले. मागे १ मुलगा कोठून पडला, त्याची समाधी कोठे आहे ती दिशा दाखवली. म्हणजे कुठे जाऊ नका ते सांगितले. तिथे १ गाववाल्या तरुण मुलांचे टोळके बसले होते. त्यांच्याकडे जात म्हणाला, एवढ्या उशीरा तुम्हाला 'गाईड' मिळणार नाही. शनिवारी- रविवारी लहान मुले सकाळी रस्ता दाखवायला येतात. आज गुरुवार होता व दुपार झाली होती. आम्ही तिघेही ४७-४९ वयाच्या दरम्यान होतो. त्याने आम्हाला सांगितले की तलावाच्या बाजूच्या रस्त्याने पुढे जा व पुढून रस्ता आहे. आम्हाला काही तो रस्ता सापडला नाही व आम्ही तलावाला वळसा घालून वर गेलो. १ वाजल्यानंतर आम्ही एका अवघड जागी पोहोचलो की जिथून वर चढायला काहीच मार्ग नव्हता. आता परत खाली उतरावे हे उत्तम! माझ्याकडे 'सामी डायरेक्ट' कंपनीचा मिल्कशेक होता. तो तिघाना वाटला. बब्बीने आंबा आणला होता, तो कापून वाटला. वाटेत भजी घेतली होती ती खाल्ली. लिंबाचा रस बनवून प्यालो. आमच्याकडचे पाणी संपले. आता फक्त बब्बीकडे पाण्याची बाटली शिल्लक होती. खाली उतरणार तेव्हढ्यात शेवटचा प्रयत्न म्हणून वर जाऊन बघितले तर रस्ता सापडला. त्या माणसाच्या सल्ल्यानुसार किल्ला डावीकडे असायला पाहिजे होता. चालत चालत चढत चढत एका सुकलेल्या ओढ्याच्या बाजूला येऊन पोहोचलो व त्याच्या मुळ स्थानाकडे जात होतो. माझा व बब्बीचा जुना अनुभव (भीमाशंकर) सांगत होता की जसजसे आपण वर जाऊ तसा रस्ता अजून अवघड बनत जाणार. बब्बी म्हणत होता, परत जाउया पण आम्ही ऐकायला तयार नव्हतो. शेवटी एक आडवी जाणारी पायवाट दिसली. डावीकडची वाट पकडली. ओढा (सुकलेला) पार केला व आम्हाला दगडावर रंगवलेले बाण दिसले. बब्बी म्हणाला "चला, आता खाली जाऊ" पण आमची जुनी 'जिद्द', आम्हाला सोडायला तयार नव्हती.

वर डोंगराचे टोक दिसत होते. त्याच्यापलीकडे किल्ला असणार. बब्बीला आता चालायची सवय राहिली नव्हती. याच्या उलट वेंका रोज त्याच्या कॉलोनीत २ तास जोग्गिंग करत होता. शेवटी बब्बी थकला व म्हणाला " मी थांबतो. तुम्ही जाऊन या. तोपर्यंत मी तुमची वाट बघतो." वर चढल्यावर वाट अजून अवघड बनत गेली. माझ्या पायांत गोळे यायला लागले होते. दुपारचे ऊन रणरणत होते. पाण्याची एकुलती एक बाटली बब्बीकडेच राहिली होती. एकदाचा तो डोंगर चढलो. बघतो तर काय, अजून तेव्हढाच डोंगर चढायचा बाकी होता. आता मात्र माझी सहनशक्ती संपली. मी वेन्काला म्हटले "परत जाउया". जिथे बब्बीला सोडले तिथे उतरून बघतो तर बब्बीचा पत्ताच नाही. बब्बी परत खाली उतरायलाही लागला होता. आता हा सापडला नाही तर! ताण यायला लागला! खाली उतरल्यावर उजव्या बाजूला १ डबक्यासारखे पाणी होते. तिथून बब्बीला फोन लावला. बब्बी अजूनही मागेच होता. आम्ही त्याला ओलांडून पुढे आलो होतो. तो कुठेतरी भलत्या जागी आमची वाट पहात थांबला होता. त्याला पुढे यायला सांगितले. हा पठ्या परत दुसऱ्या रस्त्याला लागला. त्याला म्हटले, " परत थोडा वर ये, डावीकडे वळ. परत डावीकडे वळ. आम्ही वाट बघतोय!" तर तो म्हणतो "मी खाली जातो. तुम्ही पण खाली या. आपण खाली भेटू." त्याला म्हटले दुपारचे ४ वाजून गेलेत. संध्याकाळ झाली, अंधार पडला आणि या खालच्या जंगलात हरवलो तर परत आपण सापडणार नाही. तेव्हा एकत्र राहूया." शेवटी आला. त्याच्याकडे असलेली पाण्याची बाटलीही संपवली. खाली तळ्यातले माती तरंगत असलेले पाणी प्यालो. आता चालवत नव्हते. पायाची नखे कापली नसल्याचा त्रास बुटानतून जाणवायला लागला होता. सकाळच्या इमारतीपर्यंत पोहोचलो. पाणी प्यालो. रस्ता दाखवणाऱ्याचे आभार मानले. त्याचा

भ्रमणध्वनी क्रमांक घेतला. (आता तोही हरवलाय!) तेवढ्यात आमची एस.टी. आली. वेंका कल्याणची एस.टी. पकडून गेला. मी व बब्बी पालघरच्या एस.टी.त चढलो. एस.टी. स्थानक येईपर्यंत ठार झोपून गेलो होतो. पालघरला उतरून एका काहीच मिळत नसणाऱ्या हॉटेलमध्ये (राइस plate? नाही, चपाती भाजी? नाही. दाल राइस? नाही.) आमलेटपाव खाल्ला. चहा प्यालो व विरारला जाणारी ट्रेन पकडून व विरारवरून दुसरी लोकल ट्रेन पकडून बोरिवलीला आलो. बब्बी अंधेरीला गेला. कोहोजच्या किल्ल्याकडे जाताना प्रथम 1 तलाव लागतो. त्याला वळसा घालून ट्रेकची सुरुवात करावी. तिकडे सफेद रंगाने खुणा केलेल्या आहेत, त्या शोधाव्यात अन्यथा आमच्यासारखे चुकावयास होईल.

12 6 15 रोजी राजेश म्हात्रे सरांच्या नायगावच्या बंगल्यावर जाऊन आलो. (भविष्यकाळातील सहल स्थळ बघण्यासाठी)

18-7- 2015 रोजी डेक्कन एक्स्प्रेसने सकाळी 7 वाजता निघुन पुण्याला गेलो. पुण्याच्या इनसर्च आउट्डोअर्सबरोबर ताम्हिणी घाटात गेलो. जाताना एका हॉटेलात थांबून ओरिएन्टेशन कार्यक्रम झाला. रात्री आम्ही प्रथम गेको पाहिले. तज्ञांनी पकडून दाखवले. रात्रीचे पतंग, बेडूक, टोड, खोडात लपलेले टोड, भिंतीवरील बेडूक, डराव- डराव करणारे बेडूक, क्रिकेट बेडूक, दिवड साप दाखवले, हाताळायला दिले. क्याट स्नेक, बुल फ्रॉग (नर बेडूक) झाडीतून, ओढ्यातून पकडून दाखवले. ओढ्याला एवढी गती होती की कमरेभर पाण्यातून आम्ही एकमेकांचा हात धरून चालत होतो, नाहीतर वाहून गेलो असतो. रात्री एका घरात मस्त जेवणाची व्यवस्था केली होती. १९-७-२०१५ ला मध्यरात्रीनंतर २ वाजता, एका जागी उतरून, घनदाट अंधार, फक्त गाडीचा प्रकाश, आम्हाला त्यांच्याकडे असलेले, हवेसाठी छिद्र असलेल्या प्ल्यास्टीकच्या बरणीतील २ बिनविषारी व एक विषारी (रस्सेल्स व्हायपर) साप रस्त्यावर सोडून दाखवले व परत पकडून बरणीत ठेवले. त्यांचे फोटो काढू दिले. माझ्याकडच्या कॅमेरा मध्ये अंधारात फोटो काढायची यंत्रणा नव्हती, व मोबाइल डेड! प्रचंड थंडी! रात्री साडेतीन वाजता आम्हाला सिद्धी गार्डन, पुणे येथे सोडण्यात आले. इतरांकडे वाहने होती. फक्त मी व माझी सहकारीण (वय ४०-४५) (इनसर्च आउट्डोअर्सची व्होलन्टिअर ट्रेनिंग प्रोग्रामची माझी सहविद्यार्थिनी- २०१४ची ब्याच) आमच्याकडे कोणतेही वाहन नव्हते. एकही रिक्षा यायला तयार नव्हती. मग आम्ही चालत निघालो. भर रात्री मी व ती पुण्याच्या रस्त्यावर गप्पा मारत चालत होतो. माझ्या मोबाईलची ब्याटरी संपली होती. (चार्जिंग उतरले होते.) मध्यंतरी एक कुत्रा आमच्या दिशेने धावत आला. मग अचानक त्याला काय झाले, माहित नाही, बाजूला फिरत शेपटी हलवायला लागला. रस्त्यावर चिटपाखरूदेखील नव्हते.

नंतर काही वेळाने एक रिक्षा मिळाली, जिने मला स्वारगेटला व तिला तिच्या घरी स्वारगेटच्या 1 स्टॉप पुढे! (पुण्याला) सोडले. मला रात्रीची कर्नाटक-मुंबई एशियाड मिळाली जिने मी पहाटे मुंबईत घरी परतलो. (संपूर्ण रात्र जागून काढली होती.)

कास पठार:- 19 9 15 सातारा – सकाळी माझ्या टाटा इंडिका कारने निघालो. बब्बी माझ्या घरी आला होता. माझा मुलगाही सोबत होता. तिथून आम्ही ठाण्याला वृंदावन सोसायटीत गेलो. तिथे माझ्या लहानपणीच्या २ऱ्या मित्राचे घर होते. हा सध्या अमेरिकेत स्थायिक आहे. साताऱ्याला पोहोचण्याच्या आधी एका हॉटेलात जेवणासाठी वळलो. गाडी पार्क करणार तेव्हढ्यात माझा मुलगा म्हणाला, "इथे मी येऊन गेलोय. हे फार महाग हॉटेल आहे." परत मागे वळवणार, तेव्हढ्यात गाडी बंद पडली. चालूच होईना. धक्का स्टार्टही नाही. ब्याटरी नक्कीच उतरली नव्हती. हिटर देऊन पाहिला. नो स्टार्ट. शेवटी उतरून तिथेच जेवायला गेलो. हॉटेल मालकाला विचारले, जवळपास कोणी इलेक्ट्रिशिअन कम मेकानिक आहे का? त्याने साताऱ्यावरून एकाला बोलावले. त्याने आमच्या ब्याटरीला व स्टार्टरला एक वायर जोडली आणि म्हणाला. "आता वायर काढेपर्यंत गाडी बंद पडणार नाही." त्याने त्याच्या ग्यारेजला गाडी नेली. उजव्या बाजूच्या प्यानेलला गंज लागला होता. दुरुस्त केल्यावर फक्त २०० रुपये घेतले. मुंबईकर असता तर लुटले असते आम्हाला! मग माझ्या मित्रानेच बक्षिशी म्हणून १०० रुपये दिले. त्याचे ग्यारेज कासच्या वाटेवरच होते. त्याने कल्पना दिली होती की वर थंडी आहे म्हणून! पण आम्ही गांभीर्याने नाही घेतले! वर एवढी थंडी की विचारू नका. माझ्या अंगावर पावसाळी विंड चीटर (विंड शिटर नव्हे) होते, पण त्याचा काही उपयोग नव्हता. कास पठार दर्शन बंद झाले होते. आम्ही तिथेच एखाद्या हॉटेलमध्ये राहायचा निर्णय घेतला. जिथे आम्ही राहिलो तिथे (हॉटेल धनसागर, अंबानी सातारा- कास मार्ग, तालुका सातारा) समोर पावसामुळे चिखल झाला होता. रात्री अजून १ गट तिथे जेवायला आला. त्यातील एकच व्यक्ती पुण्याची होती. इतर केरळ ते पंजाब वरून आले होते. त्यांचा

आपापसात फक्त इमेलद्वारे संपर्क होता. (व्हाटसप्प नाही, फेसबूक नाही, ट्वीटर नाही, इनस्टाग्राम नाही! या काळात सुद्धा!) ते रात्री कोणाच्या तरी गावकऱ्याच्या घरासमोर स्लीपिंग ब्यागमध्ये झोपले. एवढया थंडीत, मानायला पाहिजे! रात्री उशिरा जेवून, मांसाहारी पतंगाचे निरीक्षण करत

आम्हीही झोपलो. 20 9 15 सकाळी कास पठारावर फोटो काढायला, फुले बघायला गेलो. मंजिरीची फुले खरे तर ही फुले आमच्या कोकणातही असतात, गेंद फुले फक्त इथे मोठ्या संख्येने असतात एव्हढेच! ७ वर्षानी फुलणारी कारव्ही या वर्षी फुलली होती. प्रचंड धुक्यात, मला थंडी वाजल्यामुळे डोके दुखत होते. पुरेसा सूर्यप्रकाश नसल्याने माझा मुलगा, हौशी फोटोग्राफरही वैतागला होता. पण बब्बी काही परतायला तयार नव्हता. त्याने



फुलांची माहिती असलेली २ पुस्तके विकत घेतली. १ मराठीत व १ इंग्रजीत. पुढच्या रविवारी पत्नी व त्याच्या मुलाला घेऊन येईन म्हणाला. आलाही! जाताना

एक्स्प्रेस हायवे संपल्यावर आमच्या गाडीचे याक्सल कशावर तरी आपटले. आवाज यायला लागला म्हणून ग्यारेज शोधले तर रविवारी रात्री सर्व ग्यारेजेस बंद. शेवटी एक ग्यारेज सापडले. त्याने तात्पुरते ठोकून दिले. गाडी घरी आणली व २ऱ्या दिवशी स्थानिक ग्यारेजला नेली. १२००० रू.चा चुना! प्रवासाव्यतिरिक्त खर्चाचा! (१९ ते २० सप्टेंबर २०१५)

25 10 15 ला नॅन्सी कॉलॉनी, बोरिवली पुर्व येथुन दुपारी 12 वाजता शिवनेरी पकडुन वनज येथे उतरलो. त्याच दिवशी स्वारगेटला संध्याकाळी 7.31 ला शिवनेरी पकडुन नॅन्सी कॉलनी, बोरिवली पुर्वेला उतरलो. सुपरमाइंड ट्रेनिंग!

20 किंवा 24 11 2015 ला छत्रपती शिवाजी टर्मिनस येथुन (या दिवशी मला कळले की रेल्वेस्टेशनवरुन वायफाय मिळते. पण मला मिळाले नाही.) सकाळची ट्रेन पकडून नाशिकला पुतण्याबरोबर उतरलो. रिक्षा ठरवली. प्रथम वाटले जास्त भाडे आकारतोय मग ‘बस पकडून गेलो असतो तर बरे झाले असते.’ पण जेव्हा आम्ही यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठाच्या इमारतीसमोर उतरलो तेव्हा लक्षात आले की इथे दुसरे कुठलेही वाहन मिळाले नसते. नाशिक बस स्थानकाजवळून मुंबईला जाताना खाजगी बस पकडली तर तिने संपूर्ण मुंबईचे दर्शन घडवून मला संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाकडे सोडले.

६ डिसेंबर २०१५ ला सकाळी भरती असेल व फ्लेमिंगो दिसतील म्हणून मी व माझा मुलगा शिवडी जेट्टीला गेलो. मुंबई नेचर फोटोग्राफर्स मीटअपपैकी फक्त ३ जण आले. ज्याने माहिती दिली होती तो आलाच नाही. जेट्टीच्या बाजूच्या तिवरांच्या जंगलात पोलिसांनी जाऊ दिले नाही. फ्लेमिंगोचे दर्शन झाले नाही. मुलगा जाम वैतागला. नंतर शेजा-यांनी सांगितले की त्या जंगलात एक कॉंक्रीट चा रस्ता आहे, तिथे फ्लेमिंगो दिसतात म्हणून. रंगीत करकोचे!

१४-१२-१५ ला चुलतभावाबरोबर त्याच्या मामाकडे अर्नाळयाला उल्कावर्षाव पाहायला गेलो.

२४ डिसेंबर २०१५ ला १७ सीटरने थोरल्या भावाच्या मित्राना व त्यांच्या कुटुंबाना व वहिनीला घेऊन वायंगणीस जावयास निघालो. थोरला भाऊ (जो आधीपासूनच वायंगणीत जाऊन राहिला होता.) म्हणाला होता की “त्यांना आपला कोंकण दाखवण्यासाठी मुंबई गोवा महामार्गाने घेऊन ये.” आधीच या मुंबईकरांनी खोपोली फाट्यावर नाश्ता करायला खूप वेळ घालवला. त्यांना वेळेची, प्रवासाची काही काळजीच नव्हती. त्यांना वाटत होते 2 तासात वायंगणी येईल. आपण सावकाश जाऊ. वळणावळणाच्या रस्त्याने मुलांना उलट्या झाल्या. आधीच पोटात पाष्टा, फ्रेंच फ्राइज अशासारखे फास्ट फूड होते. आमच्या 17 सीटरचा चालक वाटेतील पोलिसांना पैसे देण्यासाठी माझ्याकडूनच पैसे घेत होता. थोरला भाऊ यावर चिडला होता, “आपण योग्य असताना त्यांना पैसे देण्याची गरज नाही,” असे त्याचे म्हणणे होते. १६ तासांचा प्रवास झाला. ४ दिवसांची सुट्टी आल्यामुळे अर्धी मुंबई बाहेरगावी चालली होती. माणगावला ट्राफिक जाम! रात्री ११ वाजता वायंगणीला पोहोचलो. यावेळी ड्रायव्हर घरापर्यंत आला. मागच्या वेळी तो एवढा घाबरला होता, की दीड दिवस गाडीतच बसून होता. ‘कोकणातली भूता लई वाईट! एकदा धरल्यानी की सोडुक न्हायत!’ ‘ती परत आलीय!’ सकाळी शहाळयाचे पाणी, समुद्रस्नान, जीप राइड (बीचवर), आचऱ्याच्या बाजारात मासे खरेदी यात वेळ काढून आम्ही मालवणला सिंधुदुर्ग बघायला गेलो. जाताना कालावलीच्या पुलावर थाम्बुन छायाचित्रण केले. धक्क्यावर सिंधुदुर्ग किल्ल्याचे टिकिट काढायला एवढी गर्दी (४ दिवसांची सुट्टी म्हटल्यावर, मुम्बईकर, सांगलीकर, कोल्हापुरकर सगळे आले होते) की विचारू नका. अख्खा‘ धक्का’ भरला होता. आज काही नंबर लागला नसता. स्कूबा डायव्हिंगला तीच परिस्थिती! नोंदणीचा दर चढ़ा होता. दुसऱ्या दिवशी

सकाळी साडेसातच्या आधी आलो असतो तर स्वस्तात मिळाले असते. पण आमचा गट‘ सूर्यवंशी’. वोटर स्पोर्ट्सचा धोका (गर्दीचा) पत्कारायला आम्ही तयार नव्हतो. शेवटी शीतपेये (सरबते) पिउन व जेवुन आमचे धुरीवाड्यातील घर पाहावयास गेलो. तत्पूर्वी ‘पान’ खान, आइसक्रीम सेवन, फोकांडा पिंपळ दर्शन ही महत्वाची कामे उरकली होती. मालवणमधला त्र्याफिक जामही अनुभवून झाला. खरोखर पर्यटकांना कुठे गाडी घालायची याचा सेन्स नसतो. घाई तर प्रचंड! आमचे घर पाहून झाल्यावर झांटये काजू कारखान्यातुन काजुगर खरेदी आटोपल्यावर ब्रह्मगिरीची समाधी व शिवकालीन गुहा पाहावयास गेलो. वायंगणीच्या घरी पोहोचून वामकुक्षी केली. संध्याकाळी चुलतभाऊ त्याच्या मित्र- मैत्रिणींना घेउन आला. जीपचे समुद्रकिनाऱ्यावर चलचित्र काढून छायाचित्रणही पूर्ण केले. इतरांचे क्रिकेट जोमात आले होते. परत मालवणला जाताना चुलतभावाची गाडी वाळूत अडकली, रुतली! फरशी वैगेरे चाकाखाली घालून ती चालु केली. दूसरा दिवस घरातच घालवला. संध्याकाळी समुद्रकिनारी उभा खो खो खेळताना मी हातावर पडलो. हात सुजला. स्नायु दुखावले गेले. तिसऱ्या दिवशी सकाळी निघालो, ते रात्री २ वाजता चारकोपला पोहोचलो. आज थोरला भाऊ आमच्याबरोबर परत आला. “बघूया पोलिसांना का पैसे द्यावे लागतात ते?” पहिल्यांदा पोलिसांनी चालकाला खाली बोलावल्यावर हाही बरोबर गेला. त्यांनी चालकाचे परवाना पत्र मागितले. Expiry डेट उलटून गेली होती. थोरला भाऊ जो परत आला तो परत चालकासोबत पोलिसांकडे गेला नाही. परत १६ तासांचा प्रवास. अर्धी मुंबई रजा आटोपून मुंबईत परत आली होती. (२७ डिसेंबर २०१५)

थोरल्या भावाची बोट, अर्नाळयाला विकत घेतली. १ वर्षभर सांभाळली,

आपल्याला पाहिजे तशी बनवून घेतली. यातले इंजिन स्टान्डरड २००० या गाडीचे आहे. प्रथम मीच त्याच्याबरोबर जाणार होतो, पण मला अचानक ताप आल्याने आमचा चुलतभाऊ त्याच्याबरोबर गेला. चुलतभावाला पोहता येत नाही. तरी त्याने ह्याच्याबरोबर जायचे धाडस दाखवले. चुलतभाऊ, एक तांडेल व इतर ३ खलाशी याना घेऊन तो मुंबईहून आचऱ्यापर्यंत ५०० पेक्षा जास्त नौटीकल मैल, पाण्यातून चालवत घेऊन आला. एकदा अधिकाऱ्याना कागदपत्रे दाखवताना चिपळूणजवळ समुद्रात बुडाला. एका हातात पासपोर्ट व दुसऱ्या हातात पेपर्स. त्याची उंची ६ फुट! एका खलाशाने त्याला उडी मारून बाहेर काढले. ७ दिवसांचा प्रवास. प्रत्येक धक्क्यावर मुक्काम. एकदा प्रोपेलर कोळयांच्या जाळयात अडकले. ते दुरुस्त करण्यात एक दिवस गेला. समुद्रात दिशा दाखवणारे याप चुलतभावाच्या मोबाईलमध्ये होते. शेवटच्या टप्प्यात वारा उलटा फिरला म्हणून थांबावे लागले. शेवटी आचरा किनाऱ्यावर बोट लावली व वाइंगणीला मुक्काम! मी त्याना परत घेऊन यायला कार घेऊन गेलो होतो. मार्च २०१६

१९-६-१६ ला फोटोग्राफेर्स क्लब ऑफ इंडिया या संस्थेबरोबर आमच्या मुंबई नेचर फोटोग्राफर्स मीटअपचा एकत्र फोटो शूटिंग कार्यक्रम महाराष्ट्र निसर्ग उद्यान, धारावी येथे केला.

27-9-2016 रोजी रात्री माझ्या मित्राची पत्नी त्याला कुठेतरी बाहेर जाण्यासाठी प्रेरित करू लागली. त्याने मला फोन केला, की कुठे जाऊ शकतो? मी त्याला डहाणूला जाण्यासाठी सुचवले. त्याने मला मार्गदर्शक म्हणून बरोबर येण्यास सुचवले. त्याने सांगितले की रात्रीची बडोद्याची तिकिटे काढून चंपानेरला जाउया. तो म्हणत होता की दुसऱ्या दिवशी म्हणजे २८-९-१६ ला दिवसभर डहाणूला भटकायचे. व बोइसरवरून ट्रेन पकडून पहाटे बडोद्याला जाऊन उतरायचे. मी त्याला सांगितले की बोइसरवरून असलेली गाडी रात्री १२ वाजता आहे व दुसरी गाडी रात्री २ वाजता बडोद्याला पोहोचते. तेव्हा पहिल्या गाडीसाठी रात्री १२ वाजेपर्यंत काय टाईमपास करायचा? व जी ट्रेन २ वाजता पोहोचते तिथे रात्री २ पासून पहाटेपर्यंत वहिनी कशी राहणार? म्हणून आम्ही ही योजना बाद केली व सकाळी मुरुडला जायचे ठरवले. दादरवरून एस. टी. पकडून. रात्री ९.३० वाजता पत्नीस सांगितले होते की मी उद्या चंपानेरला जाईन. १२ वाजता तिला सांगितले की कदाचित मुरुडला जाईन. गाडीत बसल्यावर फोन करून सांगेन. पहाटे लवकर उठून व्होट्स अप्प न तपासता आन्हिके उरकली व निघणार तोच व्होट्स अप्प तपासला तेव्हा असे लक्षात आले की मित्राने रात्रीच संदेश पाठवला होता की त्यांच्या मुलाला पिकनिक साठी सोडल्यावर ते मित्राच्या सासरी जाऊन येणार होते, त्याला उशीर लागणार होता. त्याने फोनवर ‘एस.टी. न्यान्सी कॉलोनी एस.टी. स्थानक बोरीवली पूर्व येथून मुरुडला जाणारी एस.टी. आहे का?’ ह्याची चौकशी करायला सांगितले. मी बाईक घेऊन ब्याग घरीच ठेवून एस. टी. स्थानकावर गेलो व चौकशी केली. ७.३० ची एस.टी. निघत होती व पुढची एस.टी. ८.३० ला होती. त्याना तिथेच बोलावून घेतले. परत घरी आलो, ब्याग घेतली व पत्नीस सांगितले की कदाचित मुरुडला जाऊ!

चुलतभावाकडे चहा प्यायला गेलो. त्याने चिपळूणला जाता येईल का याची चौकशी केली. रात्रभर स्टेशनवर मुक्काम करावा लागला असता! त्याने चिपळूणच्या मित्राला फोन करून सांगितले की कदाचित ‘आम्ही (म्हणजे नितांत, त्याचा मित्र व मित्राची पत्नी)’ तिकडे येऊ. फोन करून विचारले असता हे ८.३० पर्यंत पोहोचणार नाहीत हे कळले. शेवटी १० च्या सुमारास चुलतभावाने होंडा याक्टीव्हा वरून मला एस. टी. स्थानकावर सोडले. तेवढ्यात ते आले. समोर साताऱ्याला जाणारी सेमी लक्झरी उभी होती. कासला जायचे ठरवून आतमध्ये शिरलो. त्याला साताऱ्यापर्यंत एस.टी. ने प्रवास करायचा नसल्याने त्याने ३ तिकिटे पुण्यापर्यंत वाकड नाक्यापर्यंत काढली. तिथून पुणे स्थानकाला जाऊन रेल्वेने साताऱ्याला जायची योजना ठरली. मी पत्नीस व चुलतभावास फोन करून सांगितले की आम्ही पुण्याच्या दिशेने निघालोय. तिकीट काढून झाल्यावर तो म्हणाला “आपण पनवेलला उतरुया व मुरुडला जाउया.” पनवेलला एस.टी. थांबलीच नाही. ती हायवेला लागून लोणावळयाजवळील या एशियाडस जिथे थांबतात तिथे थांबली. वाहक, १५ मिनिटे गाडी थांबेल असे म्हणाला. मी मित्राला झोपेतून उठवले व खाली यायला सांगितले. तो म्हणाला की आपण आपला स्टोप आल्यावरच उतरू ना! मग मी त्याला सांगितले की आपण पनवेल पार करून लोणावळयाला आलोय. तेव्हा उतरला व आम्ही १ वाजता नाश्ता केला. गाडी वाकड नाक्याला लागल्यावर आम्ही रिक्षा पकडून डांगे चौकात गेलो. तिथून शेअर रिक्षाने (६ सीटर) शिवाजीनगर स्थानकाजवळ गेलो. तिथे एका हॉटेलात मी प्रातर्विधीसाठी गेलो असता शौचगृहाच्या दरवाजाला कडी नसल्याचे व नळाला पाणी नसल्याचे लक्षात आले. बाहेरच्या पिंपात पाणी होते. जेवण होईस्तो साताऱ्याला जाण्याची योजना रद्द होऊन सिंहगडला

जायची योजना ठरली. स्वारगेटला जायची बस पकडल्यावर तसे पत्नीस व चुलतभावास फोन करून सांगितले. स्वारगेटला पोहोचल्यावर धायरी फाट्याला जायला शेअर रिक्षा केली. तिथून डोणजे फाटा! तिथून चालत डोणजे गावात हॉटेल शोधत निघालो. संध्याकाळचे ५ वाजले होते. मित्राला आताच सिंहगडावर जाऊन मुक्काम करायचा होता. पण गाडीच उपलब्ध नव्हती. पहिली २ हॉटेले ‘बार सहीत’ असल्यामुळे सोडली. ‘जिथे बार असतो तिथले जेवण खराब असते, दारुड्याना क्वालिटी कळत नाही. माझा अनुभव!’ मध्ये एका छोट्या रेस्टोरंटमध्ये बसून चहा प्यालो. नंतर एका हॉटेलात शिरलो तर खोलीत गळक्या भिंतींमुळे एकप्रकारचा कुबट वास पसरला होता. तिथेच कुठलीतरी बुरशीयुक्त हवा माझ्या फुफ्फुसात शिरली, ज्याचा मला काही दिवस त्रास झाला. मित्राची पत्नी रात्रभर तिथे मुक्काम टाकावयास तयार नव्हती. पुढच्या होटेलवाल्याने आम्हाला नकार दिला. कारण त्याच्याकडे एका तासाला एवढे उत्पन्न होते जे आम्ही संपूर्ण दिवसाचे दिले असते तरी कमी पडले असते.. पुढचे हॉटेल जरी बारवाले असले तरी त्यांच्या खोल्या स्वच्छ होत्या. तिथे मुक्काम केला. मला परत चहा प्यायची हुक्की आली. मित्र व वहिनी ५ मिनिटात येतो असे म्हणाले पण अर्धा तास त्यांचा पत्ताच नव्हता. फोन केल्यावर त्याने पत्नीस विचारले “चाय पिनेको जाना है क्या?” तिने नकार दिल्यावर “तो येत नाही” असे म्हणाला. तो विसरूनच गेला होता की त्याने मला ५ मिनिटात येतो असे म्हणालाय. शेवटी मी एकटाच गेलो, चहा प्यालो व फिरायला बाहेर पडलो. जिथून सिंहगडला जायला जीप्स असतात तिथे जाऊन आलो. वाटेत अंधारात एका हॉटेलमधील कुत्रा येणाऱ्या जाणाऱ्या कोणालाही भुन्कायचा, अंगावर यायचा.

वाटले मित्राला फोन करून बोलवावे पण ‘आमचा मित्र मला मदत करण्याऐवजी उलट त्या कुत्र्यालाच भडकवायचा’ म्हणून तो बेत रद्द केला. खोलीवर येऊन पुस्तक वाचत बसलो. टी.व्ही. चालत नव्हता. ८.३० ला मित्राला फोन केला की “जेवायला जाउया का म्हणून” तर ह्याने चक्क ताणून दिली होती. शेवटी त्याला तयार करून खाली आणले. जेवण झाल्यावर रात्री ११ वाजेपर्यंत परिसरात शतपावली केली. म्हणायला लागला “आपण सकाळी दुसरीकडे जाऊ. तोरणा किंवा राजगडावर?” म्हणालो “आपण फक्त या हॉटेलात राहण्यासाठी इथे आलोय का?” आता सिंहगड बघूनच जायचे! 29 9 2016 रोजी सकाळी लवकर उठलो. ७ वाजता! हॉटेलमध्ये चहा इतक्या सकाळी मिळत नव्हता, म्हणून फिरायला बाहेर पडलो. एका हॉटेलमध्ये चहा प्यायला गेलो. तिथे मालक व दूसरा एक ग्राहक यांच्यात ‘कांदा मिळत नव्हता तेव्हा!’ अशा गप्पा रंगल्या होत्या. परत येताना एका तारेवर एक मेलेले ‘फ्लायिंग फॉक्स’ जातीचे वटवाघुळ लटकत होते. आल्यावर ८ वाजता आंघोळीचे गरम पाणी नळाला आले. मित्राला उठवायला गेलो तर वहिनीची आंघोळ झाली होती. पण मित्र म्हणाला आपल्याला ९.३० वाजता चेक आउट करायचेय ना? मग मी ९ वाजता उठतो.” नशिबाने लवकर उठून त्याने आंघोळ केली. माझे पुस्तक वाचून संपले होते. आता काही टाईमपास शिल्लक राहिला नव्हता. बाहेर जाऊन छायाचित्रण करण्याशिवाय! आम्ही ९.३० च्या आधीच चेक आउट करून निघालो. शेअर जीपमध्ये १ स्त्री नागपूरहून आली होती. तिला एक तासात सिंहगड पाहून परत जायचे होते. अजून २ मुली नागपूरच्याच होत्या पण पुण्याला एम.पी.एस.सी. किंवा यु.पी.एस.सी. च्या परीक्षेच्या अभ्यासासाठी कोणत्यातरी क्लासला होत्या. त्यांनाही लवकर जायचे होते. अजून २ मुले

होती. त्याना घाई नव्हती. जीपचालकाने प्रस्ताव ठेवला की ‘जाण्याचे ५० व येण्याचे ५०’ असे १०० रुपये द्या. २ तासात परत या. आमचा मित्र भडकला. “का म्हणून २ तासात परत यायचे? आम्हाला पाहिजे तेव्हा येऊ. ही गाडी सोडून दुसऱ्या गाडीत जाऊन बसुया.” त्या मुली म्हणाल्या “इथे सर्व गाडीवाले असेच वागणार.” आम्ही १२ जण होतो. गाडीत कसेबसे बसलो होतो. तरी तो अजून २ जणांची वाट बघत होता. शेवटी आम्ही प्रत्येकी १० रुपये जास्त काढायचे ठरवले. वर पोहोचल्यावर तो त्या मुलाना म्हणाला “तुम्ही पैसे आल्यावर द्या.” पण ती मुले म्हणाली “नाही. तुमचे ६० रुपये आताच घेऊन ठेवा. आमची लवकर परत येण्याची खात्री नाही.” त्या मुली मात्र लवकर परतणार होत्या. त्या विचारत होत्या “पुण्याला परत कसे जाणार?” मी म्हणालो “५० नंबरची बस मिळते.” त्यांनी विचारले “त्यांच्या वेळा काय आहेत?” मी म्हणालो “माहित नाही. पण डोणजे फाट्यावरून शेअर रिक्षा मिळतील.” मी मित्राचे ऐकले ते फार बरे झाले, कारण इतक्या वेळा आलो पण ‘घोड्याची पागा’ पहिली नव्हती. ती यावेळी पाहिली. दुपारी जेवायच्या वेळी भजी खाल्ली व चहा प्यालो. मित्राने तिथे चादर पसरली व त्यावर लवंडला. तो उठायलाच तयार नाही. कलावंतीण बुरुजाला नवीन नाव ‘हवा पोइन्ट’ आहे ही नवीन माहिती मिळाली. तिथे हे जोडपे अगदी टोकावर जाऊन बसले. कासचे फुलांचे गालिचे, फुलपाखरे, मधमाश्या आदी कीटक, अनेक प्रकारचे पक्षी दिसत होते. एक पक्ष्यांचे प्रकाशचित्रण करणारा गट पुण्याहून आला होता. कारव्ही या वर्षीही फुलली होती. लोकमान्य टिळकांच्या घराआधी जेवणाची व्यवस्था होती. मित्राला म्हणालो “जेवूया,” तर तो म्हणाला “आताच भजी खाल्लीय. आपण जिथून गाडी सुटते, तिथे

जाऊन खाऊ." म्हणून लोकमान्य टिळकांच्या घराचे छायाचित्रण करावयास गेलो, तर तिथे ते जीपमधील २ तरुण बसले होते. त्यांचाही फोटो काढला. त्यांचा संपर्क क्रमांक घेतला. अजूनही संपर्कात आहे. आता त्यापैकी एक मुंबईत राहतोय. त्याला मुंबईत घर शोधायला मीच मदत केली. बाहेर आलो तर माझा मित्र व वहिनी जेवायला (?) एका चादरीवर बसून मला बोलावत होते(!) जाताना कुल्फी खाल्ली. तळावर ३.३० वाजता पोहोचलो. जीपमध्ये आम्हीच पहिले! १३ जण जमावायास ५ वाजले. चौदाव्याचे पैसे भरावयास जेव्हा आम्ही ७ जण तयार झालो, (इतर कामगार असल्याने ते त्यांचे फक्त ५० रुपये भरणार होते) तेव्हा त्याने जीप काढली व डोणजे फाट्याला सोडले. तिथून आम्ही दुसरी शेअर जीप केली. धायरी फाट्यावरून पी.एम.टी. बस पकडून स्वारगेटला! स्वारगेटला मी न्यांसी कॉलोनीला जाणाऱ्या एशियाडमध्ये बसलो व मित्र पुणे स्टेशनकडे टयाक्सी पकडावंयास रवाना झाला. माझी गाडी लोणावळ्याला फक्त १५ मिनिटे थांबणार होती म्हणून गरम गरम मसाला डोसा घाईघाईत खाल्ला व चहा प्यालो. गाडीत झोपलो. न्यांसी कॉलोनी एसटी स्थानकावर उतरून रिक्षा पकडली. घरचे जेवण न जेवता १ वाजता झोपावयास गेलो. २ उलट्या केल्या. रात्री २.३० वाजता उठून परत उलटी किंवा वांती केली. ४ वाजता उठून परत. ५ वाजता परत. ६ वाजता परत. ६ उलट्यात सर्व मसाला डोसा, चहा, कुल्फी, ज्वारी-बाजरीच्या भाकऱ्या, वांग्याचे भरीत, पिठले, चटण्या, भजी इत्यादी व बाहेरचे पाणी बाहेर पडले होते.

२५-१०-२०१६ रोजी दुपारी ३.३० वाजता ओला बुक केली व तिला आमच्या घरासमोर बोलावले. मी व माझा चुलतभाऊ गाडीत जाऊन बसलो. चालक गुजराथचा होता. सासगीरजवळ त्याचे गाव होते. सतत मावा खाऊन थोड्या थोड्या वेळानंतर चालत्या गाडीचा दरवाजा उघडून बाहेर थुंकायची त्याला सवय होती. गाडी घेऊन दुसऱ्या मित्राच्या घरी जुहुला गेलो. तिथून त्याला घेऊन नांदगावच्या काशीद बीचजवळ निघालो. जाताना लवकर जाण्यासाठी चिरनेर फाट्याजवळून उरणमार्गे जाणारा रस्ता पकडला. असे वाटले की इतका खराब रस्ता दुसरा नसेल. लवकरच तो गैरसमज दूर झाला. अलिबागवरून काशीद्‌ला जाणारा रस्ता तेवढाच वाईट होता. जिथे ४ तासात पोहोचू शकलो असतो तिथे ७ तास लागले. भरपूर वेळ प्रवास करूनसुद्धा मुक्कामाचे स्थळ येईना! असे वाटले की आम्ही पुढे आलो की काय? म्हणून मागे फिरून परत निघालो असता एक पोलिसांसारखी दिसणारी व्यक्ती मोटारसायकलीवरून आली. तिने सांगितले की आम्ही बरोबर रस्त्यावर होतो. अजून ८ कि.मी. वर ते ठिकाण आहे. आधी उजव्या बाजूला काशीदचा दांडा (समुद्रकिनारा किंवा चौपाटी) लागेल, मग ते ठिकाण आहे. त्याने आम्हाला त्याच्यापाठी पुढे यावयास सांगितले. आम्ही वळून त्याच्या मागे जाईपर्यंत तो अदृश्य झाला. पाय उलटे होते की नाही ते बघितले नव्हते. नंतर दिसला! म्हणतात ना! शिजेपर्यंत दम निघतो, निवेपर्यंत निघत नाही! ते ८ कि.मी. काही संपायला तयार नव्हते. शेवटी एकदाचे अंतर संपून आम्ही फार्महाऊसवर पोहोचून जेवून झोपलो व दुसऱ्या दिवशी सकाळी निघून परत घरी आलो.

१७ जुलै २०१६ रोजी रविवारी एका सामाजिक संस्थेबरोबर भिवपुरी धबधब्यावर कर्जतच्या पुढे जायला निघालो. सुरुवातीला छत्रपती शिवाजी स्थानकावर (सी. एस. टी.) सकाळी ७ ची कर्जत लोकल पकडली. इतर कोणालाही मी ओळखत नव्हतो. प्रथम काही जणांशी संपर्क साधला असता, काही जण दुसऱ्या डब्यात चढले आहेत व इतर मधल्या स्थानकावर चढणार असल्याचे कळले. पण छ. शि. ट. वरच एवढी गर्दी होती की इतर स्थानकांवर चढणे अशक्य होते. पुढच्या भायखळा स्थानकावर तुफान गर्दी आत शिरली. नंतर दादर फुल्ल! ठाणे विचारायलाच नको! कल्याण अशक्य! मी खिडकीजवळ बसलो होतो. मला उतरायचे कसे याची चिंता होती. पण माझ्यासमोर उभे असलेले तरुण पण तिथेच उतरणार असे कळले. शेवटी संपूर्ण डबा भिवपुरी स्थानकावर रिकामा झाला. काहीजण मात्र आधीच्या नेरळ स्थानकावर उतरले. 'आता इतराना कसे शोधायचे?' हा प्रश्न होता. मी कोणते पावसाळी ज्याकेट घातले आहे, कुठे उभा आहे या सर्वांचे वर्णन देत त्या सगळ्याना गाठले. ३० जण होते. १ मुलगी या ट्रेनमध्ये चढू शकली नव्हती. ती मागच्या ट्रेनमधून आली. पाउस भूरभूरत होता. बिस्लेरीचा खोका घेऊन, आम्ही जय मल्हार हॉटेल गाठले. तिथे नाश्ता करून त्यांच्याकडून त्यांची खोली भाड्याने घेतली. एकच खोली मिळाल्याने कपडे बदलायला कधी पुरुष बाहेर, कधी स्त्रिया बाहेर! तिथून धबधब्याला जायला शोर्ट कट असल्याचे कळले. पावसाची भुरभुर चालली होती. जाताना एका घराच्या अंगणात मोर दिसला. पाळला होता वाटते! जातानाची वाट शेणाने भरली होती. एका पठारावर पोहोचलो. समोर तलाव होता. उजव्या बाजूला काही तरुण प्यायला गेले होते. डाव्या वाटेला २ पोलीस दारुड्याना जायला अडवत

होते. कोणी तरी सांगितले, तो धबधबा खूप लांब आहे. म्हणून त्याच पठारावर आमच्यातल्या एका मुलाचा वाढदिवस साजरा केला. व्यवस्थित केक वैगेरे फासून! नंतर आमची ओळख परेड झाली. परत जायला निघालो. तेवढ्यात कोणीतरी सांगितले की धबधबा तिथेच आहे. आता पोलीसही जेवायला गेले होते. २ वाजून गेले होते. जाताना वाटेत घसरायला होत होते. प्रथम तो तलाव उजवीकडे लागला. आमच्यातले ४ जण, त्यात ज्याचा वाढदिवस झाला तो सुद्धा, तलावात पोहायला उतरले. मध्ये १ छोटासा धबधबा दिसला. म्हटले, १- १ करून यातच आंघोळ करू. पण पुढे गेलो. वाटेत भाताची शेते, आमच्या गावासारखी! एक छोटासा ओहोळ, त्याला घातलेला बांध, एक छोटीशी झोपडी, त्याला मध्ये मध्ये घातलेले निळया मेणकापडाचे छप्पर, गायी, बैल, शेळया, आदिवासी शेतकरी, धनगर! जाताना २ फाटे आले. आम्ही वरचा फाटा घेतला. एक साहसी ट्रेक आयोजित करणारा गट लहान मुलाना व तरुणांना परत घेऊन चालला होता. पण तो रस्ता काट्यानी, तारांनी बंद केला होता. आम्ही अजून वरच्या अंगाला गेलो. तिथे एकाने काटे तोडून तात्पुरती वाट केली होती. त्यातूनच तो गट येत होता. तेवढ्यात त्यातल्या एका स्त्रीने लोटांगण घातले. ती त्या तारेत अडकली. तिच्या सहका-यांनी तिला उठवले. मग आमच्यातल्या एकाने ती तार धरून ठेवली. आम्ही सांभाळून पुढे चालायला लागलो. वाटेत एका छोट्या धबधब्यात लोक नहात होते. आमच्यातले काही तिथेच जायचे म्हणत होते, पण आमच्यातल्या तो ४ जणांचा गट (मघाचसा पोहणारा) डोंगराला वळसा घालून मोठ्या धबधब्याकडे निघाला होता. आम्हीही गेलो. तिथून एक उंचवटा, एकमेकांचा आधार घेत व देत चढलो. समोर बघतो तर त्या धबधब्यावर प्रस्तरारोहण नव्हे, उतरण चालले होते. तो मघाचसा प्रस्तरारोहणवाला गट, धबधब्यावरून

दोरी टाकून काही जणाना उतरवत होते. कॅमेरा न आणण्याचे वाईट वाटले. मोबाईल वापरला पण स्क्रीनवर धबधब्याचे तुषार उडण्याची भीती! चालायला १ तास लागला होता. धबधबा म्हणजे काय? आहा! असा पाठीवर घेतलाय म्हणता! चांगला १ तास मसाज करून घेतला. बाहेर पडायचे मनच करत नव्हते. पण वरती पावसाचा वेग वाढला, तसा धबधब्याचा वेगही वाढला. प्रस्तर उतरण करणा-यांनी आटोपते घेतले होते. खाली गढूळ पाणी येत होते. धबधब्यातून एखादा दगड येऊन डोक्यावर पडण्याची भीती होती. कमीतकमी १ तास चालत, मनुष्यवस्ती नव्हती. कोणतेही वाहन येऊ शकत नव्हते. शेतातली पायवाट, पाण्याचे वेगवान ओहोळ, नाले वैगेरे! त्यामुळे जवळपास डॉक्टर नाही, इस्पितळ नाही. एखादा गेला तर हरकत नाही, पण त्याच्या/तिच्या घरी जाऊन काय सांगायचे याचा ताण येतो ना! शेवटी निघालो. परत घसरगुंडी चालू झाली. तो ४ जणांचा गट वर डोंगरावर चढून जिथून ती मुले प्रस्तर उतरण करत होती तिथे जाऊन आला. परत जाताना वाटेत दारुड्यांचा खच पडला होता. कोण इथे झिंगत होते, कोण तिथे! आम्हाला वाटेत एक नाला ओलांडायचा होता. तिथे काही दारुडे आम्हाला व इतराना आधार द्यायला उभे होते. त्याशिवाय तो वेगवान प्रवाह ओलांडणे कठीण होते. जे स्वत:च नीट उभे राहू शकत नव्हते, त्यांच्या आधाराने आम्ही पुढे सरकत होतो. पाउस जोरात सुरु झाला होता. परत १ तास चालल्यावर तो मोर त्याच जागेवर बसला होता. आम्ही त्या खोलीकडे (इमारतीतील) पोहोचलो. सुरुवातील जे गेले ते निराश झाले कारण चावी मागून येणा-यांकडे होती. परत तोच प्रकार. मुले बाहेर तर मुली आत! मग मुली बाहेर तर मुले आत! आता सुके कपडे घातल्यावर पाउस नकोसा झाला. हॉटेलला पोहोचलो तर ५ वाजून गेले होते. तरी जेवायला लोकांची गर्दी होतीच. पण आमचे

बुकिंग सकाळपासून असल्याने आम्हाला आधी जेवायला मिळाले. चहा न पिता स्टेशन गाठले. स्टेशनवर एक दारुडा तरुण आपल्या गटात बोलताना सहजपणे आई- बहिणीवरून असलेल्या शिव्या वाक्या- वाक्यात उद्धृत करत होता. ह्यांच्या वाक्यांची सुरुवात व शेवट सहजपणे या शब्दांनी किंवा लिंगाचा उल्लेख असलेल्या अपशब्दांनी होतो व त्याचे याना काहीच वाटत नाही. मी सहज प्रतिक्रिया म्हणून ‘क्लिक क्लिक’ उच्चारले. आमच्याबरोबर असलेली १ स्त्री संतापाने त्या मुलास बोलली. त्यावर तो मुद्दामून परत तसेच बोलायला लागला. आम्ही गप्पपणे सहन करण्याशिवाय काही करू शकत नव्हतो. तुफान गर्दी! मुंबईकडे जाणाऱ्या ट्रेनमध्ये चढायलाच मिळेना. कर्जतकडे जाणाऱ्या ट्रेनची वाट पाहिली. त्यातही आम्हा चौघाना चढायलाच मिळाले नाही. इतर प्रथम श्रेणीतून, अपंगाच्या डब्यातून वैगेरे गेले. तीच ट्रेन परत आली तर आम्हाला परत चढायला मिळाले नाही. काही दारुडे बंद दरवाजावर लटकून वैगेर गेले. आम्ही कर्जतला जाणारी पुढची ट्रेन पकडली. तिथे मी अर्ध्या सीटवर बसून कर्जत पर्यंत व तिथून पुढे लोकलने ठाण्यापर्यंत प्रवास केला. त्यावेळी माझ्याबरोबर असलेल्या सहप्रवाशाने सांगितले की त्या खोलीची चावी त्यांच्यात खिशात चुकून राहिली. ते घरी गेल्यावर कुरियर करतील पण प्रत्यक्षात (?) त्यांनी केली नाही. मी ठाणे स्टेशनला उतरून रात्री साडेआठ – नऊला चहा प्यालो व ठाणे- बोरीवली बसने व पुढे रिक्षाने रात्री १२ वाजता घरी पोहोचलो. नंतर जेवून दिवसभर ओले असलेले मधुमेहग्रस्त पाय सुकवून रात्री १ वाजायच्या सुमारास झोपलो.

३१ जुलै २०१६ रोजी पहाटे उठून ‘मानसी पर्यटन’ आयोजित निसर्ग रिसोर्ट, सातपाटी येथे निघालो. बरोबर २० वर्षीय मुलगा व १८ वर्षीय पुतण्याही होता. मुलाला आदल्या दिवशी जबरदस्त सर्दी झाली होती. त्याला सांगितले की त्याचे पैसे आधीच भरले आहेत. ते फुकट जातील. जास्तीत जास्त आपण तरण तलावात न उतरता किंवा रेन डान्समध्ये न भिजता समुद्र किनाऱ्यावर जाऊ! तिथे छायाचित्रण कर! बरोबर त्याचा कॅमेरा ठेवायचा ‘आधार’ही घे. ते वजन घेऊन तो उत्साहात निघाला. पुतण्याही तरणतलावात पोहायला मिळणार म्हणून निघाला. आमच्यातल्या एकाने व्होट्सयापवर जाहिरातच तशी केली होती. तरणतलाव आहे, समोर समुद्र चौपाटी आहे. आम्ही २७ सीटर बस बुक केली होती. प्रत्यक्षात फक्त १९ लोकच आले. नंतर लक्षात आले की त्यादिवशी लोकांची गटारी होती. आमच्यासारख्या कुटुंबवत्सल, दारू न पिणाऱ्या लोकांबरोबर ते कसे येणार? आम्ही सीटवर झोपून गेलो. पालघरवरून सातपाटीला जाताना वाटेत अनेक धबधबे लागले पण तिथे लक्ष न देता आम्ही रिसोर्टला पोहोचलो. तरणतलाव लहान मुलांकरता होता. त्यांच्या जाहिरातीत तरण तलावाचा उल्लेख नव्हता म्हणून त्यांनी फसवले असे आम्ही सांगू शकत नाही. रेन डान्स होता. कार मधले संगीत वाजवून त्यांनी आम्हाला नाच करण्यासाठी संगीतही पुरवले. पण माझा मुलगा व पुतण्या जे रागाच्या भरात वर जाऊन बसले ते जेवायलाच व नंतर चहा प्यायला खाली उतरले. व्होट्सयापवर च्याट करत, मोबाईलवर गाणी ऐकत, गेम खेळत व झोपून त्यांनी दिवस काढला. आम्ही नाचून झाल्यावर समुद्रावर एक वेगळी वाट शोधून गेलो. पाउस असल्याने समुद्राला भरती होती. किनारा अस्वच्छ होता. फक्त पाण्यात पाय बुडवला. पोहलो नाही. धोका पत्करला नाही. आमच्यातल्या एकीची चप्पल वाटेवरच्या चिखलात

अडकून तुटली. दुपारचे जेवण शाकाहा-यांसाठी व मांसाहा-यांसाठी पर्वणी होती. तांदळाच्या भाकऱ्या, भाज्या, साधा भात, मसाले भात, वरण, पापड, कोशिंबीर, गुलाबजामून व त्यावर शिरा. पोट तुडुंब भरून त्यावर अजून भर पडली होती. आमची दुपार गप्पा मारण्यात व परत घरातच नाचण्यात गेली. चहा पिऊन निघालो. तोपर्यंत पुतण्याला चुलत भावाने संदेश पाठवला होता की वरोर फाटा ते बोरीवली या पश्चिम एक्स्प्रेस्स महामार्गावर पूर आल्याने ट्राफिक बंद करण्यात आलेय. मार्ग वळवलाय व चक्का जाम झालाय. इतरही दूरदर्शनवरील अशा प्रकारच्या बातम्या आम्हाला पुरवत होते. पण जेव्हा आम्ही गेलो तेव्हा मात्र गळा ते गळा ट्राफिकशिवाय जास्त त्रास न होता इंच इंच सरकत आम्ही घरी पोहोचलो.

१४ ऑगस्ट २०१६ च्या रविवारी परत एका दहिसर पश्चिम येथील खाजगी इस्पितळात काम करणाऱ्या प्रयोगशाळा तंत्रज्ञांबरोबर व तेथील

विद्यार्थ्यांबरोबर भिवपुरीला जायला निघालो. यावेळी मात्र एक शाळेची १७ सीटर बस बुक केली. बसला बोलावले ६ वाजता, आली ६.४५ ला व हा गट निघाला, ८.४५ ला! २ तास मी संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाजवळ उभा! भारतीय लोकाना इतरांच्या वेळेची कदरच नसते हे खरे! आदल्या दिवशी मुंबई पुणे महामार्गावर झालेली तुफान गर्दी वाचली व ऐकली होती. तो टोलही वाचवायचा होता. म्हणून कल्याण शहरातून गाडी काढली तर त्याच्यापेक्षाही गर्दी जास्त, ट्राफिक जाम वैगेरे! काही विद्यार्थ्यांनी व तंत्रज्ञांनी डबे आणले होते. कल्याण ओलांडल्यावर रस्त्याच्या बाजूला उभे राहून ते डबे खाल्ले. टपरीवरचा कटिंग चहा प्यालो व मार्गाला लागलो. भिवपुरी स्टेशन पर्यंत बरोबर गेलो पण गूगलला भिवपुरी स्टेशन न सांगता नुसतेच भिवपुरी सांगितल्याने त्याने (गूगल मॅप) भलतीकडेच गाडी नेली. शेवटी स्थानिकांना विचारले. त्यांनी जिथून आलो होतो तोच रस्ता परत दाखवला. परत जय मल्हार हॉटेल गाठले. त्याना आधीच्या ट्रीपची

आठवण करून दिली. व ती खोली (इमारतीतील) मागितली. ते म्हणाले आधीवाल्यानी चावी घेऊन गेल्यामुळे त्याचे कुलूप तोडावे लागले व नवीन कुलूप लावावे लागले. तेव्हा आता आम्हाला चावी मिळणार नाही. आता काय करायचं? कारण कपडे बदलायला दुसरे हॉटेल कुठून शोधायचे? आधीच दुपारचे २ वाजले होते. मग त्यांनी आम्हाला स्त्रियांसाठी त्यांचे गोदाम दिले व पुरुषांना बाथरूम! आधीचा अनुभव बघता आम्ही आधीच जेवून घेतले. वाटेत तो मोर नव्हता. आमच्याबरोबरचे लोक सेल्फी काढत टाईमपास करत पुढे सरकत होते. वाटेत एक ओढा आला. तो पार करत असता १०० रुपयाची नोट वाहताना दिसली. दिसली मला, मी ओरडलो पण मिळाली दुसऱ्याला! नोट नोट पे लिखा है, इस्तेमाल करनेवालेका नाम! परत तो फाटा (शेतातल्या वाटेचा) आला. यावेळी वरून न जाता खालच्या अंगाने ओढ्यात शिरलो. आता प्रवाहाचा वेग वाढला होता. गर्दी नव्हती! ओढ्याखालील खडकांवर शेवाळ साचून निसरडेपणा वाढला होता. काहीजणांच्या चपला वाहून चालल्या होत्या. आयोजकांनी इतरांशी नीट सुसंवाद साधला नसल्यामुळे, (कुठे जातोय ते सांगितले नसल्याने) काही मुली रिसोर्टला जायच्या तयारीने आल्या होत्या. २ मुले तर संजय गांधी राष्ट्रीय उद्यानात जायच्या तयारीने आली होती. एकीने तर घरी सांगितलेच नव्हते कि ती पिकनिकला चाललीय. ती तर कामावर जाण्यासाठी घरातून निघाली होती व घरी वेळेवर पोहोचणार होती. त्यामुळे त्यांच्या चपला हाय हिल्सच्या, चिखलात अडकून बसणाऱ्या, निसरड्या वैगेरे होत्या. मध्ये मध्ये खळाळत्या ओढ्यातून बाहेर येत आम्ही कडेकडेने चाललो होतो. मध्येच एखाद्या उन्चवट्यावर चढत होतो. तिथून २ स्थानिक उन्चवट्यावरून आमची मजा बघत गेले. शेवटी ज्या धबधब्यावर जायचे ठरवले होते तिथे न जाता

भलत्याच धबधब्यावर पोहोचलो. पण हा धबधबासुद्धा प्रचंड, वेगवान, मसाज करणारा वैगेरे होता. इतरांनी मजा केली. बाहेर पडावेसेच त्याना वाटत नव्हते. शेवटी जेवढे आलो तेव्हढेच चालत परत जायचे आहे हे सांगितल्यावर ते धबधब्यातून बाहेर पडले. यावेळी ओढ्यातून जायचे नाही हे ठरविले. म्हणून एक निसरडा उंचवटा झुडपांच्या फांद्यांचा आधार घेत मी वर चढलो व इतराना हात देत वर चढवले. माझी 'आयोजिका' मैत्रीण वर चढत असताना तिचा पाय निसटला व तिने सगळा भार माझ्यावर टाकला. आम्ही दोघेही घसरलो. सुदैर्वाने खाली गडगडत गेलो नाही. परत एक उतार आला, जिथे सगळे एकमेकांचा हात धरून उतरले. तिथे कोणी घसरले असते तर अनर्थ ओढवला असता! तिथे गुरे वाट होती. गुरे मात्र सहजपणे या मार्गातून जात होती. परत ओढ्यात शिरलो. ओलांडला! एका डोंगरावर चढलो. जाताना वाटेत एक पुरुष, ४ प्रौढ स्त्रिया व १ लहान मुलगी यांचा गट दिसला. जो धबधब्याकडे चालला होता. संध्याकाळचे ५ वाजले होते. त्यांना जाऊन येईपर्यंत नक्कीच रात्र झाली असती. त्यांना वाट ही सापडली असती कि नाही कोणास ठाऊक? त्यांना सावध करूनही त्या पुढे गेल्या. आता जिवंत आहेत कि नाहीत, काही कल्पना नाही(!), परत तलावाच्या काठी गेलो. तिथे एक स्थानिक गळाने मासे पकडत होता. आमची लोक तिथे जाऊन उभी राहिली. सेल्फी, फोटो वैगेरे काढू लागली. त्यांचे मोबाईल डेड झाले होते तर माझ्या कॅमेराने त्यांनी ९५ फोटो काढले! अजूनही मोर परतला नव्हता. बसमध्ये कपडे बदलावे तर बसला पडदे नव्हते. बसचा ड्रायव्हर म्हणतो की सतत कोणा ना कोणाचा मोबाईल बसमध्ये वाजत होता. परत जय मल्हारला जाऊन कपडे बदलले. माझ्या कपड्यांना बाथरूममधील मुताचा वास येत होता. घरी जाऊन वॉशिंग मशीनमध्ये न धुता स्वतंत्रपणे धुवावे लागले. चहा, भजी व

परत चहा झाला. हॉटेलवाल्याना संध्याकाळी वर गेलेल्या गटाची माहिती दिली. त्यांनी सांगितले की ते तिथूनच चहा पिऊन गेले होते. रात्री साडेसात – आठ वाजता निघालो. अडीच तासात मुंबई! सकाळपेक्षा लवकर पोहोचलो. गुगल वापरूनसुद्धा! पहिल्या व्यक्तीला कान्जुरमार्गला सोडले, दुसरीला आरे कॉलनीत! तेव्हा आयोजिकेने विचारले की “बस उडत नेता येईल का?” म्हणून. कारण हा सर्व कर्मचारीवर्ग एका इस्पितळात प्रयोगशाळा तंत्रज्ञ म्हणून कामाला होता. तेथील दिवसपाळीवाले कर्मचारी आपले काम आटोपून ९ वाजताच गेले होते. हे सर्व माझ्याबरोबर होते. १० वाजेपर्यंत इस्पितळात कोणी नाही व १ तातडीची केस येऊन दाखल झालेली! म्हणून ते घाई करत होते. शेवटी आम्हाला बोरिवलीला उतरून, बस सरळ इस्पितळापर्यन्त गेली.

४ ९ २०१६ रोजी गणेशचतुर्थीच्या आदल्या दिवशी हरतालिकेच्या दिवशी वाइंगणी गावास जायला निघालो. पहाटे ४ वाजता उठून जायची योजना होती. पण नेहमीप्रमाणे ६ वाजले. सकाळी थोरल्या भावाने टाटा सुमो माझ्या इमारतीसमोर आणली असता, आमच्या सार्वजनिक मंडपासाठी स्वागतासाठी बांबूची कमान उभारणारी मुले रस्त्यावर आडवे बांबू घालून बसली होती. तो प्रथम थांबला. तरी ते बांबू काढायला बघेनात. मग त्याने तशीच गाडी पुढे घेतली, तेव्हा ते भांडायला आले. पैसे मागायला लागले. नाही दिले! प्रवासाची व दिवसाची सुरुवात अशी झाली! मी, थोरला भाऊ व २ चुलतभाऊ गावाला निघालो. गुगल म्यापवर, मुंबई गोवा महामार्गावर प्रचंड गर्दी दिसत होती, म्हणून मुंबई पुणे एक्स्प्रेस्स हायवेवरून निघालो. टोल माफ पासवाल्याना फक्त एकच टोल माफ होता. बाकीचे पुढचे कोल्हापूरपर्यंत सर्व टोल होते. टोल माफ पासवाल्यांसाठी जास्त गर्दी होती. आम्ही टोल भरून लवकर निघालो. कोल्हापूरला गणपती घेऊन येणा-यांमुळे उशीर झाला तसेच आमच्या गाडीचा वेग कमी असल्याने, गगनबावड्याला चहा प्यायला थाम्बल्याने, वाटेत भाजी वैगेरे घेतल्याने रात्री पोहोचायला उशीर झाला. थोरल्या भावाच्या घरी जाण्यासाठी वाटेत गाडी ठेवून शेतातून गुडघाभर पाण्यातून चिखलातून टोर्चच्या प्रकाशात मैलभर चालावे लागते. जेवणाची ताटे घेतल्यावर लक्षात आले की वाटेत घेतलेल्या चपात्या गाडीतच राहिल्या. मी परत ती वाट तुडवत एकटाच गेलो. परत जाताना बाजूने कोणीतरी प्राणी चालतोय असे वाटत होते, पाण्यात राणा टायग्रीना (हिरव्या पिवळया बेडकाचे शास्त्रीय नाव), खेकडे, वेगळ्याच प्रकारचे पाण्यात पोहोणारे बीटल्स पायाजवळ येत होते. टोर्चच्या प्रकाशावर अनेक प्रकारचे पतंग, डास, माशा,

कीटक झडप घालत होते. 5 9 16 दुसऱ्या दिवशी सकाळी परत त्याच मार्गाने जाऊन गाडी काढून गावातल्या एका शेजाऱ्याकडून ग्यास सिलिंडर व पीठ, दुध, साखर, चहा इत्यादी सामान घेऊन आलो. मूळ घरात गणपतीदर्शनासाठी गेलो. कासची फुले आमच्याकडे सुद्धा! रात्री शेजारच्यांकडे गणपतीला जाऊन

आलो. (6 9 16) तिसऱ्या दिवशी सकाळी मालवणला गेलो. गाडी लावल्यावर रिक्षावाले सांगायला आले की त्यांची रांग वाढली व मोठी गाडी आली तर तुम्हाला गाडी काढायला जमणार नाही. मला बसवून ठेवून थोरला भाऊ व थोरला चुलतभाऊ गेले. मी ताण तणावाखाली! उकाडा वाढत होता व बरोबर अशा वेळी मला लघवीला जोरात होते. ते परत येऊन गाडी काढली तरी

रिक्षावाल्यांची रांग काही आमच्यापर्यंत पोहोचली नाही. सिंधुदुर्ग नगरी आर.टी.ओ. ला (गाडीच्या नूतणीकरणासाठी) गेलो. तर गाडीचा वीमा व छायाप्रती काढण्यासाठी कुडाळ शहरात जावे लागले. परत आलो तर अधिकारी निघण्याच्या बेतात होते. पण आमच्यासाठी थांबून त्यांनी सह्या केल्या. तरी संगणकात नोंद करण्यासाठे अजून एक दिवसा आड येण्यास सांगितले. पण त्यांनी काम वेळेत केले. आडकाठी केली नाही. अतिरिक्त पैसे मागितले नाहीत. सिंधुदुर्ग नगरी आर.टी.ओ.ला सलाम! परत

येताना मालवणला थांबलो. खरेदी केली. आमच्या घरात जाऊन आलो. वायंगणीला घरी पोहोचल्यावर आमच्या दुसऱ्या घरातल्या दीड दिवसाच्या गणपतीचे विसर्जन केले. मावसमेहुणी, भाचे व मेहुणीच्या वडलाना घ्यायला सरपंचांच्या घरी गेलो. त्यांची रिक्षा सोडायला लावली. आमच्या गणपतीकडे त्याना घेऊन आलो. सर्वात थोरल्या चुलत चुलतभावाला व ह्या सर्वांना घेऊन आचऱ्यामार्गे पोयऱ्याला त्यांच्या घरी गणपतीला गेलो. रात्री उशिरा परत आलो. त्या मार्गावरून चालत परत थोरल्या भावाच्या घरी! (7 9 16) चौथ्या दिवशी परत आर.टी.ओ! १० मिनिटात काम ओ.के! संध्याकाळी गावातच केस कापले. स्वस्त व मस्त! (8 9 16) पाचव्या दिवशी मुंबई! निघायलाच १०.३० वाजले! भावाने आचऱ्यावरून मासे घेतले. कणकवलीत बर्फ व थर्माकोल प्याकिंग घेतले. आल्टरनेटरचा १ भाग नवीन घेतला. तरीही चिपळूणला ब्याटरीचा इंडिकेटर सतत दिसायला लागला. जनरेटर ते ब्याटरी वायर सोकेट लूज झाल्यामुळे जनरेटर ब्याटरीला चार्ज करू शकत नव्हते. म्हणून ब्याटरी उतरत चालली होती. न बंद करता गाडी चालवत गेलो. महाडला विसाव्याला चहा प्यायला गेलो तर गाडी तशीच चालू. चावी काढताच येत नव्हती. पुढे ट्रकच्या पाठीमागे गाडी ठेवून द्यायची. ट्रक ४० च्या वेगाने तर आम्हीसुद्धा ४०, ट्रक ६० तर आम्हीसुद्धा ६०. पाली- खोपोलीच्या रस्त्यावर जायची हिम्मत होत नव्हती. गाडी बंद पडली तर कोणी मदत करायला थांबणार सुद्धा नाही. रात्री १२ वाजता मागाठाणेच्या पेत्रोल्पम्पावर होतो.

11 9 16 रोजी पनवेलला धाकटया भावाच्या नवीन घरी गणेशपूजनाला निघालो. आम्ही (मी, पत्नी, 2 चुलतभाऊ) वाशीला पोहोचलो तरी तो, थोरला भाऊ, वहिनी, पुतण्या चारकोपच्या घरातून निघाले नव्हते. त्याच्या सासरचे पार्ल्यावरून निघाले नव्हते. प्रथम फक्त असे ठरले होते की फक्त घर उघडायचे, कलश ठेवायचा, नारळ वाढवायचा व नमस्कार करून निघायचे. मग आयत्या वेळी गणेश पूजन करायचे ठरले. अचानक ओर्डरी सुटल्या व आमचा मोर्चा वाशीला वळला. वाशीला अपना बाझार मध्ये जाऊन खरेदी केली. ग्यास सिलिंडर (छोटा), शेगडी, भांडी, मसाला दुध बनवण्यासाठी दुध, साखर, ताटे व ग्लास प्ल्यास्टिकचे, पूजेसाठी कलश, द्रोण इत्यादी सामान वाशीला विकत घेतले. नाश्ता करून पनवेलला पोहोचेपर्यंत हे सर्व आलेले! पूजा, जेवण आटोपून परत निघालो तर थोरल्या भावाची गाडी बिघडली. स्त्रीयांना चुलत भावाच्या गाडीत बसवले. धाकट्या भावाच्या सासरचे दुसऱ्या गाडीतून पार्ल्याला गेले. मी, थोरला चुलत भाऊ व पुतण्या चालत निघालो. थोरला भाऊ व अजून १ जण गाडी दुरुस्त करायला थांबला. मी व पुतण्या एका बोरिवलीला जाणाऱ्या एस.टी.त चढलो व चुलत भाऊ सायनमार्गे दादरला जाणाऱ्या एस.टी.त चढला. माझ्याकडे फक्त एस.टी.चे तिकीट काढण्यापुरतेच पैसे शिल्लक होते. कांदिवली पुर्वेला पुतण्याला रिक्शा करून दिली व मी दुसरी रिक्षा पकडून घरी आलो.

24 12 2016 ला मी व माझे ४ मित्र, ते गाडीत व मी बाईकवर गोराई बीचवर गेलो होतो. येताना गोराई खाडीवर, लॉंचमध्ये बाईक घालून परतलो.

सिंधुदुर्ग जिल्हा प्रशासनाने सिंधुदुर्ग जिल्ह्याच्या मालवण तालुक्याच्या वायंगणी, तोंडवली, तांबडीसुर्ला व चौथे गाव कुठले ते आता मला आठवत नाही, तसेच वेंगुर्ला तालुक्यातील ८ गावे यांच्यासाठी १ योजना चालू केली. आमच्या गावच्या सरपंचानी ती योजना माझ्या थोरल्या भावास कळवली. योजनेत पर्यटन विभागाच्या उत्कर्षासाठी २५ लाख प्रत्येक लाभार्थीस बिनव्याजी परतफेडीच्या बोलीवर जाहीर केले होते व त्यासाठी २१ जानेवारी २०१७ पर्यंत प्रकल्प सादर करायचा होता. मी व माझा थोरला भाऊ त्याच्या चालकाबरोबर १५ १ २०१७ रोजी जिप्सी घेऊन निघालो. या जीप्सीचे वैशिष्ट्य असे की ही ४ चाकी गिअरवाली आहे, म्हणजे तिच्या मागच्या चाकांसाठी 2 गिअर्स वेगळे आहेत. जाताना वडखळ नाक्याजवळ थांबून ‘आमंत्रण’मध्ये व बाहेर पापड, तांदूळ, नाश्ता वैगेरे घेतला. पेणजवळ एका गावाला थांबून एका लाकडाच्या वखारीत जुने दरवाजे पाहिले. त्यात एका माशिदिचाही जुना दरवाजा होता. महाड ते पोलादपूर मधील उजवीकडच्या एका धाब्यावर जेवण घेतले. रात्री उशीरा वायंगणीच्या घरी पोहोचलो. केअर टेकरने चांगले जेवण बनवले होते, ते खाल्ले, तसेच आम्हीही कणकवलीतून जेवण विकत घेतले होते तेही खाल्ले. १६ जानेवारीला पहाटे ४ वाजताच कोंबडा आरवायला लागला. आमची झोप उडाली. पाच- साडे पाचलाच चहा पिऊन समुद्रकिनाऱ्यावर फिरायला निघालो. समुद्रकिनारा माझ्या घराला लागुनच आहे किंवा आमच्या माडाच्या बागेचा दरवाजा चौपाटीवरच उघडतो. आमच्या माड बागेच्या काळजी वाहकाने हातात १ काठी घेऊन जायला सांगितले. कुत्र्यांसाठी! ४-५ कुत्रे एकदम अंगावर आले तर ती १ काठी कशी काय पुरणार? बरे! चौपाटीवर फोनही लागत नाही. कोणाला हाक मारावी तर तीही ऐकू जाणार नाही. शेवटी अंधारातच कुत्रे यायच्या आत

परतलो. एक व्यक्ती काहीतरी शोधत जाताना दिसली. चौकशी करता कळले की गावकरी बोटीतून काही वाहत आले का ते शोधतात व बाजारात विकतात. घरी एअरटेलला रेंज नाही. आयडिया चालत नाही. वोडाफोन, ट्रम्प घराच्या पश्चिम भागातच फक्त काम करतात. सकाळी चालकाला घरी ठेवून काकाच्या घरी गेलो. तिथून ग्रामपंचायतीचे कार्यालय! बाहेर ‘मागेल त्याला शेततळे’ ची योजना लावली होती. तिची चौकशी केली. बाहेर नोटिस लावली होती, पण आतल्या कर्मचाऱ्यांना त्याची कल्पना नव्हती. तिथून तलाठ्याचे कार्यालय! त्यानंतर सिंधुदुर्गनगरी! जिल्हाधिका-यांची इतकी मोठी इमारत आहे व त्यात एवढे उपविभाग आहेत की आपल्याला पाहिजे असलेले कार्यालय शोधताना नवखी व्यक्ती कंटाळून परस्पर निघून जावी असा यांचा अन्तस्थ हेतू असावा. तरीही आमच्या अशिक्षित काळजीवाहकाने (घराचा केअरटेकर) त्याचे काम करण्यासाठी योग्य ती व्यक्ती पकडून त्याची अडचण सोडवली होती. आम्हाला तेथील अधिकाऱ्याने सांगितले की अर्जासोबत प्रकल्पाचा अहवाल पण जोडावा लागेल. आम्ही फक्त अर्ज आणला होता. प्रकल्प तर माझ्या घरी (मुंबईला) डेस्कटॉपवर होता. बरे, एवढ्या मोठ्या सिंधदुर्ग नगरीत सरकारी कार्यालयात वाय फाय प्रणाली सुद्धा नाही. आमची टाटा डोकोमो डोंगल, एअरटेल ४ जी हॉटस्पॉट इथे काम करत नाहीत. माझ्याजवळ कॉम्पबुक, थोरल्या भावाकडे ल्यापटोप असूनही त्याचा इथे काही उपयोग नाही. गाडी काढली व मालवण गाठले. जाताना माझ्या मुलाला मुंबईत फोन! महाविद्यालयात जाण्यापूर्वी, त्याने ‘रार’ फाईलमध्ये मला माझे कागदपत्र पाठवून दिले. आता उघडायचे कसे? मग त्यानेच उपाय सुचवला. ‘विनरार’ याप डाऊनलोड करायचा. तेही समजेना! मुंबईतील पुतणीकडून अख्खा प्रकल्प यायला अजून वेळ होता. आम्ही मालवणला पोहोचेपर्यंत

मुलगा महाविद्यालयात निघून गेला. आता संध्याकाळपर्यंत तोही उपलब्ध नाही. एकही सायबर कॅफे चालू नाही. मालवणमध्ये सर्व दुकाने दुपारी १ ते ४ बंद. फक्त विजया बेकरी, गाड यांचे काजूगर विक्रीचे दुकान, काही फुटकळ इतर दुकाने व काही परप्रांतीयांची दुकाने मात्र चालू! 'सुनीता' खानावळीत जेवण घेतले. तिथून मावशीकडे मेढ्यात गेलो. तिच्या घरी बसून कॉम्पबुक उघडून बसलो. थोरल्या भावाच्या ल्यापटोपचा काहीही उपयोग नव्हता कारण त्यात पेनड्राईव्ह टाकायला युएसबी पोर्टच नव्हता. प्रथम त्या 'रार' फाईल्स उघडायचा प्रयत्न केला. पण माझ्या कॉम्पबुकमध्ये 'विनरार' प्रोग्रामच नव्हता. शेवटी माझ्या संगणक हार्डवेअर अभियंत्यास मुंबईला फोन लावला. त्याने, त्याला इमेलवर त्या फाईल्स पाठवून द्यावयास सांगितले. मावशीकडून चहा पिऊन व तिने रात्रीसाठी बनवलेल्या चपात्या घेऊन आम्ही ४ वाजल्यानंतर बाजारातील एक फोटोग्राफर गाठला. त्याने माझ्या क्यामेरातील फोटो डेवलप करण्यात असमर्थता दर्शविली. तिथून दुसरीला (फोटो स्टुडिओ) गाठले. तिने आमची ४० छायाचित्रे कोल्हापूरला पाठवून स्वस्तात विकसित करून आणण्यास अनुकुलता दर्शविली. तिच्याकडे व्होट्सयाप, जीमेल वैगेरे काहीही चालू नव्हते. फक्त 'शेअर इट'वर ती कामे करत होती. तिथून निघायला आम्हाला उशीर झाला. मालवणच्या आमच्या घरी आम्ही जाऊ शकलो नाही. मावशीचा निरोप घेऊन व अजून १ चहा ढोसून आम्ही आचरा गाठले. तिथे औषधे व पाण्याचा २० लिटरचा पाण्याचा बाटला घेऊन वायंगणीत मित्राचे (आमचा वायंगणीतील प्रतिनिधी) घर गाठले. ग्रामसेविकेच्या घरी जाऊन आलो. १७ जानेवारीला पहाटे कोंबड्याच्या आरवण्याने जाग आली पण कुत्र्यांच्या भीतीने चौपाटीवर फिरायला जायची हिम्मत दाखवली नाही. सकाळी काळजीवाहक, समुद्राचा सकाळचा उपयोग

करायला गेला असताना (घरात सर्व काही आहे पण गावक-यांच्या पिढ्यानुपिढ्यान्च्या सवयी सुटत नाहीत) मीही एअरटेल ४ जी हॉटस्पॉटला रेंज मिळावी म्हणून कोम्पबूक घेऊन व दुसऱ्या हातात काठी घेऊन (कुत्र्यांसाठी) त्याच्या सोबतीने चौपाटीवर गेलो. पण हॉटस्पॉटला चार्ज केले नसल्याने त्याचा काही उपयोग झाला नाही. शेवटी चालकाला घरी ठेवून काकांचे घर, ग्रामपंचायतीचे कार्यालय, तलाठ्याचे कार्यालय असे करत मालवणला सायबर कॅफेत गेलो. १ वाजता बाहेर पडून ‘अरुण’ भोजनालयात जेवून मावशीकडे गेलो. चहा पिऊन, चपात्या घेऊन परत सायबर कॅफेत गेलो. साडेतीनला जाण्याचा मूर्खपणा केला. या वेळेला सर्व मालवण बंद! (वामकुक्षीच्या बाबतीत आम्ही पुणेकरांपेक्षा सुशेगात!) सायबर कॅफे बंद असल्याने बाजारात जाऊन आलो. सायबर कॅफेतून (उघडल्यावर आमचे काम झाल्यावर) वायंगणी! देवव्रत पाटलाचे घर! मग आमच्या घरी! आजही मालवणच्या घरी जायला जमले नाही. आज १८ जानेवारी- ‘फोटोग्राफर’ फोटो देणार अशी बोलली होती. इथला बोका सकाळी स्वत:हून उडी मारून मांडीत येऊन बसला. मी त्याला जेवण देत नाही तरी लाडात यायचा! रात्री पांघरुणात येऊन झोपायचा! याचे वैशिष्ट्य असे की हा रोज रात्री एका उंदराला पकडून आणायचा. त्याला खेळवायचा! उंदीर मेल्यानंतर त्याला खायचा मात्र नाही. खायला त्याला आमचे कॅट फूड लागायचे. एकदा उंदीर मारल्यानंतर तो उंदीर न खाता त्याला बघत बसला. म्हणून त्या मेलेल्या उन्दराशेजारी त्याचे कॅट फूड ठेवले. तर तेही खायला तयार नाही. शेवटी उंदीर उचलल्यावर त्याने ते कॅट फूड खाल्ले. आधी सकाळी आचऱ्याला गेलो. पोयरा शाळा क्र. २ च्या स्टोपवर उतरलो. भाऊ पुढे लाकडे घ्यायला गेला. कालपर्यंत वायंगणी शेतीची (दुबार शेती) कामे चालू असल्याने मित्राला वेळ नव्हता तो आज

आ
ला
हो
ता.
पोय
ऱ्या
च्या
पुढून
एका



गावातून लाकडे आमच्या स्वयंपाकघर व डायनिंग हॉल बनवण्यासाठी आणायची होती. मी पोयऱ्याला पाहुण्यांकडे चालत गेलो. बघतो तर घराचा दरवाजा बंद. अरे बापरे! आता काय करायचं? आता थोरला भाऊ परत येईपर्यंत वेळ कसा काढायचा? पण काका मागच्या परसदारी काम करत होते. काकी आचऱ्याला दवाखान्यात गेली होती. थोरल्या भावाचा फोन आल्यावर परत निघालो. तेव्हढ्यात काकी रिक्षाने जाताना दिसली. तिला काकानी माझा पाहुणचार केल्याचे सांगितले. आज वायंगणीला जेवायला गेलो. संध्याकाळी मालवण! फोटोग्राफरला फोन करतो, तर उचलतच नव्हती. शेवटी कोळंब खाडीजवळ तिने आम्हाला फोटो आणून दिले. दुसऱ्या दिवशी आम्ही ते फोटो व्यवस्थित लावले व अर्ज व प्रकल्प सिंधुदुर्ग नगरीत नेऊन दिला. आदल्या रात्री कळले होते की आमचा लाकडे आणणारा त्र्याक्टरच्या मागचा भाग (माल वाहून न्यायचा भाग) पोयऱ्याच्या पुढे उलटला होता व लाकडे जंगलात पडली होती. उचलायला कामगार नव्हते. दुसऱ्या दिवशी सकाळी ६ आसनी रिक्षाने मजूर पाठवून दिले. आम्ही मालवणमार्गे सिंधुदुर्ग नगरी

गाठली. एकही सायबर कॅफे नाही. एका देवळाच्या आवारात एक संगणक असलेले दुकान! तिथे माझ्या पेन ड्राईवमधील फोन्ट दिसत नाही. परत तिथे बसून अर्ज टाईप करून घेतला आणि डेड्लाइनच्या आत प्रकल्प सबमिट (प्रस्तुत) केला. दुपारी आचऱ्याच्या वखारीवर जाऊन लाकडे कापून घेतली. २ दिवस आमच्याकडे बौद्धवाडीच्या विहिरीजवळ केदार शिंदे दिग्दर्शित 'रेडयो' चित्रपटाचे शूटिंग (चलचित्र चित्रीकरण) चालू होते. मी तिथे थांबून फोटो काढायला लागलो तर त्यांनी मला फोटो काढू दिले नाहीत. एक्स्ट्रा कलाकार म्हणून आमच्या गावकऱ्यांनीच कामे केली होती. शेवटच्या दिवशी सकाळी मालवणच्या घरी सुताराला घेऊन गेलो व वासे दाखवले. (२१ १ १७ रोजी) दुपारी चालकाबरोबर आचऱ्याला आलो. थोरला भाऊ सायबरकॅफेत शेततळ्याचा अर्ज करायला बसला व आम्ही पोयऱ्याला पाहुण्यांकडे परत जाऊन आलो. २२ जानेवारी २०१७ रोजी काकांच्या घरी जाऊन ग्राम्सेविकेला भेटून सकाळी ११ वाजता आचरा सोडले व रात्री १२ वाजता मुंबईला घरी पोहोचलो.

23 2 2017 रोजी गुरुवारी दु. ४.३० वाजता पत्नी, मुलगा, मावस मेहुणी व भाच्यासह माझ्या टाटा इंडिकाने चालक भाड्याने घेऊन पुण्यास जावयास निघालो. पुण्याला रात्री येरवड्याला दुसऱ्या मावस मेहुणीच्या घरी मुक्काम केला. २४ २ १७ रोजी शुक्रवारी पहाटे ६.३० वाजता पुणे सोडले. कोल्हापूर मार्गे कणकवली गाठले. चालकाला खाजगी बसचे तिकीट काढून देऊन मी गाडी चालवून वायंगणी गाठली. शेवटच्या टप्प्यात मुलाने गाडी चालवली. संध्याकाळी मुलाने कंटीन्यूअस शॉट लावून सूर्यास्ताचे समुद्रकिनाऱ्यावर फोटो काढले. केअरटेकरने बनवलेले जेवण जेवून अमावास्येच्या रात्री मुलाने (वय २० वर्षे) स्ट्याण्डवर क्यामेरा लावून तारकांचे चलचित्रण केले. रात्री आमचा बोका बिचकत बिचकत माझ्या पांघरुणात येऊन झोपला. २५ २ १७ रोजी शनिवारी सकाळी उठून लवकर प्रातर्विधी आटोपून कुडाळमार्गे पेडण्याला आमच्या कुलदेवतेच्या भगवतीच्या दर्शनाला गेलो. गाऱ्हाणे घालून झाल्यावर म्हापसा गाठले. जाताना २५० रुपयाचा टोल भरावा लागतो. येताना तीच पावती जपून ठेवा म्हणून सांगतात पण प्रत्यक्षात बघत नाहीत. ‘गूगल’ला सांगितले म्हापशाला घेऊन जा. तर त्याने शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी उभे केले. तिथे जवळपास कुठलेही हॉटेल, रेस्टोरट, खानावळ, दुकान, त्र्याव्हेल एजंटची कचेरी वैगेरे काहीही नव्हती. परत त्याला म्हापसा बस स्थानक सांगितल्यावर तो योग्य जागी घेऊन गेला. गाडी लावल्यावर शाकाहारी जेवण कुठे मिळेल (शनिवार) असे विचारल्यावर एका स्त्रीने एका अन्नपूर्णा खानावळीचा पत्ता सांगितला तो एका इमारतीच्या चौथ्या व ५ व्या मजल्यावर होता. चौथ्या मजल्यावर एसी व ५ व्या मजल्यावर नॉन एसी शाकाहारी व मांसाहारी बार व रेस्टोरंट होते. शुद्ध शाकाहारी गोव्यात मिळत नाही. ५ व्या मजल्यावर बारचे वातावरण दिसल्यावर, त्याना आधी विचारले इथे जेवण

मिळते ना! मगच जेवायला बसलो. पत्नीने मासे अनोळखी असल्याने शाकाहारीचीच निवड केली. मी मुळातच शाकाहारी असल्याने जे समोर आले ते मुकाट्याने गिळले. जेवण तयार व्हायला वेळ लागला. त्रावेल्लिंग एजंटकडे चौकशी केल्यावर इथून दक्षिण गोव्यात घेऊन जाणारा एकच टूर ऑपरेटर असल्याचे कळले. टूर बुक करण्याआधी सिरसाट लॉजमध्ये रविवारसाठी ३ बिछांन्यांची खोली नोंदली. व्यवस्थापकाने आमच्याकडून जमा रक्कम घेतली व प्रत्यक्षात आल्यावर भाड्याव्यतिरीक्त इतर रक्कम परत करण्याचे आश्वासन दिले. मग आम्ही परत त्रावेल्लिंग एजंटकडे जाऊन तिसऱ्या दिवशीची म्हणजे सोमवारची दक्षिण गोव्याची सहल नोंदली. तिथून आम्ही मालवणला आलो. जेवून मावशीकडे गेलो. मावशीकडून रॉक गार्डनला व नंतर राजकोटावर गेलो. परत जाताना अरुण भोजनालयातून माशांचे पार्सल घेऊन वायंगणी गाठली. रात्री परत मुलाने तारकांचे फोटो काढले. आज बोका माझ्याकडे न येता पत्नीस व मावस मेहुणीस त्रास देत होता. रविवारी (२६ २ १७) रोजी सकाळी मुलाबरोबर वायंगणीच्या येळेवर (किनाऱ्यावर) गेलो. दुपारी

आचऱ्याला 'शिव रामेश्वर टरावेल्स' या गाडीत मुलाला बसवून आम्ही कणकवलीमार्गे म्हापशा गाठले. निघण्यापूर्वी माझी गाडी वाळूत अडकली होती. त्यापूर्वी १ टेम्पो आमचे फर्निचर घेऊन पेणवरून आला होता. त्याच्या चालकाने ती काढून दिली. तेवढ्यात गावातले काही पाहुणे चौपाटीवर फिरायला आले असल्याने त्यांनी ती गाडी उचलायला मदत केली. या घडामोडीत गाडीची ब्याटरी जागेवरून हलली होती. म्हापशाला वाहनतळावर गाडी लावत असता ब्याटरीतील पाणी संपल्यामुळे गाडी मध्येच बंद पडली. तेथील उभ्या असलेल्या चालकाच्या व वाहनतळावर भाडे घेणाऱ्या

कर्मचाऱ्याच्या मदतीने गाडी जागेवर लावली. आज रविवार असल्याने म्हापसा बंद. ब्याटरीचे दुकान बंद! गाडी उघडून बघत असता कोल्हापूरवरून आलेला १ चालक तिथे मदतीला आला. पेट्रोलपंपावरून ब्याटरीचे पाणी विकत घेऊन त्याच्या सहाय्याने ते भरले. गाडी चालू केली. नंतर लॉजवर गेलो. खोली ताब्यात घेतली. जमा केलेली अतिरिक्त रक्कम परत घेतली व बाजारहाट करायला खाली उतरलो. म्हापसा बंद! रविवार हा खरा म्हणजे पर्यटनाचा दिवस! गोव्यात पर्यटनापेक्षा सुट्टी महत्वाची! (व्यवसायापेक्षा आराम महत्वाचा! सुशेगात!) छोटी हॉटेल्स बंद! दुकाने बंद! रस्त्यावरचा बाजार चालू. एक बेकरी चालू होती. वाटेत गोळी पाव विकणारे विक्रेते उभे होते. १ हॉटेल चहा प्यायला उघडे होते. खायला फक्त तळलेली मिरची उपलब्ध होती. १० वर्षाच्या भाच्याला ती कशी खायला द्यायची? फक्त बेकरीतील प्याटीस देऊन त्याची भूक भागवली. २ शोर्टस विकत घेतले. एक २४ तास चालू असलेले स्टेट ब्यांकेचे एटिएम उघडे होते. त्यातून पैसे काढले. जेवण्यासाठी फक्त १ चायनीजचे दुकान कम हॉटेल चालू होते. आम्ही जेवायला बसलो असताना अनेक उघडे परदेशी बाहेर रस्त्यावर बसले होते. वरच्या मजल्यावर आतमध्ये, ६-७ मुलांचे टोळके जेवायला येऊन बसले. त्याना दारू देण्यात आली. वर फलक होता ‘इथे दारू पिण्यास मनाई आहे’. संपूर्ण गोव्यात सिगारेट प्यायला, गुटखा, मावा खायला, कचरा टाकायला मनाई आहे. इथे सुका कचरा व ओला कचरा टाकायची वेगवेगळी व्यवस्था आहे. तरीही आम्ही त्रावेल्लिंग एजंटकडे चौकशी करत असता एक परदेशी मुंबईसाठी बसचे तिकीट काढायला आला तर तो सिगारेट पीत होता. परदेशी गिऱ्हाईकाना सर्व माफ आहे. रात्री शिरस्त्याप्रमाणे शतपावली करून झोपी गेलो. सोमवारी २७ २ १७ ला, सकाळी ८ वाजता खोली सोडायची

असल्याने ६.३० वाजता उठलो. तर नळाला गरम पाणीच नाही! आदल्या रात्री पोऱ्या सांगून गेला होता की दिवसभर नळाला गरम पाणी असते म्हणून! रिसेप्शन काऊन्टर 2ऱ्या मजल्यावर होते व आमची खोली तिसऱ्या मजल्यावर पार दुसऱ्या टोकाला! ६.३० वाजता नळाला गरम पाणी नाही. बेल वाजवली! कोणाचे उत्तर नाही! चालत खाली उतरलो! रिसेप्शन काऊन्टरवर अंधार, समोर १ माणूस झोपलेला! परत वर आलो! थंड पाण्याने आंघोळ केली. कपडे ठेवायला बाथरूममध्ये स्ट्याण्ड नाही. काल लक्झरी चार्जेस कसले घेतले ते कळले नाही. पत्नी उठली. ती काही थंड पाण्याने आंघोळ करायला तयार नव्हती. परत बेल वाजवली. प्रतिसाद नाही! परत चालत उतरलो. रिसेप्शन काऊन्टरवरील, पहाटेच्या व्यवस्थापकाने सांगितले दुसऱ्या नळाला पाणी आहे म्हणून. डावीकडचा की उजवीकडचा ते कळले नाही. दोन्ही पाळीपाळीने चालू करून पाहिले. गरम पाणी नव्हते. परत बेल वाजवली! परत प्रतिसाद नाही. परत खाली उतरलो! त्याना बरोबर वर यायला सांगितले. ते निघाले. मी वर चाललो तर ते दुसऱ्या खोलीत गेले. तेथील २ वृध्द व्यक्तींसाठी चहा घेऊन परतले. मी खाली उतरून परत त्याना विनवणी केली. त्यांनी त्यांच्या बॉयलरचा नळ चालू करून दिला. मी गरम पाणी एका बादलीत भरून घेतले. त्यांच्याकडे पोऱ्या नसल्याने व ते स्वत:ही यायला तयार नसल्याने मी ती गरम पाण्याची बादली उचलून दुसऱ्या मजल्यावरून तिसऱ्या मजल्यावरील शेवटच्या टोकावरील खोलीकडे गेलो. परत मावस मेहुणीसाठी व भाच्यासाठी दुसरी बादली खालून भरून आणली. त्यांनी बिचा-यांनी, एकाच बादलीत दोघांनी आंघोळ केली. नंतर चहा द्यायला (नाश्ता नाही) तो व्यवस्थापक वर आला. परत न्यायलाही आला. त्याचे पैसेही त्याने वसूल केले. याच ‘सिरसाट’ लॉजमध्ये २३ वर्षांपूर्वी मी माझा

मधुचंद्र साजरा केला होता. कमीतकमी २३ वर्षांचा अनुभव असलेले हे लॉज अजूनही सुधारायला तयार नाही! सामान गाडीत आणून टाकले. काल बंद असलेले उडुपी हॉटेल आज चालू होते. नाश्ता केला! जवळच १ सार्वजनिक प्रसाधनगृह आहे. लघवी करायलाही ५ रुपये घेतात. मुंबईही एवढी महाग नाही! परवाच्या त्रावेल्लिंग एजंटकडे गेलो व आम्ही आल्याचा रिपोर्ट केला. थोड्या वेळाने आमची १९ सीटर बस दूर थांबलेली दिसली. आम्ही चौकशी केली असता ती बस आमच्यासाठीच थांबली असल्याचे कळले. त्यांनी पणजीला शेवटचा प्रवासी गाडित घेतल्यानंतर व आमचे सर्व भ्रमणध्वनी क्रमांक लिहून घेतल्यावर, आम्हाला मार्गदर्शन करायला सुरुवात केली. सुंदर 'मार्ग'दर्शन! प्रथम सर्व नियम सांगितले! गाडी कोणासाठीही थांबणार नाही असे सांगितले व एकदा असे करूनही दाखवले. दिवसभराच्या प्रेक्षणीय ठिकाणांची प्रवेश फी आमच्याकडून घेतली. गोव्यात पाळावयाचे सर्व नियम सांगितले. काय काय महाग व काय काय स्वस्त तेही सांगितले. गोवेकरांचे ३ फ ही सांगितले- फिश, फेणी व फुटबॉल! प्रथम आम्हाला दक्षिण गोव्यातील, पणजीतील घरे, मांडवी नदी, तिने गोव्याचे २ जिल्ह्यात पाडलेले भाग (उत्तर व दक्षिण), नदीवरील पूल, नदीतील क्रुझ, समुद्रकिनारा लांबून दाखवून, माहिती देऊन येथील विज्ञान विषयक वस्तुसंग्रहालय दाखवले! तिथे आमच्या काजुविषयक माहिती मिळाली, जे आमच्याकडे पिकत असूनही आम्हाला नव्हती. प्रथम येथील जागतिक तापमान वाढीविषयक ३ डी शो दाखवला. त्यानंतर वेगात विविध दालने दाखवली. परत बसमध्ये बसल्यावर जाताना पणजीतील असा संरक्षित भाग दाखवला जिथे आपल्याला (गोव्याबाहेरील

लोकांना) घरे घेता येत नाहीत किंवा तेथील बांधकामात बदल घडवता येत

नाही! (आणि लोक म्हणतात, काश्मीरमध्येच फक्त वेगळा कायदा होता!) नंतर बॉन जीसस गिरिजाघर व से कॅथेड्रल चर्च + वास्तुसंग्रहालायापर्यंत सोडले व परत घेतले. तोपर्यंत आमच्या भ्रमणध्वनी क्रमांकांची यादी त्यांनी हरवली होती, ती परत घेतली. नंतर वेगात मेणाच्या पुतळ्यांचे प्रदर्शन पाहिले! त्यात आपल्याकडच्या व्यक्तीमत्वांबरोबर, परदेशी शास्त्रज्ञ, संगीतज्ञ व फ्लोरेंस ऑफ नाईटयांगल सारखी व्यक्तिमत्वे तसेच व्यसनांचे दुष्परिणाम, भ्रष्टाचाऱ्यांबद्दल दृश्येही होती! नंतर विनोदी वाटणारा हॉरर अनुभव घेण्यासाठी एका दालनात शिरलो व बाहेर आलो! जाताना एका दुकानात परमिटसह (फक्त गोव्याबाहेर दारू नेण्याचे परमीट) फेणी व वाईन घेण्याची सोय होती. त्या आधी मार्गदर्शकाने फेणीचे औषधी उपयोग सांगितल्याने आम्हीही फेणी विकत घेतली होती. मंगेशीचे देऊळ पाहून झाल्यावर एका हॉटेलात जेवलो. शांतादुर्गेचे देऊळ पाहून (तोपर्यंत त्यांनी आम्हाला इसाई व हिंदू धर्मांविषयी, गोव्याच्या व भारतातील धार्मिक स्थळांविषयी एवढी माहिती दिली की नंतर कळले हा मार्गदर्शक तिसऱ्याच धर्माचा होता. सुंदर अभ्यास किंवा पाठांतर! मानायला पाहिजे!) व भर दुपारी ४.३० वाजता कोलवा चौपाटी पाहून (आमची वायंगणीची चौपाटी याहून लाखपटीने चांगली व अस्पर्शित आहे.) आम्ही परतीच्या वाटेवर निघालो. त्यांनी आम्हाला पणजीवरून दुसरी बस करून दिली. म्हापशाला सोडल्यावर माझी कार चालू अवस्थेत होती. तिथून मालवणला आलो. माझ्या आवडत्या सुनीती खानावळीत जेवलो. शिंपल्या पार्सल घेऊन वायंगणी गाठली. दुसऱ्या दिवशी सकाळी २८ २ १७ रोजी ६

वाजता धुक्यात मी, पत्नी व मेहुणी मोर पाहायला बाहेर पडलो. दत्ताच्या देवळात गेलो! मला १ मोर एका झाडावरून २ऱ्या झाडावरून उडत जाताना दिसला पण इतराना दिसला नाही. आम्ही चालकाला घेऊन आचऱ्याला गेलो. पत्नीचे बसचे तिकीट रद्द केले. रामेश्वराच्या देवळात गेलो. मावसमेहूणीच्या काकांकडे पोयऱ्याला गेलो. त्यांच्या माडाच्या बागेत गेलो. परत आलो! जेवलो आणि तिला व भाच्याला सोडायला आचऱ्याला गेलो. शिवरामेश्वर ऱ्यावेल्सच्या गाडीत त्याना बसवून वायंगणीत परत आलो. बुधवारी १ ३ २०१७ रोजी माझी गाडी तिथेच ठेवून थोरल्या भावाच्या व्हेंटोमधून मुंबईला परत आलो.

५ ५ २०१७ रोजी बोरिवली नॅन्सी कॉलनीतुन शिवनेरी पकडुन स्वारगेटला पहाटे 5 वाजता गेलो. पुणे मुंबई एक्स्प्रेस्स हायवेवर! सुपरमाइंड ट्रेनिंग!

मी ज्या शाळेत शिकवत होतो तेथील प्रयोगशाळा सहाय्यकाच्या मुलीचे लग्न १४ मे २०१७ रोजी भूमला (अहमदनगरच्या पुढे) होते. मी प्रथम आमच्या न्यांसी कॉलोनी एस.टी.स्थानकावरून एस.टी. पकडून जायचे ठरवले होते. पण कल्याणचे सहकारी म्हणाले आपण गाडी करून जाउया. प्रथम चुलतभावाच्या गाडीतून जायचे ठरवले. पण सहकारी वाढले, (पनवेलवाले!) म्हणून ६ सीटर ठरवली. ओला! शेवटी आले तिघेच. (पनवेलवाल्यांनी टांग दिली! 6 जणांचे भाडे 3 जणांत विभागावे लागले.) १३ मे २०१७ रोजी सकाळी बोरिवलीहून मी व चालक निघालो. घोडबंदर मार्गावर प्रचंड रहदारी! कल्याणला पोहोचेपर्यंत उशीर झाला. मुरबाडजवळ एका गावात नाश्ता केला व पेट्रोल भरले. दुपारी नाशिकच्यापुढे आडवाटेला जाऊन खाम्गावला एका सहकाऱ्याला (दुसऱ्या शाळेतील) बरोबर घेतले. मग परत ३ वाजायच्या सुमारास सिन्नरजवळ जेवलो. रात्री भूमला अजून २ सहकारी जांबवरून (बारामती जिल्ह्यातील) बाईकने आले होते, ते भेटले! वधूपित्याने आमची राहाण्याची व्यवस्था एका लॉजमध्ये केली होती. तिथे आम्हाला २ खोल्या दिल्या होत्या. एका खोलीत ३ जण व २ऱ्या खोलीत ३ जण! दुसरी खोली तपासून न पाहता नुसते सामान टाकून वधुपित्याकडे जेवायला गेलो. जेवून झाल्यावर गाडीचेच संगीत लावून नाचलो. पण त्यांची गाणी आधुनिक! (आम्ही कधीही न ऐकलेली!) मजा येईना! चालत लॉजवर निघालो. तेवढीच शतपावली! लॉजवर आल्यावर कळले, आमची एक खोली त्यांच्या २ऱ्या पाहुण्यांनी बळकावली होती. बाकीच्या सर्व खोल्या व वरची गच्ची दुसऱ्याच व्हराडाने ताब्यात घेतली होती. आमच्या खोलीत ५ पलंग व एकच पंखा चालू. भूमची कोरडी हवा व मे महिन्याचा उकाडा! ५ पलंग रांगेत लाऊन घेतले. डास हजर होतेच! रात्रभर झोप नाही. संडास अरारारारा ! एस.टी. चा

बरा म्हणावा लागेल. आधीच्या राहून गेलेल्यांनी पाणीच ओतले नव्हते. कसे ओतणार? पाणीच नव्हते. फ्लश नाही. टाकीच नाही. टमरेल म्हणून पाण्याची बाटली. कशीबशी भरायची व ओतायची. साबणाचा पत्ता नाही. बिच्छान्यावरील चादर बदललेली नाही. नवीन टॉवेल नाही. 14 5 17 रोजी सकाळी उठून चहा प्यायला व प्रातर्विधी करायला एस.टी. स्थानकापर्यंत गेलो. तिथेही कुलूप. अस्वच्छ मुतारी! आमचे सहकारी दिवसभर प्रातर्विधीशिवायच होते. मी थंड पाण्याने आंघोळ करून घेतली. प्रातर्विधी हॉलवर उरकले. मग वधूच्या घराकडे वरात घेऊन यायला व भर दुपारी भूमच्या चांदण्यात नाचायला! देवळापर्यंत जाऊन फटके उडवत हॉलवर! लग्न लावताना पुरुष खुर्च्यांवर व स्त्रिया सतरंजीवर! अक्षतांचा खच पायाखाली, शेतकऱ्याच्या लग्नात! जेवून निघालो, सहकाऱ्याना ड्रोप करत १५ तारखेच्या

रात्री घरी!

२४ 6 17 ला तापातून नुकताच उठलो होतो. तरी पेणला एका शाळेत ‘अभ्यास कसा करावा’ या विषयावर व्याख्यान देण्यासाठी चुलतभावाच्या गाडीतून गेलो.

1 7 2017 रोजी शिवाजी नाट्यमंदीर, दादर (प) येथे ‘सुपरमाइंड’साठी निवेदन करायला चाललो होतो. वाटेत माझ्यासमोर एक ‘ग्रीन बी इटर’ पक्ष्याचे पिल्लू खाली पडले. आता त्याला घेउन इस्पितळात जायला वेळ नव्हता. सकाळी सकाळी एखादा पशु वैद्यकीय खाजगी दवाखाना उघडा असण्याची शक्यता नव्हती. माझ्या भ्रमणध्वनीत एरवी ठाण मांडुन असलेले समाजसेवी संस्थांचे क्रमांक नव्हते. मित्राला फोन केला तर त्यालाही माहीत नव्हते. शेवटी बाजुला उचलुन ठेवला. वर 2 कावळे आम्ही कधी बाजुला होतो त्याची वाट बघत उभे होते. वाईट वाटले, पण काही करु शकत नव्हतो.

७ ७ १७ रोजी थोरल्या भावाच्या जीप्सीने वायन्गणीला निघालो. चालक अशी गाडी हाकत होता की माझे डोके छतावर आदळत होते. पेणला भरपूर पापड घेतले. भावाने तांदूळ घेतले. मध्येच थांबून एका लाकडाच्या वखारीत भावाने एक दरवाजा बघितला. परत येताना ९ ७ १७ रोजी वायंगणीत ‘नाईकां’च्या बंगल्याच्या खिडकीत शिंगचोच्या (Hornbill) दिसला. महाडजवळील जैन गुजराती पटेल रसोई हॉटेलमध्ये गुजराथी थाळी मिळाली. तिथे ट्यूबलाईटजवळ खूपच पतंग व माश्या होत्या.

२२ ८ १७ रोजी गणेशोत्सवासाठी वायंगणीला गेलो. २४ तारखेला धामापूरच्या तलावाजवळ भगवतीच्या देवळात गेलो. तिथून जाताना सिंधुदुर्गनगरीला भेट देऊन सावन्तवाडीला मावशीकडे गेलो. येताना परत सिंधुदुर्गनगरीला जिल्हाधिका-यांच्या कचेरीत गेलो. परिणामी २९ ८ १७ ला आर्किटेक्टचा सहकारी प्लॉट बघायला येऊन गेला. मी त्यावेळी चौथ्या घरात होतो. तिथून पहिल्या घरी आलो तर थोरल्या चुलतभावाने हळू आवाजात अशा स्वरात सांगितले की मला वाटले की ‘कोण गेले की काय?’ तर तो सांगत होता की माझ्या थोरल्या भावाने टाकोटाक बोलावलंय. “जेवत असलास तर हात धुवायला घरी ये!” मी ताणात! ‘घरी काय घडलय? काही वाईट बातमी तर नाही ना?’ मी धावत अर्ध्या मैलावरील माझ्या थोरल्या भावाच्या घरी निघालो. घरी जाऊन बघतो तर तो आर्किटेक्टचा सहकारी, दादा, पुतणी व आमचा काळजीवाहक तिसऱ्या प्लोटकडे गेलेत. तसाच तापत्या वाळूतून धावत निघालो, तर ते परतत होते. जेवण झाल्यावर परत दादाबरोबर ३ no. चा प्लॉट बघायला गेलो. लांबवर मोर दिसला! जवळ गेला तर तो उडून गेला. मध्यंतरी असाच दादा फिरत असताना १ लंगडणारा मोर दिसला. दादा त्याला हळूच पकडायला गेला तर मोराला आठवले, ‘अरे! आपल्याला उडता येते.’ दादाला कुठे उडता येत होते? 25 8 17 रोजी मुख्य घरात आरतीला! आज गणेश विसर्जन! देवव्रत पाटीलला बरे नव्हते. तरी गणेशविसर्जनाला तो आला होता. गावातील २० गणपती समुद्रकिनाऱ्यावर रांगेत बसवले होते. एकत्रच आरती वैगेरे झाली. आम्ही ३० ८ १७ ला मुंबईला परतलो.

२७ ९ १७ रोजी कोल्हापूरला जाणारी महालक्ष्मी ट्रेन पकडून कोल्हापूरला निघालो होतो. माझ्या समोरच्या सीटवर पुण्यापासून अंगणवाडीच्या मोर्चेकरी बायका मोर्च्यावरून परत निघाल्या होत्या. विना आरक्षण! टी.सी. आल्यावर त्यांनी फक्त मोर्च्यातून आलोय एवढेच सांगितले. T.C. काहीही न विचारता पुढे गेला. मला आमचा पूर्वीचा विद्यार्थी संघटनेचा मोर्चा आठवला. आम्हीही ट्रेनमध्ये T.C. ने विचारल्यावर “जो हमसे टकरायेगा! मिट्टीमें मिल जायेगा! कौन लायेगा देश में क्रांती? हर जोर जुलम की टक्कर में संघर्ष हमारा नारा है! संघर्ष हमारा नारा है, भावी इतिहास हमारा है! आवाsssज कुणाचा?” असे नारे द्यायचो. एकदा मुंबईला दादरला उतरल्यावर आमच्यातला एक कार्यकर्ता आपल्याच धुंदीत एकटाच पुढे चालला होता. T.C. ने विचारल्यावर त्याने पटकन “महात्मा गांधी की!” म्हटले. मागे वळून पाहतो तर “जय! म्हणायला किंवा पाठींबा द्यायला कोणीच नाही. दंड भरावा लागला की राव! इथेसुद्धा एक प्रवासी त्या स्त्रियांना म्हणाला “तुमच्याबरोबर आमचेही नाव सांगितले असते तर मला तिकीट काढावे लागले नसते ना!” त्या स्त्रिया म्हणाल्या “आधी नाही का सांगायचे?” खूप परिस्थिती वाईट आहे त्या स्त्रियांची! १० रुपयाचा चहाही शेअर करत होत्या. पण फेरीवाल्यां स्त्रियांकडून क्लिपा वैगेरे मात्र विकत घेत होत्या. काही बीड जिल्ह्यातून आल्या होत्या. पुणे ते कोल्हापूर, पोलीस आत येऊन खिडक्या बंद करायला सांगून गेले. रात्रीच्या वेळेस खिडक्यातून सामान लुटले जाते म्हणे! २८ ९ १७ पहाटे उतरायच्या आधी ३ सहप्रवाशांनी जे पुण्यात चढले होते, (त्यातील २ एकमेकांचे मित्र होते, त्यातील १ विमा प्रतिनिधी असून रात्री ३१ डिसेंबरला कसा भूकंप येणार ते गुगलच्या साहाय्याने सिद्ध करणारा [अजून तो भूकंप आला नाही ही गोष्ट अलहीदा!] व मला पोलिसी विकू पाहणारा! [मी 12 गावचे पाणी प्यालेला

माणूस, मी त्याला बधतोय व्हय! काहीतरीच आपल!]) व तिसरे एक नातू असलेले वृद्ध गृहस्थ होते, ते मला महालक्ष्मीच्या देवळाच्या बाजूला आंघोळीची व नंतर फिरण्याची व्यवस्था होईल का ते विचारात होते. मलाही ११ वाजता कोल्हापूरमधील पर्यावरणाच्या सरकारी विभागात जावयाचे असल्याने तोपर्यंत आंघोळीची व्यवस्था पाहिजे होती. त्यातल्या त्यात मी पूर्वी कोल्हापूरला दोनदा मुक्काम केल्याने व अनेक वेळां गावात जाताना येताना कोल्हापूर ओलांडल्याने (वासरात लंगडी गाय शहाणी या हिशोबात!) त्याना म्हणालो की "देवळाजवळील लॉजेसमध्ये फ्रेश होता येईल" असे सांगून त्याना घेऊन निघालो. स्थानकातच एक रिक्षाचालक आम्हाला अशा एका लॉजमध्ये घेऊन जातो असे म्हणाला. मुंबई स्थानकात एखादा रिक्षाचालक असा आत येऊ शकला असता काय? स्थानकाच्या दुसऱ्या टोकाला आंघोळीची व्यवस्था होती. विमा प्रतिनिधी तिथेच आंघोळ करुया असे म्हणायला लागला. मी म्हणालो विश्रांती घ्यायला देवळाजवळच जाउया! आम्हाला त्या लॉजला सोडून रिक्षाचालक निघून गेला. जाताना मधल्या दलालाला भेटायला विसरला नाही. लॉजचालकाने २ तासांकरिता १ खोली, स्नानगृह (सार्वजनिक) व प्रसाधनगृह बाहेरच्या बाजूस अशी, प्रत्येकी ५० रुपयात दिली. फ्रेश झाल्यावर मीसुद्धा यांच्याबरोबर देवळाच्या दर्शनाला गेलो. ११ वाजेपर्यंत वेळ घालवायला दुसरे काही साधन नव्हते. प्रथम पाठ्पिशवी ठेवण्यासाठी १ लॉकर घेतला २० रुपये भाड्याने व चप्पल ठेवण्याचा चार्ज (10 रुपये) वेगळा. वृद्ध गृहस्थ म्हणाले की त्याना वेगळा लॉकर पाहिजे, लवकर निघाले तर! मी सुद्धा वेगळा लॉकर घेतला. विमा प्रतिनिधी व त्यांचे मित्र दुसरीकडे अजून स्वस्तात (5 रुपयात!) चप्पल ठेवायला काही मिळते का ते पहायला गेले. (शेवटी पुणेकर!) मी व वृद्ध

गृहस्थ रांगेत शिरलो. तिथे काही अंतर मागे ते दोघेही आले. मी एकत्र सेल्फी काढला व देवळाच्या छायाचित्रासहीत कुटुंबाच्या गटावर टाकला. नवरात्राच्या ८व्या दिवशी माझ्यासारखा नास्तिक मनुष्य महालक्ष्मीचे सकाळी सकाळी रांग लावून दर्शन घेतोय असे बघितल्यावर कुटुंबियांच्या (चुलत-मावस) काहीतरी प्रतिक्रिया येतील असे वाटले. कसचे काय? वाईट वाटले. आतमध्ये दर्शन घेईपर्यंत विमा प्रतिनिधी व त्याच्या मित्राशी आमची ताटातूट

झाली. वृद्ध गृहस्थाबरोबर बाहेर येऊन मी न्याहारी केली. त्याना नातवासाठी प्ल्यास्टिक्चा गोगल वैगेरे घ्यायचा होता. तो घेतल्यावर त्याना 'राजवाडा' व 'रंकाळा तलाव' कोणत्या बाजूस आहे ते दाखवल्यावर मी रिक्षाने पर्यावरण कार्यालयाकडे गेलो. कार्यालय अजून उघडले नव्हते. म्हणून समोरच्या टपरीवर चहा प्यालो. रस्त्यावर एक उभी आडवी चक्कर मारली. शेवटी समोरच्या गार्डनमध्ये गेलो. तिथे एक स्तंभ होता. जवळ जाऊन बघतो तर ते एक स्मारक होते. त्यावर मराठी, पोलिश व इंग्रजी भाषेत मजकूर लिहिला होता व एक त्या काळातला वलीतम्बुन्चा नकाशा चित्रलिपीत होता. मजकूर असा होता, "इ.स. १९४३ ते १९४८ या कालावधीत (महायुद्ध) कोल्हापूर संस्थानाने पोलंड देशाच्या ५००० निर्वासित नागरिकाना वळीवडे येथे जो आश्रय दिला, अंत:करणपूर्वक आदरातिथ्य केले त्याबद्दल मनपूर्वक धन्यवाद! अखिल जगतात विखरलेले आम्ही, भारतातील स्नेहपूर्ण सद्भावनात्मक सहकार्याचे सातत्याने स्मरण करतो. इ.स. १९९८ साली आमच्या निर्गमनाला ५० वर्षे पूर्ण होत आहेत. भारतातील पोलस संघटना!" ह्याच्या बाजूला बसुनसुद्द्धा एक सेल्फी मी गटावर टाकला. पण आमचे कुटुंबीय ते न बघता फक्त 'मला सेल्फि कसा

काढावा’ या विषयी मार्गदर्शन करत होते. तिथून माझे काम पूर्ण करून मी एस.टी. पकडायला रिक्षाने गेलो. त्या रिक्षाचा मीटर जोरात होता. उतरल्यावर पण तो चालू होता. तेथील ट्राफिक हवालदाराला सांगितले. तो बघायला येईपर्यंत हा पळून गेला होता. एस.टी. पकडून ओरसचे तिकीट काढले. दुपारी २ वाजता गगनबावड्याला गाडी जेवणासाठी थांबली. वडा खाताना धाकधूक होत होती की पोटात मळमळणार तर नाही ना? एस.टी.च्या चालक वाहकांची दया येते, अशा छोट्या स्थानकात जिथे प्रात:र्विधीचीही सोय नाही, एक ताटभर भातात सोडा न घातलेले जेवणही मिळत नाही, शुद्ध पाणी नाही व बाहेरच्या घाणेरड्या तेलात तळलेले पदार्थ खाऊन हे कसे काय आरोग्य संभाळत असतील? संध्याकाळी ५ वाजता कणकवलीला पोहोचलो तेव्हा ढगफुटीसारखा पाउस पडत होता. ६ वाजेपर्यंत सिंधुदुर्गनगरी गाठणे शक्य नव्हते. तिथेच उतरलो. स्थानकात छत्रीही नव्हती. (दुसऱ्या दिवशी मालवणची मावशी म्हणाली सुद्धा! "छत्री नाही का आणायचीस?" "आता मुंबईला कुठे पाऊस होता? कोकणात असा पाऊस लागेल याची मला काय कल्पना?") बाहेर जाऊन वडाप (६ आसनी रिक्षा) पकडणेही शक्य नव्हते. शेवटी एस.टी. पकडून आचऱ्याला गेलो. या एस.टी.त भिजलेले दफ्तर घेऊन अनेक शाळकरी मुले प्रवास करत होती. मधली सगळी गावे घेत, भले त्यासाठी आडवाटेला जाऊन, एस.टी. आम्हाला आचऱ्याला घेऊन गेली. आचरा तिठ्याला उतरून समोरच्या मेडीकलच्या दुकानात छत्री व विजेरी विकत घेतली. तिथून रिक्षा पकडली. १७० रुपये देऊन दुकानदारांच्या घरामागे उतरलो. किरणकाकाच्या घरी गेलो. आजच्या दिवशी काकीची जयंती असल्याने ते शाळेतील मुलाना शैक्षणिक साहित्याचे वाटप करतात. त्याला

भेटून आमच्या घराकडे निघालो. किरणकाकाने विचारले “एकटा राहणार का?” “हो. त्यात काय!” मी उत्तर दिले. शेतातून अंधारातून चालताना मला माझ्या चुलतभावाचा देवाशिषचा फोन आला. वर धुवांधार पाउस पडतोय! एका हातात छत्री, दुसऱ्या हातात मोबाईल कानाशी धरून व विजेरी पकडून पाठीवर पाठ्पिशवी सावरत मी अंधाऱ्या रात्री चिखलातून प्रवास करत होतो. अर्ध्या तासाने आमचे घर आले. घराच्या पुढील दरवाजाला कुलूप व पुढचा प्रकाश चालू! चुलतभावाला सांगितले, रमेशशी (आमचा घरव्यवस्थापक) संपर्क कर. थोड्या वेळाने रमेष आला. घर उघडले. ग्यास संपला होता. रमेश व रमेशची बायको जेवण त्यांच्या घरातून बनवून घेऊन आली. मी त्याला इलेक्ट्रिक शेगडी कशी चालू करतात ते दाखवले. चहा बनवायला सांगितला. दुपारी गगन्बावड्यानंतर चहाच मिळाला नव्हता. आंघोळ करून घेतली. रमेशने विचारले, “झोपशील ना एकटो? अंग नाही ना काढायचस? (म्हणजे भीती नाही ना वाटायची?) सगळी दारे खिडक्या बंद करून झोप! मिया सकाळी येतंय.” जेवलो व झोपलो. अनेकाना आश्चर्य वाटले. म्हणाले “माझ्या थोरल्या भावासारखो शूर हा!” मला विंहीरीवरच्या भूतिणीने काही त्रास दिला नाही. २६-९-१७ सकाळी एकट्याने समुद्रकिनाऱ्यावर जायची हिंमत नव्हती. २५-३० कुत्रे असतात. रमेशने सकाळी येऊन नाश्ता दिला. माझ्या स्यांडल्समध्ये एक बेडूक बसला होता. एक रिक्षा बोलावली होती. ३५० रुपये! मालवणला ८.३० वाजेपर्यंत वकिलाला भेटायचे होते. मालवणला जाऊन मावशीकडे गेलो. इथून वकिलाकडे! नंतर सिंधुदुर्गनगरीला एस.टी.ने! काही मुली कोट घालून एस.टी.त चढल्या. या ओरसला, एका कनिष्ठ महाविद्यालयाच्या विद्यार्थिनी होत्या. यावेळी ओरसवरून शेअर रिक्षा पकडून

परत आलो. मालवणला परत येऊन रिक्षाने ७५० रुपये! दुपारी मावशीकडे जेऊन, जगदंबाची दुपारी 4.30 वाजताची गाडी पकडून बोरिवली गाठली.

26 10 17 रोजी सकाळी माझी चुलत आत्या वारली. दुपारी स्मशानभूमीत असताना थोरल्या भावाचा फोन आला. “आजच्या आज सिंधुदुर्गनगरीला जायला हवय. उद्या जिल्हाधिकाऱ्याने आम्हा लाभार्थ्यांची बैठक आयोजित केलीय.” आम्ही चुलतभावाच्या गाडीतून जाताना, वाटेत गोकुळ आनंद हॉटेलकडे थांबून नीता त्र्यावेल्स्ची तिकीट काढली. गाडी रात्री ८.३० वाजता संजय गांधी राष्ट्रीय उद्यानाच्या पुढे अक्षिस बँकेसमोर येणार होती. ही गाडी १० वाजल्यानंतर आली. (1.30 तास मी एका जागेवर उभा!) रात्री २ वाजता जोगेश्वरी विक्रोळी लिंक रोड पार करून भांडुप मुलुंड किंवा कुर्ला विक्रोळी वैगेरे स्टेशन्स दाखवून चेमबुर वरुन मानखुर्द किंवा ऐरोली पूल दाखवत वाशी किंवा ठाणे दाखवत लोणावळयाला नीता त्रावेल्सच्या हॉटेलसमोर थांबली. यावेळी मी मागच्या वेळचा अनुभव लक्षात ठेवून चहा घेतला नाही. नाहीतर झोप उडते! चालकाचे खान’पान’झाले. मी टेन्शनमध्ये! पत्नीस गाडीचा क्रमांक व सीट क्रमांक एसएमएस केला होता, पण तो गेला नव्हता. उद्याच्या पेपरमध्ये अपघाताची बातमी आली तर तिला कसे कळणार, मी कुठल्या गाडीत होतो ते? २८ १० १७ रोजी सकाळी ११ वाजता बैठक सुरु झाली. मी १२ वाजेपर्यंत पोहोचलो नव्हतो. रिक्षाने धावत धावत पोहोचलो. तरी माझ्यानंतर अजून ५-६ जण आले. तोपर्यंत मी सचिवाकडून माहिती मिळवली होती. बैठक संपवल्यावर बाहेर पडलो व मुद्रांक विकणाऱ्या कर्मचाऱ्याला शोधले तर तो जेवायला गेला होता. मलाही भूक लागली होती, सकाळपासून प्रातर्विधी केले नव्हते, दाढी नाही व आंघोळही केली नव्हती. बाहेर टपरीवजा दुकानात जेवण केले, कागदपत्रांचे फोटो काढून थोरल्या भावाला समाजमाध्यमाद्वारे पाठवले. तिथून टाईप करायला जवळचे दुकान शोधून काढले. टायपिंग संपेपर्यंत ६ वाजले. ६ वाजता मालवणला जायला

एस.टी. होती. समोर १ एस.टी. दिसली. ती पकडायला धावलो, तर ती कणकवलीला जाणारी गाडी होती. मालवणला जाणारी गाडी पाउण तास उशीरा आली. मावशीला फोन केला तर ती वायन्गणीला मामाच्या घरी गेली होती. मलाही वायन्गणीला जाण्याशिवाय पर्याय नव्हता. एस.टी. मालवणला पोहोचली तेव्हा त्या स्थानकातून कुठेही जाणारी एकही गाडी नव्हती. आता पुढचा पर्याय होता, पोष्टासमोर उभ्या असलेल्या वडाप! जाताना एका दुकानात चहा विचारला, तर ती मालवणी स्त्री म्हणाली, “तुम्ही एकटेच चहा पिणार? मग आमच्याकडे चहा नाही.” वडापही उपलब्ध नव्हती. शेवटी फोकांड्या पिंपळाकडे ३ सीटर रिक्षा मिळाली. ३७० रुपये! दुकानदारांच्या घराकडे उभे केल्यावर चालकाने आठवण काढली की तो ‘माझी काकी (किरणकाकांची दिवंगत पत्नी!) सरपंचपदाच्या निवडणुकीला उभी असताना इथे नेहमी यायचा’. आज घरात छोटी इंगळी आली होती. रात्री परत एकटा झोपलो! आज रात्री कशलाशा आवाजाने जाग आली. एक भला मोठा उंदीर उडया मारत उतरत होता. सकाळी २९ १० १७ रोजी एस.टी. साठी वाट पहाताना ‘इशारा’ (देवव्रत पाटलाचा मुलगा) भेटला. तो म्हणाला “कार घेऊन का जात नाही?” देवव्रतला भेटलो. माझी इंडिका कार (जी त्यांच्या घराजवळ पार्क केली आहे) घेऊन मालवणला गेलो. हॉटेल भाई भाईच्या मालकाला भाई खोबरेकरला हात दाखवला. माझ्या मावशीकडे मेढयाला गाडी उभी केली. मोर पाटकरला भंडारी हायस्कूल्कडे भेटलो. भंडारी हायस्कूलच्या सुपरवायझर

म्याडमची भेट घेतली. दिवाड्करान्च्या हॉटेलमध्ये मिसळ खाली. मग रोझरी हायस्कूलच्या फादरना भेटलो. परत भाजी मंडइत जाऊन भाजी विकत घेतली. मावशीकडे जाऊन जेवलो. पोयऱ्याला जाऊन आलो. येताना आचऱ्याला केक घेतला. रात्री उशीरा दादा आला. बरोबर त्याचा चालक होता. दुसरा चुलत चुलतभाऊ त्याच्या घरी झोपला. आज दादाचा वाढदिवस होता. रमेश (आमचा काळजीवाहक) व चालकाबरोबर त्याचा वाढदिवस साजरा केला.

पानाच्या आकाराचा टोळ!

30 10 17 ला मालवणला तहसीलदाराच्या कचेरीत व भूमापन विभागात जाऊन आलो.

पतंग!

सूर्यास्त! ३१ १० १७ पासून रोज

किरणकाका व विंदकाकांबरोबर समुद्रकिनाऱ्यावर प्रभातफेरीला जाऊ लागलो.

झाडावरील मोर!

किनाऱ्यावरील होडी!

वूड स्पायडरचे जाळे!

तारामासा!

१ ११ १७ ला सरपन्चांबरोबर सिंधुदुर्गनगरीत जाऊन आलो. त्याच रात्री वायंगणीत तुळशी विवाह प्रत्यक्षात बघायला मिळाला. एरवी मुंबईत असा पाहायला मिळत नाही. २ ११ १७ ला परत भूमापन व तलाठ्यांच्या कचेरीत गेलो. एके रात्री चुलत चुलतभावाची तब्येत बिघडली म्हणून रात्री मालवणमधील झांट्ये यांचे इस्पितळ गाठले. तिथे दुसरा स्थानिक (चुलतभावाचा) मित्र त्याच्या मित्राला घेऊन आला होता. मुंबईत कदाचित उशीरा इस्पितळात पोहोचलो असतो पण मालवणमध्ये अर्ध्या तासात पोहोचलो. समुद्र गरुड! रापण! चतुर! 4 11 17 रोजी 2 चुलत काकांबरोबर येळेवर

(किनाऱ्यावर) प्रभातफेरीस! ९ ११ १७ रोजी किरणकाका व विंन्द्काकांबरोबर संध्याकाळी समुद्रकिनाऱ्यावर फिरायला गेलो असता रापण (रापण म्हणजे, गावकरी समुद्रात एक भलेमोठे जाळे फेकतात व नंतर ते ओढून घेतात. त्यांना लाटांचा रंग बघूनच अंदाज येतो की इथे मासे आहेत का? कधीकधी रात्रभर होडीने समुद्रात जातात व सकाळी जाळे ओढून घेतात.) लागली होती, त्यात म्हादळे व लोबस्टर्सपण होते, पण आमच्याकडे पिशव्या नव्हत्या. १० ११ १७ला मात्र आमचा



गुजराथी चालक मला किनाऱ्यावर रापण लागलीय म्हणून घेऊन गेला व मी म्हादळे (स्क्वीड्स), खेकडे घेऊन आलो. चालक आमच्याकडे मासे खायचा पण गुजराथी असल्याने मुंबईला घेऊन जाऊ शकत नव्हता. ९ ते ११ ११ १७ रोजी अडीच दिवस जेसीबी लावून २ प्लॉट साफ करून घेतले. निघायच्या आदल्या

रात्री रापणीत मासे मिळाले, म्हणून मालवणमध्ये जाऊन थर्माकोलचे २ खोके व बर्फ घेऊन आलो. निघायच्या दिवशी ११ ११ १७ रोजी दुपारी २ वाजता आर्किटेक्ट (पती-पत्नी) व त्यांची मुलगी येऊन गेले. त्यामुळे निघायला उशीर झाला. कणकवलीला परत बर्फ घेतला! 12/11/17 रोजी रात्री साडेतीनला घरी पोहोचलो तेव्हा मासे इतके गोठले होते की ते वेगळेच होईनात. त्यामुळे ते गाडीतच ठेवून मी माझे घर गाठले आणि गाडी घेऊन थोरला भाऊ चारकोपला निघून गेला.

९ १२ २०१७ रोजी सिंहगड एक्स्प्रेस्स्ने मी, पत्नी, मुलगा, भाचा व पत्नीचे मावशे पुण्याला चाललो होतो. आरक्षण करूनसुद्धा इतकी प्रचंड गर्दी गाडीत! ३ माणसे एका बाकड्यावर मावत नव्हती. त्यात सर्व भिकारी, फेरीवाले ५ ५ मिनिटांनी फेऱ्या मारत होते. शिवाजीनगरला आम्हाला घ्यायला आमचा भाचा येणार होता. तो कार घेऊन विरुद्ध बाजूला व आम्ही दुसऱ्या बाजूला. एकतर या पुण्याच्या दिशा कळत नाही. रात्री मेहेन्दीचा कार्यक्रम! १० १२ १७ रोजी सकाळी नाश्ता हॉलवर होणार होता, म्हणून १०-११ वाजता हॉलवर बसने पोहोचलो. तिथे सामानच पोहोचल नव्हत. आम्ही नाश्ता करायला बाहेर! वडगाव शेरी भागात चांगले नाश्ता करण्यासाठी हॉटेल नाही. फक्त जेवणाची हॉटेले! मिसळ एके जागी मिळत होती पण १० वर्षाचा भाचा ती खायला तयार नाही. अर्धा तास चालल्यावर एक मसाल्या डोस्याचे फास्ट फूड केंद्र (सेल्फ सर्विस) लागले. हॉलवर नाश्ता तयार करणारे कर्मचारी आम्हाला द्यायच्या आधी स्वतःचीच ताटे घेऊन जायला लागले. विचारल्यावर आमच्याकडे रागावून बघत! हॉल नवीन! तेथे घडणारे २रे लग्न आमचेच! अनेकाना पत्ता सापडत नव्हता, बाहेर बाण दाखवणारे ब्यानर लावूनसुद्धा! इथे पद्धत हीच आहे. दादरसारखे नाही! इथे बाहेरगावावरून येणारे पाहुणे ब्यानर कुठे आहेत ते शोधतात. इथल्या पोलीस चौकीलाही हॉल माहीत नव्हता. लग्न लागल्यावर रात्री १ वाजता वरपक्षाच्या घरी आमच्या भांड्यांचा टेम्पो आला. रात्री २ वाजेपर्यंत ती भांडी उतरवत होतो. उरलेले वरण, भाजी दुसऱ्या दिवशी सकाळी आजूबाजूला

वाटली.

११ तारखेला दुपारी प्रति बालाजीला गेलो. संध्याकाळी जेजुरीला! नवीन लग्न झालेल्या नवऱ्याने पत्नीस उचलून घेऊन ५ पायऱ्या चढायच्या असतात. माझ्या भाच्याने १० पायऱ्या उचलून नेले. जेजुरीच्या देवळात शिरताना एक मुलगा आम्हाला म्हणाला, इथे १० रुपये टाका, मग मी उचलून नेईन. देवाच्या नावावर लुटणा-यांची संख्या खूपच वाढलीय. पुरीला पायावर छडी मारणाऱ्या बडव्यांची आठवण आली. खाली उतरताना मला एक पायरी दिसली. त्यात ब्राह्मी किंवा खरोष्टी लिपीत काहीतरी लिहिलेले दिसले. 12-12-17 तारखेला आम्ही दुपारी मुंबईला येण्यासाठी स्वारगेटला गेलो. बाहेरचे खाजगी गाडीवाले कमी पैशात फुल एसीवाली सीट देत होते. आम्हीही बळी पडलो. साना बस सर्विस! आमची ३-४ क्रमांकाची सीट अजून दोघा तिघाना विकली गेली होती. गाडीत रुद्रं चित्रपट दाखवला. घरी टी.व्ही.वर ३ तास बसून बघायला जमत नाही. इथे वेळ मिळाला. लोणावळ्याला जिथे थांबलो तेथील प्रसाधनगृह पत्नीस आवडले नाही. म्हणूनच मी राईट टू पी चळवळीचा समर्थक आहे.

४ १ २०१८ रोजी ‘सुपरमाइंड’च्या ‘सीएसआर’ ट्रेनिंगसाठी, ‘मराठा चेंबर ऑफ कॉमर्स’च्या सभागृहात सकाळी ५.३० ची शिवनेरी बस पकडून निघालो. आदल्या दिवशी आंबेडकरी जनतेने महाराष्ट्र बंद केला होता. १०.३० ला सभागृहात मुंबईचेच लोक आधी पोहोचले होते. पुण्याचे नंतर आले. दुपारी १.३० ला बाहेर पडून स्वारगेटला आलो. जातानाचे आरक्षण केले नव्हते सामान्य एस.टी. ने जाणारे लोकसुद्धा हिरकणीने जायला तयार होते व हिरकणीने जाणारे शिवनेरीला! काल बंद होता ना! सगळे आज घरी निघाले होते. आज बाहेरचे गाडीवाले दलाल मुंबई, दादर, बोरीवली असे पुकारत नव्हते. जेव्हा आपल्याला गरज असते, तेव्हा नेमके अदृश्य होतात. खूप वेळानंतर २.३० ला दादरची शिवनेरी आली. ज्याना परवडत नाही, त्यांनी पण गर्दी केली. या शिवनेरीत जागा मिळाली. दादरला पोहोचून ट्रेन पकडली. कांदिवलीला उतरून पूर्वेला शेअर रिक्षा करून ठाकूर संकुलात (कांदिवली पूर्व) येथे उतरलो. चालत मित्र ज्या घरी (संस्कृती सोसायटीत) गेला होता तिथे खाली येऊन त्याची वाट बघत उभा राहिलो. तोपर्यंत इमारतीतील जाणारे येणारे लोक संशयित नजरेने पाहत (हा कोण अतिरेकी कसाबची बॅग पाठीवर ठेऊन आपल्या इमारतीवर नजर ठेवतोय?) होते. शेवटी तो मित्र खाली उतरला. आमच्या आवडत्या ढाब्यावर जाऊन पराठे खाल्ले. त्याला रिक्षाने अशोकवनला बसस्टॉपवर (बोरीवली पूर्व) सोडून मी घरी गेलो.

5 मार्च 2018ला चुलतभावाच्या ओला गाडीने ठाण्याला कुर्ल्यावरून सुटणारी सेवाग्राम एक्स्प्रेस्स पकडायला निघालो. चुलतभाऊ गृहीत धरून होता की आम्ही २ तासात पोहोचू! पण मध्ये घोडबंदरच्या नाक्यावर गाड्या अर्धा तास उभ्या करून ठेवतात त्याचे कॅलक्युलेशन त्याने केले नाही. तरी नशिबाने वेळेत आम्ही ठाणे स्टेशन पूर्वेला पोहोचलो. एका हॉटेलमध्ये अजू मिस व तिचा नवरा आकाश चहा पीत होते. ते मलाही आग्रह करत होते, पण ट्रेन पकडायला उशीर होईल म्हणून म्या मूढाने तो नाकारला. म्हटले स्थानकावर पिऊ, नाहीतर ट्रेनमध्ये पिऊ! स्थानकावर देवाशिष वाट बघत होता. आमच्या गाडीला चंद्रपूरला जाण्यासाठी शेवटी ४ डबे वेगळे जोडले जातात. ते सेवाग्राम जंक्शनला वेगळे करून दुसऱ्या गाडीला जोडतात. उरलेली गाडी पुढे नागपूरला वेगळी जाते. आमची गाडी चंद्रपूरचा सकाळी ८.30 चा टायमिंग दाखवून १०-११ला पोहोचते. आम्ही जिथे ट्रेनची वाट पाहात उभे होतो तिथे चहाचा एकही स्टॉल नव्हता. निघण्याची वेळ 3.35 पी.एम. ट्रेनमध्ये कल्याणला, कसाऱ्याला गाडी जिथे थांबली तिथे चहाचा स्टॉल नाही. गाडीला पॅंट्रीकारचा डबा नाही. असे ऐकले की कसाऱ्याला काहीतरी भांडण झाले होते म्हणून बाहेरच्याना पाणी, चहा वैगेरे विकायला परवानगी नव्हती. शेवटी इगतपुरीला ५.४५ ला ‘इलायची मारके’ चहा मिळाला. रात्री चाळीसगावला जेवण मिळाले पण देवाशिश्च्या सांगण्यावरून मॅडमनी खूप खायला आणले होते जे परत मुंबईला येईपर्यंत संपले नव्हते. पोटाला तडस लागली. रात्री झोपण्यापुरती आमच्या डब्यात चढलेली माणसे नागपूरला जाणारी, सेवाग्रामला उतरून दुसऱ्या डब्यात गेली. (६ ३ १८) सकाळी चंद्रपूरला उतरल्यावर आम्हाला न्यायला, ठरवलेल्या त्रावेल्सचा चालक

आला होता. दिल्लीचा बंगाली होता. चंद्रपूरला येऊन त्याला ५ महिने झाले होते. मी तणावाखाली! उद्या गडचिरोलीच्या जंगलात जाताना स्थानिक माणूस नसला तर काय होणार? कारण माझ्या चुलतभावाने त्याच्या एका मित्राची कथा सांगितली होती. त्याच्या मित्राने नागपुरवरून १ लोकल गाडी केली. ती जंगलात एका विशिष्ट ठिकाणी १५-२० मिनिटांकरिता थांबली. प्रवाशांनी विचारले, "काय झाले?" चालकाने सांगितले "गप्प बसा! नन्तर सांगतो." नंतर तो म्हणाला की, "तिथे एक खूण केलेली जागा असते, ती फक्त स्थानिक चालकांनाच माहीत असते. तिथे नक्षलवाद्यांकडून संपूर्ण गाडी तपासली जाते. त्याना संशय आला तर पुढे न थांबलेली गाडी उडवतात." म्हणून मी तणावाखाली, या चालकाला ती जागा माहीत नसेल तर? आर्या! पत्नीस (तेव्हा SRPF मध्ये काम करणाऱ्या) फोन करून आजचा कार्यक्रम सांगितला. ती तणावाखाली होती. म्हणत होती, "आनंदवन, हेमलकसाला जायलाच हवे का? शेगाव करून परत या." तिला म्हंटले, "आज आनंदवनात चाललोय, तिथे वाटेत जंगल नाही. उद्या हेमलकसाला जाईन. तिथे खरा धोका आहे." हॉटेल मालकाने सुचवलेल्या रेस्तराँमध्ये जेवायला गेलो. अंधारे वातावरण (एरवी अशा हॉटेल्समध्ये काय खायला घालतात ते दिसू नये म्हणून अंधार केलेला असतो), पण बिर्याणी चांगली होती. तिथून आनंदवन गाठले. चौकशी केली असता त्यांनी आम्हाला एका हॉलमध्ये नेले. तिथे आधीच, तिथे मुक्काम केलेले पर्यटक होते. आम्हाला आनंदवनाविषयी माहिती देणारी व बाबा आमटेंचा इतिहास सांगणारी चित्रफीत दाखवण्यात आली. एक माहितीपुस्तिका देण्यात आली. आम्हा मुंबई पुणे पर्यटकांबरोबर एक चाकवाली गाडी चालवणारा कुष्ठरोगमुक्त अपंग मार्गदर्शक होता. त्याने सर्व इमारती बाहेरूनच दाखवण्यास सुरुवात केली. तो बाबांविषयी त्याच्या

आठवणी सांगायला लागला. सोबतच्या स्त्रियांना हे सर्व पुस्तकात वाचून व चित्रपटातून पाठ झाले होते. त्या कंटाळल्या व त्या इमारती आतून दाखवा म्हणायला लागल्या. शेवटी आमच्या मार्गदर्शकाने शुभेच्छा पत्रे कुठे बनवतात, कलाकुसरीच्या वस्तू कुठे बनवतात, कुठे विकतात ते दाखवले. मी सुद्धा १ भित्तीचित्र घेतले. नंतर १ काष्ठशिल्पाचे प्रदर्शन दाखवले. छायाचित्रण केले पण काष्ठशिल्प विकत घ्यायची हिंमत नव्हती. बाबांची स्ट्रेचर टाइप गाडी पाहिली. त्यानंतर चरखा कसा चालतो, विणकराचा माग पाहिला. चलचित्रीकरण केले. अजून काय काय दाखवत होते, उद्याही इतराना दाखवणार होते, पण आमची मुक्काम्माची व्यवस्था नसल्याने व परत जायची घाई असल्याने आम्ही निघालो. जाताना त्यांच्या भेटवस्तू विक्री केंद्रातून (महारोगी सेवा समिती, वरोरा) १ बिग बाजार पिशवी घेतली. अल्पोपहार करून निघालो. स्थानिक तुपाची किंमत मुंबईच्या दुप्पट होती. जाताना भद्रावती गावातील विजासन गुंफा पाहिल्या. संध्याकाळची वेळ होती. आतमध्ये खूप अंधार होता. कॅमेऱ्याच्या फ्लॅशलाइटमध्ये आतली दालने

पाहावी लागली. खाली उतरून तेथील जैन मंदीर पाहिले. आतमध्ये कॅमेरा, मोबाईलच्या प्रकाशचित्रणास परवानगी नाही. बाहेरून छायाचित्रण करता येते. स्त्रियांनी देवळात जाताना डोक्यावर पदर, ओढणी घेणे आवश्यक! नागा पंथियांचे देऊळ पाहिले. गणेश मंदीर उंचावर असल्याने पाहायला गेलो नाही. रात्री चंद्रपूरमध्ये हॉटेल मालकाने सुचवलेल्या दुसऱ्या रेस्टॉरंटमध्ये जेवायला गेलो. कुबट, बुरशीयुक्त फर्निचर व वातावरण होते. जेवल्यावर चंद्रपूरमध्ये चक्कर मारली. प्रथेप्रमाणे! रात्री एका गुजराथ्याच्या आईसक्रीम पार्लरमध्ये आईसक्रिम खाल्ले. दिनशौ फ्रांचायसी!

मालकाचे म्हणणे की चंद्रपूरला माल द्यायला मुंबईच्या नॅच्युरलला जमत नाही व इतरांचा माल आणून विकायला ह्याना परवडत नाही. कारण २४ तास शीतगृहात ठेवून इथे विकायचा म्हणजे किंमत वाढणार आणि स्थानिकांना तेवढा दर परवडत नाही, म्हणून दिनशो! विदर्भाचा उन्हाळा असल्याने महाविद्यालयीन तरुणांचा वावर जास्त व खप पण होतो. मालकाने अजून आनंदवन पाहिले नव्हते, पण बाबा आमटे जवळपासच्या डॉक्टरांकडे आले होते, तेव्हा त्याना पाहिले होते. (७ ३ १८) सकाळी हेमलकसाला जायला ५.३० ला निघायचे होते, पण आम्ही ६.३० ला निघालो. त्रावेल्वाल्याने माझ्या विनंतीनुसार स्थानिक चालकाला, साध्या गाडीने पाठवले होते. आज एकूण ५०० कि.मी.चा प्रवास करायचा होता. पहिला थांबा गोंडपिंपरी एस.टी. स्थानक! शौचालयावर तुकारामांचा अभंग लिहीला होता, १ वाक्य होते, 'देह देवाचे देऊळ, आत वाहे निर्मल' २रा थांबा अल्लापल्ली! आम्ही समजत होतो, साधे गाव असेल पण हे तालुक्याचे ठिकाण निघाले. पोहे विकणाऱ्याला सांगितले की तर्री न मारता पोहे दे, पण तिखटपणा काही त्याने कमी नाही केला. वृत्तपत्र मात्र तिथे कोणी विकत नाही, पण प्रत्येक प्रवाशाच्या हातात तो असतो. तिथून डावीकडे जंगलात रस्ता गेला होता. उंच झाडे होती म्हणून त्याला जंगल म्हणायचे, नाहीतर कोकण पाहिलेल्याने त्या पानगळीच्या वृक्षांना कधीही जंगल म्हटले नसते. ऊन खालपर्यंत येत होते. एकही नक्षलवादी दिसला नाही. वाटेत १ तलाव दिसला, तिथे एका झाडावर खूप बगळे होते. फोटो काढायला जवळ गेलो तर उडाले. जाताना मला भीती वाटत होती की नक्षलवादी येतील की काय? पण कसचे काय? पत्नीची भीती निरर्थक ठरली. जंगलतोड मात्र प्रचंड प्रमाणात चालली होती. हेमलकसाला आत जाऊन चौकशी केल्यावर कोणीतरी डॉक्टर विकास आमटेंचे घर

दाखवले. ते व त्यांची पत्नी खुर्चीवर बसले होते व त्यांच्या बाजूला १ प्रवाशांचा गट फोटो काढून घेत होता. ते गेल्यावर त्यांनी आम्हाला जवळ बोलावले. सहसा तसा मला फरक पडत नाही, (मी या पृथ्वीवर कोणालाच माझ्यापेक्षा मोठा मानत नाही, मग तो पंतप्रधान असो, माझ्या महाविद्यालयांचा प्रिन्सिपल असो की बॉस असो. सर्व माणसे समान असतात व माझ्यापेक्षा कोणी ग्रेट नाही! सर्वांचेच पाय मातीचे असतात.) पण त्या जोडीला पाहून मी भारावलो. आम्ही आमची ओळख करून दिली. त्यांनीही आमची चौकशी केली. आमच्याबरोबर स्वत:हुन फोटो काढून घेतले. फार साधी सरळ माणसे! कसलाही गर्व नाही. बाकी मला त्यांचा चित्रपट पाहून,

पुस्तके वाचून त्यांच्याबद्दल माहिती होती, पण राहून राहून १ प्रश्न सतावत होता. शेवटी न राहवून त्याना विचारले, “आनंद्वनवरून एवढ्या लांब का यावेसे वाटले?” ते उत्तरले, “त्यांच्या वडलांची इच्छा!” त्यांचे प्राणी फोटो न काढता पाहिले. जेवणासाठी सांगितले नसल्याने, न जेवता निघालो. मॅडम व त्यांच्या यजमानांनी देणगी दिली. तिथून भामरागड संगमाकडे गेलो. प्रत्येकी १० रुपये प्रवेश फी भरली. वारुळाने भरलेली झाडे पाहिली. हेमलकसाचे बाहेर पण १ कॅन्टीन आहे पण जेवणाची ऑर्डर १ तास आधी द्यावी लागते. तिथून परत अल्लापल्ली गाठली. एका रेस्तराँमध्ये गावाच्या मानाने बरे जेवण मिळाले. मार्कण्डेश्वराचे दुरुस्तीला काढलेले देऊळ बघितले. चंद्रपूरच्या हॉटेल मालकाने सुचवलेल्या एका ढाब्यावर गेलो. त्याने १० चपात्या + न खाल्लेल्या भाक-यांचेही बिल घेतले. कोंबडी मसाला खूपच तिखट होता. पानवाल्याच्या दुकानातून मिठाई घेऊन खाल्ली. रात्री

हॉटेलात पोहोचलो तर आकाशांची व मॅडमची खोली हॉटेल कर्मचाऱ्यानी दुसऱ्याला दिली होती, आकाशांचा खाजगी टॉवेल तेथील रहिवासी वापरत होते व त्यांची चप्पल तिसऱ्याच खोलीबाहेर पडली होती. तेथील कर्मचाऱ्याला झापले, तर तो ही गोष्ट मालकांना न सांगण्यासाठी गयावया करू लागला. आदल्या रात्री एसी बिघडला होता व (८ ३ १८) तिसऱ्या दिवशी लाईटचे काम चालू असल्याने पंखाही चालत नव्हता.

आज ताडोबाला जाण्यासाठी लवकर उठलो व ठरलेल्या वेळेपेक्षा १ तास उशिरा निघालो. आज कोअर झोन मध्ये बुकिंग फुल असल्याने बफर झोन मध्ये डाव्या बाजूला आम्हाला जीपने नेण्यात आले. आमच्या कालच्या व आजच्या चालकाच्या सूचनेनुसार (हा मध्ये मध्ये जंगलखात्यासाठी काम करायचा.) जंगलातील धूळ उडून तोंडावर बसू नये म्हणून नवीन कापडी बुरखे कम शिरस्त्राणे विकत घेतली. जोराचा वारा होता. रानकोंबड्यांचा आवाज ऐकला. आत जाताना मोर दिसले. आमच्या मार्गदर्शकाने धुळीत वाघिणीच्या व तिच्या पिल्लांच्या पायांचे ठसे दाखवले. वाघ व वाघिणीच्या पायांच्या ठश्यांतील फरक सांगितला. रानडुकरानी वाघिणीला कसे जखमी केले होते ते सांगितले. रानकुत्र्यांच्या गोष्टी सांगितल्या. आम्हाला एका जागी उभे करून दूरवर १ तलाव दाखवला. तिथे वाघ येतात म्हणून सांगितले. मला वाटले तिथपर्यंत चालत जायचं. म्हणून मी खाली उडी मारली. तर मला सांगितले गेले, जंगलात जीपमधून खाली उतरायचे नाही. उतरलात तर मार्गदर्शकास व चालकाला सजा भोगावी लागते. मागे एका अधिकाऱ्याच्या नातेवाइकानी जबरदस्ती जंगलात फिरून कसा गोंधळ घातला व त्यामुळे त्या जीपचालकाचा व गाइड्चा परवाना कसा तात्पुरता निलंबित करण्यात आला

होता त्याची कथा मार्गदर्शक सांगत होता. माझा जंगलातील प्रभातफेरीचां कार्यक्रम हुकला. आम्हाला गवे, गायबगळे , रानडुकरे, चितळ , काळविटे दाखवण्यात आली. एक रानडुक्कर २ हरणांच्या पाठी पडले होते. माझ्या पत्नीस फोन लावला असता नेमके त्याचवेळी एका काळविटाने रोमहर्षक

चित्तथरारक उडी घेऊन मादी हरणांचा पाठलाग केला. मी पत्नीस या घटनेचे वर्णन करत असता ती म्हणाली, “चलचित्रण करा.” मी कॅमेरा सरसावेपर्यंत ते एका जागेवर स्थिर झाले. तिथून चालकाने आम्हाला दूरवर दुसरे पर्यटक दाखवले. पण याना एकमेकांच्या

क्षेत्रात जायला परवानगी नाही. वाटेत टिटव्या, माळटिटव्या, भारद्वाज, शेंडीपाकोल्या, खंड्या, बंड्या, नीलपन्ख, सर्पगरुडाचे घरटे दिसले. आम्हाला तिथून एका पाणथळ जागी नेण्यात आले. भरपूर पाणपक्षी दिसले, पण वाघ नाही. माझ्या कॅमेराची बॅटरी संपत आली होती. परत जाताना एक ससा दिसला. जीप अशा जागी उभी केली होती की ससा कॅमेऱ्यात स्पष्ट दिसत नव्हता. बर! जीप हलली असती तर ससा पळून गेला असता. शेवटी निराश होऊन १५ मिनिटांच्या विश्रांतीसाठी बाहेर पडलो.

जाताना परत एकदा मोर पाहिले. बाहेर गेल्यावर नाश्ता करायला उजव्या बाजूच्या प्रवेशद्वारापलीकडे गेलो असता तिथे जो गट

आला होता त्याने सांगितले की त्याना एक वाघीण व तिची ३ पिल्ले दिसली. आम्ही आमच्या मार्गदर्शकाला विचारले की “आपण त्या बाजूला जाऊ शकत नाही का?” तर तो म्हणाला तिथे जायला परत ४००० रुपये फी वेगळी भरावी लागेल. आम्ही गुपचूप आल्या मार्गावर परत गेलो. इतरही चालक जीप घेऊन वाघाना शोधत होते. त्यांच्या बोली भाषेत एकमेकांशी संपर्क साधत होते. अचानक आम्ही दुसऱ्या जीपपाशी गप्पा मारत असता अजून १ जीप आली. तिने आमच्या मागे वळण घेताना तिच्या मार्गदर्शकाने आमच्या मार्गदर्शकाला काहीतरी सांगितले. तो आम्हाला म्हणाला, “दूर धरणाकडे वाघ दिसलाय म्हणे!” त्यानंतर सुरु झाला १ चित्तथरारक पाठलाग. १ली ती जीप जिने माहिती दिली, त्यानंतर २री जीप जिच्याशी आम्ही बोलत उभे होतो ती व तिच्यापाठी आम्ही! त्या जंगलात १००- १२० च्या वेगाने ते गाड्या चालवत होते. डिस्कव्हरी वाहिनीची आठवण आली. वाघ बघण्यापेक्षा हा थरारच रोमांचक होता. तिथे पोहोचल्यावर आमच्या समोरून १ वाघ डावीकडे गेला. माझ्या मित्राला त्याचे शेपूट दिसले. मला तर काहीच दिसले नाही. परत उजवीकडे वाघ दिसतोय असे लोक सांगत होते. मी कॅमेरात (डीएसएलआर) असलेल्या झूम लेन्सने फोटो काढले. पण फोटोत १ पण वाघ दिसला नाही. दूरवर १ जीप चांगले कॅमेरे व झूमर्स लावून उभे होते. निराश मनाने जंगलाबाहेर पडलो. तिथून आमच्या भाड्याच्या गाडीने कोअर जंगलाकडे गेलो. दुरून जंगल साजरे केले. इथे कॅनटोर बुक केला असता तरी जवळून वाघ दिसला असता. मी वाद घालत होतो की “महाराष्ट्रात पट्टेरी वाघ नाहीत. फक्त बिबटे आहेत.” तर आमच्या चालकाने त्याच्या मित्राला जो नुकताच कोअर जंगलातून कॅनटर मधून बाहेर पडला होता, त्याच्या कॅमेऱ्यातील नुकतेच केलेले पट्टेरी वाघाचे चलचित्रण दाखवले. त्याना १०

फुटावर वाघ दिसला होता. कॅनटर जीपसारखा वाट्टेल तिथे भटकत नाही. तो एका विशिष्ट परिघात फिरतो, तरी त्याना वाघ दिसले. काहीवेळा जीपला अंग घासून जातात म्हणे! आम्ही जेवायला चंद्रपूरला परवा जिथे बिर्याणी खाल्ली

त्या रेस्तराँमध्ये गेलो. आज जी बिर्याणी खाल्ली ती शिळी होती. हॉटेलमध्ये परत गेलो तर त्यांचे लाईट दुरुस्तीचे काम चालू असल्याने एसी बंद होता. फक्त १ पंखा हळू चालत होता. ४ वाजता निघालो, जाम्बला नाश्ता केला. नागपूरमध्ये हल्दीरामच्या मॉलमध्ये जेवलो. गुगलने

आम्हाला खूप वेळ फिरवले. शेवटी तोंडी पत्ता विचारत मित्राच्या बंगल्यापर्यंत पोहोचलो. रात्री उशिरा झोपलो. ९ ३ १८ ला सकाळी उठून प्रभातफेरीला जाऊन रस्त्यावरील चहा प्यालो. प्रातर्विधी उरकून मित्राच्या गाडीने, त्याच्या कंपनीच्या चालकाच्या मार्गदर्शनाखाली रामगिरीला पोहोचलो. तिथली भेळ खाऊन खिंडसी तलावावर पोहोचलो. तिथे ५ रुपये पार्कीन्गसाठी अक्कलखाती घातल्यावर तेथील सुरक्षारक्षकाने खाली दुसरीकडे जायचा सल्ला दिला. तेथे तलावाजवळ जाण्यासाठी बोटिंगसाठी

जायचे नसल्यावरही जबरदस्तीने १०० रुपये प्रवेश फी भरून खाली तलावाजवळ गेलो. तिथे तलावाकाठी जेवलो. जेवून झाल्यावर परतीच्या मार्गावर लागलो. परत जाताना ड्रॅगन पॅलेस देऊळ, दीक्षाभूमी, स्वामी नारायण मंदीर वैगेरे पाहून एका नागपूरच्या ढाब्यावर महागडी तंदुरी घेऊन परतलो. रिवाजाप्रमाणे रात्री त्या वसाहतीत फिरलो. १० ३ १८ ला ओला भाड्याने घेऊन नागपूर स्थानकावर पोहोचलो. सकाळी 10.55 ते दूपारी 3.44 महाराष्ट्र एक्स्प्रेस्स्ने नागपूरवरून शेगावला जायला निघालो. ह्याही गाडीत पॅंट्री नव्हती. मध्येच १ व्यक्ती जेवणाची ऑर्डर घ्यायला आला. बडनेरा जंक्शनला जेवण आणून देईन म्हणाला. बाकीच्यानी काहीबाही खाऊन घेतले. मी आपली वाट पहातोय. कसचे काय? शेगाव येईपर्यंत मी उपाशी. माझा मित्र मला शेगाव स्थानकावर कचोरीही खायला देईना. त्याला आनंद विहारला जायची घाई लागली होती. २ रिक्षा करून आनंद विहारच्या रांगेत उभे राहिलो. मग कळले आनंद सागर विसावा आनंद विहारपेक्षा स्वस्त होते. मला भूक लागल्यामुळे मी विहाराच्या बाहेर जाऊन जेवण करून आलो. ५ वाजून गेले होते. आता भक्तनिवासात जेवण मिळत नाही. नंतर भक्तनिवासात चहा घेतला. कुलरवाली खोली ४ बेडचीच मिळते. आमची मैत्रीण व तिचा नवरा स्वतंत्र खोलीत राहायचा हट्ट करत होते. माझी जेव्हा खोली बुक करायची पाळी आली, तेव्हा कळले की भक्तनिवास फक्त कुटुंबियांसाठी आहे. मी म्हणालो “पत्नी नन्तर येईल”, तर म्हणाले “आताच घेऊन या.” आता तिला कुठून आणायचे? सांगितले“ती उद्या येईल.” तर म्हणाले “उद्या ती आल्यावर स्वतंत्रपणे परत देणगी द्यावी लागेल.” ४ बेडची कुलर असलेली खोली (एका खोलीत आम्ही दोघेच) मिळाल्यावर थोडे फिरून जेवायला गेलो. ५० रुपयात मनसोक्त शाकाहारी जेवण मिळते. थंड पेये लस्सीसारखी, मिल्कशेक,

आईस्क्रीम वैगेरे मिळतात. चहाचे, कॉफीचे, ग्रीन टीचे वेगळे काऊंटर आहेत. तिथे त्यांचे साबण, टूथपेस्ट, ब्रश वैगेरेही मिळते. फक्त रांग लावून जेवण घ्यावे लागते. टेबलावर ऑर्डर घेऊन सर्व करायला वेटर नाहीत. काही भक्त येथे मोफत स्वयंसेवक म्हणून वावरतात. पहाटे लवकर उठून पावसातसुद्धा परिसराची साफसफाई करत असतात. दुसऱ्या दिवशी ११ ३ १८ रोजी दर्शनाला गेलो. तिथून रिक्षा पकडून आनंद सागर विहार बागेत फिरायला गेलो. ध्यानमंदिरापर्यंत चालत गेलो. ध्यान केले. तेथेच जेवलो. येताना माझी स्लीपर तुटली. रिक्षाने आनंद विहारात परत आलो. संध्याकाळी आमची मैत्रीण एकटीच दर्शनाला परत गेली. आम्ही इथे तिथे भटकून जेवून रात्रीची मुंबई सुपर’स्लो’ एक्स्प्रेस्सने ठाण्याला उतरलो. रिक्षा पकडून (रिक्षावाले ओला, उबेरला स्थानकाजवळ येऊ देत नाहीत.) घरी परतलो. (१२ ३ १८)

2 4 18 ला कल्याणवरून सकाळी ८.३५ ला सुटणारी मंगला लक्षद्वीप सुपर'स्लो'एक्ष्प्रेस्स पकडण्यासाठी ६ वाजता ओलाची गाडी बुक केली. त्याच्याकडचा गॅस संपत आला होता. सकाळी सकाळी घोडबंदर नाक्यावर पोलिसांनी गाड्या अडवून ठेवल्या होत्या. त्यात सर्व ट्रक, लोऱ्या, टेम्पो, tankers ठाण्यावरून येत जात होते. असा रस्ता जाम झाला होता की विचारू नका. त्यात आमचा चालक स्वत:सकट माझ्याही जीवाची पर्वा न करता गाडी चालवत होता. मी जर त्याला सावध केले नसते तर एका अवजड गाडीखाली नक्कीच आला असता. निघताना मला भीती वाटत होती की मी वेळेवर पोहोचतोय की नाही! नंतर मला भीती वाटू लागली की मी पोहोचतोय की नाही. तरी वेळेत ठाण्याला पोहोचलो. तेथील रिक्षानी ह्या टॅक्सी चालकाला स्थानकापर्यंत जाऊ दिले. रेल्वेचे तिकीट काढून कल्याणला जाण्याच्या लोकल गाडीत बसलो. १ तास आधी पोहोचलो म्हणून व देवाशिष आला नव्हता म्हणून, बाहेर नाश्ता करायला गेलो. नाश्ता करून होईस्तो त्याचा फोन आला. मला एटीएम मधून पैसे काढायचे असल्याने शोध घेतला असता एटीएम स्थानकाच्या २ऱ्या टोकाला होते. पैसे काढून परत मधल्या पुलावर आलो. वाटेत देवाशिष भेटला. सुपरस्लो थोडी उशीरा येऊन उशीरा सुटली. ३ तारखेला 10.15 ला पोहोचणारी गाडी, उशीरा केरळ राज्यातील एर्नाकुलम जंक्शन स्थानकावर पोहोचली. बाहेर गेल्यावर कळले, एर्नाकुलम बसस्थानक, एर्नाकुलम शहर व एर्नाकुलम रेल्वेस्थानकाच्या मधोमध आहे. बाहेर १ रिक्षा ठरवण्यासाठी चौकशी खोके होते. तिथे एका अनोळखी स्थानिक मुलीने आम्हाला मार्गदर्शन केले. त्या खोक्यात १ रुपया भरून रिक्षाचे कुपन घ्यायचे. त्या कुपनवर रिक्षाचा योग्य दर लिहिलेला असतो. तेवढे पैसे रिक्षावाल्याला

द्यायचे. फसवणूक होत नाही. फक्त रिक्षा प्रथम येईल त्याला सेवा तत्वावर काम करत नाहीत. त्याना जिथे जायचे असेल तिथलेच भाडे घेतात. तरी मुंबई, दिल्लीपेक्षा सेवा चांगली आहे. साम्यवादी सरकार चांगले काम करतय! बसस्थानकावर काहीतरी खाऊन घेतले. बसेसवर सगळे मल्याळीत बोर्ड होते. स्थानकात कोणीतरी सांगितल्यावर मुन्नारला जाणाऱ्या बसमध्ये जाऊन सामान ठेवले. बसेस महाराष्ट्रासारख्या एका विशिष्ट रंगाच्या नाहीत. इथे खाजगी वाहतूक चालते असे वाटते. इथेही लेडीज सीट्स आहेत. पण मल्याळीत लिहिल्याने कळत नाही. स्थानिक प्रवाशाना हिंदी काय, इंग्रजीही येत नाही. तरी एका बाईने मार्गदर्शन केले. पण इथे मुंबईसारखे काटेकोर नाहीत. स्त्रियांच्या सीटवर पुरुष बसतात व स्त्रिया त्याना उठवत नाहीत. वाहकही त्या पुरुषांना उठवत नाहीत. बसमध्ये एक पुण्याचा गट होता. आपली लोक भेटल्यासारखे वाटले. आम्ही अडीमाली या बसस्थानकावर उतरलो. तिथे आम्हाला घेऊन जायला रेगी व त्याचा मित्र जीप घेऊन आले होते. प्रथम आम्ही तेथील खानावळीत खाऊन घेतले. मसाला डोसा, स्थानिक पुरी भाजी असा तेथील आहार होता. इथे पुरी भाजीत पिवळ्या बटाट्याची भाजी नसते तर वेगळीच भाजी असते. मसाला डोसाही वेगळा लागतो. इथे तुम्ही इडली सांबार जरी मागवले तरीही त्यात १ मेदुवडा देतातच. जेवताना १ गुलाबी रंगाचे गरम पाणी बरोबर देतात. एका विशिष्ट लाकडाचे तुकडे टाकून पाणी उकळवतात. जर तुम्ही फास्ट फूड कॉर्नेरला गेलात व जर तुम्ही या पाण्याची मागणी केलीत तरी तुम्हाला हे पाणी दिले जाते. स्थानिक तर हे पाणी आवर्जून पितात. त्यांच्या जीपने आम्ही राजक्कड शहर टाळून एका अरुंद पुलावरून राजक्कड गावाकडे गेलो. देवाशिष केरळात पहिल्यांदा येत होता. माझी दुसरी वेळ होती. ऑगस्ट २०१५ नंतर. देवाशिष केरळवर खूप

खुश होता. “कोकणासारखे आहे पण कोकणापेक्षा हिरवे व इथली घरे कोकणापेक्षा विकसित!” रेग्गी विषण्णपणे म्हणाला “इथली लोक दुबईला काम करतात, प्रचंड कमावतात, इथे बंगले बांधतात व ते सांभाळायला आपल्या वृद्ध, एकाकी आई वडीलाना ठेवतात.” त्या अरुंद पुलाकडे काही प्रवासी मुन्नारवरून भेट द्यायला आले होते. आम्हाला त्याने, आधी वर डोंगरावर गाडी घेऊन जाऊन, परत त्याचे खाली असलेले घर दाखवले. नंतर आम्ही त्यांच्या घराकडे निघालो. मध्ये १ मातीचा अवघड रस्ता. आमची उघडी जीप! इथे फक्त स्थानिकच गाडी चालवू शकतात, अपवाद- ‘माझा थोरला भाऊ!’. आणि इथे फक्त जीप, जिप्सी, ट्रॅक्टर अशी वाहनेच चालू शकतात. त्याच्या घराच्या आधी ते एक होम स्टे बांधत होते. (एंजेल’स ट्रंपेट स्टनी पोथूएमच्या मालकीचे नेडूमपुरं इस्टेट, चित्तमपरा, अन्नकरा, टेकडी, केरळ, भारत). एका खुराड्यात कोंबडे पाळले होते. काही कुत्रे होते. गेल्ययावर चहा मिळाला. मागच्या बाजूला एक भलामोठा खडक होता जो डोंगरावरून गडगडत आला होता व घराचे नुकसान न करता मागे येऊन थांबला होता. रेग्गी आम्हाला एका नदीकडे घेऊन गेले. जाताना इलायची, पेपरमिंट वैगेरे झुडुपे दाखवली. गावातल्या लोकांशी ओळख करून दिली. पण त्यांना फक्त मल्याळी भाषा येत होती. गावातील मुलांच्या शाळेत हिंदी, इंग्रजी या भाषा असतात पण त्याना त्या बोलता येत नाहीत. माझा मित्र त्यांच्याशी खुणेने बोलण्याचा प्रयत्न करत होता. अंधार पडायच्या आत रेग्गीने आम्हाला घरी आणले. ही मंडळी सेबास्तीन प्रोटेस्टट पंथाची होती. त्यांचे पूर्वज पोर्तुगालचे आहेत. आज मासा खायला होता. मला मासे आवडत नाहीत. पण आज इलाज नव्हता. पापी पेटका सवाल होता. सकाळी ४-४-१८ ला

पक्ष्यांची किलबिल ऐकू येत होती. रेग्गीची आई मोतीबिंदूच्या शस्त्रक्रियेतून बरी होऊन कोइम्बतोर्वरुन परत येणार होती. तिच्याबरोबर रेग्गीचा भाऊ पण होता. ही सर्व मंडळी इगतपुरीचा विपश्यना अभ्यासक्रम पूर्ण केलेली होती. त्याना घ्यायला रेग्गीचा मित्र जीप घेऊन जाणार होता. तो आम्हाला घेऊन मुन्नारला गेला. आम्ही जिथे नाश्ता केला, तिथेच बाजूला एक चॉकोलेट विकणारे दुकान होते. माझी पत्नी चॉकलेट ‘बेस’ पासून चॉकलेट तयार करून चंदेरी कागदात गुंडाळून टोफी तयार करते. तिने मला मुन्नारमधून कच्चे चॉकलेट आणायला सांगितले होते. मी त्या दुकानातून रमच्या चवीचे, आल्मोन्डच्या चवीचे, मिल्कमेडच्या चवीचे वैगेरे वेगवेगळया चवीची चॉकलेट घेतली. नंतर बाजारात गेल्यावर कळले की इथे असे कच्चे चॉकलेट विकणारी भरपूर दुकाने आहेत. टाटा कंपनीने आपली चहाची उत्पादने विकणारे एक आउटलेट उघडले आहे. माझ्या पत्नीस तिथला चहा नको होता. आम्ही फक्त तिथे १० रुपयाला चहा पिऊन निघालो. तिथे ग्रीन टी वैगेरेपण मिळते. आमच्याबरोबर जो रेग्गीचा मित्र होता त्याला इंग्रजीही नीट कळत नव्हते, तरीही माझा मित्र त्याच्याशी गप्पा मारण्याचा प्रयत्न करत होता. माझा मित्र त्याला वेफर्सची फक्त चौकशी करायचा. तो ते आमच्यासाठी घेऊन मोकळा व्हायचा! तो आम्हाला पोश दुकाने दाखवायचा व मी त्याला स्थानिक बाजारात घेऊन जायला सांगायचो. तिथल्या दुकानात आपल्यासारखा गरम भाजका मसाला मिळत नाही. ते हळद, जिरे, राई, तीळ वैगेरे वेगळे विकत घेतात व घरी जाऊन तो एकत्र भाजतात. शेवटी मला, इर्नाकुलम्ला सांबार मसाला मिळाला, जो मी माझ्या थोरल्या भावासाठी घेतला. आमचा चालक आम्हाला मुन्नारच्या वर एका धरणाकडे घेऊन गेला. तिथे आम्हाला थांबायचे नव्हते. जाताना १ हत्ती उद्यान लागले. इथे हत्तीवरून

फिरवतात. आम्हाला त्यात इंटरेस्ट नव्हता. जाताना काही फलक लागले, ज्यावर लिहिले होते, ‘इथून हत्ती रस्ता ओलांडतात’. प्रत्यक्षात रस्त्याच्या बाजूला कुंपण होते, ज्यातून विद्युत प्रवाह खेळवला होता. आमचा चालक कम मार्गदर्शक म्हणाला, “या तारांचा धक्का बसल्यावर हत्ती रस्ता बदलतात”. इथे टाटा व इतर कंपन्यांचे चहाचे मळे होते. खूप वाईट वाटले. एकतर आम्ही माणसानी हत्तींच्या क्षेत्रात आक्रमण केले व आता त्यांनाच हाकलताय. मग या अबोल प्राण्यांनी जावे तर कुठे जावे? पुढे गेल्यावर १ बोटिंग करण्यासाठी जागा होती. बाहेर भरपूर दुकाने होती. काकीला हव्या असलेल्या जडीबुटी असलेल्या बाटल्या मिळाल्या. त्यात घरी आपले तेल घालून त्या मसाज करायला वापरायच्या. चहा प्यालो व बोटिंग बघायला खाली उतरलो. बोटिंग न करता परत आलो. परतीचा प्रवास मुन्नारपर्यंत! मागच्या वेळी (ऑगस्ट २०१५) ज्या राजस्थानी खानावळीत मी जेवलो होतो, त्याच्या विरुद्ध बाजूच्या खानावळीत आम्ही जेवलो. मी तिथली स्थानिक थाळी मागवली. माझा मित्र इथले जेवण जेवायला खूप घाबरायचा. त्याला वाटायचे हे लोक बीफ खाऊ घालतील. जेव्हा त्याला खात्री पटली की हे शाकाहारी आहे, तेव्हा त्याने निर्धास्तपणे खाल्ले. इथे बादलीतून सांबार आणले जाते. एका भांड्यातून भरपूर भाज्या, भात व डाळी आणल्या जातात. पाहिजे तेव्हढे पापड देतात. इथले लोकही भरपूर खातात. बहुतेक खाणावळीतील वेटर्स यु.पी., बिहारचे असतात व त्यांच्यावरील प्रमुख मल्याळी! इथला प्रमुख लालबागला राहिलेला होता. आम्ही मुंबईचे होतो व त्यात आम्ही मल्याळी जेवण मागवले म्हणून आमच्याबाबत तो जास्त उदार झाला होता. पण इथले जेवण खोबरेल तेलात बनत असल्याने मला ते पचत नव्हते. त्यानंतर आम्ही दुपारी ३ वाजता रेग्गीच्या आईला व भावाला घेऊन

राजाक्कड शहराकडे निघालो. आम्ही इथे स्वस्तात, इलायची, हळद, आले, मध, मल्याळी पापड घेतले. नंतर घरी जाऊन रेग्गीने देवाशिश्ला त्याची जमीन दाखवली. चढ उतार भयानक होता. त्यानंतर मी व देवाशिष परत काल गेलेल्या नदीकडे गेलो. निसर्गाचा शांतपणा अनुभवला. अंधार व्हायच्च्या आत परतलो. आज आम्हाला दोघाना न ओळखून कुत्र्यांनी भुंकायला सुरुवात केली. रेग्गीने त्याना आवरले. काल आम्ही ज्या खोलीत झोपलो होतो त्या खोलीत रेग्गीची आई झोपली. आमची रवानगी लाईट व पंखा नसलेल्या एका खोलीत झाली. फक्त मोबाईल चार्जिंग करण्यासाठी मी बाहेरचा चार्जिंग पोइन्ट वापरू शकत होतो. मला रात्रभर खूप उकडत होते व डासही चावत होते. सकाळी ५ ४ १८ ला आम्ही आंघोळ करून रेग्गीच्या मित्राच्या जीपमधून अडिमालीकडे निघालो. जाताना सकाळी मुन्नारवरून येणारी एकुलती १ बस दिसली. एक अपघाताचे स्थान पाहिले, जिथे शाळेची बस कठडा तोडून खालच्या रस्त्यावर पडून ३० मुले दगावली होती. कालच्या धरणावर थांबून, धरण उभारताना हुतात्मा झालेल्या मजुरांचे स्मारक पाहिले. माझ्या मावसभावाला डॉल्फिन नेटवर्कचा वापर करून वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. कारण तेच १ नेटवर्क इथे चालत होते. एका धोकादायक वळणावर डावीकडे एका उतारावर गाडी वळवून आमचा चालक एका खानावळीसमोर थांबला. इथे आम्ही नाश्ता केला. मी पुरी भाजी मागवली. भाजी उसळ प्रकारची होती. आयुष्यात कधीच खाल्ली नव्हती. बाहेर पडताना त्या चढावर चालकाने गाडी उलटी चढवली. एकतर वळण, जिथे मागून येणारी गाडी दिसणारही नाही. दुपारी आम्हाला त्याने अडीमालीला सोडले व मल्याळी भाषेत नामफलक लिहिलेली इर्नाकुलम्ला जाणारी बस दाखवून दिली. आजच्या प्रवासाचे त्याचे भाडे देऊन (इथे ९०० रुपये प्रति दिन भाडे आहे.)

आम्ही बसमध्ये बालो व अर्नाकुलम शहरात पोहोचलो. इथेसुद्धा बाहेर रिक्षा ठरवण्यासाठी खोके आहे. तिथे १ रुपया भरून पावती घेतली व रिक्षावाल्याला दिली. त्याने येताना जे भाडे आकारले होते (२९रुपये) त्यापेक्षा जास्त भाडे आकारून (३१रुपये) आम्हाला नो एन्ट्री मधून शोर्टकटने (खुश्कीच्या मार्गातून) एर्नाकुलम रेल्वे स्थानकाकडे पोहोचवले. माझ्या पुतणीने कळवले होते की रेल्वेत तात्कालची तिकिटे मिळत नाहीत. तिकीट देणारी चौकशीस उत्तर द्यायला तयार नव्हती. चौकशी खिडकीत कोणीही नव्हते. करंट बुकिंगवर तिकीट उपलब्ध नव्हते. मंगला सुपरस्लोमधून जनरल डब्ब्यातून उभ्याने जायची माझी तयारी नव्हती. कारवार मंगलोरपर्यंत बस पकडून जावे तर बस कुठे पकडायची व ती नेमकी कुठे सोडणार ते मला माहीत नव्हते. शेवटी जेवायला आम्ही रेल्वे स्थानकाच्या पश्चिमेकडील एका रेस्तराँमध्ये गेलो. दोघांमध्ये एकच भाजी व दोनच रोट्या मागवल्यावर वेटर नाराज झाला व आमच्याकडे लक्ष देईनासा झाला. इथे लोक प्रत्येकी १ भाजी खातात. आम्हाला दोघाना मिळून ती १ भाजी पण संपत नव्हती.

बाहेर पडून एका रेल्वे तिकीट बुक करून देणाऱ्या दलालाला गाठले. त्याने आम्हाला एका दूरच्या कचेरीत बोलावले. तो एकच एसीचे तिकीट किंवा २ स्लीपिंग कोचची तिकिटे काढून देऊ शकत होता. आम्ही त्याला फोर्म भरून दिला व भाड्याव्यतिरिक्त २०० रुपये प्रत्येकी जादा दिले. त्यांनी खात्रीने सांगितले की उद्या सकाळी ११ वाजल्यानंतर या व कन्फर्म तिकीट घेऊन जा. पावती वैगेरे काही नाही. रामभरोसे! १४५० रुपये वट्ट त्याच्या हातावर टेकवले व बाहेर पडलो. एका हॉटेलात जाऊन खोलीची चौकशी केली. त्याने आधी एक दर सांगितला व नंतर आम्ही दोघेही एका खोलीत राहणार म्हटल्यावर डबलबेडचा दर जास्त आहे म्हणून सांगायला लागला. त्याला म्हटले, “तुला

मी काय दलाल वाटलो? त्याच्या एकट्यासाठी, खोली बुक करायला आलो काय? आम्हा दोघांसाठी खोली पाहिजे होती. पण आता नकोच.” दुसऱ्या एन एम त्रावेल्सच्या ‘होलीडे होम्स’ नावाच्या हॉटेलमध्ये ७९० रुपये भाडे व २१० रुपये डिपॉजिट भरून डबलबेड एसीविरहीत खोली घेतली. खूपच गरम होत होते. आंघोळ केली. चालत बाहेर पडलो. लिम्बुपाणी व चहा पिऊन बस पकडली व कोची बंदराकडे गेलो. तिथेही क्रुझ होते पण मी २०१६च्या गोवा ट्रीपला क्रुझ ट्रीप केली असल्याने मला इंटरेस्ट नव्हता. आम्ही बंदरावर फिरत

निघालो. खूप वेगवेगळया पद्धतीचे मासे (मोरी, पापलेटे, सुरमई, बांगडे वैगेरे), म्हाडोळया (स्कवीडस), शेवण्ड, खेकडे, झिंगे, कोलमी, जवळे, कालवे वैगेरे विकायला होते. पाहिजे असल्यास तिथल्या तिथे भाजून पण द्यायला तयार होते. चीनी जाळे होते. एक कोळी त्याच्या जाळयातून मासे सोडवून खाली टाकत होता. सूर्यास्त होत आलेला होता. सुंदर दृश्य होते. आम्ही एका जागी मीठ मसाला लावलेले कलिंगड खाल्ले. पाण्यात लांबवर एक बंदर दिसत होते. मोठमोठ्या बोटी, टग्स इथून तिथे जात होत्या. मासे खायला कावळे होते. खूप परदेशी होते! एका विलायती परदेशी महिलेला विचारले तर ती भारतात २५ वेळा आली होती. काश्मीरपासून केरळपर्यंत भारत तिने पाहिला होता. तेव्हढे तर आम्हीही फिरलो नव्हतो. त्यांना भारतात कोणताही वाईट अनुभव आला नव्हता. आम्ही तिथे माशांचा लिलाव पाहिला! थोरल्या भावाची, मावस मेहुणीची (अस्सल मत्स्यप्रेमी) आठवण काढून त्याना फोन केला. त्यांच्यासाठी फोटो काढले, चलचित्रण केले! देवाशिश्ने तेथे एका कंदमूळाच्या वेफर्स, एका जर्मन गटाला खायला घातल्या. त्या तेलकट बेचव

वेफर्स त्यांनी बिचा-यांनी तोंड वेडेवाकडे करत खाल्ल्या. तिथून बस पकडून निघालो. बसमध्ये १ विदेशी तरुणी होती. १८ वर्षांची होती! सीटवर मांडी घालून बसली होती. खूप बोलकी होती. इथे अशा अनेक विदेशी तरुणी एकट्याने प्रवास करतात. पण आमच्या लक्षात आले की एकही मल्याळी मुलगी अथवा स्त्री तिच्या बाजूला बसायला तयार नव्हती. शेवटी पारंपारिक विचार सहजासहजी जात नाहीत. एका आड रस्त्याला बसचालकाने आम्हाला उतरवले. आमच्या हॉटेलमध्ये जाऊन फ्रेश वैगेरे होऊन जेवायला खाली उतरलो. यावेळी केरळी जेवण टाळले. फिरून झोपायला हॉटेलमध्ये गेलो. सकाळी ६ ४ १८ ला चहा प्यायला खाली गेलो. देवाशिष उठल्यावर परत नाश्ता व चहा घेतला. काल दुपारी ज्या हॉटेलमध्ये जेवलो होतो, तिथेच रात्री जेवलो व तिथेच सकाळी नाश्ता केला. त्यांनी उपमा दिला. देवाशिश्ला शिरा खायचा होता. वेटरला कळत नव्हते. देवाशिष "स्वीट" म्हणाला. त्याने साखर आणून दिली. शेवटी त्याला कळले. तो म्हणाला "इथे शिरा मिळत नाही." आम्ही तिकीट घ्यायला गेलो. त्याने आधी विचारले की मला संदेश आला होता का? पण मला संदेश आला नव्हता. त्याने त्याच्या संगणकावर आमचे तिकीट दाखवले, पण कोणाच्या नावाचे होते ते दिसले नाही. त्याने तिकिटावर पेनाने कन्फर्म्ड लिहून बोगीचा क्रमांक लिहून त्यापुढे आसन क्रमांक लिहिला. आम्ही जेवायला 'आर्य' नावाच्या खानावळीत गेलो. तिथे मसाला डोस्याची किंवा उटप्पाची ओर्डर द्यायची असेल तर टेबलावर बसून द्यायची. पण ताट घ्यायचे असेल तर आगाऊ पैसे भरायचे. देवाशिश्ने जेवण घेतले व मी उतप्पा! त्याला भात वाढल्यावर त्याच्या मागच्या केरळी माणसाला भात वाढला गेला. त्या मल्याळी माणसाने त्यानंतर ४ वेळा भात खाल्ला तरी देवाशिश्चा पहिला भातही संपला नव्हता. कसाबसा त्याने तो

संपवला. आम्ही त्यानंतर एका प्रदर्शनात जाऊन पुस्तक विकत घेऊन ट्रेन पकडली. मंगला सुपरस्लो!

७ ४ १८ ला सकाळी कणकवलीला उतरलो. देवाशिश्ने स्थानकावरच दाक्षिणात्य पदार्थांचा (रेल्वेतून उतरताना विकत घेतलेल्या) नाश्ता केला. मला मात्र आता दाक्षिणात्य पदार्थांचा उबग आला होता. मला आता कणकवलीतील (माझ्या मातीतील) मालवणी पदार्थ न्याहारीला खायचे होते. रिक्षावाल्याने कणकवली शहरात जाण्यासाठी ४० रुपये भाडे सांगितले. देवाशिश्च्या मनाविरुद्ध (एवढे पैसे का द्यायचे? लुटतोय तो!) आम्ही रिक्षात बसलो. एस.टी. स्थानकावर कळले की आचऱ्याला जायला एस.टी. सकाळी ८.३० वाजता येईल. शेअर रिक्षा निघायला वेळ होता. आम्ही समोरच्या न्याहारी केंद्रात कटवडा उसळ खाल्ली. पेपर घेतले. तरी रिक्षा सोडेना. दुसऱ्या ट्रेनच्या प्रवाशांची वाट बघत बसला. दोघे जण उतरून एस.टी. पकडायला गेले. पण रिक्षा तुडुंब भरेपर्यंत त्यांनी रिक्षा सोडली नाही. ८.३०ची एस.टी. नक्की मिळाली असती. ५० रुपये प्रत्येकी भाडे देऊन आचऱ्याला उतरलो. भाजी, अंडी, कांदे, बटाटे, दुध, पाणी वैगेरे घेऊन बाळू नावाच्या माझ्या मामेभावाची (तिठ्यावर वाण्याचे दुकान चालवतो.) चौकशी करून, त्याच्याकडूनच तेल घेऊन, दुसरीकडून पेपर घेऊन वायंगणीच्या पेडणेकरांच्या घरापर्यंत रिक्षा ठरवून (१७० रुपये) निघालो. पेडणेकरांच्या घरापासून चालत माझ्या थोरल्या भावाच्या घरापर्यंत गेलो. सामान ठेवले. मनमोहनने चहा, नाश्ता (पोहे) दिले. आंघोळ करून मी एकटा आधी पेडणेकरांकडे व नंतर इशाऱ्याच्या घरापर्यंत गेलो. बहुतेक लोक काजीत होते. सूर्यशेखर मुंबईला गेला होता. जाताना तलावात पाणपक्षी भरपूर होते. त्यांचे फोटो काढले. दाश्राठ्च्या घरी त्यांची भात कापणीची कामे चालू होती. मजूर मिळत नव्हते. माझी गाडी सर्विसिंगला असल्याने ती मला उपलब्ध नव्हती. जाताना वाण्याच्या दुकानातून सामान घेऊन परत किरणकाकांच्या घरी गेलो.

त्यांच्याशी गप्पा मारताना कळले, मोहनभाई, धनंजय २ दिवसांकरता येऊन गेले. इथे त्याना आता करमणुकीचे साधन नसल्याने ते कंटाळतात. धांनन्जायचे मालवणला घर असल्याने व बाजार दारात असल्याने ते एक व एकच दिवस तेथे राहिले. संध्याकाळी समुद्रावर गेलो. रापण वैगेरे काही नाही. एक डॉल्फिन मरून पडला होता. त्याला कुत्रे तोंड लावत नव्हते. फक्त खेकडे त्याला खात होते. रविवार (8 4 18) पण आम्ही घरीच घालवला. किरणकाका आचयाच्या बाजारात मासे आणायला गेले होते. देवाशिष कोणालाही भेटायला तयार नव्हता. सोमवारी ९ ४ १८ रोजी सकाळी एस.टी. पकडून आसोलकरांच्या दुकानाजवळ उतरलो. तिथून ६ आसनी रिक्षा पकडून मालवणच्या टोपीवाला हायस्कूलजवळ! मेढ्यातील मावशीकडे गेलो. ११ वाजता तलाठ्याच्या कार्यालयात गेलो. फक्त सोमवारी चालू असते हे! इतर दिवशी सिंधुदुर्गातील सर्व तलाठी सिंधुदुर्गनगरीमध्ये एकत्र बसून संगणकावर माहिती भरण्याचे काम करतात, असे तिथे सुचना फलकावर छापले होते. पण प्रत्यक्षात तिथे गेलो असता त्या दिवशीसुद्धा कार्यालयात कोणी नव्हते. आम्ही सिंधुदुर्गनगरीला जायचा निर्णय घेतला. तिथून चालत मालवण एस.टी. स्थानकाकडे गेलो. सर्व बसेस भरून चालल्या होत्या. आम्ही चौकशी केली तेव्हा त्यांनी कणकवलीला जाणाऱ्या बसमध्ये बसायला सांगितले. आता सिंधुदुर्गनगरी उजवीकडे व कणकवली डावीकडे! याचा मेळ कसा जमायचा? तेव्हा ते म्हणाले, “सुकळवाड्च्या पुढे रानबांबुळीला उतराव, तिथून रिक्षा पकडून सिंधुदुर्गनगरीला जा.” आम्ही उभ्या उभ्या प्रवास करून रानबांबुळीला उतरून रिक्षात दुसऱ्या एका व्यक्तीबरोबर भागीदारीने (प्रत्येकी २० रुपये) सिंधुदुर्गनगरीला गेलो. एका खोलीत, सिंधुदुर्गातील सर्व तलाठी सिंधुदुर्गनगरीमध्ये एकत्र बसून संगणकावर माहिती भरण्याचे काम करत होते.

बाहेर एकाला विचारले, “मालवणचे कोण?” तेव्हा त्यांनी एका निळया बुशशर्टवाल्याकडे बोट दाखवले. त्या व्यक्तीकडे चौकशी केली असता, त्यांनी मला परत परवा बोलावले. आता परत एवढा त्रास घेऊन इथे यायचे? ५० रुपये रिक्षाला देऊन रानबांबुळीला गेलो असता पोयऱ्याच्या कृपेशला फोन केला. त्याने परत सिंधुदुर्गनगरीला न जाता उद्या पोयऱ्याला येऊन भेटायला सांगितले. तिथून एस.टी. पकडून मालवण बसस्थानक! चालत सुनिता खाणावळीकडे गेलो. बाहेर पडताना त्यांच्याकडून कुंदा घेतला. तिथून फोकांडा पिंपळामार्गे ६ आसनी रिक्षास्थानक, समोरील संगणक केंद्राकडे जाऊन ७ १२ च्या उताऱ्याची प्रिंट काढली. रिक्षा पकडून वायंगणीला गेलो. प्रथम त्रीम्बाक्कारांकडे गेलो, पण देवाशिश्वी मामी घरी नसल्याने परत दादाच्या घरी गेलो. रात्री परत त्रीम्बाक्कारांकडे गेलो. मामी एकटीच घरी होती. दुसऱ्या घरी एक व्यक्ती होती. तिसऱ्या घरी एकच व्यक्ती! शेजारच्या घरी माझा मामेभाऊ एकटा! लांबवर या मामीची जाऊ एकटी! संपूर्ण कोकणात अशीच परिस्थिती आहे. सगळी एकेकटे राहतात. मामीने आम्हाला गावठी अंडी दिली. परत जाताना दाश्राठ्च्या घरी गेलो तेव्हा तो घरी नव्हता. इथे रस्त्याची कामे करायला सोलापूरचे लोक आलेत. त्यांची भाषा ह्यांना कळत नाही. ह्यांची भाषा त्याना कळत नाही पण ते सर्व दाश्राठ्च्या पडवीत राहतात व एकत्र गप्पा मारतात. दशरठ खाली वाण्याच्या दुकानात गप्पा मारत बसला होता. त्याच्याबरोबर गप्पा मारत परत आमच्या घराकडे मार्गस्थ झालो. वाटेत जाताना कमलेश भेटला. आमची वाट बघत होता. एकटा घरी जायला घाबरत होता. देवांशीष व त्याला, दोघाना एकत्र पाठवून मी सूर्यशेखरच्या व आनंदकाकाच्या घरी गेलो. परत दादाच्या घरी जाताना मी एकटा होतो. मोबाइलचा लाईट होता पण मीही घाबरलो होतो. मध्येच

दत्ताच्या देवळाचा प्रकाश दिसल्यावर माझ्यासारख्या नास्तिकालाही हायसे वाटले. घरी जाऊन जेवल्यावर मी व कमलेश मेलेल्या डॉल्फिनला बघायला गेलो. येताना अंदाजाने घर शोधले नसते तर समुद्रकिनाऱ्यावर भटकत राहिलो असतो. मंगळवारी १० ४ १८ला आम्ही पोयऱ्याला जायला निघालो. सकाळी प्रथम दशराठ्कडे, नन्तर एस.टी. पकडून आचऱ्याला, तिथून रिक्षाने पोयऱ्याला. पोहोचेपर्यंत दुपारचे १२ वाजलेले. १०.३० वाजताच कृपेश पसार झाला होता. फोन लावतोय, त्याच्या घरी पातील्काका जाऊन आले. त्याच्या घरीही ठाऊक नव्हते, 'तो कधी येणार? कुठे गेलाय?' शेवटी काकांच्या घरी जेऊन कच्चा भाजीचा फणस घेऊन दुपारी बाहेर पडलो. एस.टी. थांब्यावर एक स्त्री गावातल्या सरपंचाना, पातालाना शिव्या घालत आमच्याशी गप्पा मारत होती. तेव्हा कळले की ती कृपेश्चीच आई आहे. अजून तो आला नव्हता, कुठे गेलाय ते तिला माहीत नव्हते, कधी येणार तेही तिला माहीत नव्हते. तिला निरोप देऊन आम्ही आचऱ्याला उतरलो व दुसरी एस.टी. पकडून वायन्गणीला गेलो. तिथून रिक्षाने घरी! दुसऱ्या दिवशी ११ ४ १८ रोजी सकाळी त्याला परत फोन लावला तर तो म्हणाला "वायंगणीच्या ग्रामपंचायतीच्या कार्यालयात या!" ९ साडेनऊच्या आसपास उन्हात २-३ मैल चालत ग्रामपंचायतीच्या कार्यालयासमोर पोहोचलो तर तो म्हणाला, "येतोय. वाटेत आहे." बाईकवरून येत होता. परत फोन आला की बाईकचे काहीतरी झाले. मला नीट कळले नाही म्हणून परत फोन लावला तर फोन बंद! परत दीड तास त्या उन्हात थांबलो. फोन बंद! शेवटी त्या तळपत्या उन्हात चालत परत निघालो. वाटेत १ सहा आसनी रिक्षावाला एका प्रवाशाला घेऊन बौद्धवाड्यावरून पुढे चालला होता. त्या प्रवाशाने मला लिफ्ट दिली. त्याने विचारले, "कोण तुम्ही?" मी म्हणालो, "मी अभय पेदानेकार्चा भाऊ." असे

म्हटल्यावर रिक्षाचालकाने मागे वळून माझ्याकडे कौतुकाने पाहिले. पुढे तो प्रवासी उतरला. चालक मला घेऊन पुढे गेला. वाटेत त्यांने काही शाळकरी मुलाना घेतले व बौद्धांच्या विहिरीकडे सोडले. मीही उतरलो व त्याला विचारले, “किती पैसे देऊ?” तो म्हणाला. “पैसे नकोत.” घरी जाऊन फोन करून मुंबईला जाणारी ठाणेश्वर त्रावेल्स्ची तिकेटी काढली. जेवण करून इशाऱ्याकडे गेलो. इशाऱ्याने आम्हाला, माझ्या कारने वायन्गणीच्या नाक्यावर सोडले. तिथून बसमध्ये बसून मुंबई सकाळी १२ ४ १८ रोजी गाठली.

माझी पत्नी २८ ४ २०१८ रोजी तिची मावसबहीण, आई, मावसबहीणीचे वडील व मावसबहीणीच्या मुलांसह पोयऱ्याला (सिंधुदुर्ग जिल्हा, मालवण तालुका) गेली होती. २ ५ १८ रोजी मी वायंगणीला जाण्यासाठी 'रेड बस' द्वारे 'आत्माराम मनिष ट्रॅवेल्स्ची' गोव्याची बस कणकवलीपर्यंत बुक केली. त्यात ट्रॅकिंग सिस्टम आहे असे रेड बसवाले रेकून सांगत होते. पण मला त्यांचे काही नेटवर्क मिळत नव्हते. मला काही एसएमएस सुद्धा नाही. चालकाचा, वाहकाचा फोन नाही. माझ्याबरोबर त्याच बसने प्रवास करणारा दुसऱ्या एका सहप्रवाशाने ज्याने रीतसर ट्रॅवल एजंसीकडून तिकीट काढले होते, त्याचाकडे चालकाचा फोन, एसएमएस वैगेरे सगळ! बस समोर लागल्यावर मी वाहकाला माझा सीट क्रमांक सांगितल्यावर त्याने आश्चर्य व्यक्त केले. म्हणजे रेड बसच्या बुकिंगबद्दल त्याला कल्पनाच नव्हती. दुसऱ्या दिवशी पहाटे मोबाईलचे चार्जिंग संपले असताना मी पहाटे ५ वाजता (३ ५ १८) कणकवलीला उतरलो. एस.टी. स्थानकात प्रातर्विधी उरकून समोरच्या खानावळीत नाश्ता करून ६ सीटर रिक्षात लाकडी फळीवर पार्श्वभाग शेकून काढून आचरा तिठ्यापर्यंत गेलो. तिथे भाजी विकत घेऊन (इतर दुकाने बंद- ७ वाजता) दुसरी रिक्षा पकडून (दर वाढलेला- २०० रुपये) वायंगणीला उतरलो. नाश्ता करुन दहृथ्कडे जाउन माझी तिथे ठेवलेली कार घेउन आच्र्‌रा तिठामार्गे घेउन पोयऱ्याला पोहोचलो. तिथे पत्नी 4 दिवस आधीच गेली होती. जेवुन झाल्यावर पत्नी, सासु, मावसमेहुणी, मावसमेहुणीचे वडील याना घेउन ओटवला गेलो. ओटव हे मुम्बई गोवा महामार्गावर कण्कवलीच्या आधी उजवीकडील फाट्यावर (नांद्गाव जवळ) सारडाव धबधब्यानंतर लागणारे गाव आहे. हे माझ्या पत्नीचे मुळ गाव! इथे सास-यांचे नातेवाइक राहतात. पण

त्यांचे मुळ घर शिल्लक नाही! त्यांच्या देवीच्या (भवानी आई) दर्शनाला जाण्यापुर्वी गावकऱ्याना बरोबर घेउन जाण्याची प्रथा आहे. गावकरी म्हणजे ‘गुरव’! माझ्या पत्नीचे माहेरचे आड्नावही ‘गुरव’. प्रथम त्यांच्या नातेवाइकांच्या घरी गेलो. घरी एकटी स्त्री होती. मुलगा बाहेर गेला होता. सासुने त्यांच्याशी ओळख काढ्ली. तिथुन आम्ही गावातल्या देवळात गेलो. तिथे 1 गावकार आले होते. ओटी भरली! सध्याकाळी अंधार पडायच्या आत 2रे देउळ गाठायचे होते. ते जरा गावाच्या बाजुला डोंगरात होते. एका व्यक्तीने सांगितले, इथे डावीकडे जा. खडीचा रस्ता! चाक पंक्चर व्हायची खात्री! तिथे कोपऱ्यावर 2रा माणुस भेटला. “हो! आतच आहे.” म्हणला. त्याच्या भरवश्यावर आत गेलो तर कुठेही देउळ नाही. ‘म्याक्नेस गोल्ड’ या चित्रपटात दाखवलाय तसा वैराण वाळवंटी भाग! प्रथम डावीकडे गेलो. एका धरण बंधाऱ्याच्या डावीकडे गेलो. दुरवर कुठेही देऊळ नव्हते. त्या मातीत उलट्सुलट गाडी चालवत अस्ताना 1 देउळ दिसले. कोणीही मनुष्यप्राणी, काळ कुत्र, चिट्पाखरु देखील नव्हते चौकशी करायला! वैराण, उजाड भाग! संध्याकाळचे 5.30- 6 वाजले होते. माझी पत्नी उतरुन ते देउळ बघुन आली. ते महादेवाचे देउळ होते. आम्ही भवानी आईचे मुळ देऊळ शोधत होतो. मला लाम्बुन त्या देवळाजवळील वीरगळ दिसली. पण आता जवळ जाउन फोटो काढायला वेळ नव्हता. परत त्या बंधाऱ्याच्या बाजुने दुसरीकडे आलो. आम्हाला डावीकडे 1 भगवा झेंडा दिसला, पण त्याच्या डावीकडे काहीच दिसत नव्हते. आम्हाला वाटले तो झेंडा जमिनीची हद्द दाखवण्यासाठी असावा. उजवीकडे एक ट्रक जाउ शकेल असा मातीतील रस्ता दिसत होता. तो लाम्बवर वळसा मारुन परत समोर येत होता. मी शोर्टकट्ने निघालो. एक

भलामोठा दगड वाटेत दिसला. ब्रेक मारायच्या आत त्या दगडाला आप्टुन गाडी पुढे गेली होती. मागच्यावेळी याक्सल तुटला होता त्याची आठवण झाली. आता मात्र मी घाबरलो होतो. परत उजवीकडे गाडी घेतली. तर मधला उंचवटा व 2 बाजुला खळगे अशा मातीवाल्या रस्त्यावरुन मी चाललो होतो. ह्या रस्त्यावरुन फक्त ट्रक किंवा लोऱ्याच जाउ शकत होत्या. बरे माझी 'टाटा इंडिका'. तिचा क्लीअरंसही कमी! एकवेळ एस.यु.व्ही. असती तरिही चालले असते. आता गाडी पंक्चर झाली किंवा तिचा येक्सल, साय्लेंसर वैगेरे तुटला किंवा इंजिनला धक्का लागला तर एकही ग्यारेज जवळपास नाही, कोणिही मनुष्य मदतीला येणार नाही. संध्याकाळची वेळ! गाडीत 1 व्रुद्ध पुरुष, 3 स्त्रिया, त्यातील 1 मधुमेह, लो बि.पी. असलेली व्रुद्ध स्त्री! गाडी अशा आड जागी बंद पडल्यास मदतीला कोणी नाही. जवळपास एकही घर नाही. रात्र कुठे काढायची? मी गाडी बाजुला नेउन थाम्बवली. माझी पत्नी व तिची मावसबहीण त्या रस्त्यावरुन पुढे चालत निघाल्या. माझ्या क्यामेराचा बंद तुटुन तो धुळीत पडला. भरपुर वेळ झाला, त्या दोघींचाही पत्ता नाही. दोघिंचाही भ्रमणध्वनी लागत नाही. शेवटी मी त्याना शोधत निघालो. एक असा भाग वाटेत लागला की तिथे 2 रस्ते फुटले होते. आता याना कुठे शोधायचे? पावलांचा मागोवा घेउन डावीकडे गेलो. चुकामुक झाल्यास त्या गाडीपर्यंत पोहोचल्या असत्या व मी अनंत काळासाठी अंधारात चाचपडत राहिलो असतो. एकही रस्त्यावरचा दिवा वैगेरे काहिही नव्हते. गुडुप अंधार पडला असता! मागे 1 घर होते पण तिथपर्यंत चालत जाउ शकेल अशी सासुची परिस्थिती नव्हती. तिचे गुड्घे गाडीत बसुन सुद्धा दुखायचे. शेवटी या परतताना दिसल्या! म्हणाल्या की 'त्याना पुढे 1 स्त्री जाताना दिसली. तिचा

पाठलाग करुन यानी तिला गाठले. ती म्हणाली इथे पुढे फक्त ट्रकचा रस्ता आहे. आम्ही जिथुन आलो, तिथेच देऊळ आहे. मी म्हणालो, “आता देवळात जाणे नको. अंधारात रस्ता समजणार नाही. आडवळणावर कोणिही मदतीला येणार नाही. आपण एका देवळात ओटी भरली आहे. दुसऱ्या देवळात जायलाच पाहिजे असे काही नाही.” हे ऐकल्यावर दोघी नाराज झाल्या. परत जाताना मघासच्या झेंड्यापलिकडे ते देऊळ दिसले. 1 एस.यु.व्ही.ही तिथे चालली होती. ह्या म्हणाल्या की “तुम्ही गाडी वाटेत लावा. आम्ही चालत जाऊ.” आता सासु एवढे कसे चालणार होती. जितक्या जवळ शक्य होते, तितक्या जवळ गाडी लावली. गाडी पुर्णपणे लाल धुळीने माखली होती. जिथे जिथे थाम्बलो तिथे कुठेही डिझेलची किंवा तेलाची गळती झाली नव्हती. म्हणजे डिझेलची टाकी फुटली नव्हती. आम्ही देवळात चालत गेलो. तिथे 2रे गावकार होते. त्यानी सांगितले इथे 7 वाजल्यानंतर कोणी थाम्बत नाही. आम्हाला 6.50 झाले होते. लवकर लवकर ओटी भरुन बाहेर पडलो. माझी पत्नी, लहानपणी एकदा आली होती. 40 वर्षापुर्वी कोणते झाड पाहिले होते तेही तिला आठवत होते. बाहेर पडलो तेव्हा अंधार झाला होता. रात्री 11 वाजता पोयऱ्याला घरी पोहोचलो. दुसऱ्या दिवशी (4 5 18) सकाळी पत्नी, मेहुणी, भाचे व काकाना घेउन तोंडवळीला गेलो. तिथे पुजा होती! रात्री मेहुणी तिथेच राहिली. आम्ही (मी व पत्नी) वायंगणीला आलो. (5 5 18) दुपारी मेहुणी व भाचे एस.टी.ने आले. रात्री मालवण गाठले. बिछाने खराब झाले होते. चांगल्या चादरी कपाटात होत्या ज्याची चावी आमच्याकडे नव्हती. सेवांगणातुन चादरी, मालवणच्या मावशीकडुन चटया आणल्या. रात्री सुनिता खानावळीसमोर गाडी उभी केली होती. निघताना मागे उभी असलेली

बाइक बघितली नाही. मेहुणी व भाचा डावीकडे बसल्याने डावीकडचा आरसा दिसला नाही. सासु, पत्नी व भाची मागे बसले, त्यानीही सांगितले नाही. गाडी रिव्हर्स घेताना ती बाइक पडली. तिचा मालक धावत येउन भांडायला लागला. “किती पैसे झाले?” म्हणुन विचारले तर “ग्यारेजला चला” असे सांगायला लागला. आता या वेळेला ग्यारेज कोठले उघडे मिळणार ? तसाच निघालो तर ‘ह्यांडल मोडले’ असा दावा करणारा बाइक चालक वेगाने गाडी चालवत आडवा उभा राहिला. गर्दी जमवुन सहानुभुती मिळवायला लागला. पोलिसस्टेशनची भिती दाखवल्यावर 500 रुपयांच्याऐवजी 200 रुपयात पटला! घरी आल्यावर भीती वाटत होती की हा रात्री घर बघुन गाडी तर फोडणार नाही ना? चुलतभावाशी बोलल्यावर लक्षात आले की हे मुद्दम पर्यटकांकडुन पैसे उकळण्यासाठी गाड्या आयत्यावेळी मागे उभ्या करतात. (6 5 18) सकाळी लवकर तयारी करुन (भगवती- आमचे कुलदैवत) पेडणे गाठले. तिथेच जेवुन 4 वाजेपर्यंत परत मालवण. तिथुन सिंधुदुर्ग किल्ल्यावर मी, मेहुणी व तिची 2 मुले. पत्नी व सासू मावशीच्या घरी. नंतर चिवल्याच्या येळेवर (बीच) खुप गर्दी व घाण होती. (7 5 18) चादरी व चटया परत करुन पोयरा. (8 5 18) सकाळी गाडी वायंगणीला दश्रथकडे ठेवुन आचरा तिठ्याला आम्बे ताब्यात घेउन परत पोयरा! परत पत्नी, सासु, मेहुणी, भाच्याना घेउन बसने मुम्बैच्या दिशेला. सकाळी घर. (9 5 18)

29 5 2018 रोजी सकाळी 6 वाजताच्या शिवनेरीने सुपेर्मिंड्च्या ट्रेनिंग्ला पुण्याला जाउन आलो. दुपारी 3 वाजताच्या शिवनेरीने स्वारगेटवरुन परत आलो.

21 7 18 रोजी शहाजी राजे क्रीडासंकुलासमोरील एका रेस्टोरंटमध्ये, फलटणच्या बालमित्राला, भांडुपच्या व डि.एन.नगर, अंधेरी पश्चिमच्या बालमित्रांबरोबर भेटलो. फलटणचा मित्र ‘नंतर परत येईन तेव्हा बाहेर फिरायला जाऊ’ असे म्हणायला लागला. त्याला म्हटले, “उद्या कोणी बघितलाय? आत्ताच निघायचे!” त्याने घरी कळवले, “मी बाहेर चाललोय.” इतरानीही तसेच घरी कळवले. मी फोन केल्यावर पत्नीने फक्त एवढेच विचारले. “कपडे?” मी माझे नेहमीचे जुने उत्तर दिले, “वाटेत घेईन!” अंधेरीच्या मित्राने गाडी काढली. प्रथम डहाणूच्या दाभोसा धबधब्यावर जायचे ठरले. बोरिवलीच्या दिशेने निघाल्यावर घरातुन मुलाला कपडे घेऊन खाली बोलावले. मनोर फाट्याला पोहोचल्यावर डावीकडे पालघरला जायचा निर्णय घेतला. [उजवीकडचा रस्ता खराब होता व रात्रीचे 2 वाजून गेले होते.] (22 7 18). रात्री 2.50 ला पालघरला पोहोचलो. आता कुठले लॉज मिळणार? शेवटी हिय्या करुन एका लॉजवाल्याला उठवले. त्याने जास्तीचा चार्ज मागीतला. अडला हरी गाढवाचे पाय धरी! निमूटपणे भरला. गाडीचा 1 दरवाजा लॉकच होत नव्हता. तो 1 वेगळा तणाव! सकाळी समोरच्या न्याहारी केंद्रावर नाष्ता करुन माहीम बीच गाठले. गूगलने फिरव फिरव फिरवले. मित्र परत जायला निघाले. मी हट्टाला पेटलो! म्हणालो “रात्रभर काय डासांकडुन चावुन घ्यायला इथे आलो होतो?” गूगल बंद करून स्थानिकांकडे चौकशी केली. मार्ग सापडला! किनाऱ्याचे दर्शन घेतले! समुद्राने त्याला अर्पण केलेला सर्व कचरा किनाऱ्याला परत केला होता. 10 मिनिटात परत निघलो व मुम्बई गाठली.

26 7 18 रोजी पुण्याला जायच्या रेल्वेची तिकीटे काढली होती. पत्नी तिच्या कचेरीतुन जोगेश्वरीतुन निघणार होती. दुपारी 2.45 ला पत्नीस फोन केला “घरातुन निघतोय”. तिने विचारले, “इतक्या लवकर?” मी थोडासा सैलावलो. घर बंद करुन बाहेर पडताना लक्षात आले की खिशात चावीच नाही. अर्धा तास शोधल्यावर लक्षात आले की धुलाइ यंत्रात लावुन बाहेर वाळत घातलेल्या विजारीत चावी होती. 3.15 ला बाहेर पडलो. बस नव्हती. रिक्शा पकडली. घराजवळच त्र्यािफिक जाम. रिक्शा मागे फिरुन दुसऱ्या रस्त्याने निघालो तर आधीचा रस्ता रिकामा. बोरिवली पुर्वेला पहिल्यांदा 8 क्र. फलाट जवळ आहे. पश्चिमेला 3 क्रमांकाचा फलाट आहे. त्यानंतर दक्षिणेला चर्चगेटच्या बाजुला 2 क्र. फलाट नंतर 1 क्र. फलाट. मला तिथुन गाडी मिळाली. तिही स्लो. पत्नीस फोन केला तर तिने अंधेरी ओलांडले होते. मी दादरला पोहोचलो तर तिने भायखळा गाठले होते. मी सेंट्रलच्या दिशेने धावायला सुरुवात केली. हातात 2 ब्यागा. पत्नीस जरी रेल्वे मिळाली तरी तिचे घालायचे ड्रेस माझ्याकडच्या पिशवीत. बुटाची लेस सुटली होती ती बांधायलाही वेळ नव्हता. लेसवर पाय पडुन अडकुन पडायची भीती होती. दादरला गाडी बदलली. छत्रपती शिवाजी टर्मिनसच्या आधी गाडी थोडावेळ थाम्बुन राहिली होती. माझे ह्रुदयही थोडावेळ थाम्बले होते. छत्रपती शिवाजी टर्मिनसच्या फलाटावर उतरलो तर पत्नी त्या गाडीसमोर उभी माझी वाट पहातेय. त्या गाडीजवळ पोहोचलो तर आमचा डबा दुसऱ्या टोकाला. शेवटी गाडी मिळाली. पुण्याला त्याच गाडीने मावसमेहुणीही उतरली. रोज पुणे मुम्बई करुन मुम्बई विद्यापीठात काम करते. सकाळी 3.30 ला उठून कामावर जाते. मानले पाहिजे. त्यांच्याचकडे जेवायला गेलो व झोपायला दुसऱ्या

मावसमेहुण्याकडे. 27 7 2018 रोजी मी व माझी पत्नी पुण्याहुन वैयक्तिक कामे करुन परत आलो.

27 8 18 ला मी व माझा चुलतभाऊ सीएसटी वरुन रात्री 11.05 ला कोंकण कन्या पकडून सकाळी 8.05 ला कणकवलीला गेलो. मी एकटा कणकवलीला 31 8 18 ला रात्री 7.14 ला कोंकणकन्येत बसलो. 1 9 18 ला सकाळी दादरला उतरलो.

12 9 18 वायंगणीला जायला महिंद्रा टियुव्ही कारने पत्नी, मुलगा, पुतण्यासह निघालो. गाडी माझा चुलतभाउ देवाशिश चालवत होता. वाटेत महिंद्रा व महिंद्राच्या बसस्टॉपवर, कांदीवली पुर्व येथे मावससाडुला घेतले. वाशी टोलनाका ओलांडल्यावर वेंटोने थोरला चुलतभाऊ प्रकाश, थोरली वहिनी, तिचा मुलगा कुमार व गाडीचा चालक संजय आम्हाला येउन मिळाले. आम्ही सामान व माणसे इथुन अदलाबदली केली. कोल्हापुरमार्गे वायंगणी गाठले. साडुबंधू आचरा तिठ्याला उतरुन पोयऱ्याला गेला. गुरुवार सकाळी 13 9 18 गणेश चतुर्थी निमित्त मूळ घरात पूजा, आरती, जेवण!

किरणकाकांच्या घरची 20.50 इंच लांब काकडी! संध्याकाळी समुद्रकिनाऱ्यावर! उपस्थित सगळ्याना चंद्राचे दर्शन (गणेशचतुर्थीच्या दिवशी!). जे उपस्थित नव्हते त्याना व्हत्सॅपद्वारा घरपोच चंद्रदर्शनाची डिलीव्हरी! (आता एवढ्या सगळ्यांना शेजाऱ्यांच्या घरावर दगड मारून शेजाऱ्यांच्या शिव्या खाव्या लागणार, नाहीतर त्यांच्यावर चोरीचा आळ येणार!) रात्री जेवण झाल्यावर कुटुंबियांची संगीत मैफल! सुरुवात भक्ती गीतापासुन भावगीते व मग हिंदी जुन्या गीतापासुन नविन गीतांपर्यंत! रात्री 1 वाजताच्या अंधारातुन थोरल्या भावाच्या घरी! वाटेत दत्ताच्या देवळात प्रकाश असल्याने तेवढाच दिलासा! त्यानंतर रात्री 2 वाजता भजन मंडळी

गणपतीवाल्या घरात आल्याचे ऐकले! त्यांचे बिचा-यांचे जागरण झाले! तिसऱ्या दिवशी मालवणला व नंतर आचऱ्याला जाउन आल्यानंतर शुक्रवार 14 9 18 ला थोरल्या भावाच्या घरी येउन दुपारी 3.30 वाजता भात खाल्ला. संध्याकाळी तिसऱ्या घरातल्या

गणपतीचे विसर्जन! रात्री माझ्या मुलाने स्टॅन्डवर कॅमेरा लावला व आम्हाला उल्का दर्शन घडवले. मुलाने लॉन्ग एक्स्पोझरवर कॅमेरा सेट केला होता. आम्हाला आमच्या भ्रमणध्वनीवर नाइट मोडचे सेटींग करुन दिले होते. वाळूत मस्त चटया अंथरुन पत्नी, वहिनी व मुले बसली, पहुडली होती, मी व माझा चुलतभाऊ खुर्च्यान्मध्ये बसलो होतो. मस्त रात्रीची आकाशदर्शनाची मैफल चालु होती! मुम्बईपासुन 500 कि.मीवर असल्याने आकाश निरभ्र होते. तरी मालवण शहर फक्त 20 कि.मी.वर असल्याने प्रकाशाचे प्रदुषण जाणवत होते. शनीवारी 15 9 18 ला मुले सकाळी चौपाटीवर आंघोळ करुन आली! दुपारी त्याना गाडीने आचरा तिठ्याला सोडले. नेहमीच्या कोपऱ्यावरील हॉटेलमध्ये जेवण नव्हते. नविन उघडलेल्या पारिस्का

होटेलमध्ये आमचे डबे दिले, तेव्हा तो पार्सल द्यायला तयार झाला. बाकी प्रत्येक गि-हाइकाला 20-25 मिनिटे लागतील म्हणुन फुटवण्याचेच काम चालु होते. अन्यभाषिक असते तर “थोडा वेळ बसा, गरम जेवण देतय” म्हणुन आलेले गि-हाइक

सोडले नसते. आमची गाडी सुटण्याची वेळ झाली तरी भाकऱ्या तयार होत नव्हत्या. शेवटी चिकन सुके व 2 भाकऱ्या घेउन बस गाठली. तरी बस सुटत

नव्हती. म्हणुन मुलाला ब्रेड स्लाइस [हे असे सांगण्याचे कारण, आम्ही मराठी लोक चौरसाकृती पावाला ब्रेड म्हणतो व गोल पावाला 'पाव' 9 जो मुळात पोर्तुगीज शब्द आहे.) म्हणतो. हे आमचे अज्ञान!] घेउन दिले. बस सुटल्यावर चप्पल शिवणारा चर्मकार किंवा चांगल्या, मॉड नसलेल्या चपला विकणारा न सापडल्याने पोयरा गाठले! विहिरीवर असलेल्या एका घोरपडीचा फोटो काढला. नंतर तिच्यापेक्षा मोठी घोरपड भावाला वायंगणीत गाडीजवळ दिसली पण फोटो नाही काढता आला. पोयऱ्यावरुन येताना परत आचरा बाजार गाठला, पण एकही चपलाचे दुकान नाही. संध्याकाळी भंडारवाडीतील गणपतींचे दर्शन घेतले. रविवारी 16 9 18 ला सकाळी प्रभातफेरीसाठी किनाऱ्यावर! तम्बू काढायला चुलतभावाला मदत केली. दुसऱ्या चुलतभावाबरोबर दत्ताच्या देवळात गेलो. मी नास्तिक, पण अचानक काय वाटले कुणास ठाऊक, त्याला बाजुला व्हायला सांगुन दत्तमुर्तीला नमस्कार केला. संध्याकाळी वायंगणी भंडारवाड्यात जाउन मालवणच्या मावशीला घरी आणले. संध्याकाळी किनाऱ्यावर जाउन दीपग्रुहाचा फोटो काढण्याचा प्रयत्न केला. मुलगा बरोबर नसल्याने प्रचंड उदास होतो. सोमवारी 17 9 18 ला सकाळी मावशी परत तिच्या माहेरी गेली. देवाशिशचा तम्बू काढला. आचऱ्याला जाउन त्रिम्बकजवळील जमीन बघितली. मसुरा मालवणला जाणारा पूल बघितला. दुपारी पद्माला मूळ घरी सोडले. संध्याकाळी गावातील 25 गणपतींचे एकत्र विसर्जन केले. मंगळवारी 18 9 18 ला थोरली वहिनी, चुलतभाऊ, चालक मुम्बईला वेंटो कारने गेले. उंदरानी त्या गाडीची वायर कुरतडल्याने, जाताना त्यांचे हाल झाले. बुधवारी 19 9 18 ला मी व पत्नी

नांद्गावला वैदेहीची जादा बस पकडुन गुरुवारी 20 9 18 ला 9.45 वाजता सकाळी घरी पोहोचलो.

21 10 18 रोजी मी व माझा चुलतभाऊ देवाशिष थोरल्या भावाची टाटा सुमो घेउन कोकणात निघालो. वाशीला नाष्टा केला. एक्स्प्रेस्स हायवेच्या पहिल्या टोलनाक्यापर्यंत तो पेंगत गाडी चालवत होता. पुण्याला थोरल्या भावाला उचलले! रात्री वायंगणीला घरी पोहोचलो. 22 10 18 रोजी दुसऱ्या दिवशी म.प.वि.म.च्या सिंधुदुर्ग नगरी- कुडाळ येथील कार्यालयात पोहोचलो. त्यानी सरकारी हिसका दाखवला! नियमांवर बोट ठेवुन, वास्तवात काहिही असो, फॉर्मवर न विचारलेल्या ‘वहिनीचे ॲफिडेव्हीट, स्थानिक पोलिस परवानगी जी प्रत्यक्षात कधिही मिळू शकत नाही, पण त्यांच्या जुन्या पुराण्या यादीत आहे ना! मग नो आर्गुमेंट! व स्थानिक बॅन्केतील डि.डी.’ आणण्यासाठी हेलपाटा घालायला लावला. मालवणला सुनिता खानावळीत जेवलो. आचरा गाठले व वायंगणीत परतलो. 23 10 18 रोजी तिसऱ्या दिवशी तम्बुचा पाया घातला. भात वाऱ्यावर पाखडला. आरामकाकांची गाय हरवली होती! हा दिवस ग्रामपंचायतीची परवानगी, आचरा पोलिसांची नाहरकत यात वाया गेला! तलाठ्याच्या वरील अधिकारी सर्कल निरिक्षक टेहेळणी करुन मोजमाप करुन गेला. संध्याकाळी मी व चुलतभाउ मालवणला जाउन कोजागिरीनिमित्त मराठी गजला ऐकुन आलो. 24 10 18 रोजी आरामकाकांच्या गायीने बछड्याला जन्म दिला व ती स्वत:हुनच त्याला घेउन आली. प्लम्बिंग्चे काम सुरु करुन दादा मुम्बैला गेला. 25 10 18- इथे आता मजुर मिळत नाहीत. सर्व पर्सोनेटवर जातात. एका दिवसाला 3 लाखांची मासळी मिळते. त्यातील 50% मजुराना मिळते. कमीतकमी एका दिवसाचे त्यांचे उत्पन्न 5000/- असते. ते कशाला दिवसाला 300/- रुपये रोजावर काम करतील? पर्सोनेटवाले समुद्राचा तळ खरवडुन काढतात. माशांची अंडी नष्ट

होतात. पुढ्च्या वर्षी मासळी नाही. त्याना किनाऱ्याजवळ येउन मासेमारी करायला परवानगी नाही तरी करतात. संध्याकाळी दीपग्रुहाचा लाइट कॅमेरात पकडायचा प्रयत्न केला. इथला सुर्यास्त मस्तच असतो. 26 10 18- औषधे विकत घेतली. 27 10 18- आम्हीच पुर्वी बांधलेल्या चिऱ्याच्या भिंती तोडल्या. 30 10 18- सकाळी एकटाच फिरायला गेलो असता खडपा खेकडा दिसला. त्याचा पाय तुटलेला असला तरी तो जिवंत होता. घरी येउन केअरटेकरला फोटो दाखवल्यावर ते म्हणाले, मस्त रस्सा केला असता! परत येउन शोधले, तर तो कसला सापडतोय? मासे पागणारे (पकडणारे), भटके कुत्रे, पक्षी किंवा समुद्राच्या लाटा यापैकी कोणीतरी त्याला घेउन गेले असणार. कॅम्पसाइट्चे कुम्पण पुर्ण केले. कमळाचे व तलावाचे फोटो काढले. रोज सकाळी एक चुलत काका प्रभातफेरीला यायचे. त्यांच्याबरोबर समुद्रावर जायचो. इतर दिवशी कामे चालु! चुलतभाउ रोज मालवणला किंवा आचऱ्याला एकटाच जायचा. मला ना धड सामान आणता येत ना व्हॉट्सॲपचे संदेश मिळत! एकट्याला जाम कंटाळा यायचा. एकदा संध्याकाळी काठी न घेता डाव्या बाजुला समुद्रकिनाऱ्यावर गेलो. एक कुत्रा भुंकायला लागला. विजेरी पेटवली. संरक्षणासाठी काठिही नाही. खुप घाबरलो. मदतीला कोणिही नाही. कसाबसा घरी पोहोचलो. केअरटेकर विचारतो, “आंग नाय ना काढलस?’ म्हणजे ‘घाबरलात नाय ना?’ मी कशाला कबुल करतोय. 31 10 18 ला शेवटी एकदाचे चुलतभावाबरोबर मुम्बईला निघालो. काटकीसारखा नाकतोडा पाहिला. प्रथम जामसण्डीला त्याच्या मैत्रीणीच्या घरी, नंतर चिपळूणला, त्याच्या मित्राच्या दुकानावर, असे मजल दर मजल करत मुम्बईला निघालो. संध्याकाळी पाली फाट्यावर मी

नाश्ता केला. त्याने विश्रांती घेतली. एक्सप्रेस्स हायवेवर मी गाडी चालवली. रात्री उशीर झाल्याने 2 वाजता संजय गांधी उद्यानाजवळ इडली साम्बार खाल्ले. भरपुर आयटी वाले, कॉल सेंटरवाले, विद्यार्थी सिगारेट पित ईडली खायला व कॉफी प्यायला तिथे आले होते. आम्हिही कॉफी पिऊन घरी जाऊन झोपलो.

18 11 18 ला वायंगणीला परत. रात्री 2.50 ला उठुन तयारी करुन 3.50 ला माझ्या मुलाने त्याच्या बाइकवरुन मला बोरिवली पुर्वेला रेल्वेस्थानकावर सोडले. बरोबर माझी गिर्यारोहणाची पिशवी व कम्पोस्ट खत बनवण्याची बास्केट होती. लोकल रेल्वेचे तिकीट आधीच मोबाइलवर काढलेले होते. पहिली लोकल 3.50 ला रेल्वे स्थानकावरुन सुटणार होती. मी ज्या डब्यात जाउन बसलो, त्या डब्यात दुसऱ्या दरवाज्यात एक तरुण आडवा झोपला होता. त्याच्या बाजुला 1 श्वेत रंगाचा भ्रमणध्वनी पडला होता. दुसरा 1 माणुस इकडेतिकडे फिरत होता. त्याने तो भ्रमणध्वनी संच त्याचाच पडलाय असे दाखवुन उचलला व विरारच्या दिशेने निघुन गेला. मी शेजारच्या तरुणाला विचारले “कोणाचा भ्रमणध्वनी होता तो?” तो म्हणाला “त्या खाली झोपलेल्या तरुणाचा!” आता मला माहित नव्हते, पण त्याला तर माहित होते ना! मग त्याने खाली झोपलेल्या तरुणाला सावध का नाही केले? थोड्या वेळाने खाली झोपलेला तरुण उठला. तो पेंगुळलेल्या अवस्थेत काहितरी त्याच्या पाठ्पिशवीत शोधत होता. मला खुप वाटत होते की त्याला सांगावे, ‘तुझा भ्रमणध्वनी, अशी अशी दिसणारी व्यक्ती घेउन गेली.’ पण नाही सांगितले मी त्याला, का कोणास ठाउक? थोड्या वेळाने गाडी सुटली. माझा थोरला भाऊ कांदिवली स्थानकावर 2 क्रमांकाच्या फलाटावर चढणार होता, म्हणुन मी त्या तरुणाच्या बाजुला जाउन उभा राहिलो. त्याची विजार फाटलेली असुन त्याच्या हातापायावर रक्त दिसत होते. मला असे वाटले की तो व्यसनाधीन असावा. मालाड स्थानकानंतर तो दिसला नाही. आम्ही दादर सेंट्रलला जाउन 5 क्रमांकाच्या फलाटावर जाउन रेल्वेच्या चहाच्या स्टॉलवर चौकशी केली असता असे कळले की तेजस 4 क्रमांकाच्या फलाटावर येणार.

मी दादरच्या पूलावरील इंडिकेटरवर विश्वास ठेवत नाही. रेल्वे कर्मचाऱ्याना किंवा चहाच्या स्टॉलवाल्यांना विचारतो. 4 क्रमांकावर माझा तो लोकलमधील सहप्रवाशी, ज्याला तो कोणाचा भ्रमणध्वनी आहे ते माहित होते तो दिसला. पण आतापण माझ्या थोरल्या भावाला या घटनेबद्दल सांगावेसे वाटले नाही, तो मलाच ओरडायचा, ‘का? त्या दुसऱ्या व्यक्तीला ह्याचा भ्रमणध्वनी चोरु दिला?’ तेजसमध्ये रत्नागिरीत, कुडाळात उतरणाऱ्या आमच्यासारख्या प्रवाशाना फक्त नाश्ता होता. जे मडगावला जातील त्यानाच जेवण होते. बर! गाडीचे दरवाजे फक्त स्थानकावरच उघडतात. धावती गाडी पकडायची काही संधीच नाही. कुडाळात उतरुन समोरील रिक्शा पकडण्यात चुक केली. स्थानकाकडे येणारी एस.टी. आम्हाला ओलांडुन गेली. त्या रिक्शावाल्याने आम्हाला बसस्थानकात सोडले. तिथे मालवणला जाणारी एक एस.टी. आली. पण वाहक आम्हाला सांगायला लागला, त्याना मालवणला पोहोचायला वेळ लागेल. बस रिकामी गेली व आम्हाला घ्यायला दुसरी बस आलीच नाही. मग कळले की मघासची बस दुसरीकडुन निघुन गेली. दुसऱ्या नाक्यावर जाउन उभे राहिलो. शेवटी रिक्शा पकडुन मालवणला गेलो. सुनिता खानावळीत जाउन जेवलो. तिथे 1 लोणचे विकत घेतले व तिथेच विसरलो. तिथे चुलतभाऊ त्याची गाडी घेऊन आला होता. तो आम्हाला घेऊन वायंगणीला आला. त्या दिवशी समुद्रकिनाऱ्यावर मेलेला क्याट्फिश पहिला. दुसऱ्या दिवशी 19 11 18ला, आम्ही माझी टाटा इंडिका घेऊन कुडाळला गेलो. वेबसाईट्वरची यादी वेगळी व ओरसची म.प.वि.म. ची यादी वेगळी. अक्खा दिवस एमटीडीसीने खाल्ला! 4 वाजता आम्ही मोकळे झालो. सिंधुदुर्ग नगरीमधील चैतन्यमध्ये जाउन जेवलो. परत वायंगणीला जाउन झोपलो. 20

11 18 ला संध्याकाळी तुळशी विवाहाचा कार्यक्रम होता. कोंकण कॅम्पचा शर्ट नुकताच कुरिअर सर्विसने थोरल्या भावाच्या हातात सोपवला होता. खरे म्हणजे कॅश ऑन होम डिलीवरीचा पर्याय होता. पण त्यानी वायंगणीच्या तिठ्यावर आणुन दिले. घरी नाही आणुन दिले. घरी आणून दिले असते तर रोख देता आले असते. दादा काका नवरदेव म्हणुन सजले होते. तुळशीला साडी घालुन तयार केले होते. मोहनभाईच्या घरासमोर एक तुळस व सतयेच्या देवळासमोर दुसरी तुळस सजवली होती. विवाह झाल्यावर गा-हाणी घातली व मसाला दुधपानाचा समारोह झाला. 21 11 18 ला अनेक स्थलांतरीत सी गल्ल्सचा समुह पाहिला. 22 11 18ला दशरठ पाटल्लांच्या घरी हनुमान जयंतीचा कार्यक्रम होता. माझी मानलेली बहिण नंदाताई अनेक वर्षांनी तिथे भेटली. आज 2 खोल्यांतील पलंगाना पांढऱ्या चादरी व उशाना सफेद अभ्रे घातले. 23 11 18ला विंदकाकांबरोबर प्रभातफेरीला गेलो असता त्यानी भाम्बुर्टा (छोटा खेकडा) पकडला. तिथे काही मुले वाळुत फावड्याने खोदुन आतुन खेकडे काढुन पिशव्यात भरत होती. एक म्रुत खेकडा 2 पायावर उभा होता. घरी आणला पण चुलतभाऊ तो खायला तयार होइना! (आधीच मेलेला कसा खाणार? मी एरवी खात नसल्याने मला चवीतला फरक समजत नाही.) आज आमच्या पेडणेकरांचे ब्राम्हणभोजन होते. एका ब्राम्हणाने शेतावरच्या मातीच्या चुलीवर जेवण बनवले व गा-हाणे म्हटले. मग आम्ही वनभोजन केले. घराजवळील गवत काढुन जाळले. 24 11 18 ला विंद्काकाला मुम्बईला परत जायचे होते, म्हणुन त्यानी रापणीतुन मासे आणण्यासाठी पैसे व पिशवी आणली होती. नेमके आम्ही जाइपर्यंत त्यानी कोळणीचे वाटे काढुन ठेवले होते. त्यामुळे आम्हाला कोळणीकडुन प्रत्येक बांगड्यामागे अडीच रुपये जास्त देउन मासे घ्यावे लागले. आज समुद्र खुपच

शांत होता. तम्बुनिवासी पाण्याची टाकी वर चढली होती. संडासाच्या टाइल्स लावण्याचे काम सुरु झाले. दशरथणे कामगाराना एका रेषेत चर खोदावयास सांगितला. चेम्बर खोदुन झाला होता. दश्रथने ओळम्बा लावुन कामगारांकडुन काम करुन घेतले. घरासभोवताली गवत साफ करण्याचे काम चालु होते. ते गवत संध्याकाळी जाळण्यात आले. हे काम आमचा केअरटेकर करत होता. गोम! 25 11 18ला बाहेरच्या खोलीतील खिडक्याना नवीन पडदे लावले. आजसुद्धा गवत कापुन जाळले. देवाशिश व देव्व्रटणे तम्बुनिवासी खुर्च्या टाकुन फोटो काढुन घेतले. आज मासे पागायला (पकडायला) गेलेल्या एकाने देव्व्रताच्या मुलीच्या दिराला काही जिवंत मासे दिले. ते त्याने आमच्या घराच्या नळावर साफ केले. 26 11 18ला आमचा चिपळुणचा मित्र संदेश आला होता. त्याच्याबरोबर प्रभातफेरीला गेलो. त्यानंतर तो व देवाशिश मुम्बईला गेले. आज इशाऱ्याबरोबर कोंकण कॅम्प्चे बोर्ड लावले. 27 11 18 ला वायंगणी तिठ्यापासुन घरापर्यंत बोर्ड लावले. 28 11 18 आजपण बोर्ड

लावले! संध्याकाळी आमच्या चिंदरच्या कचेरीसमोर बॅनर लावला! 29 11 18 ला किरणंकाका डे व नाईट चश्मा घालुन प्रभातफेरीवरुन आले. आचऱ्याला जाऊन आलो. रात्री घरी एकटा झोपलो असताना भिती

वाटायची. रात्री छापरावर कोणीतरी चालते, फावड्याने घराच्या बाजूला काहीतरी ओढत जाते! त्यात मानमोहणाने सांगितलेल्या भुताच्या कथा! आज आजुबाजुच्या परिसरातील गवत काढुन ते जाळले. रात्री गवत जाळल्यामुळे आसरा गेल्यामुळे सर्व पतंग घरात आले होते? परत तोच मुलभूत प्रश्न- विकास की भकास? 30 11 18 ला किरणंकाकांबरोबर 6

वाजता प्रभातफेरीला गेलो असता मेलेले कासव व रापणीत समुद्रसाप दिसला. काल 2रा संडास लावुन झाला होता. १ १२ १८ ला पेडणेकरांच्या रापणीला स्टिंग रे मासा मिळाला होता. आम्ही येताना बांगडे घेऊन आलो. फ्रीझरमध्ये ठेवले. माझा मुलगा व त्याच्या मित्रांसाठी! सकाळी फिरायला गेलो असता आचऱ्याच्या बाजूच्या एका रेसोर्ट्ने समुद्रकिनाऱ्यावरच पर्यटकांच्या दारूची व्यवस्था केली होती. मग याच बाटल्यांचे तुकडे पर्यटकांच्या मुलांच्या पंजात घुसतात व त्या मुलांना इस्पितळात न्यावे लागते. 2 12 18 ला माझा मुलगा व त्याचे 5 मित्र 6 सीटर रिक्शा करून आले. खूप थकले होते. झोपले. काळजीवाहकांच्या मुलाचा चिटरक्षचा वाढदिवस होता. आम्हाला सर्वांना बोलावले होते. पण माझा मुलगा कुठेही जाण्याच्या मनस्थितीत नव्हता. तिकडे बाळू (मामेभाऊ) आला होता. त्याला माइक मिळाला. तो कसला संधी सोडतो? त्याने जे भाषण ठोकले की यंव! मीही हॅप्पी बर्थडे टू यू! मे गोड ब्लेस्स यू! वैगेरे म्हटले. काळजीवाहकाचे शेजारी खुश! 3 12 18ला स्वयंपाकघराच्या ओट्याचे माप (ट्रोली करण्यासाठी) केले. 4 12 18 ला मुलाला व त्याच्या मित्रांना घेऊन मालवणच्या दांडीकडे गेलो. जाताना माझा मुलगा त्याच्या एका फोटोग्राफर मित्राला घेऊन बाइकने गेला व मी टाटा इंडिका कार घेऊन निघालो. मालवणच्या नाक्यावर आमची प्यारागलायडीङ्ग आयोजित करून देणारा भेटला. तो त्याची बाइक घेऊन पुढे! त्याच्या मागे माझा मुलगा त्याची बाइक घेऊन! त्याच्या मागे मी कार घेऊन! हे दोघे कुठे गेले ते कळले नाही. मी थोडा वेळ तिथेच थांबलो, कार घेऊन! मग माझा मुलगा परत आला. “आपल्याला या वाळूत कार घेऊन जायचेय!” “आणि अडकली तर! काढणार कशी?” माझा बाळबोध प्रश्न! तिथे मला एक कोंकरिटचा रस्ता दिसला. मी घातली बिनधास्त! तो

वेडीवाकडी वळणे घेत चालला होता. दोन्ही बाजूला बाईकस, स्कूटर्स पार्क केल्या होत्या. पुढून एखादी गाडी आली तर वळायला काहीच संधी नव्हती. मग कळले, त्याला डेड एंड होता. परत मुलाच्या सूचनेखाली रिर्वस घेतली. माझ्या आयुष्यातील वेडीवाकडी अशी सर्वात मोठी रिर्वस! परत समुद्रकिनाऱ्यावर येऊन गाडी उभी केली. आम्हाला एका लॉचवर चढवले.

मुलाचा एक मित्र लॉचवर आला नाही. त्याच्याकडे सर्व कपडे दिले. एक एक करून आम्ही पॅरश्यूटने वर गेलो. अफलातून अनुभव! वर गेल्यावर प्रथम भीती वाटली. मग वरुन संपूर्ण समुद्र पाहताना मजा आली. माझा मुलगा सरळ विडियो शूटिंग करायचे सोडून इनस्टाग्राम वर उलटीसुलटी (बूमरांग) शूटिंग करत बसला. नशीब माझा कॅमेरा दुसऱ्याच्या हातात होता. त्याने तरी सरळ चलचित्रण केले. दुपारी सुनीतात जेवून संध्याकाळी रॉक गार्डनच्या पुढे राजकोटावर गेलो. खळाळता समुद्र, त्याच्या खडकांवर फुटणाऱ्या लाटा, खेकडे, सी कुकुम्बर, सूर्यास्त बघताना मजा आली. परत वाइंगणी! 6 12 18 आम्हाला सकाळी एका मृत कासवाचे कवच सापडले. ते माझ्या मुलाचा एक मित्र व मी आमच्या घराच्या आवारात नेऊन टाकले. इथे अजून एक गोष्ट लक्षात आली. इथे शेताच्या बांधावर इतरांना घाबरवण्यासाठी एक बैलाची कवटी टांगतात. आज आम्ही दादाच्या 2ऱ्या प्लॉट कडे गेलो होतो. थोड्या वेळाने तिथल्या स्थानिक माणसाने देवव्रत्ने सांगितले. “अजून पुढे नको

जाऊया. इथे एखादा संध्याकाळी हरवला, तर मोठ्या मोठ्या तज्ञांना पण सापडायचा नाही.” माझ्या मुलाचा मित्र चंद्राने निवडुंगाचे छायाचित्र काढले. तिथले एक झाड माझ्या मुलापेक्षा 5 पट रुंद होते. 7 12 18 ला रात्री कोल्हा

दिसला. फोटो काढण्यासाठी चुलतभावाने त्याला गाडीच्या प्रकाशाने बंदीस्त करायचा प्रयत्न केला, पण तो कसला हातात सापडतो? 9 12 18ला चुलतभावाने जवळच्या वाळुच्या उंचवट्यावर छत्र्या लावल्या व त्याखाली खुर्च्या मांडुन तो बसला. एका झाडावर ‘निसर्गाचा आस्वाद घेण्याची जागा’ असा नामफलक लावला. दादा कुडाळवरून दुपारी 3.32 ला तेजस एक्सप्रेस पकडून मुंबईला गेला. 18 11 18ला विसरलेले लोणचे सुनीता खानावळवाल्यांनी परत केले. मुलगा व त्याचे मित्र मुंबईला गेल्यावर 10 12 18 ला पोयऱ्याला गेलो. खूप थंडी वाजत होती. 11 12 18 आज मानवी अस्पर्शीत समुद्रावरून (वायंगणी) भटकलो. 12 12 18 आज रापण बघितली. रापण म्हणजे स्थानिक लोक समुद्रात जाळे टाकून मासे किनाऱ्यावर ओढून घेतात, त्याचे वाटे करतात व घरी घेऊन जातात. काही कोळणीना विकतात तर इतर घरी घेऊन जातात. 14 12 18 ला पोयऱ्याला गेलो असता भिंतीवर चुलीच्या धुराचे काळे दाग व त्याच चुलीत उबेसाठी जाऊन बसणारी मांजर पाहिली. 15 12 18 आजपण बोर्ड लावत फिरलो. 16 12 18 काळजीवाहक व इशाऱ्याला घेऊन बोर्ड

लावत फिरलो. 17 12 18ला मालवण वायंगणी रस्त्यावर कोंकण निसर्ग शिबिराची जाहिरात करणारे फलक लावले. काळजीवाहकाला हॉटेलात येणाऱ्या लोकांना सेवा देण्यासाठी गणवेश दिला. 18 12 18 आज केरकरांची माडाची बाग पाहिली. बरोबर देवव्रत होता. 20 12 18 आज मेनू कार्ड व अन्नपदार्थांचा व राहण्याचा दर ठरविला. घराच्या दरवाजावर बोर्ड लावून फोटो काढले. क्षेत्रात वाटेवर एकखांबी बोर्ड लावले. निवडुंगाच्या झाडाजवळ काळजीवाहकाचा फोटो काढला. किती उंच व मोठे असू शकते हे झाड! अळंबी पाहिली. 21 12 18 रोजी आमच्या रीसोर्ट्च्या परीसरात ठाणेश्वर प्राथमिक शाळेचे विद्यार्थी, त्यांचे पालक, शिक्षक, मुख्याध्यापिका, भण्डारवाडीतील प्रतिस्थित व्यक्ती यांनी वनभोजन केले. माझ्या थोरल्या भावाने व इतरांनी पैशाची व साहित्याची मदत केली. सुरयशेखरने चुलीवर जेवण बनवले. आमच्या काळजीवाहकाने मदत केली पण जेवायला आला नाही. 22 12 18ला दत्तजयंतीनिमित्त आमच्या दत्तमंदीरात भटजीनी पूजा केली. मोबाइलवर मोठ्याने गाणी लावली होती. आरती केली. फटाके वाजवले. 23 12 18 सुपरमून पाहिला. 24 12 18 रापण पाहिली. 26 12 18 रोजी सकाळी प्रकाशकाकांबरोबर प्रभातफेरीहुन आल्यावर थोरल्या भावाने जवळील एका झाडीत चांदण्यांसारख्या फुललेल्या फुलांची प्रकाशचित्रे काढायला सांगितली. 30 12 18 रोजी तम्बुसमोर खुर्ची व टीपॉय ठेवले. आज समुद्रकिनाऱ्यावर साळिंदराचा काटा पाहिला. संध्याकाळी 7 वाजता एकटेपणाच्या जाणीवेतून रडत होतो. जवळ जवळ दीड महिना वायनगणीला होतो. पत्नीचे तोंड नव्हते पाहिले. 31 12 18 ला एकटा होतो. 1 1 19 समुद्रावर धुके! 2 1 19 मुंबईला परत!

मित्राबरोबर पुण्याला त्याच्या नातेवाईकांकडे पिंपरी चिंचवड बाजूस गेलो. 10 3 19 रोजी इंदिरा कॉलेज वाकड येथे संध्याकाळी 6.32 ला सरकारी सेमी लक्झरी बस पकडून आम्ही दोघे निघालो. तो सायनला उतरला व मी न्यान्सी कॉलनी, बोरिवली पूर्व येथे उतरलो.

23 3 19 मी व माझी पत्नी आमच्या घराच्या कामासाठी 11.40 ला उद्यान एक्सप्रेसने दादरला चढून तात्काळ तिकीट काढून येरवडा पुणे येथे गेलो होतो. येताना स्वारगेटवरून शिवनेरी होती. एशियाड सुटायला वेळ होता. आम्ही सारसबागेत गेलो. आयुष्यात पहिल्यांदा लग्न केल्यावर आम्ही इतर कोणीही आग्रह न करता आयुष्यातील एकुलता एक सेल्फी काढला. (23 3

19)

6 4 19 मी, पत्नी, मुलगा, मावस मेहुणी, भाची, भाचा, साडूबंधू, ऑगस्ट क्रांती राजधानी एक्सप्रेसने बोरिवलीहून दिल्लीच्या दिशेने निघालो. 7 4 19 ऑगस्ट क्रांती राजधानी एक्सप्रेसमध्ये! 10.55 ला हजरत निजाम्मुद्दीन स्थानकावर उतरलो. टॅक्सीने दिल्ली स्थानकावर गेलो. दिल्लीला धाब्यावर जेवून घेतले. 7 4 19 ला दुपारी 2.25 ला नवी दिल्लीहून अमृतसरला जायला शान ए पंजाब ट्रेन पकडली. 2 सीटर (फक्त बसण्यासाठी, झोपायला बर्थ नाही.) डबा होता. या ट्रेनमध्ये काही तरूणांशी वादावादी झाली. मावस मेहुणी म्हणाली, परक्या राज्यात आहोत आपण! पण सरदारांविषयी राग आला. उतरल्यावर

त्रावेल्सच्या गाडीने अमृतसरच्या हॉटेलमध्ये! (अमृतसर ते डलहौसी कारने 4 तास 22 मिनिटे. डलहौसी ते धरमशाळा 3 तास 31 मिनिटे. धरमशाळा ते मनाली 7 तास 10

मिनिटे. मनाली ते चंदीगढ 7 तास 45 मिनिटे अशी योजना होती. प्रत्यक्षात वेगळेच घडले.) 8 4 19 ला अमृतसरचा होटेलवाला पैसे घेतल्याशिवाय

फिरायला जायला द्यायलाच तयार नव्हता. नीता जाइसवालला (आमची टूर संचालिका) फोन लावला. तिने तिथल्या कारवाल्याला सांगितल्यावर, त्याने होटेलवाल्याला सांगितल्यावर, होटेलवाल्याने जाऊ दिले. कारवाल्याने आम्हाला एका कार पार्कींग मध्ये आणून सोडले. तिथून एक सायकल रिक्शा पकडून सुवर्ण मंदीराकडे! आधी एक हुतात्मा स्मारक लागते.

डाव्या बाजूला जालियनवाला बाग! पण सध्या तिथे न बघता आधी सुवर्ण मंदीर! दुरूस्ती चालली होती. स्वच्छ पाण्यात मोठे सुंदर मासे सोडले होते. खायला दिल्यावर जवळ यायचे. आमच्या डोक्यावर सोनेरी रुमाल गुंडाळले होते, तिथेच विकत घेतलेले, अजून परत घातला नाही. (एकदाच वापरला, लग्नातला सूट कसा आपण परत कधीच वापरत नाही.) स्त्रियांनी डोक्यावर ओढण्या घेतल्या होत्या. एका तलावाच्या मध्ये सुवर्ण मंदीर! बाजूला खूप मोठा राऊंड! भला मोठा मंडप1 आतमध्ये जायला खूप गर्दी, हळूहळू एक एक लॉट सोडतात. 3-4 तास लागतात. त्यानंतर हॉटेलमध्ये जेवण! जुन्या काळातले दिवे! मग जालियनवाला बाग दर्शन! नीताला अजून पैसे ट्रान्सफर केले. त्यानंतर अटारी सीमा! आम्ही आमच्या गालावर तिरंगी स्टीकर्स चिकटवले होते. इंडिया’स फर्स्ट लाइन ऑफ डीफेन्स पाहिली. गाड्यांचे चाके पंक्चर करायला वापरले जाणारे खिळयांचे पट्टे पाहिले.

परेडच्या आधी फक्त स्त्रियांनाच तेथील रस्त्यावर नाचता येते. बीएसएफची परेड पाहिली. इथून लाहोर फक्त 22 किमीवर आहे. रात्री 3 वाजता दल्हौसीच्या हॉटेलमध्ये जेवलो. तुम्ही लोकांनी त्यांचे स्वयंपाकघर पाहिले असते तर 2 दिवस जेवण गेले नसते तुम्हाला! मला, भाचीला, पत्नीला फूड पॉइजनिंग झाले. इंटरनेटवर शोध घेतला, किती स्टार आहेत तर या हॉटेलवर बॅन होता. शून्य स्टार! नीता जाइसवालची कृपा! आम्ही तिच्याकडे सर्वात

स्वस्त हॉटेल्स मागितली, तिने 4th क्लास दिली. (3rd क्लास पण चांगले असते या होटेलांपेक्षा!) दुसऱ्या दिवशी 9 4 19 ला डलहौसीला फिरायला गेलो. सकाळी होटेलच्या बाल्कनीत माकडे आली होती. मी सुकत घातलेला टॉवेल हातात पकडला. मी त्याला हाकलायला गेलो तर दात विचकून तो वानर अंगावरच आला. माझ्या मुलाने मला मागे खेचले. नंतर आम्ही पंचपुला धबधब्यावर गेलो. इथे एका हॉटेलमध्ये हुक्का पार्लरपण होते. मग एका ‘बीजी’ज गार्डनमध्ये! तिथे लढाऊ विमानांची,

रणगाड्यांची, जीप्स्ची मॉडेल्स होती. जीपमध्ये बसून आम्ही फोटो काढले. इथून खज्जियर फक्त 20 किमी होते. रविंद्रनाथ टागोरांचे स्मारक होते. इथून डोंगरावरील एका देवीच्या देवळात गेलो. इथे माझा भाचा बर्फात घसरून पडला. वरच्या बर्फात आम्ही मनसोक्त खेळलो. होटेलच्या खोलीत गेल्यावर इतर सगळे थकले होते. संध्याकाळी मी, मावस

मेहुणी व साडूबंधू बाजारात फिरून आलो. 10 4 19 ला आधी डॉक्टर शोधला. काला टॉपच्या वन विश्राम गृहात गेलो. समुद्रसपाटीपासून 8000 फुटांवर! इथे सूर्यप्रकाशापासून ऊर्जा मिळवण्याची सोय होती. नंतर खज्जियर! (मिनी स्वीत्झर्लंड). तेथील स्थानिक कपडे घालून फोटो काढून घेतले. पुढे जाताना वाटेत धनगर शेळया मेंढया घेऊन चालले होते. 11 4 19 ला धरमशाळेत गेलो. थेगछेन छोलिंग बुद्ध विहारात गेलो. 1987, 88 आणि 1989च्या

मेमरीस ऑफ तिबेटन वॉर ऑफ फ्रीडम स्ट्रगल आणि मुव्हमेंट. तिबेटचा स्टोलन चाइल्ड- द 11th पांचेन लामा गेढून चोएकयी नीइमा- द वर्ल्डस

यंगेस्ट पोलिटिकल प्रिझनर यांची माहिती वाचली. मणी चक्र फिरवले! तिथून एचपीसीए क्रिकेट स्टेडियमला गेलो. नंतर पालमपुर चहाचा मळा पाहिला. मनालीत मुक्काम! आमच्या होटेलजवळच सफरचंदाची बाग होती. 12 4 19 ला सोलंग दरीकडे जाताना बर्फात घालायचे कपडे (इथे भाड्याने मिळतात. बर्फात घालायचा गॉगल विकत मिळतो) घातले. खेळून झाल्यावर बियास (ब्यास किंवा माझ्या मते व्यास) नदीकडे प्रयाण! त्या आधी कपडे (भाड्याने घेतलेले) परत केले. बियास नदीतले पाणी खूपच थंड होते. तिथून ढुंगरी, मनाली येथील हिडिंबा देऊळ पाहायला गेलो. नंतर घटोत्कच देवळात गेलो.



याकवर बसलो. जर्मन सश्याला उचलून फोटो काढला. त्या नंतर येथील संग्रहालय पाहिले! बकरीच्या केसांपासून बनवलेले लोकरी मोजे, स्त्रियांसाठी फ्रोक कोट, पट्टू नावाची शाल, दागिने, तलवारी पाहिल्या. एका बागेत (कंवर

सांकटुयरी, कुल्लू) पण जाऊन आलो. संध्याकाळी बाजारात गेलो. रात्री मानसी ट्रॅव्हल्सचा केक कापला. 13 4 19 ला हरिहर घाट मणीकर्णच्या गुरुद्वाराला भेट दिली. मावसमेहुणी व साडूबंधुने इथल्या लंगरमध्ये जेवण घेतले. आम्ही इतरांनी धाब्यात जेवण घेतले. एक पूल ओलांडून मा नैना

भगवती व वासुकी नागाच्या तीर्थस्थळाला जिथे गरम पाण्याची कुंडे आहेत. तिथे भेट दिली. 20 वर्षापूर्वी मी इथे सारपासला जाऊन आल्यावर आलो होतो. आंघोळ पण केली होती. आठवण आली. मन भरून आले! 20 वर्षे! आता परत कधी दर्शन होतेय कुणास ठाऊक? रात्री खूप उशीरा चंदीगढला पोहोचलो. चालकाला ताप आला होता. रात्री 3 वाजता हॉटेलमध्ये शिरलो तर होटेलवाला दारू पिलेल्या अवस्थेत जास्त पैसे मागू लागला. 14 4 19 सकाळी दिल्लीची ट्रेन पकडली. तिथून राजधानीने मुंबई. 15 4 19 मुंबईत!

मी व देवाशीष 11 5 19 ला दादरला सकाळी 8.45 वाजता कोल्हापूरकडे जायला बसणार होतो. पण प्रत्यक्षात मी वाइंगणी गावाला गेलो व तो एकटाच या बसने गेला व मी त्याला कोल्हापूरला जॉइन झालो. मी 7 मे 19 ला गगन्बावड्याला होतो. 8 मे, 9 मे व 10 मेला वाइंगणीत. 11 5 19 वडा कोंबड्याची गाडी व रात्री रंकाळा तलाव कोल्हापूरला पाहिला. 12 5 ला सकाळी देवाशीश्च्या नातेवाईकांचे लग्न बघायला एसटीने नृसिंहपूर! तीर्थस्थान पाहिले. रात्री 7/12 हॉटेलला जेवलो. नियम- ‘भाकरी कुस्करूनच खायची! ताटाला वटकान लावायला इसरायच नाही! काळा रस्सा भुरका मारूनच प्यायचा. काळा रस्सा लई तिखट लागला तर पिवळा रस्सा प्यायचा. आणि लईच झाले तर गूळ शेंगा हाइतच की! कांदा बुक्कीने फोडूनच खायचा! हाडबी फोडूनच खायच! आन हे सगळे झाल्यावर ढेकर द्यायला इसरायच न्हाय!’ खूप तिखट होते. 13 5 19ला सकाळी ज्योतिबाला गेलो. सगळे गुलाबी गुलाबी! कोल्हापूरमध्ये संध्याकाळी बासुंदी चहा प्यालो. रंकाळा तलाव बघितला. तोपर्यंत सामान स्टेशनच्या लॉकर मध्ये ठेवले होते. शाहूमहाराज टर्मिनसवरुन रात्री 10.50 ची गाडी ठाण्याला सकाळी 14 5 19 ला 10.57 ला पोहोचली.

21 6 19 शुक्रवार-- माझा धाकटा भाऊ व त्याचा धाकटा मुलगा अमेरिकेतून येणार होते व त्यांचा इथे काही धाडसी कृती करण्याच्या योजना होत्या. फक्त त्यांना इथल्या अशुद्ध हवेची कल्पना नव्हती. म्हणून त्या कल्पना तशाच राहिल्या. तर त्या योजनांची तयारी म्हणून मी, माझा 23 वर्षीय तरुण मुलगा व आमचा एक मित्र देवाशीष गो. नाणेघाटात जाणार होतो. हा देवाशीष पूर्वी संगणकाची दुरूस्ती करण्यासाठी खूप फिरायचा. बारीक होता, 'आर्चीज' मधल्या जगहेडप्रमाणे! खाण्याची तशीच आवड, एका वेळेला डबल आमलेट खाणारा, पोट सुटलेला, तरीही बारीक व उंच! पूर्वीच्या ट्रेकस्ना सर्वात पुढे, कधीही त्याच्या पायात गोळे आले नाहीत! पण गेल्या काही वर्षात मात्र त्याची जीवनशैली बदलली होती. सतत संगणकासमोर! हे माझ्या लक्षात आले नव्हते! चौथा- आमचा चालक- माझा चुलतभाऊ! हा आम्हाला जिथून नाणेघाट सुरू होतो तिथे सोडणार व नंतर जिथे आम्हाला पोहोचायचे होते तिथे उचलणार! वाटेत एका धाब्यावर आम्ही भजी व चहाचा नाश्ता केला. प्रवेशद्वारापासून चढायला सुरुवात केली. मुलगा पुढे आणि मी व देवाशीष मागे! सातवाहन कालीन (ई.स. पूर्व 250) साली बांधलेला हा रस्ता – 'नाणेघाट' व्यापारी मार्ग, कल्याण ते प्रतिस्ठान (जुन्नर). आम्ही चालत वर जात असताना देवाशीषला प्रचण्ड थकवा आला व त्याला चक्कर आली. नशीब माझा मुलगा बरोबर होता म्हणून! आधी त्याच्या तोंडावर पाणी मारले व त्याला जागे केले. त्याला हर्बालाईफ 24 चे हायड्रेट बेवरेज मिक्स पॅकड विथ एलेक्ट्रॉलाईटस आणि एसेनश्यल विटामिन्सचे पेय प्यायला दिले. त्याला थोडी तरतरी आली. त्याला थोडा वेळ तिथेच सावलीत झोपू दिले. जागा झाल्यावर चिक्की खायला दिली. त्याला विचारले, "आता फक्त पाव भाग

शिल्लक राहिलाय, पण चढ आहे, चढणार का?" "नाही" म्हणाला. चुलतभावाला परत मूळ जागी बोलावून घेतले. आम्ही परत मागे चालत गेलो. मुलगा निराश झाला होता. 'कुठे, या म्हातायांबरोबर आलो असे त्याला झाले होते.' भावाने गाडीने आम्हाला नाणेघाटात सोडले. प्रथम एक भला मोठा रांजण लागला. पूर्वीचे व्यापारी त्या रांजणात जकात भरायचे. नाणेघाट प्रवेश मार्गावर आलो. आता हा भाग, वनपरिक्षेत्र जुन्नर, संयुक्त वन व्यवस्थापन समिती घाटघर, यांच्या अधिकारात येतो. त्यानंतर गणपती लेणींना भेट दिली.

दुपारचे 2 वाजले होते. माझा चुलतभाऊ नाणेघाटात चालताना छायाचित्र काढायला सांगत होता. म्हणजे लोकांना वाटेल की हा अख्खा नाणेघाट चढून आला. गणपती लेण्यांच्या भिंतीवर ब्राम्ही किंवा खरास्ट्री लिपीत अर्धमागधी किंवा पाली भाषेत काहीतरी लिहिले होते. शिकलो असतो तर बरे झाले असते! वाचता तरी आली असते. काही शेवाळयाच्या पाण्याने भरलेल्या टाक्या होत्या. माझ्या मुलाकडे हातात धरायचा लवचिक मोबाइल स्टँड होता. त्याच्या सहाय्याने तो फोटो काढत होता. आम्ही ज्या वाटेने येणार होतो तो मार्ग बघत होतो. अजून थोडावेळ चढलो असतो तर! दगडी पायऱ्यांच्या साहाय्याने हयाही वर एक डोंगराचे शिखर होते, तिथे मी माझ्या मुलाच्या समाधानासाठी गेलो. इथेही तो माझ्या पुढे! खूप वारा सुटला होता. त्याला सुरक्षित कसे उतरायचे ह्याच्या सूचना केल्या. (जित्याची खोड मेल्याशिवाय जात नाही म्हणतात!) येताना माळशेज घाटातून आलो. रस्त्याच्या कठड्यावर माकडे होती. धुके दाटले होते, भर दुपारी!

26 7 19 या वेळेला तिकोनाला जायचे ठरले. देवाशीष मागच्या प्रसंगामुळे घाबरल्याने तो तयार नव्हता. माझा मुलगा वैतागल्याने तो सुद्धा तयार नव्हता. दुसऱ्या मित्राला बब्बीला बोलावले. ह्याने माझ्याबरोबर हिमालयाचा सारपास पूर्ण केला होता, पण सध्या बाहिरी ढाक करताना, लोहगड चढताना त्याच्या पायात गोळे आले होते. जेव्हा देवाशीष सरळ चालत गेला होता. चालक चुलतभाऊ! त्यालाही आमच्याबरोबर चालायची ऑफर होती, पण त्याची तयारी नव्हती. आम्ही चालायला लागल्यावर एक वाहनतळ लागला. कदाचित तिथून वर जायचा मार्ग असावा. पण मी व बाबबी सरळ पुढे गेलो. मोबाइल वर गूगल मॅप! थोडे पुढे गेल्यावर ज्ञानुपुर देऊळ लागले. पाऊस पडायला लागला. नाश्ता करून घेतला. आमचा चालक आम्ही येईपर्यंत झोप काढतो असे म्हणाला होता. आम्ही देवळाच्या थोडे पुढे गेलो. ओढा, चिखलवाला रस्ता. बब्बीला चुलतभावाची आठवण आली, “तो उपाशी असेल.” परत फिरलो. वाटेत एका धाब्यावर झुणका भाकर जेवलो. तिकोना अजून बघायचाय!

१५. 8 19 ला सीसी कोचने दादरला जनशताब्दीने मी, माझा मुलगा, माझी पुतणी, माझ्या धाकट्या भावाच्या सासूबाई, माझी पत्नी, माझ्या धाकट्या भावाच्या मेहुण्याची मुलगी, बसून कणकवलीला उतरलो. ट्रेनमधून जाताना, तो व त्याची पत्नी 'जा सिमरन! जी ले तेरी जिंदगी' वाला सीन रिर्वस मध्ये करत होते, म्हणजे धाकटी वहिनी डब्यात व हा बाहेर! वायंगणीला जेव्हा दुसऱ्या दिवशी रात्री आम्ही घरी गेलो तेव्हा धाकट्या भावाचा मेहुणा म्हणाला "मी माझ्या मित्रांना घेऊन इथे कधीच येणार नाही." "का?" "दिवसा खूप सुंदर आहे. रात्री वाट कशी शोधायची?" 16 8 19 ला माझी चुलतबहीण, तिचा नवरा व भाचीपण आली होती. त्यादिवशी आम्ही रक्षाबंधन केले. ते त्याच दिवशी मालवणला परतले. 17 8 19 ला फूटबॉल खेळलो. एका बाजूला तरुण पिढी व दुसऱ्या बाजूला आम्ही पन्नाशीचे लोक! तरी आम्ही त्यांना परत एकदा टफ दिली. माझा पाय दुखावला होता. माझा थोरला भाऊ माझ्यावर चिडला होता. "या वयात असे खेळायची काय गरज होती?" मालवणहून मावशी पण आली होती. नवीन शिरीष निवास रेसोर्टच्या 2 खोल्या बांधून झाल्या होत्या. आज इंगळी (विंचू) दिसली! 18 8 19 सुरूच्या झाडावर मोर पाहिला! एक समुद्रसाप नायलॉनच्या जाळयातून सोडवला व समुद्रात परत सोडला. बारबेक्युची तयारी केली. त्यावर मक्याची कणसे भाजून खाल्ली. थोरल्या भावाने वाळूवरून जिप्सीने मुलांना फिरवून आणले. केळीचा घड काढला. 19 8 19 आज आम्ही सतयेच्या देवळात गेलो होतो. 20 8 19 कालावली नदीच्या पुलावर गेलो. धाकटा भाऊ समुद्रकिनाऱ्यावर खुर्चीत बसला असता धपाक्कन

मागे पडला. माझा मुलगा, माझी पत्नी व मी जनशताब्दीने 20 8 19 ला कणकवलीला बसून दादरला परतलो.

गणेशोत्सव 2 9 19 ला वायंगणीत सुरू! 3 9 19 ला पेडणेकरांच्या 3ऱ्या

घराचे गणेशविसर्जन. नाणेटींची छायाचित्रे व चलचित्रे काढली. आज पोयऱ्यालाही जाऊन आलो. 4 9 19 आज करड्या रंगाचा खण्डोबाचा घोडा पाहिला. हिरण्याकश्यप व प्रलय वाचले. देवावरत, वस्त व त्रिमबककरांचे गणपती पाहून आलो. 5 9 19 वाइंगणी होम स्टे पूर्ण! 6 9 19 आज विसर्जनाचा दिवस! खूप पाऊस पडत होता. आज खूप उदास वाटत होते. बोलायला कोणी नाही! घराच्या आवारात उगाचच भटकत वेळ काढत होतो. रामेश्वर त्रावेल्स्ने मुंबईत परत.

22 9 19 ला आरे कोलोनीतील जंगल हे जंगलच आहे हे सिद्ध करण्यासाठी एका सामाजिक संस्थेने सहल आयोजित केली होती, त्यात मी व बाबबीने भाग घेतला. आम्ही बिचचुया/ हेन’स नेत्त्ल, ग्रासहोपर, (ग्रासहोपरचे ब्रिसल्स), जंगली सुरंग, रफ टेकसचर ऑफ कारीट (कारटे), वूडू लिली- सुरणाचा प्रकार, खूपच दुर्मिळ वनस्पती, बाघ मूछ/ देवकंद- सुरणाचा दुर्मिळ प्रकार, ली, ली यासीयाटा, ली माक्रोफाटा, चिंचुडी, पाण्याची वेल, कोचा गवत, वेवी लीफबास्केट ग्रास, बांचालिटा, गजकर्णी/ दिंडा, सिल्की एलिफेंट ग्लोरी, अनंतमूळ, पेव/ स्पायरल जिंजर, मुरुड सेंघ, शेंड वेल/ फाइव लीफ याम, जंगली पडवळ, असन, चिमणीचे पोहे अशा दुर्मिळ वनस्पती बघितल्या, ज्या फक्त इथेच रुजू शकतात. जर त्या तुमच्या बाल्कनीत रुजवण्याचा प्रयत्न केला तर त्या रुजू शकत नाहीत, कारण ह्या एकमेकांवर, विशिष्ट कीटकांवर, ते कीटक पण विशिष्ट वंनस्पतींवर, ते विशिष्ट पक्ष्यांवर तसेच आद्रता, माती, तापमान, पाऊस अशा अनेक अजैविक घटकांवर अवलंबून असतात. या सर्वांचा मिळून एक परिसर बनतो. यातील एकही घटक नष्ट झाला तर अख्खे जंगल नष्ट होते व मुंबई शहराच्या आत असे एखादे जंगल असणे किती फायद्याचे आहे, ते तुम्हाला वेगळे सांगायला नको.

मॉस्स! तेव्हा इथे मेट्रो प्रकल्प नको. मला सोसायटीच्या बैठकीला परत यायचे असल्याने मी लवकर निघालो. तो तिथेच राहिला. माझी बाइक चालूच होईना. मेक्यानिक म्हणाला वाटेत एक गाडी दुरुस्त करणारा आहे, त्याच्याकडे न्या. मी ढकलत त्याच्याकडे नेईपर्यंत ती गरम होऊन सुरू झाली. मग न थांबवता घरापर्यंत आणली.

नाशिक - 17 11 19. चुलतभावाच्या गाडीतून गेलो. जाताना एक टॉयलेट लागले, त्यावर लिहिले होते, ‘वॉशरूम्स- ही टू द लेफ्ट बीकॉज शी इज आलवेज राइट’. भांडारकरच्या पुतण्याच्या लग्नात डोक्यावर फेटा बांधून फोटो काढला, तिथे फाल्गुन, नीलांबर, ठाकूर, विश, निवृत्ती, आराम, मोहङ्कुमार, रणधीर सर्व मी ज्या शाळेत शिकवत होतो त्या शाळेतील सहकारी भेटले. लग्न लागल्यावर मी व चुलतभाऊ सुला वाईनयारडसला गेलो. येताना ओम चहाच्या स्टॉलवर फर्स्ट क्लास चहा प्यालो.

रविवारी 24 11 19 रोजी माझ्या चुलतबहिणीच्या नणंदेच्या विवाहासाठी भुवनेश्वर, ओरीसा येथे विमानाने 23 11 19 रोजी दुपारी 4.55 च्या गो इंडिगोच्या फ्लाइटने गेलो. विमानात चढण्यापुर्वी चेकींग करण्यापूर्वी माझा बोर्डिंग पास हरवला. नंतर तो मागे खाली पडलेला दिसला. हुश्श! तिथे थोरला भाऊ, चुलतभाऊ (थोरला व धाकटा) पण आले होते. भुबनेश्वरला पोहोचल्यावर (7.15 संध्याकाळी) मेहुण्याला म्हणालो, “आम्हाला भूक लागलीय. काहीतरी फास्ट फूड खायला घाल!” त्याच्या चालकाने, बिर्याणी केंद्रावर गाडी थांबवली. शेवटी चालत चालत रगडा प्याटीसच्या टपरीवर पोहोचलो. माझे चुलतभाऊ बीएमसीच्या जल व मलनिस्सारण खात्यात काम केलेले असल्याने, संपूर्ण भुवनेश्वरच्या सिवरेज खात्याला नावे ठेवत असल्याने, त्यांना रगडा प्याटीसच्या टपरीच्या जागेवर भूमिगत गटार नसल्याचा वास येत होता. रगडा प्याटीसही काही वेगळाच होता. स्वछतेची आबाळ! इथे लोक खाण्यावर प्रचंड प्रेम करतात पण चहाच्या टपऱ्या मात्र दिसत नाहीत. जेवायला, मेहुण्याच्या घरी पोहोचलो तर लग्नाच्या उच्च जातीच्या आचा-यांनी मटन रस्सा बनवला होता. (महाराष्ट्रात ही जात मांसाहाराच्या जवळपासही फिरकत नाही.) या आचा-यांना मेस्त्री म्हटले जाते. मांसाच्या तुकड्यावर राईच्या तेलाची ‘तरी’ भरभरून ओतली होती. जळगावची आठवण आली. शेवटी ताटात स्वत: वाढून घेतलेले भात व दाल फ्राय टाकून निघालो. (आधीच रगडा प्याटीसने पोट भरले होते.) त्या आधी चुलतबहिणीने दिलेल्या 3 प्रकारच्या ओरिसी मिठाया मात्र चापून खाल्ल्या होत्या. रात्री झोपायला ग्रीन फील्ड हॉटेल, (साई दरबार) हॉस्पिटल रोड एनएच 16 भुबनेश्वर! 24 11 19 दुसऱ्या दिवशी सकाळी चहा प्यायला खाली

उतरलो. यांच्या हॉटेलमध्ये गुहेसारखी रचना केली होती. हॉटेलचे रेस्टोरंट बंद! आतमध्ये काळे कुत्रे, चिटपाखरू देखील नाही. गेट मधून बाहेर पडायला गेलो तर बाहेरून कुलूप लावलेले. परत खोलीवर येऊन व्यायाम करून पुस्तक वाचत बसलो. नंतर देवाशीषने एका दुधाच्या रिकाम्या पिशवीतून चहा आणला. प्याल्यावर पाणी कसे गरम करायचे ते तंत्र समजून घेतले. पण बोयलर लवकर थंड व्हायचा. तशीच थंड कोमट पाण्याने आंघोळ केली. प्रवासी गाडीने कोणार्ककडे निघालो. एका कळकट्ट मळकट्ट रेस्टॉरंटमध्ये नाश्ता केला. त्यांच्याकडे चहा, कॉफी काहीही नव्हते. कोणार्कला पोहोचल्यावर गाडी लावून सूर्यमंदीराकडे निघालो. दरवाजापर्यंत पोहोचल्यावर कळले की तिकीट विक्रीची खिडकी मागे आहे. परत मागे गेलो. आतमध्ये पोहोचल्यावर निराश वाटले की 10 वर्षांपूर्वी ऑक्टोबर 2009ला जसे देवळाला बांबू लावले होते दुरुस्तीसाठी तसे आजही लावले होते. देवळाची डागडुजी करताना त्यांनी (पुरातत्व खात्याने) महत्वाच्या शिल्पांची वाट लावून ठेवली आहे. मान्य आहे की, त्यांच्याकडे त्या काळासारखे कलाकार नाहीत, पण काहीतरी जवळपास, (तरी काम करा मेल्यानू)! बाहेर पडताना कोणार्कच्या रथाची प्रतिकृती विकत घेतली. बाहेर प्रसाधनगृह चांगले आहे, पण दिव्याची कळ पटकन सापडत नाही. नाश्ता महाग पण स्वच्छ आहे. तिथून समुद्रकिनाऱ्यावर गेलो. आपल्यासारखाच समुद्रकिनारा पण पूर्वेकडे तोंड करून व आपल्यापेक्षा जरा स्वच्छ! येताना वादळात पडलेली झाडे दिसली. दुपारी 4 वाजता मेहुण्याच्या घरी जेवलो. हे चुलतबहिणीच्या सासूने बनवले असल्याने बरे होते. संध्याकाळी चहाची टपरी शोधत निघालो. आमचा मुक्काम ज्या हॉटेलात लग्न होते तिथेच होता. पण ते

2 विवाहांच्या तयारीत व्यस्त असल्याने त्यांच्याकडे फक्त एका व्यक्तीसाठी चहा नव्हता. त्याच्यासमोरील टपरीवर चहा संपला होता. जिथून सकाळी चुलतभावाने चहा आणला होता, तेही दुकान बंद! दुसऱ्या नाक्यावर काही वाण्याची दुकाने होती. तिथे 3 दुकानात चहा होता. समोर रस्त्यावर मराठी, वडारी जमातीची माणसे होती. त्यांना विचारले, की "तुम्हाला महाराष्ट्रात कामे मिळत नाहीत का? एवढ्या लांब का येता?" ते म्हणाले, "इथे काही लोक ओळखीचे आहेत." परत खोलीवर जाऊन थोरल्या भावाला घेऊन आलो. वेगवेगळया दुसऱ्या 2 दुकानांवर चहा प्यालो. एका देवळावर तेच 2 मिशीवाले सिंह, शंकर राक्षसाच्या चेहऱ्याचा, नऊ देवींच्या प्रतिमा होत्या. रात्री लग्नाचा सर्व खर्च मुलीकडच्यानी केला. ड्रोन क्यामेरा वैगेरे होता. 7.30 वाजता आधी मुलीकडचे रीसेप्शन व जेवण झाले. मग नवऱ्याला बोलवायला माझा मेहुणा व त्याचा मेहुणा गेला. त्याला उचलून स्टेजवर नेण्यात आले. (नवऱ्याचे पाय म्हणे जमिनीवर लागता कामा नयेत!) [राज कुमार एका चित्रपटात म्हणतो ना, "आप आपके पैर जमीनपर मत रखीएगा, मईले हो जाएंगे!) {माझ्या एका पुण्यासाइडच्या मित्राच्या भावाच्या लग्नात पण असे घडले होते, माझ्या मित्राने स्वत: च्या भावाला पाठीवर उचलून घेत मंडपापर्यंत पोहोचवले होते} नवऱ्याकडच्यानी आधी जेवून घेतले व नंतर रात्री 12 वाजता लग्न सुरू झाले.

ते 2.30ला संपले. जुनीजाणती मंडळी म्हणत होती, “लवकर संपले, सकाळी 6 वाजेपर्यंत चालायला पाहिजे होते!” आम्ही होटेलमधुनच पाहिले. तिथे समोर दुसऱ्या कोणाचे तरी लग्न चालू होते. त्यांच्यापैकी कोणीतरी रात्री पावणे दोन वाजता आमच्या खोलीची घंटा वाजवून पळाले. 25 11 19 सकाळी, झोपेतून उठवलेल्या मेहुण्याकडे नाश्ता करून मुंबईस विमानाने प्रस्थान!

28 12 19 रोजी पहाटे 6 वाजता अंधेरीला लोकल ट्रेनने पोहोचलो. तिथे मेट्रो लोकलला मित्रांना भेटलो. घाटकोपरला उतरून परत लोकल पकडून भांडुप! रिक्षाने तिसऱ्या मित्राच्या घरी! त्याच्या घरी नाश्ता केल्यावर त्याच्याच गाडीने पालीला गेलो. जातानाचा सूर्योदय! रांगेत उभा असताना सोशल माध्यमावर प्रकाशचित्रे टाकली. एका मित्राचा लागलीच संदेश, "रांगेत कशाला उभे राहायचे? आपण नमस्कार केल्यावर तो देवाला आपसूक पोहोचतो." हा तोच मित्र जो एका सहलीला माझ्याबरोबर पालीच्या भक्तनिवासात राह्यला होता. तेव्हाचे पाली खूप बदलले. आता देवळापर्यंत पोहोचण्यासाठी रांग लावावी लागते, इथेही दुरूस्ती सुरू! नंतर कोलाडला हॉटेल डॉल्फिन गार्डनला मुक्काम करून रात्री पोपटी खाऊन 29 12 19 ला मुंबईला परत!

19 7 20 वायंगणी गावाला पोहोचलो. येताना पोयऱ्याला जाऊन दिगंबरला (मावसमेहुणीचा चुलतभाऊ) [तो 14 दिवसांकरता क्वारंटाईन!] त्याच्या घरी सोडले. चुलतभाऊ माझ्या गाडीचा चालक होता. पण त्याला थांबायला सरकारी परवानगी नव्हती, म्हणून तो मालवणला निघून गेला. संध्याकाळी वायङ्गणीच्या समुद्रावर गेलो. तो किनारा आमच्या प्रॉपर्टिचा भाग असल्याने, (नियमात म्हटले होते की तुमच्या घराच्या आवाराच्या बाहेर जायचे नाही.) मी नियम मोडत नव्हतो! तुम्हाला जर माझ्याकडून कोविड्चा धोका संभवत असेल तर तुम्ही येऊ नका माझ्या आवारात! नवीन रिंग वेल बांधली होती. ढोलीचे फोटो काढले. 20 7 20. माझा थोरला भाऊ यांची ही भांडणे कौतुकाने बघत बघायचा. (21 7 20) 22 7 20ला आमच्या शिकारी बोकयाने ‘कुश’ने एक घोरपड पकडली. मुश्कीलीने तिला सोडवून परत जंगलात सोडली. ती प्रचंड घाबरली होती. सध्या ‘पक्ष्यांची ओळख’ या विषयावर बीएनएचएस चा क्रॅश ऑनलाइन कोर्स करत होतो. त्यात ‘पक्षी स्थलांतर आणि लाइफ हिस्टरी’ या विषयावर आज व्याख्यान होते. संध्याकाळी परत समुद्रकिनायावर गेलो. माझ्या खोलीत माझे स्वतंत्र स्वयंपाकघर होते. त्यात 2 लाकडी खुर्च्यांवर एक दगडी फळी होती. त्यावर डाव्या बाजूला विजेवर चालणारा इंडक्शन हीटर होता. ज्यावर

पसरट स्टीलच्या भांड्यात मी चहा बनवू शकत होतो. कधी अफरेश गरम करायचो. एक कप व चहाची गाळणी होती. चहा पावडर मुंबईवरून घेऊन आलो होतो. फक्त दूध आणू शकत नव्हतो. ते वहिनीकडे मागावे लागायचे. स्टीलचे ग्लास्सेस होते. अजून एक मोठे पसरट भांडे होते. एक मोठा बिसलेरीचा बाटला 20 लिटरचा होता. 23 7 20 सुंदर आकाश! 24 7 20ला सकाळीच समुद्रकिनायावर गेलो. 25 7 20 सकाळी परत समुद्रकिनायावर! वाटेत पुतण्याने आदल्या संध्याकाळी एक खुर्ची ठेवलेली असायची. तिथे एखादा बोका असायचा. एखादा दरवाज्याच्या बाहेर, एक मांजर त्याला दाद लागू न देता काचेच्या खिडकीच्या आत! मी चालत चालत आचऱ्याच्या दिशेने गेलो असता माझ्या उंचीची पुळणीची भिंत! लहानपणीची आठवण आली. गणपतीचा काळ असायचा! एवढीच मोठी भिंत! मी व माझा चुलतभाऊ लहान! माझे वडील समुद्रापक्ष्यांची (वाडर्स) शिकार करायचे. आमच्या घरी पक्षी मारायची बंदूक होती. आम्हाला भिंतीवरून खाली येऊ नका म्हणून सांगायचे. कारण समुद्राची भली मोठी लाट आली तर ती आम्हाला भिंतीत चिरडू शकायची. आम्हाला पोहता येत नव्हते. तरी आम्ही खाली उडी मारायचो. परत समुद्रवेलीचा वापर करून वर चढायचो! एकदा माझे वडील आम्हाला ओरडून काहीतरी सांगत होते. आम्ही खाली उतरलो होतो. आम्हाला वाटत होते, ते आम्हाला वर जायला सांगताहेत! नंतर लक्षात आले की त्यांनी एक पक्षी जखमी केला होता, त्याला पकडायला ते आम्हाला



Sand bay

बोलावत होते. या समुद्रकिनाऱ्यावर काटूयाचा एक गोल (साळिन्दराभोवती कसे असते तसे) तयार व्हायचा. आम्ही त्याला समुद्री घोडा म्हणायचो! तो वाऱ्याने जाम पळायचा! आम्ही पण त्याच्या पाठी पळायचो! खूप मजा यायची! गेले ते दिवस व राहिल्या त्या आठवणी! समुद्रकिनायावर हनुमान लंगूर व त्याची टोळी पाहिली. 26 7 20 रोजी परत समुद्रकिनायावर! 2 इंची लांबीचा कोळी पाहिला! बीएनएचएसचा 'लीडरशिप इन जैवविविधता' हा पण ऑनलाइन कोर्स करतोय. 'मेजर पर्यावरणीय कायदे ऑफ इंडिया', 'हरपेटॉलॉजी' या विषयावर व्याख्यान ऐकले. 27 7 20 ला परत समुद्रकिनाऱ्यावर! इंद्रधंनुष्य! आज शिंगचोच्याची जोडी पाहिली. 28 7 20 सुरूच्या झाडावर माकडांची टोळी आली होती. 29 7 20 आज घरातील सर्व मालवणला गेले होते. रेडकर इस्पितळात! काळजीवाहक दुपारी आपल्या घरी गेला होता. बाकी सर्व मांजरे घरात होती, फक्त क बाहेर होता, ज्याचा माझा परिचय नव्हता. मी घरासमोर एका झाडाखाली सावलीत बसलो होतो. इथे इंटरनेटचा वेग जास्त मिळत होता. अचानक समोरून एक कुत्री मागे गेली. थोड्या वेळाने प्रिन्सचा आवाज ऐकायला आला. म्हणून मी त्याचा शोध घेतला, तर तो पम्प हाऊस च्या पाठीमागे एका झाडावर उंच चढून बसला होता व ती कुत्री समोर भुंकत होती. तिला काठीच्या सहाय्याने हाकलले. पण प्रिंसला खाली उतरता येईना. म्हणून थोरल्या भावाला फोन लावला. त्याला यायला वेळ होता. प्रिन्सला काढायला

शिडी घेऊन आलो, तर हा उडी मारून खाली आलेला! परत 3 कुत्रे दिसले म्हणून त्याला उचलून घराच्या मागे आलो, तर परसातले दार बंद! परत त्याला घेऊन पुढच्या दारापर्यंत आलो तर हा मला ओळखत नसल्याने त्याने माझ्या मनगटावर जोरात पंजा मारला व उडी मारून पळाला. रक्ताची धार लागली होती. मी माझ्या खोलीत जाऊन औषध लावले. परत 3 कुत्रे मागे लागल्याने तो माझ्या खोलीत शिरला. त्यांना हाकलले, ह्याला परत उचलून पुढच्या दारातून घरात टाकले व घर बंद करून घेतले. आल्यावर भावाला सर्व प्रसंग सांगून "धनुर्वाताचे इंजेक्शन घेऊ या का?" असे विचारले. तो म्हणाला, "त्याची काही गरज नाही." वहिनीने रात्री त्याला दटावले असणार! रात्रभर हात सुजला होता. नाही नाही ते विचार मनात येत होते. मला रात्री काही झोप लागेना! आज मला काही झाले तर सकाळी 6 वाजेपर्यंत कोणाला कळणारही नाही. पत्नी, मूलापासून दूर! उद्याची सकाळ आपण बघणार की नाही? पण 31 7 20 बघितली. आजचीही सकाळ बघितली. आज आकाश सुंदर होते. दादा मला त्याच्या गाडीतून मास्क लावायला सांगून आचऱ्याच्या डॉक्टरीण बाईकडे घेऊन गेला. आमचे नेहमीचे कोळंबकर डॉक्टर वायङ्गणीच्या नाक्यावर नव्हते. आचऱ्यालाही नव्हते. तिच्याकडे धंनुर्वाताचे इंजेक्शन नव्हते. एका औषधाच्या दुकानातून ते 30 रुपयाला आणले. टोचायचे, 10 रुपये! 40 रुपयात काम झाले. मुंबईत असतो तर किती खर्च आला असता! परत येत असताना, परिचीत मान फिरवायचे. मी क्वारंटाईन होतो ना! माझ्यावरून विषाणू उडी मारून त्यांच्यावर गेला असता म्हणजे! ही गाडी आमच्या मित्राच्या आवारात ठेवायचो व तिथून आमची जिप्सी घेऊन घरी यायचो. चावी बदलताना त्या मित्राचा मुलगा आला, तो पलीकडच्या बाजूला

काचेच्याही पलीकडे जाऊन उभा राहिला. विषाणूने उडी मारली तर! 1 8 20 आजचा कोळी माझ्या पहिल्या (तर्जनी!) अर्ध्या बोटापेक्षाही मोठा! आज नन्नू बोका खूप मारामारी करत फिरत होता. सुंदर आकाश! पोर्णिमेचा चंद्र! वाळूत अंग लपवणारा खेकडा! मालवणीत कुर्ली म्हणतात. 2 8 20 आज सुपेरमिंदचे व्याख्यान ऐकले. आज क्वारंटाईन संपायचा 14 वा दिवस! उद्यापासून मुक्त! खूप वाईट दिवस अनुभवले मी! गावचे तर गावचे, घरचेही तसेच! (मालवणीत गावकी तर गावकी, भावकीही आपली नाही राहिली!) अक्षरक्ष: वाळीत टाकले होते मुंबईकरांना! पहिल्या दिवशी आमच्या परड्यात माझे एक चुलत चुलत काका गुरे चरायला आले होते. त्यांच्याबरोबर त्यांचा मुलगाही होता. मी घराबाहेर पडलेलो बघितल्यावर दुसऱ्या दिवशी मुलाला त्यांनी गुरे चरायला आणलेच नाही. त्यांनी मला “बाहेर का पडलास?” म्हणून जाब विचारल्यावर मी म्हणालो, “नियम असे म्हणतो की ‘मी माझ्या घराच्या परड्यात फिरू शकतो’, जे परडे समुद्र्किनाऱ्यासकट आहे.” सर्व पेडणेकरांची जमीन 151 एकर आहे, ज्यात आमच्या घरासमोरील समुद्रकिनारापण अंतर्भूत

आहे. तरी मी समुद्रकिनाऱ्यावर फिरताना कोणी दिसले की परत मागे फिरायचो. तिसऱ्या घरातील सूर्यशेखर आपल्या मुलाला बाइकने आणायला गेला म्हणून त्यालाही 14 दिवसांचे विलगीकरण! जर एखादा मुंबईकर बाहेरून गावात आला तर त्यांना गावात आणण्यासाठी टेम्पोची व्यवस्था करण्यात आली होती. मामा, मामी, शेजारी अशा वयस्कर लोकांना टेंपोत चढणे उतरणे शक्य नव्हते. म्हणून त्याने थोरल्या भावाला जिप्सी घेऊन बोलावले. त्याला सांगण्यात

आले, जर तुम्ही गेलात तर तुम्हीही परत 14 दिवस विलगीकरणात! शेवटी तो म्हणाला, मी तोंडाला मास्क लावून, हातमोजे घालून, चालक व प्रवासी यांच्यामध्ये प्लॅस्टिकचा पडदा लावून, गाडीत सांनीतीजर लावून त्यांना घेऊन येईन, तेव्हा त्याला परवानगी मिळाली. दादाच्या गाडीत नेहमीच स्यानिटायझर असायचा. मित्राच्या मुलाला म्हणालो की कुठल्याही वस्तूला हात लावला की स्यानिटायझरने हात स्वच्छ करून चेहऱ्याला लावलास की विषाणूंचा धोका नसतो. मध्येच वादळ झाले, आनंदकाकाचा गोठा मोडला. एका वासराचे पाठीचे हाड मोडले. आनंदकाका खूप घाबरले, त्यांचे थोरला बंधु विशालकाका मुंबईहून लगोलग आले. (मुंबईतच एनसीपीआरटीची टेस्ट करून) त्याला रामकाकाचे घर राहायला दिले. घर पूर्ण बंद, एकही खिडकी नाही. आत सगळी ओल. पंखा नाही. रात्री लपतछपत आणन्द्काकाच्या घरी झोपला तर गावातले तक्रार करणार. पहिला दंड 10000/- दूसरा 15000/ ह्याला समुद्रावर फिरायची आवड, कोणीतरी ग्रामपंचायतीकडे तक्रार केली. माझा थोरला भाऊ म्हणाला, “अरे! समुद्र आमच्या परड्यात येतो. तुम्हाला त्रास होत असेल तर तुम्ही आमच्या परड्यात येऊ नका!” पण विशालकाका परत समुद्रावर गेले नाहीत. एकदा ‘इशारा’ काहीतरी निरोप घेऊन 2ऱ्या घरात आला. तिथून विशालकाका 2 घरे पलीकडे, 25 फुट अंतरावर! पण तरीही तो त्याच्याकडे बघायलाही तयार नाही. त्याने बघितले असते तर विषाणूने 25 फूट लांब उडी नसती मारली? आमचे वाळीत टाकले गेलेल्यांचे जास्त काही म्हणणे नव्हते, 25 फुट लांबून एखादे स्मित तरी द्या! जरातरी माणुसकी दाखवा! या गाववाल्यानपेक्षा मुंबईकर बरे! लवकरच हा भ्रमाचा भोपळाही

फुटणार होता! 3 8 20 ला 'रोटे' नावाचे किडे बघितले. हे माडाचे झाड पोखरतात. ह्यांच्यावर केमिकल टाकले, मीठ टाकले तरी हे मरत नाहीत. 4 8 20 ला माझ्या

पुतण्याचा वाढदिवस साजरा केला. 5 8 20 भावाने झाडांना संरक्षणासाठी जाळी, पाण्याची टाकी बांधून घेतली. 6 8 20 व्हाइट बेलीड सी ईगल (सफेद पोटाचा समुद्र गरुड) व दुर्मिळ पक्षी गल बिल्ड टर्न दोन्ही पाहिले. 7 8 20 कुंभारीण माशीचे घर पाहिले. 8 8 20. आमचा शिकारी बोका 'कुश' दिवसभर माझ्या बरोबर होता. याने आतापर्यंत एक दयाळ पक्षी, एक घोरपड व न जाणे कोणाकोणाला

पकडले होते. 10 8 20 आज जैव विविधतावाल्यांचे सरपटणाऱ्या प्राण्यांविषयी व्याख्यान होते. 11 8 20 आज श्रीकृष्ण जन्माष्टमी! माझ्या वडलांची जन्मतिथी! 12 8 20 आज हिरवा टोळ व शेती बघितली. 13 8 20 आमच्या परड्यात समुद्रकिनाऱ्याजवळ एक होडी नांगरलेली होती. तिच्या पुढच्या टोकाला आग्या वेताळी मधमाशांचे पोळे होते. (जैत रे जैत फेम) आमच्या गावातील एका स्त्रीचा अशा प्रकारच्या माशांनी बळी घेतला होता. जवळ जायला पण भीती वाटायची! आज

काळ्या रंगाचा टोळ पाहिला. उत्तरेला याची धाड आली होती. जिंजर बोका झाडावर जाऊन बसला होता. 14 8 20 आज पोयऱ्याला गेलो होतो. त्यांच्या घरी टाइल्स लावण्याचे काम चालू होते. दिगंबरच्या वडिलांनी व आईने त्याला सुखरूप घरी आणून सोडल्याबद्दल माझे आभार मानले. त्यांना असे वाटत होते की मुंबईतून तो जीवंत येणार की नाही? मुंबईची सर्वांनी धास्ती घेतली होती. त्यांना मी म्हणालो की "इथले स्थानिक 25 फुटांवरून पण आमच्याकडे बघायला तयार नसतात. कोविड 19 झाला तर?" "मग नाही होत?" दिगंबरच्या वडिलांची प्रतिक्रिया!



मी मनातल्या मनात कपाळावर हात मारून घेतला. किती लोकांचे कोविड विषयी गैरसमज दूर करायचे? दिगंबर म्हणतो, इथले सर्व मुंबईकर नेटवर्कसाठी पोयऱ्याच्या साई मंदीरात संध्याकाळी जमा होतात. 16 8 20 टर्न नावाचा तो दुर्मिळ पक्षी आजच्या वादळात फिरत होता. रत्नागिरीकडून येऊन मालवणकडे चालला होता. 17 8 20 कुश व जिंजर एकत्र झोपले होते. आज मांजरांसाठी रापणकरांकडून कोकल व ढोमो नावाचे मासे विकत घेतले. आज माझ्या टी शर्ट वर सफेद पतंग येऊन बसला होता. 18 8 20 आज माकडांची टोळी घराच्या बाजूला होती. 21 8 20 आज गणपती आणण्यासाठी

गणपतीच्या कार्यशाळेत गेलो होतो. एक पतंग बघितला. 22 8 20 गणेशोत्सवाचा आज पहिला दिवस. आम्ही पहिल्या घरीच मुक्काम हलवला होता. त्या घरात नेहमी राहणारे एकही कुटुंब गणपतीला येऊ शकले नव्हते. ईवन त्याच्या जन्मापासून येणारा, ज्याने कधीही नेम मोडला नव्हता, तो थोरला चुलतभाऊसुद्धा! सर्व जबाबदारी वहिनीच्या अंगावर पडल्याने ती ताणात आली होती. सर्व 5 घरांनी आपआपल्या वाड्या आणून देवासमोर ठेवल्या. आदल्या रात्री जागून आम्ही सजावट पूर्ण केली होती. देवासमोरच्या वाटीतील तेल संपणार नाही याची, रात्रीची जबाबदारी माझ्यावर होती. थोरल्या भावाने पूजा केली. याचे लाईव्ह चलचित्रण मला करायचे होते व मुंबईकरांना दाखवायचे होते पण जिओ बोंबलत होता. अख्खा सिंधुदुर्ग जिल्हा आपआपल्या घरांना असे चित्रण पोहोचवायचे प्रयत्न करत होता. शेवटी चलचित्रण करून ते पोहोचवले. 23 8 20 आज 2रा दिवस! मला व विशालकाकाला समुद्रकिनाऱ्यावर कालटन 134 ए नावाचे रेफ्रिजेरंट सापडले, पण रिकामी होते. त्यावर अनेक कालवे होती. अजून 1 पतंग, वहिनीच्या मधल्या बोटाच्या अर्ध्या उंचीचा! रुंद. आज सूर्याशेखरच्या गणपतीच्या मूर्तीचे विसर्जन! आम्ही बांधलेली अंगणवाडी, सौर पॅनल, लहान मुलांना खेळायला साहित्य, घसरगुंडी, तेथील कुत्रा पाहिला. समुद्रकिनाऱ्यावर किरणकाकांना उभे केले. पुळण आज त्यांच्या उंचीची होती. 24 8 20 आज 3रा दिवस! गावातले इतर गणपती पाहिले. कोतवाल पक्षी

पाहिला. आज पेडणेकरांच्या घरी मुक्काम असल्याने डोंगराकडच्या रस्त्यावर प्रभातफेरी मारता आली. 25 8 20 आज चौथा दिवस! या दिवसात पण समुद्रकिनाऱ्यावर दारू पिणारी माणसे आहेत. 26 8 20 आज आमचे गणेश विसर्जन! 27 8 20 आचऱ्याला जाऊन सरकारी डॉक्टरांकडून मला कोविड नसल्याचे प्रमाणपत्र घेऊन आलो. चपलांच्या दुकानात चप्पल विकत घ्यायला गेलो. तिथे एवढे डास होते की मी विक्रेतीला म्हणालो, इथला एखादा डास मला चावला व मला मलेरिया झाला तर तुम्हीच गाववाले म्हणणार, मला कोविड झालाय व मुंबईकर करोंना पसरवतात म्हणून बोंबा मारणार! मी ज्या डॉक्टरांकडून तपासून घेतले ते प्लॅस्टिकच्या पडद्याच्या आत होते, पण मी जेव्हा मुंबईला पोहोचलो तेव्हा इशाऱ्याचा फोन आला की ज्याने मला तपासले तोच पॉजिटिव निघाला. ☺

28 8 20 दुसऱ्या दिवशी संध्याकाळच्या गाडीने मी मुंबईला निघालो. 29 8 20ला माझे स्वागत अलेकझानडराईन पाराकीटनी (पोपटाची एक जात) केले. मध्यंतरी माझ्या मुलाने मला फोटो पाठवला होता “थरेट’ म्हणून! मी त्याला म्हणालो “अरे! स्पेल्लिंग चुकले, ही ट्रीट आहे.” तो म्हणाला, “सकाळी सकाळी कीर्र आवाजाने उठवतात, ही थरेटच आहे.” आज मला ते पटले. परत एकदा दीड महिना मुक्काम झाला!

20 10 20 कोलाडच्या पुढे माणगाव येथे मी विशाल, जय व त्याच्या एका मित्राबरोबर गेलो. जय गाडी चालवत होता. त्याच्या जमिनीची काहीतरी केस होती. प्रथम आम्ही भू अभिलेख या कार्यालयात गेलो. जयचा मित्र कोणा आमदाराला भेटायला कोलाड येथे उतरला होता. जय कार्यालयात गेला. आम्ही चहाची टपरी शोधून काढली. दुपारी त्यांच्याच कोणा मित्राच्या घरी जेवलो. बापरे! किती ते जेवण! संध्याकाळी कोलाडला जयचा मित्र परत भेटला. घरी आलो!

19 12 20 मी, पत्नी व चुलतभाऊ जमीन बघायला शृंगारतळे, जानवले चिपळूणला गेलो. दुपारी ‘अभिषेक’ला जेवायला गेलो. संध्याकाळी देवाशिशचा मित्र संदेशच्या दुकानात जाऊन नंतर त्याच्या पत्नीचा पाहुणचार घेऊन परत आलो.

6 1 21 माझ्या मुलाने विचारले, “देवाशीश्काकाला 7 हिल्स इस्पितळात कोविड पॉजिटिव म्हणून ॲडमिट केलाय. तुम्ही त्याच्या संपर्कात आला होता ना!” “हो!” “आई म्हणाली, जोपर्यंत तुमचा निकाल – येत नाही, तोपर्यंत तुम्ही हैदराबादला जायचे नाही!” आता काय करायचे? हैदराबादचे तिकीट तर उद्या दुपारचे आहे. मावसमेहुणीला फोन केला, “आमच्या बाजूचे शनीमंदीरजवळचे कोविड तपासणी केंद्र किती वाजेपर्यंत चालू असते?” “दुपारी 1 वाजेपर्यंत.” मी जेवण तसेच टाकून धावलो. तिथे पोहोचेपर्यंत 1.20 झाले होते. “अजून कुठे?” “बोरिवली पश्चिमेचे प्रयत्न करून बघा.” घरी आलो, जेवलो व मुलाच्या बाइकवरुन तिथे पोहोचलो. “1.30 ला बंद होते. शताब्दीला जा!” शताब्दीला (कांदिवली पश्चिम महानगरपालिकेचे इस्पितळ) पोहोचलो. “आम्ही कोविड विभागच बंद केलाय.” पत्नीस फोन, “आता फक्त खाजगी प्रयोगशाळांत 1000 रुपये फी भरून तपासणी करता येईल.” “काही गरज नाही, उद्या सकाळी शनीमंदीरजवळच्या केंद्रात 10.30 ला जा.” 7 1 21 या दिवशी 12.30 ला घर सोडायचे, दादर स्टेशनला जायला! (2.30 ची ट्रेन) कसे व्हायचे? दोन्ही बॅगा भरून ठेवल्या, हैदराबादची पण व नेसको विलगीकरण कक्षाची पण! वॉशिंग मशीन लावताना पाकीट भिजले. सगळ्या नोटा काढून घरेलू कामगारणीस तव्यावर सुकवायला दिल्या. मुलगा चिडला होता. (तिच्यासमोर नोटांचे प्रदर्शन मांडले म्हणून!) पुण्याच्या मावसमेहुणीच्या मुलाच्या लग्नात चाललो होतो. आहेर द्यायची गरज नव्हती. (तो नंतर लग्नात पत्नी देणार होती.) केंद्रावर गेलो. ॲंटीजेन टेस्ट निगेटिव्ह आली. आरटी सीपीआर टेस्ट नेहमी निगेटिव्ह येते, असे पत्नीचे व मावसमेहुणीचे म्हणणे! ह्या टेस्टचा निकाल उद्या मिळणार होता. माझी ट्रेन आज होती. मला

हैदराबादला जायला पत्नीकडून परवानगी मिळाली. जेवून रिक्शा पकडली. खालपर्यंत मुलगा सोडायला आला. रिक्शा वान्द्र्यापर्यंत! तिथे टॅक्सी पकडायची होती. मला आपल्या टॅक्सीत घ्यायला ही मारामारी! टॅक्सीवाला म्हणाला “इथून शॉर्टकट घेऊ का?” “घे बाबा! पण चल लवकर!” दादरला पोहोचलो तर एकुण खर्च 350/- ओला केली असती तर 500/- झाले असते. एक तास आधीच पोहोचलो. आता टाईमपास काय? हातात भरपूर सामान! सार्वजनिक शौचालय गाठले व जाऊन आल्यानंतर मुख्य प्रवेशद्वाराकडे उभा राहिलो. भाच्याचा फोन आला, “गाडी वेळेवर आहे का?” “होय” तिथे दुसरी एक व्यक्ती त्याच गाडीची वाट बघत उभी होती, तिच्याकडे आलेला संदेश वाचला. मी ट्रेन बूक करण्यासाठी ज्या मोबाइल नंबरचा वापर करतो ना, तो अस्तीत्वात नसल्याने मला अपडेट्स मिळत नाहीत. (तो होता प्रत्यक्षात माझ्या मुलाचा क्रं. जो तो वापरत नव्हता आणी माझा मुख्य क्र. आयआरसीटीसी याप्पला चालत नव्हता. हा गोंधळ इथे समजावू शकत नाही. पण याच्या पुढच्या ब्लॉग मध्ये यामुळे आलेली समस्या व माझी पत्नी माझ्यावर का चिडली ते सांगेन) त्या संदेशात म्हटले होते, गाडी वेळेवर आहे, फक्त मधल्या काही स्थानकांच्या वेळा बदलल्यात. त्यांना पुण्याला यायला वेळेवर निघायला हरकत नाही. आमची गाडी दादरवरून वेळेवर सुटल्याचा संदेश पाठवला. पुण्याला यांचा जाम गोंधळ! कोणाच्या बॅगा कुठे आहेत याचाच पत्ता नाही. त्यात यांनी सोईप्रमाणे आपल्या सीटस बदलल्या! अनेक तरुणींचा पहिलाच ट्रेन प्रवास असल्याने रात्रभर ‘हीss हीss हाss हाss’ चालू होते. स्वताही झोपल्या नाहीत. इतरांनाही झोपू दिले नाही. पहाटे हैदराबाद स्थानकावर उतरून बाहेर आलो. स्थानक रंगीत दिव्यांची आरास

करून झगमगत होते. सकाळी सकाळी पहिला प्रचंड गोड चहा प्यालो. 3 बसमधून आम्हाला हॉटेलला सोडण्यात आले. मी निळा सदरा व टोपी घालून तयार! मावसमेहुणी फुल्ल साडी वैगेरे घालून तय्यार! मी, दूसरा मावस साडूबंधू, अजून एक भाचा, त्याचा मित्र वैगेरे, बंनियन, चप्पल वैगेरे घ्यायला बाहेर पडलो तर बाहेर फक्त फर्निचरची दुकाने. इतर दुकाने उघडायला, 11 वैगेरे वाजतात. शेविंग क्रीम, साबण आशा साध्या साध्या गोष्टीही मिळत नाहीत. उशीर होईल म्हणून हॉटेलमध्ये परत आलो तर नवरदेव आंघोळसुद्धा न करता झोपला होता (त्याला माहीत होते खूप उशीर होणार आहे ते!). साखर पुडा बनवायचा होता म्हणून 2 मावस मेहुण्या माझ्याबरोबर मागे थांबलेल्या. इतर स्त्रिया पूढे निघून गेलेल्या! त्यांचाही निरोप, तिथे काहीच

हालचाल नाही, नुसताच टाइमपास चाललाय! मावसमेहुणीने नवीन कपडे घातले होते, म्हणून! नाहीतर कुठेतरी हैदराबाद बघून तरी आलो असतो. वधूपक्षाचे सोलापूरवरून आलेले कुटुंब हुशार होते, ते चारमिनार बघून पण आले. आम्ही झोपही न काढता सकाळपासून तयार होऊन बसलो होतो. शेवटी एकदाचा मुहूर्त मिळाला! एका गल्लीत त्यांची चाळ होती. रस्त्याच्या दोन्ही बाजूला

एका इमारतीत त्यांचे 100 नातेवाईक राहत होते. तिथे बाजूला एक हॉल होता. तिथे आम्हाला पुरूषांना नेण्यात आले. एक टॉवेल, टोपी व एक खण देऊन आमचा सत्कार करण्यात आला. खाली रस्त्यावर जेवण बफे सिस्टमने मांडण्यात आले होते. बकरा, कोंबडी वैगेरे सर्व होते. आमचा एक साडूबंधु मांसाहार तर सोडा, कांदाही खात नाही. त्याची तर हालतच झाली. आमचे जेवण चालू आहे तर तिथे साखरपुडाही सुरू झाला. वरपित्याचाच पत्ता नाही, पण त्यांनाही काही फरक पडत नव्हता. त्यांच्या पद्धतीने साखरपुडा झाला. मावसमेहुणी वैतागली! आमच्या पद्धतीने साखरपुडा करायला लावला. हळदीचे कपडे घालायला परत हॉटेलवर गेलो. बाहेर एक गरम कटिंग चहा पण मिळत नाही अशी परिस्थिती! एका औषधाच्या दुकानात मला पाहिजे असलेला साबण वैगेरे वस्तु मिळाल्या. रात्री हळदीला परत तिथेच! नाचगाणे वैगेरे सर्व! परत हॉटेलमध्ये! 9 1 21 लग्नाची तयारी! काल उशीर केला. आज मात्र त्यांना घाई होती, देवळात जायचे, तिथून वरात वैगेरे! आज मी धोतर वैगेरे घालून! आधी नवरदेवाला त्यांच्या देवळात फुल्ल जामानिमा करून! तलवार, पागोटे इत्यादी0 आमचे सेल्फी, भर उन्हात नाच वैगेरे. एका मावस मेहुणीची चप्पल तुटली. वाटेत, हॉल जवळ एक चर्मकार नाही. मी धोतरावर लांबपर्यंत शोधून आलो. जवळपास कसलेही उपयोगी दुकान नाही. लग्न त्यांच्या पद्धतीने! मावस मेहुणीला राग येऊ लागला होता. एका भाचीला जुलाब झाले. माझ्याकडेही गोळया नाहीत. साडू बाहेर पडला तर प्रिस्क्रिप्शन शिवाय मेडीकलवाला औषध द्यायला तयार नाही, आता या वाळवंटात डॉक्टर कुठून शोधायचा? शेवटी लांबवर एका दुकानात औषध मिळाले. आता माझा आरटीसीपीआर अहवाल निगेटिव्ह आला. पॉजिटिव असता तर

या लग्नाला आमच्याकडून फक्त 35 लोक होते, पण त्यांच्याकडचे 1500! त्यात मोठी मोठी राजकारणातील धेंडे आली होती, आपआपल्या शरीर रक्षकासह! जेवण झाल्यावर आम्ही परत हॉटेलमध्ये गेलो. बिदाईसाठी व तसेच मुंबईला जाण्यासाठी परत त्या गल्लीत गेलो. बाजूच्या बाजारातील दुकानांत उपासासाठी (सकाळच्या त्या शाकाहारी साडुबंधुसाठी!) केळयांचे वेफंर्स पण मिळत नाहीत. बिदाईचा कार्यक्रम, त्यात त्या 100 बायकांच्या रडण्याचा कार्यक्रम, परत जेवून वरात, वरातीला डीजे, बॅंड बाजा. बाजूचा काय बोलतोय ते ऐकायला येत नाही. त्यात माझा मोबाइल खाली पडला. तो वधूपक्षापैकी एका म्हाताऱ्याला सापडला. मी परत मागितला, तर तो म्हणतो, “सिद्ध कर तुझाच आहे. हयाच्यावर फोन लाव.” “कुठून लावू? माझ्याकडे दूसरा फोन नाही.” त्यांनी एक जुना पुराणा फोन दिला. त्यात नंबर पण दिसत नव्हते. मी साडूबंधूंना हाक मारायला सुरुवात केली. त्या गदारोळात त्यांना हाक मारायला सुरुवात केली, त्या गोंगाटात त्यांना ती ऐकायलाही जाईना. साडुंचा सकखा भाऊ आला. त्याने मला त्याचा मोबाइल दिला. त्यावरून माझ्या मोबाइलला फोन लावला. लागला! ह्या व्यक्तीने मला फोन परत केला. मी रागात होतो, त्याला धमकी दिली की “पुण्याला ये! तुला दाखवतो.” साडूचा बंधु म्हणाला, “प्रकरण वाढायच्या आधी तुम्ही वरातीच्या पुढे जा” माझ्याही लक्षात आले की आपण दुसऱ्यांच्या क्षेत्रात आहोत. मी पुढे गेलो. तिथे दुसऱ्या साडू बंधुला बोलावून घेतले. जिथे बस उभी होती तिथे एक हलवायाचे हॉटेल होते जे 1944 सालापासून म्हणजे गेली 77 वर्षे कार्यरत होते. नाव- चाट्टूराम! कुठेही दुसरी शाखा नाही. त्यांचे रात्री 10.30 वाजता

केसर दूध प्यालो.

एक जुनी गढी बघितली.

रात्री उशीरा गाडी निघाली जी स्लीपर कोच होती. त्यात मी सर्वात पुढे. माझ्या विरुद्ध बाजूला, वर- वधू! खाली तिची मावशी व काकी. वधूला रात्री खूप त्रास झाला. जेव्हढ्या गोळ्या माझ्याकडे होत्या तेव्हढ्या दिल्या. फक्त उलटीची नव्हती. आठवले, सकाळी साडूबंधुने आणली होती. आता त्या मावस मेहुणीला कसे शोधायचे? सगळे झोपलेले! कोणाला हाक पण ऐकू येत नाही. प्रत्येक बंद कपडा कसा बाजूला करायचा? शेवटी वरानेच आपल्या पत्नीसाठी सगळे पडदे उघडून बघितले. सापडली एकदाची मावस मेहुणी आणि नंतर गोळी! 10 1 21 आमची गाडी येरवड्यात शिरल्यावर फटाके वाजवले गेले. मग वधू माप ओलांडून आत! गुलाब पाकळयांच्या पाण्यात अंगठी शोधायचा खेळ! आंघोळ खूप उशीरा झाली. पूजा दुसऱ्या

दिवशी होणार नाही व जेजुरीला मला जायचे नसल्याने मी 12 1 21 ला दुपारी 2 वाजता स्वारगेटला सेमी लक्झरी बसमध्ये चढून मुंबईत परतलो. जेव्हा ते पाहुणे पुण्याला लग्नाला रीसेप्शनला आले, तेव्हा मी गेलो नाही.

6 2 21 पोयरा गावाला जायला पत्नीबरोबर ट्रेनने निघालो. एसी 3 बर्थ कोच! बसायला गेलो तर इतर दोघेही त्याच सीटवर. त्यांचीही नावे दिसतात. बाहेर नावे बघितली नाहीत. टीसी आल्यावर कळले आमची नावे एसी 2 बर्थ कोच मध्ये अपडेट झाली होती, फक्त मोबाइल नंबर नसल्याने मला अपडेट मिळाली नव्हती. (मागच्या पानावर याचा उल्लेख आहे.) पत्नीला राग आला. तिला हे लक्षातच नाही आले की आपण एसी 3 बर्थ मधून 2 बर्थ कोच मध्ये अपडेट झालोय. शेवटी येतानाची तिकीट मिळवायला मला यूजर आयडी नवीन घ्यावा लागला. 7 2 21 सकाळी नाश्त्याला उपमा व शिरा एकत्र होते. कणकवली रिक्शा स्टँडला आलो तर खूप वेळ काढला त्या रिक्षावाल्याने! काही सहप्रवासी उद्योगधंद्याच्या प्रशिक्षणासाठी एवढ्या लांब आले होते. पोयऱ्याला गेलो. दुपारी आचरा तिठ्याला दलालाच्या कार्यालयात गेलो. नुसताच गोडबोल्या व आळशी माणूस आहे तो! पैसे मिळाले की तू कुठे व मी कुठे! त्याने परत दुसऱ्या दिवशी मालवणला कचेरीत बोलावले. नंतर पोयऱ्याला गेल्यावर रानडुकराचे मटन खायला मिळाले.

शिकार झाली होती. (8 2 21) सकाळी सकाळी त्या दलालाने आम्हाला मालवणला बोलावले, स्वत:चा पत्ता नाही. वाटेत दादाच्या गाडीत जाऊन बसलो. आम्ही मालवणच्या मावशीकडे जाऊन आलो. प्रथम कचेरीत भेट! वकीलाकडून कागदपत्रे तयार करणे. आफिडेविट! रजिस्ट्रेशन! आज वायंगणीत मुक्काम! सकाळी त्रिम्बकला! मोजणी केली.

जेवणाची व्यवस्था कुठे करता येईल ते बघून घेतले. 9 2 21 सकाळीच जेवणाची ऑर्डर देऊन आलो. त्रिम्बकच्या जमीनीत 2 मजुरांच्या मदतीने पोल चढवले. कंपाऊंड आखून घेतले. निवडुंग बाजूला घेतले. निवडुंग ओढता ओढता काटे शरीरात घुसतायत! दम निघाला अक्षरक्ष: चहाची व्यवस्था करायला दूर जावे लागले. 10 2 21 आज पत्नी पण आली होती. तिने समोरच्या कुटुंबाशी मैत्री केली. दुपारी एकत्रित आम्ही दोघांनी वनभोजन केले. चहा पिऊन घरी परतलो. इशाऱ्याने कारने आम्हाला कणकवली स्थानकावर सोडले. लवकर पोहोचल्याने बाजूच्या हॉटेलमध्ये चहा घेतला.

11 2 21 सावंतवाडी दादर स्पेशल ने 3 एसी मधून कणकवलीहून 8 वाजता सुटून 12 2 21 ला सकाळी 6.40 ला दादरला मुंबई!



21 2 21 बीएनएचसने ए जे चाणक्य पाणथळ जागा नवी मुंबई येथे सकाळी 7 वाजता पक्षी निरीक्षण सहल आयोजित केली होती. माझ्या चुलतभावाने मला 7.05 ला सोडले. ते निघतच होते. नशीब सापडले! प्रातर्विधीलाही वेळ मिळाला नाही. पुढच्या वेळी प्रौढ डायापर घालून यायचे. नेमकी विडियो कॅमेऱ्याची बॅटरी उतरली. नंतर नाशिकला पुढच्या महिन्यात कळले ती निकामी झालीय, नवी घेतली पाहिजे. तज्ञ पक्षी दाखवायचे पण मला दिसायचेच नाहीत. दिसले तर फोटो काढता येत नव्हते. काही पक्षी मात्र दूर दाखवतात, ते वायंगणीला मात्र खूप जवळ दिसतात. तिथे मॉर्निंग वॉक

घेणाऱ्याना वाटत होते की आम्ही रोहित पक्षी पाहायला आलोय. ते एका खाडीवर पाठवत होते, तिथे खूप आहेत म्हणून! खरोखरच तिथे अर्धवर्तुळाकार खूपच होते पण उज्जनी जलाशयावर मात्र हेच पक्षी खूप जवळ दिसतात. लवकर निघालो व चुलतभावाला घेऊन आलो. तोही हळहळला! चांगला कॅमेरा घेऊन यायला पाहिजे होते. परत येताना युलू बाईकस पाह्यला मिळाल्या. वाशीला नाश्ता केला.

5 3 21 ला बोरिवली नॅन्सी कॉलनी येथून 7.15 वाजता शिवनेरी पकडून नाशिकला गेलो. पहिल्या सीबीएस बस स्थानकावर न उतरता दुसऱ्या स्थानकाकडे निघालो. वाटेत मला पाहिजे असलेले सम्राट लॉज मिळाल्यावर



धावत्या बसमधून उडी मारली. खोली बूक केली. जेवायला खाली आलो. तिथे दोघांशी ओळख केली. इतरही तिथेच भेटले. गंगापुर रोपवाटिकेत आलो. तज्ञ जे पक्षी दाखवत होते

ते मला दिसत नव्हते. ज्यांचा उल्लेख ते करत होते ते मालवण, वायंगणीत जवळून पाहिले होते. कॅमेरा चालत नव्हता. बिबळ्या पकडायचा सापळा बघितला. जांभळाचे झाड पाहिले. बेलाचे, निमचे, आंबट चिंचेचे रोप पाहिले. नंतर आम्ही गंगापूर धरणाजवळ गेलो. तिथे चाललेल्या बोटिंगमुळे जास्त पाणपक्षी दिसत नव्हते. तिथून आम्ही विहंग पक्षी परिचय केंद्रात गेलो. रात्री होटेलमध्येच जेवण घेतले. 6 3 21 ला नांदूर माध्यमेश्वर वन्यजीव

अभयारण्यात गेलो. सकाळी थंडी वाजत होती. नंतर वाजेनाशी झाली. इथे तंबू निवास व्यवस्था पण आहे. प्रौढ व्यक्तींची प्रवेश फी 30 रुपये आहे.

प्रथम 800 मीटर आत, उजवीकडच्या एका निरीक्षण मनोऱ्यावर गेलो. कॅमेराने इथेच राम म्हटले. नंतर परत येऊन दुसऱ्या निरीक्षण मनोऱ्यावर गेलो. इथे पक्ष्याना बसायला जंगल खात्याने कृत्रिम मनोऱ्यानची व्यवस्था केली आहे की जेणेकरून शिकारी पक्षी यावर बसावेत पण शिकारी पक्ष्यांसाठी लवचिक फांदी लागते, ज्यावर त्यांना पकड घेता येते पण ही रुंद आहेत. जे पाणकावळ्यांना उपयुक्त आहेत. करकोचे एकूण 600 आहेत पण जर ते एकत्र येऊन शेतात बसले तर शेतकरी त्यांना हाकाळतील म्हणून ते 50- 60 च्या गटाने फिरतात. इथे कडूनिंबाचे, बदामाचे झाड आहे. दुपारी सायखेडा, मांजरगाव रोड, भुसे, ता. निफाड, जी. नाशिक येथे जेवण घेतले. राजू कसंबे सरांनी परागीकरणाविषयी माहिती दिली. नंतर निसर्ग निर्वाचन केंद्रात, खांगाव, थडी येथे एक फिल्म बघायला गेलो. सगळे झोपले. पक्ष्याची मॉडेल्स होती. एक प्रदर्शन पाहिले. बाहेर येतो तर त्यांनी पाळलेला मोर. दुपारी नांदूर

माध्यमेश्वर पाणथळ जागा, खानगरवर उन्हात पक्षी पाहायला! एका तरुणाने आम्हा सर्वांना उसाचा रस पाजला. कोरडे ऊन मी म्हणत होते. परत संध्याकाळी गंगा माध्यमेश्वर देवळाजवळ स्विफ्ट टेल पक्ष्यांचा नाच, त्यांचे घरट्यात जाणे व त्यांच्यावर एका बहिरी ससाण्याची नजर. इथे तो मघासचा मोरही आला होता. खूपच रोमांचकारक!

रात्री हॉटेलमध्ये! नंतर बारबेक्यु मिसळ खायला आणि नासिक रस्सा प्यायला! 7 3 21 अंजणेरी डोंगरावर त्र्यंबकेश्वरजवळ गिधाडे पाहायला गेलो. इथे गिधाडांसाठी संरक्षित अभयारण्य आहे. सकाळी उंच डोंगरावर जसजसे ऊन येते तसे कपारीत दडलेली ही गिधाडे उबदार हवेत स्वताला झोकून देतात. हे बघायला आम्हाला ऊन पडायच्या आत वर जायचे होते. फॉरेस्ट गार्डनी आम्हाला मास्क

काढायला सांगितले. नाहीतर उचलून वर न्यायला लागेल असे सांगितले व आम्ही याची देही याची डोळी गिधाडे उडताना पाहिली.   स्पॉट्सकोप मधून पाहिली. दुपारी हॉटेलमध्ये येऊन, जेवून जिलेबी घेऊन आयोजकांच्याच गाडीतून ठाण्याला उतरलो व रिक्षाने चुलतबहिणीकडे गेलो. तिथून घरी!

21 3 21 एसजीएनपी व बीएनएचएस यांच्या संयुक्त विद्यमाने तुंगारेश्वर वसई येथे पक्ष्यांची नोंद करून ते ईबर्ड अप्प वर नोंदवायचे होते. जायलाच खूप उशीर लागला. एकतर सर्वात शेवटचे ठिकाण आमचे! पण गाडीचं उपलब्ध नाही. मग आमच्याच गटातील एकाची कार व एक सरकारी जीप घेऊन आम्ही निघालो. इथून पुढे जायला सर्वसामान्यांना परवानगी नाही. वाटेत एक कोणीतरी जाणूनबुजून लावलेला

वणवा बघितला. आमच्या बरोबरचा पोलिस व एक वॉलंटियर वणवा विझंवायला थांबला. वाटेत दोघेजण बाइक वरुन चुकून वर आलो, परत नाही येणार असे म्हणून शॉर्टकट मारुन गेले. ही तज्ञ मंडळी जे पक्षी दाखवत होते ते मला दिसतच नव्हते. कॅमेरा वापरुन फोटो काढणे हे उद्दीष्ट नव्हतेच. 2 तासात जास्तीतजास्त पक्ष्यांची नोंद हे उद्दीष्ट होते. चढ जिकीरीचा होता. भरपूर दिवसात असा चढ चढलो नव्हतो. हा पुढे कोणाच्या तरी आश्रमात जातो म्हणे. आमचे रेकॉर्डिंग आम्ही सर्वांनी एकत्र एकाकडे पाठवले. त्यात एकजण व्हाटसप्प वापरत नव्हता. आश्चर्य ना! तसे आरे चळवळीतले तरुण पण फक्त फेसबूक वापरतात. व्हाटसप्प नाही! प्रमुखाने ग्रुप चा उल्लेख करून ते ईबर्डवर प्रसिद्ध केले. मी जंगलवाला गणवेश घातला होता.

नंतर कोरोनाच्या वाऱ्या सुरू झाल्या त्या अजून थांबल्या नाहीत. मी जिथे विलंगीकरणात होतो तिथून दिसणारी वस्ती!

लोणावळा (29-30 12 21) माझ्या भाच्याच्या (चुलतबहिणीच्या मुलाच्या) लग्नाला अप्पर डेक रिसॉर्टला सकाळी 8 वाजता चुलतभावाच्या गाडीतून पत्नी व पुतण्यासह निघालो. मुलगा आदल्या दिवशीच हळद व संगीत कार्यक्रमासाठी गेला होता. एक्सप्रेस वेच्या फूड मॉल मध्ये नाश्ता करून लोणावळयानंतर अतिशय अरुंद मार्गावर चढत गाडी लोणावळयाच्या सर्वोच्च उंचीवर पोहोचली. हे रिसॉर्ट राजमाचीच्या श्रीवर्धन व मनरंजन या 2 जुळया किल्ल्यांच्या उंचीवर (जे रिसॉर्ट मधून पश्चिम दिशेला दिसतात.) आहे. भर दुपारी शहारे आणणारा गार वारा सुटला होता. आदल्या रात्रीचे तापमान 17 अंश सेंटीग्रेड! पोहोचल्यावर आधी आमच्या खोल्यांचा ताबा घेतला. मुलाने गरम पाणी आंघोळीला कसे मिळवायचे ते दाखवले. बंद करायची ट्रिक न कळल्यामुळे शोवरचे पाणी डायरेक्ट लग्नाच्या सदऱ्यावर! बाथरूममध्ये टॉवेल, साबण, शॉवर जेल हे आयटम तर होतेच पण त्या व्यतिरीक्त टूथब्रश व टूथपेस्ट ही होती. पाणी गरम करण्याच्या भांड्याबरोबर चहा, कॉफी, दूध पावडर, ग्रीन व ब्लॅक टी पावडर (पॉउच बुडवायचे) ठेवले होते. लग्नाला जाताना आधी 3 पायऱ्या खाली उतरायच्या, परत 13 पायऱ्या वर चढायच्या अशी व्यवस्था होती. दिवसभर असे नाचून माझ्यासारख्या करोनामुळे झालेल्या हृदयविकारी माणसाची चांगलीच दमछाक झाली. फोटोग्राफर्सकडे कॅमेऱ्याचे हातात पकडण्यासारखे अत्याधुनिक सटयांड होते. प्रत्येक हालचालीबरोबर फोटो काढणे, विडियो करणे चालू होते. या व्यतिरीक्त 1 ड्रॉन कॅमेराही होता. आम्हाला 4 वेगवेगळया रंगाच्या फेट्यांची चॉइस देण्यात आली. नंतर वरात! 100, 200, 500 रुपयांच्या नोटांनी समाधान झाले नाही. 2000 रुपयांच्या नोटा काढल्यावर बॅंड पथकाचे समाधान झाले. लग्नात नवीन

प्रथेप्रमाणे, हार घालताना मामा नवऱ्या मुलाला उचलून घेतो, जेणेकरून नवरीला वराला पटकन हार घालता येऊ नये. मग नवरीचा मामा तिला उचलतो. इथे माझ्या मुलाने व पुतण्याने वराला उचलले, पण त्यानेच मुहूर्ताच्या ऐन वेळेला मान खाली करून वधुकडून हार घालून घेतला. लग्नानंतर वधूपक्षाने वराचा बूट पळवण्याचा 'बूट' काढला. वरपक्षातील तरुणाईने वराभोवती कोंडाळे करून त्याला बूट बदलू दिले. वधूपक्षाने हातघाईची गर्दी करून चेंगराचेंगरी करून त्याचा 1 बूट पळवला. त्यात करवलीच्या हाताला खरचटले. तो 1 बूट परत करण्यासाठी वधूपक्षाने 1 लाख रुपये मागितले. वराने ते न देता वडलांचे बूट घालून तो गेला. दुसऱ्या दिवशी वधूपक्षाने तो फाटलेला बूट परत केला. कितीचे डील झाले माहीत नाही! दुपारचे जेवण विविधांगी होते. वरवधुचे जेवण आटपेपर्यंत संध्याकाळचे 6 वाजले. लंडनवरून आलेले 1 कुटुंब या थंडीतही तरणतलावात उतरले होते. नंतर चहा सँडविच बिस्किटांचा बेत झाला. रात्री केक कापल्यानंतर शेकोटीच्या बाजूला कार्यक्रम होते. प्रथम वराच्या कानात हेडफोन अडकवून त्यात मोठ्याने संगीत ऐकवले गेले. वधू काय बोलते ते त्याने लीप रीडिंग करून ओळखायचे. नंतर वाईस वरसा! त्यानंतर 10 वस्तु वरपक्षाने व वधूपक्षाने कूट प्रश्न सोडवून ओळखायच्या व आणून द्यायच्या असा खेळ झाला. त्यानंतर गाणी गाण्याचा कार्यक्रम होता. लंडनवरुन आलेल्या एका लहान मुलाने 'लाज लाजिरी' हे गीत आपल्या बोबड्या भाषेत म्हटले. बाकीची गाणी म्हणजे, मी जर माझ्या भसाड्या आवाजात गायलो असतो तर लोकांनी 'तोडलस मित्रा!' असे म्हटले असते, इतकी वाईट होती. फक्त माझा चुलतभाऊ व माझी पत्नी सुरात गायली. रात्रीचे जेवणंही चांगले होते.

सकाळचा नाशताही विविधांगी होता. 11 वाजेपर्यंत वधूवरांचा निरोप घेऊन आम्ही बाहेर पडलो. एक्सप्रेस हायवेवर फूडमॉलवर गेलो असता ख्रिसमस सजावटीसाठी लावलेली एक पुठ्ठयाची वस्तु माझ्या डोक्यात पडली पण फारशी इजा न होता दुपारी साडेतीन वाजेपर्यंत आम्ही घरी आलो. वाटेत मास्क न घातलेल्या कार प्रवाशांना मार्शलस हटकत होते.

सध्या तरी हीच माझी लास्ट ट्रीप! आता करोंनामुळे सुरू झालेला हृदयविकार डोंगर चढू देत नाही. बघू! पुढे काय होते ते!

नितांत पेडणेकर

९८७०३१०९६१

nitant.pednekar@gmail.com

वाचकांच्या प्रतिक्रिया

भिराचे वर्णन मारवलस आणि एक्झाक्ट! [भिरा- रायगड जिल्हा (1985)] बाय प्रशांत सुरावकर! नितांत, तुझी भटकंट्टी अचाट आहे. (निसर्गयात्री) बाय सुरेश पेडणेकर

छान आहेत सर्व लेख...फक्त एक जाणवते.. जसे आठवले तसेच्या तसे कागदावर उतरवले आहे... थोडी अलंकारीक भाषा वापरली असती तर अजून छान वाटले असते.. काही लेख खरोखर रंजक आहेत... असेच लिहित रहा... चांगला छंद आहे. बाय अपूर्वा पांजरी

जबरदस्त वाचन.. मानलं बॉ.. (मनोगत) बाय आशिष पेडणेकर

आज तो आपल्यात नाही, फक्त आठवणी सोबत आहेत. [सोलापूर (जुलै ऑगस्ट 2010), तुळजापूर] एक आगळा वेगळा अनुभव, खरंच काय दिवस होते ना ते? वाडी हुसैनी फार्म हाउस, भिवंडी, (ठाणे जिल्हा) (29 1 2011) बाय हितेंद्र ठाकूर वाडी हुस्सेनी सहलीविषयी

खूपच सुंदर लिहिले आहेस. छान! बाय महेंद्र थरवाल

वाह! अभिनंदन! पुस्तकांचा प्रवासही मस्तच! (मनोगत) बाय विशाल रणदिवे आणि सुहास शिवडवकर. अंगावर काटा आला! (भिरा) बाय सुरेश पेडणेकर

अरे देवा! किती पुस्तके वाचलीस? मला तर पुस्तकांची नावे वाचून दमायला झाले.... जबरदस्त वाचन! (मनोगत) बाय नंदिनी ओबेरॉय

नितांत! मला आठवते की तुझ्या थोरल्या भावाची यामाहा 350 सीसी बाइक होती जी डी एन नगर मध्ये पहिलीच होती. (गणेशचतुर्थीच्यांच दिवशी घर गाठायचे!) बाय जयंत कदम

खूप सुंदर लेख.... वाचत रहावेसे वाटले. बाय अपूर्वा पांजरी

इतका प्रवास अनुभव, वाह! नशीबवान आहात! बाय विशाल रणदिवे

आपला ५० वर्षांतला प्रवास व त्याहून महत्त्वाचे म्हणजे त्याच्या व्यवस्थित ठ्वलेल्या नोंदी पाहून ग्रेट वाटले. एवढी व्यवस्थित नोंद अगदी मंत्री किंवा उद्योगपतीच ठेवत असतील. आपल्याला सलाम! सुनील सामंत
टीम ई साहित्य

असे अचानक सोलापूरला जाण्याचे धाडस
तूच करु शकतोस. वर्तुळा बाहेरच्या गोष्टी करणे, हा तूझा छंद दिसतो.
शंन्नाची टानजेनट कथा आठवली. [सोलापूर (जुलै ऑगस्ट 2010), तुळजापूर] बाय सुरेश पेडणेकर

स्वच्छंदी असणे चांगले पण कॉल लेटर विसरणे, अनाकलनीय! [बडोदा: (1988-89)], रीअली थ्रिल्लिंग! [भिवपुरी धबधबा (17 7 16)] बाय सुरेश पेडणेकर

ई साहित्य प्रतिष्ठान

esahity@gmail.com

www.esahity.com

Always believe that something
wonderful is about to happen by Nitant